यक्षांची देणगी

जयंत नारळीकर



यक्षांची देणगी

यक्षांची देणगी

◊

जयंत नारळीकर

◊

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन २६५

पहिली आवृत्ती मार्च १९७९
दुसरी आवृत्ती नोव्हेंबर १९८३
तिसरी आवृत्ती नोव्हेंबर १९९३
चवथी आवृत्ती सप्टेंबर १९९७
पाचवी आवृत्ती जून २००१
सहावी आवृत्ती जुलै २००३
सातवी आवृत्ती फेब्रुवारी २००७

© २००७, जयंत नारळीकर

मुखपृष्ठ वसंत सरवटे

ISBN 81-7486-613-2

प्रकाशक
संजय वि० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
माधव द० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

◇

मला लहानपणी असंख्य गोष्टी सांगणाऱ्या आईस

सौ० ताईस

सप्रेम भेट

◇

अनुक्रम

◇

प्रास्ताविक : सात

◇

यक्षांची देणगी : १
कृष्णविवर : ३५
उजव्या सोंडेचा गणपती : ४४
गंगाधरपंतांचे पानिपत : ६४
धूमकेतू : ८८
पुनरागमन : १०६
दृष्टीआड सृष्टी : १२४
घोंडू : १३०
पुत्रवती भव : १५०
ट्रॉयचा घोडा : १७३
नौलखा हाराचे प्रकरण : १८२
अखेरचा पर्याय : २०४

◇

परिशिष्ट : २३१

प्रास्ताविक

"ऑगस्ट १९७४. खगोलशास्त्रावरच्या एका परिसंवादात एका वक्त्याचे कंटाळवाणे भाषण चालू होते. अध्यक्ष बिचारे ओढूनताणून आपले लक्ष भाषणावर केंद्रित करायचा प्रयत्न करत होते. श्रोत्यांत चुळबूळ, कुजबूज वगैरे प्रकार सुरू झाले. अशा वेळी मी समोरचे लिहायचे पॅड उघडून भरभर काहीतरी खरडायला सुरुवात केली. मला पाहून कदाचित वक्त्याने निदान एक श्रोता तरी काळजीपूर्वक आपल्या भाषणाची नोंद करत आहे अशी गोड गैरसमजूत करून घेतली असेल. वास्तविक मी 'कृष्णविवर' ही माझी पहिली विज्ञानकथा लिहायला सुरुवात केली होती..."

प्रा० श्री० पु० भागवत यांनी प्रास्ताविकात 'मी विज्ञानकथा लिहायला कशी सुरुवात केली?' ह्या प्रश्नाची चर्चा करायची सूचना केली होती. त्या प्रश्नाचे वरवरचे उत्तर वरीलप्रमाणे देता येईल.

विज्ञानकथा लिहावी असे माझ्या मनात बरेच दिवसांपासून होते. 'कृष्णविवर'चे कथानक मनात घोळत होते. फक्त ही लिहायची नस्ती उठाठेव करावी का नाही हा प्रश्न होता. शेवटी, रिकामपणची कामगिरी म्हणून हाती घेतलेला हा उपक्रम सुदैवाने फार वेळ न घेता एकदोन दिवसांतच पुरा झाला.

"मला विज्ञानकथा का लिहावीशी वाटली?" ह्या प्रश्नाचे उत्तर मात्र तितके सरळ आणि संक्षिप्त नाही!

विसावे शतक हे विज्ञानयुग म्हटले जाते. आजकालच्या प्रौढ व्यक्तीला तिच्या आयुष्यात विज्ञानाने जगात घडवून आणलेले बदल दिसत आहेत.

गेल्या पन्नाससाठ वर्षांत मनुष्याच्या जीवनचर्येत जितके बदल झाले तितके त्यापूर्वीच्या दोन हजार वर्षांत झाले नाहीत हे पटवून द्यायला समाजशास्त्रज्ञाची आवश्यकता नाही.

परंतु विज्ञानाची ही गरुडझेप मानवसमाजाला पचलेली दिसत नाही. एकीकडे विज्ञानाच्या देणग्या भरमसाट वापरण्यासाठी मानव उत्सुक आहे; पण त्यासाठी ताळतंत्र सोडून, ह्या देणग्या किती प्रमाणात वापराव्यात, प्रदूषणासारखे गैरफायदे कसे टाळावेत वगैरे प्रश्नांचा विचार त्याने केलेला नाही. एकीकडे विज्ञानाने घडवून आणलेले चमत्कार तो स्वतःच्या डोळ्यांनी पाहतो तर दुसरीकडे अंधश्रद्धा, तथाकथित चमत्कारांवर विश्वास, पुराणकाळापासून चालत आलेल्या भ्रामक समजुती सोडून द्यायला तो तयार नाही.

'विद्ययाऽमृतमश्नुते' ह्या धर्तीवर विद्येनेच मानव विज्ञान पचवू शकेल असे म्हटले पाहिजे. वैज्ञानिक शोध आणि त्यांचे तंत्रज्ञानात झालेले रूपांतर मानवसमाजाला कोणीकडे खेचत आहे याची सामान्य माणसाला जाणीव असली पाहिजे. ही जाणीव निर्माण करायची जबाबदारी मूलतः वैज्ञानिकांवर पडते. शिवाय आजकालच्या दिवसांत वैज्ञानिक संशोधनाला लागणारा प्रचंड पैसा पुरवण्याचे काम सरकार (म्हणजे सामान्य कर भरणारा नागरिक!) करते. जे आपल्याला पैसा पुरवतात त्यांना तो कोणत्या कामासाठी वापरण्यात येतो ते जाणून घ्यायचा हक्क नको का?

वर नमूद केलेला दुसरा मुद्दा वैज्ञानिकापुरता मर्यादित नाही. अंधश्रद्धांवर उपाय म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन—म्हणजे नीट तपासणी करूनच एखाद्या गोष्टीचा स्वीकार करणे. हा दृष्टिकोन वैज्ञानिक संशोधनाच्या मुळाशी असला तरी तो जीवनात इतरत्रही लागू पडतो. वैज्ञानिकच नाही तर प्रत्येक विचारवंताला ह्या दृष्टिकोनाचा वापर करण्याचा अधिकार आहे. कित्येक वैज्ञानिक प्रयोगशाळेत हा दृष्टिकोन वापरून बाहेर तो विसरतात हा मनुष्यस्वभावाचा एक अभ्यसनीय पैलू आहे. विज्ञानाचा जागरूकपणे वापर करताना हा दृष्टिकोन मानवसमाजाला अनिवार्य आहे. म्हणून हा दृष्टिकोन जनसामान्यापर्यंत पोचवायचे काम वैज्ञानिकांचेच नव्हे तर प्रत्येक विचारवंताचे आहे.

विज्ञानाची माहिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा प्रचार आवश्यक आहे हे गृहीत धरले तर ते काम कोणी आणि कसे करावे? लेख, भाषण, वर्तमान-

पत्रे, रेडिओ, टी० व्ही० अशांसारखी अनेक माध्यमे उपलब्ध आहेत. पण दुर्दैवाने ह्या बाबतीत वैज्ञानिकांत एक प्रकारची उदासीनता दिसून येते.

अनेक वैज्ञानिकांना आपल्या संशोधनाची किंवा एकंदर विज्ञानाची माहिती सामान्य माणसापर्यंत पोचवण्याचे काम कमीपणाचे वाटते. "हा थिल्लरपणा करायला आम्हांला वेळ नाही", "आमचे संशोधन सामान्य माणसाला कळेल अशी त्याची बुद्धीची पातळी नाही", "हे काम मला नीट करता येणार नाही" अशा तऱ्हेची कारणे ऐकायला मिळतात. ह्यांपैकी तिसरे कारण एक वेळ पटण्याजोगे आहे. अमुक एक माहिती सोप्या शब्दांत सांगण्याची कला सगळ्यांनाच साध्य होते असे नाही.

पण पहिल्या दोन कारणांत मला स्वयंशिष्टतेचा भास होतो. खुद्द आइन्स्टाइनने आपली 'रिलेटीव्हिटी' इतरांना समजावी ह्यासाठी सोप्या शब्दांत पुस्तके लिहिली आणि भाषणे दिली. एडिंगटन, जेम्स जीन्स यांच्यासारख्या नामवत खगोलशास्त्रज्ञांनी आपले ज्ञान जनसामान्यापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला. जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र वगैरे विज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांत आपल्या संशोधनाने नाव कमावलेल्यांनी ही कामे केलेली आहेत. अगदी अलीकडल्या काळात सर फ्रेड हॉयेल यांच्यासारखे शास्त्रज्ञ हे काम करण्यात कमीपणा समजत नाहीत. म्हणून ज्यांना शक्य आहे त्यांनी हे काम करण्यासाठी पुढे यावे असे मला वाटते.

माझ्या मते ह्या कामासाठी विज्ञानकथा ह्या तंत्राचा बराच उपयोग होईल. महिलारोप्य शहराचा राजा अमरशक्ती आपल्या तीन नाठाळ मुलांना साचेबंद शिक्षण देण्याचा अयशस्वी प्रयत्न करून थकला. शेवटी त्याने विष्णुशर्मा नावाच्या पंडिताकडे धाव घेतली. विष्णुशर्म्याने गोष्टींच्या माध्यमाने त्या मुलांना शास्त्रनिपुण करून दाखवले. आणि त्या शिकवणीतून 'पंचतंत्र' जन्माला आले.

विज्ञानाची गोळी जर कडू लागत असेल तर त्याला साखरेचे 'कोटिंग' म्हणजे कथेचे रूप देणे योग्य ठरेल. विज्ञानकथा अशा उद्देशाने लिहिल्या जाव्यात असे मला वाटते. निदान मी लिहितो त्या कथा तरी ह्याच उद्देशाने लिहिलेल्या आहेत.

विज्ञानकथा कशा असाव्यात, ह्या प्रश्नाचे उत्तर त्या कोणत्या उद्देशाने

लिहिलेल्या आहेत यात सापडते. मराठी साहित्यात ह्या कथातंत्राचा फारसा विकास झालेला नाही. त्याला मिळावी तितकी प्रतिष्ठा अजून लाभलेली नाही. परंतु पाश्चात्त्य देशांत मात्र परिस्थिती वेगळी आहे. जूल्स व्हर्न, एच० जी० वेल्स यांनी सुरू केलेल्या परंपरेला हातभार लावणारे अनेक विज्ञानकथालेखक झाले आहेत. आज तर विज्ञानकथा-कादंबऱ्यांचा खप विलक्षण असून अशा साहित्याला वाहिलेली नियतकालिकेदेखील आहेत. परंतु याचा अर्थ सर्वच विज्ञानकथा मी वर सांगितलेल्या उद्देशाची पूर्ती करतात असे नाही. ह्या दृष्टीने मी माझे स्वतःचे मत खाली मांडत आहे. ते सर्व विज्ञानकथालेखकांना पटेल असे नाही.

विज्ञानकथा मनोरंजक आणि विज्ञानाच्या दृष्टीने उद्बोधक असावी. सध्या माहीत असलेल्या विज्ञानावर किंवा त्यात स्वतःच्या कल्पनाशक्तीने भर घालून उद्याच्या विज्ञानाचे चित्र रेखाटण्याचा त्यात प्रयत्न असावा. आर्थर क्लार्क ह्या विज्ञानकथा-लेखकाने तीन दशकांपूर्वी उपग्रहावरून टेलिव्हिजन-प्रक्षेपणाची कल्पना मांडली होती. हा उपग्रह पृथ्वीच्या विशिष्ट भागावर तरंगत असेल अशा तऱ्हेने सोडण्यात यावा अशी त्यात योजना होती. ती साकार झालेली आज आपण पाहतो. फ्रेड हॉयेल यांनी आपल्या 'The Black Cloud' या पहिल्या विज्ञान-कादंबरीमध्ये अंतराळात, ताऱ्यांच्या दरम्यानच्या विस्तीर्ण प्रदेशात 'जिवंत' कृष्णमेघ असल्याची कल्पना केली होती. गेल्या पाचदहा वर्षांत अशा प्रदेशात जीवनाचे मूल घटक म्हणून समजले जाणारे रासायनिक रेणू सापडत आहेत.

अर्थात उपलब्ध माहितीच्या मर्यादेबाहेर पाऊल टाकताना वापरलेली कल्पनाशक्ती हे विज्ञानकथालेखकाचे एक कसब आहे. ते नेहमीच सफल होते असे नाही. तसेच 'ज्ञाता'पासून 'अज्ञाता'कडे जाताना वाटणारी भीती पण साहजिक आहे आणि तिचे चित्रण विज्ञानकथांत दिसून आल्यास आश्चर्य नाही. पण याचा अर्थ विज्ञानकथा म्हणजे निव्वळ भयकथा असावी असा नाही. भयकथा आणि त्यात विज्ञानाचे मांडलेले अघोरी स्वरूप मी वर नमूद केलेले उद्दिष्ट साध्य तर करत नाहीत, उलट त्या उद्दिष्टाला अनिष्ट असा त्यांचा परिणाम होतो.

प्रख्यात विज्ञानकथाकार रे ब्रॅड्बरी यांनी एका भाषणात असे प्रतिपादन केले

आहे की माणसाचे विसाव्या शतकातले जीवन म्हणजे एक प्रत्यक्ष घडलेली विज्ञानकथा आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या आपल्या पूर्वजांना आपले आजचे जीवन म्हणजे एक विज्ञानकथा वाटले असते. दिवसेंदिवस विज्ञानाच्या विविध क्षेत्रांत लागणारे शोध, त्यांचे घडलेले आणि संभाव्य दुष्परिणाम, शास्त्रज्ञांच्या मधले तणाव, शास्त्रज्ञ आणि समाज यांच्यातील तणाव इत्यादी विषय उत्तम विज्ञानकथांना भरपूर खाद्य पुरवू शकतील. त्यासाठी कसले तरी अमूर्त काल्पनिक भय वाचकांच्या मनात रुजवून भयकथा तयार करायची आवश्यकता नाही.

शास्त्रज्ञांनी विज्ञानकथा लिहाव्यात काय? एखाद्या शास्त्रज्ञाने विज्ञानकथा लिहायला घेतल्या की काही कुत्सित टीकाकार (हा मनुष्यस्वभावच आहे!) असे भाष्य करतात की बहुतेक लेखकाची वैज्ञानिक संशोधनक्षमता संपुष्टात आली असावी. मला इतरांचे अनुभव माहीत नाहीत, पण माझा स्वतःचा अनुभव असा आहे की आपल्या वैज्ञानिक संशोधनाला किंचितही धक्का न लावता फावल्या वेळात ही कामगिरी करणे शक्य आहे. ह्या बाबतीत मी माझे गुरू फ्रेड हॉयेल यांना आदर्श मानले आहे.

मी हा कथासंग्रह सादर करताना एक निवेदन करू इच्छितो. माझे शिक्षण उत्तर हिंदुस्थानात हिंदी माध्यमाच्या शाळेत झाले. पंधरा वर्षे मी परदेशात काढली. त्यामुळे माझा मराठीशी असावा तितका संपर्क राहिला नाही. म्हणून वाचकांनी माझ्याकडे एक सराईत लेखक म्हणून पाहू नये. उलट माझी प्रतिष्ठित लेखकांना विनंती आहे की त्यांनी ह्या क्षेत्रात शिरावे आणि त्याला प्रतिष्ठा मिळवून द्यावी. विज्ञानकथा लिहायला स्वतः विज्ञानसंशोधक असणे आवश्यक नाही. विज्ञानाची माहिती मनोरंजक स्वरूपात देणारी बरीच पुस्तके मराठीत नाही तरी इंग्रजीत उपलब्ध आहेत.

'कृष्णविवर'पासून ह्या कथासंग्रहापर्यंत येऊन पोचायला मला जे प्रोत्साहन सुदैवाने वेळोवेळी मिळत गेले त्याची थोडक्यात नोंद करणे आवश्यक आहे.

'कृष्णविवर' लिहून झाली त्या सुमारास मराठी विज्ञान परिषदेने आपल्या वार्षिक विज्ञानरंजक कथास्पर्धेची घोषणा केली. गंमत म्हणून मी ही कथा वेगळे, नारायण विनायक जगताप (माझ्या नावाच्या आद्याक्षरांचा उलटा क्रम असलेले) असे नाव घेऊन म० वि० प०कडे पाठवली. त्या कथेला पहिले पारितोषिक मिळाल्याचे जाहीर झाल्यावर मग परिषदेकडे पत्र पाठवून खऱ्या

नावाचा खुलासा केला. अशा तऱ्हेने पहिले प्रोत्साहन मराठी विज्ञान परिषदेकडून मिळाले आणि याबद्दल मी परिषदेचा आभारी आहे.

त्यानंतर लिहिलेली कथा 'उजव्या सोंडेचा गणपती' ही जरा बिचकतच 'किर्लोस्कर'कडे पाठवली. तिचा दिवाळी अंकासाठी स्वीकार करणारे उत्साहवर्धक पत्र श्री० मुकुंदराव किर्लोस्कर यांच्याकडून आले. तेव्हापासून मुकुंदरावांनी मला आणखी विज्ञानकथा लिहिण्यासाठी सतत प्रोत्साहन दिले. त्यांचे आभार मानणे औपचारिकपणाचे ठरेल. पण त्यांच्या प्रोत्साहनाला मी किती महत्त्व देतो हे येथे नमूद करायला त्यांची हरकत नसेल.

पण मला अनपेक्षित शाबासकी मिळाल्याचा आनंद झाला जेव्हा कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनात अध्यक्षा श्रीमती दुर्गाबाई भागवत यांनी माझ्या ह्या नवीन उपक्रमाचे स्वागत केले. दुर्गाबाईच्या विज्ञानकथेच्या विकासाबद्दलच्या अपेक्षा पूर्ण करायला अनेक लेखक पुढे येतील अशी मी आशा करतो.

वैयक्तिक रीत्या मला अनेकांनी प्रोत्साहन दिले. लंडनचे श्री० मधू अभ्यंकर, 'किर्लोस्कर'चे श्री० ह० मो० मराठे आणि श्री० अशोक पाध्ये, माझे आईवडील आणि पत्नी सौ० मंगला इत्यादी व्यक्तींनी मला वेळोवेळी कथा तयार होत असताना "अमुक भाग अवघड आहे तो सोपा करावा" "तमुक भागात वैज्ञानिक स्पष्टीकरण पाहिजे" वगैरे सूचना करून गोष्टींत सुधारणा घडवून आणल्या. अजूनही ह्या संग्रहातल्या गोष्टींवर वाचकांकडून रचनात्मक टीका झाली तर मला हवीच आहे.

'किर्लोस्कर', 'महाराष्ट्र टाइम्स', 'सुधन्वा', 'सृष्टिज्ञान' आणि 'मराठी विज्ञान परिषद पत्रिका' येथे प्रसिद्ध झालेल्या गोष्टींचे पुनर्मुद्रण करायची परवानगी दिल्याबद्दल त्यांच्या संपादकांचे आभार मानतो.

आणि शेवटी 'मौज'चे श्री० पु० भागवत यांचे आभार मानतो. 'मौज'-तर्फे हा संग्रह प्रसिद्ध झाल्यामुळे विज्ञानकथेला मराठी भाषेत प्रतिष्ठा लाभेल याची मला जाणीव आहे.

७०१ कुलाबा हौसिंग कॉलनी
होमी भाभा रोड,
मुंबई ४०० ००५

—जयंत नारळीकर

१ / यक्षांची देणगी

दोन फेब्रुवारीच्या 'पॅसाडीना हेरल्ड' वर्तमानपत्रात खालील अर्थाचा वृत्तांत त्याच्या विशेष शास्त्रीय प्रतिनिधीने दिला :

"काल रात्री येथील बेकमन ऑडिटोरियम श्रोत्यांनी भरून गेला होता. कॅलटेकचे शेकडो विद्यार्थी प्रवेश न मिळाल्यामुळे निराश होऊन परत गेले. ही न भूतो न भविष्यति अशी गर्दी होण्याचे कारण बेकमनमध्ये होणाऱ्या चर्चेचा विषय आणि त्यात भाग घेणारे दोघे वक्ते! चर्चेमध्ये कॅलिफोर्निया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील अभ्यागत प्राध्यापक सर रॉजर आर्मस्ट्राँग आणि लोकप्रिय विज्ञानकथालेखक बेन थॉमस ह्यांनी 'अतिप्रगत जीवसृष्टी' ह्या विषयावर आपापली मते व्यक्त केली. हे वक्ते कॅलटेकला नवे नाहीत. दोघांनी पूर्वी वेगवेगळ्या प्रसंगी येथे भाषणे करून श्रोत्यांच्या विचारशक्तीस बरेच खाद्य पुरविले आहे. पण कालचा जुगलबंदीचा योग पहिलाच आणि अविस्मरणीय होता.

चर्चेला रात्री आठला सुरुवात झाली. प्रथम सर रॉजर यांनी पृथ्वीपलिकडे अफाट पसरलेल्या विश्वाची खगोलशास्त्रीय माहिती स्लाइड्सच्या साहाय्याने करून दिली. नंतर तेथे जीवसृष्टी असण्याची आणि ती अनेक ठिकाणी मानवापेक्षा अतिप्रगत परिस्थितीला गेली असण्याची शक्यता त्यांनी बोलून दाखवली. पृथ्वीवरील मानवाच्या भवितव्याबद्दल मात्र प्रोफेसरसाहेब फारसे आशावादी नव्हते. जगात वाढत चाललेली लोकसंख्या, पृथ्वीवर उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक देणग्यांचा भरमसाट अपव्यय (आणि येथे त्यांनी अमेरिकेला जास्त दोष दिला), देशादेशांतील भांडणे, समाजातील बोकाळलेल्या कुटीर प्रवृत्ती ह्यांचा उल्लेख करून सर रॉजर म्हणाले : 'पुढच्या पाचसहा दशकांत ह्या

दोषांना काबूत आणणे शक्य झाले नाही तर मला मानवसंस्कृतीचे भवितव्य फार तर दोन शतके इतकेच असेल असे वाटते!' ह्या निराशावादी भवितव्याचे चित्र डोळ्यांपुढे आणण्याचा आम्ही प्रयत्न करत असतानाच एक आशेचा किरण दिसला बेन थॉमस यांच्या भाषणामध्ये. सर रॉजर यांच्या शास्त्रीय मुद्द्यांशी आपण पूर्ण सहमत आहोत असे प्रथमच सांगून बेन थॉमस यांनी 'मानवी स्वभाव' ह्यावर आपली मते मांडली. मानवी संस्कृती अनेक वेळा मोडकळीला येऊन टिकून राहिली आहे. तशीच आताही सध्याचे निर्वाणीचे संकट ओलांडून पुढे जाईल असा आत्मविश्वास त्यांना होता. त्यांना फक्त एकच भीती होती. समजा, एखाद्या अतिप्रगत जीवसृष्टीने येथे वसाहत करायचे ठरवले तर? 'देव करो आणि कोणाचे आपल्या पृथ्वीकडे लक्ष न जावो!' असे ते विनोदाने म्हणाले.

चर्चेमध्ये श्रोत्यांतील अनेक शास्त्रज्ञ, विद्यार्थी, साहित्यिक यांनी प्रश्न विचारून भाग घेतला. शेवटी रात्री अकरा वाजता 'ऑडिटोरियम बंद करायची वेळ आली' असे सांगून अध्यक्षांनी समारोपाचे भाषण केले."

वार्ताहराने वृत्तांताला मथळा दिला होता : "मानवा! सावध हो!!"

प्रेक्षागृह मोकळे झाले तरी श्रोत्यांमध्ये चर्चा चालूच होती. त्यांपैकी दोघेजण —विजय सिन्हा आणि ब्रायन लोगी—बोलत बोलत लेक ॲव्हेन्यूवरील कॉंटिनेंटल बर्गर स्नॅकबारमध्ये गेले. ब्रायन हा कॅलटेकमध्ये सीनियर रिसर्च फेलो असून खगोलशास्त्रात संशोधन करत होता. विजय कंप्यूटर-तंत्रज्ञ असून एका वर्षासाठी संशोधन करण्यास भारतातून आला होता. दोघे ३५-३६ वर्षे वयाचे होते आणि समानशील असल्यामुळे त्यांची मोठी दोस्ती झाली होती.

"मला सर रॉजरचे म्हणणे पटते." ब्रायन एक हॅंबर्गर खात उद्गारला. "आतापर्यंतचा अनुभव काय सांगतो? मोठे शास्त्रज्ञ, नाणावलेले विचारवंत, कवी, दार्शनिक अनेक देशांत होऊन गेले. त्यांनी मानवी संस्कृतीच्या भांडारात महत्त्वाची भर घातली. स्वतःचे नाव अमर केले. पण कुठल्याही देशाचा अनुभव पाहा. शेवटी त्या संस्कृतीचे भवितव्य हे श्रेष्ठ लोक ठरवत नाहीत. ते ठरवले जाते निकृष्ट श्रेणीच्या बहुजनसमुदायाकडून. रोमन साम्राज्याचे शेवटी काय झाले? ते जाऊन शेवटी बार्बेरियन्स आले की नाही?"

"कबूल; पण तेथे युरोपचा शेवट झाला का? पुढे त्याच ठिकाणी नवीन संस्कृती आली की नाही? मायकेल अँजेलो, लिओनार्डो दा विंची हे जिथे निर्माण होऊ शकतात तेथे हा निराशावाद कशाला?" विजय नेहमी आशावादी असे.

"चक्रनेमिक्रम हा सृष्टीचा नियम आहे, आणि तो मानवी संस्कृतीला लागू होतो हे मलाही मान्य आहे. पण कधीकधी इतकी खालची पातळी गाठली जाते की तेथून पुन्हा वर येणे शक्य होत नाही. अशी परिस्थिती पृथ्वीवरच्या मानवाची लवकरच होणार आहे." ब्रायन गंभीरतेने बोलत होता. "शिवाय आपण आपलाच विनाश केला नाही तर दुसरे करतीलच."

"दुसरे म्हणजे कोण?" विजयने पृच्छा केली.

"ते मलाही सांगता येत नाही!" ब्रायन मिस्कीलपणे हसला. "पण बेनच्या बोलण्याप्रमाणे मला कधीकधी वाटते की आपल्या ह्या समृद्ध ग्रहावर परकीय जीवसृष्टीचे डोळे रोखलेले आहेत. ते एखाद्या ग्रहावर किंवा ताऱ्यांच्या मधल्या अफाट जागेत कुठेतरी असतील. योग्य वेळी ते आपल्यावर आक्रमण करून आपले उच्चाटन करतील. मानवांनी राष्ट्राराष्ट्रामधले तंटे मिटवून एक झाले पाहिजे. फार वेळ उरलेला नाही."

"बरी आठवण केलीस! मलाच आज फार वेळ उरलेला नाही." चीज सँडविच संपवीत विजय उद्गारला. "मला माझा अहवाल आज रात्रभर जागून पुरा केला पाहिजे."

"कसला अहवाल?" बिलाचा कागद उचलत ब्रायनने विचारले.

"अरे, माझ्या इन्स्टिटयूटला नवीन कंप्यूटर विकत घ्यायचा आहे. माझ्या अहवालावर आणि शिफारशीवर कुठले मॉडेल घ्यायचे ते आमची फॅकल्टी ठरवणार आहे. आणि १ एप्रिलला नवीन आर्थिक वर्ष सुरू व्हायच्या आत ऑर्डर गेली पाहिजे."

"पण आज तर दोन फेब्रुवारीच आहे." घड्याळाकडे पाहत ब्रायन म्हणाला. नुकतेच बारा वाजून गेले होते.

"तुला भारतातली दिरंगाई माहीत नाही. सर्व काम वेळेवर व्हायला आज सकाळी माझा अहवाल गेला पाहिजे हवाई डाकेने. मी पहाटे तीनपर्यंत जागून हे काम पुरे करणार आहे!"

"तू बस खर्डेघाशी करत. मी तर आता ताणून देणार." घड्याळाकडे बघत ब्रायनने जांभई दिली. "मी पैज मारतो, तुमची कंप्यूटर ग्रांटच रद्द होणार. उगाच झोपमोड करून घेतोयस."

"शुभ बोल रे लोग्या—" विजय स्वतःशी पुटपुटला. पण त्याची मुद्रा विचारग्रस्त होती.

अहवालाचे परिष्करण करून तो पक्का होईपर्यंत रात्रीचे तीन वाजायला आले. रिपोर्टबरोबर आपल्या प्रोफेसरांना पाठवायचे पत्र सकाळी लिहायचे ठरवून विजयने साडेसातचा गजर लावला. झोपायच्या तयारीत असताना विजयला फोनची घंटा ऐकू आली. "सॉरी, रॉंग नंबर!" असे ऐकण्याच्या तयारीने विजयने फोन उचलला. "७९६-८९४७" त्याने आपला नंबर सांगितला.

"आपण डॉ० विजय सिन्हा का?" फोनमधून आवाज आला.

"होय. पण आपण कोण? आणि भलत्या वेळी कसला फोन करता?"

"माफ करा, तसदी दिल्याबद्दल! मी तुमचा रिपोर्ट पुरा व्हायची वाट पाहत होतो. तुम्ही तीनपर्यंत जागणार होता ना?"

"तुम्हाला कसे समजले?" विजयने आश्चर्याने विचारले.

"तुम्ही डॉ० लोगीबरोबर स्नॅक घेत असताना मी तुमच्या शेजारच्या टेबलाशी होतो. तुमचे संभाषण मुद्दाम प्रयत्न न करता कानावर पडले म्हणून म्हटले योग्य वेळी फोन करावा!"

बोलणारा लोचटपणाची कमाल करत होता. त्याच्या संभाषणावर अमेरिकन उच्चारांची छाप असली तरी तो मूळचा अमेरिकन नसावा असे विजयला वाटले. आपल्यावर पाळत ठेवणारा हा कोणी गुप्तहेर असेल का अशी त्याला शंका येऊन गेली. त्याने रागाने विचारले :

"ही कसली योग्य वेळ? आणि वाटेल त्या वेळी मला फोन करायला लाज नाही का वाटत?"

"पुन्हा माफी मागतो! पण परिस्थितीच जरा विचित्र आहे. तुम्ही तुमचा रिपोर्ट एक दिवस उशिरा पाठवला तर चालेल का? ते तुमच्या फायद्याचे ठरणार आहे. कृपा करून माझे ऐका."

"कमाल आहे! तुम्ही कोण मला सांगणारे? रिपोर्ट उद्या पाठवणे अत्यंत आवश्यक आहे." विजयला खूप झोप येत होती आणि हे संभाषण कसे थांबवावे त्याला कळत नव्हते. कारण हा माणूस उगीच गंमत म्हणून फोन करत नसावा असे त्याला वाटत होते.

"तिसऱ्यांदा तुमची माफी मागतो. मी उत्साहाच्या भरात रीतिरिवाज बरेच वेळा विसरून जातो. मी डॉ० सुलेमान रशीद. 'मिडिल ईस्टर्न कंप्यूटर्स' ह्या फर्मच्या इथल्या डायरेक्टर्सपैकी एक आहे. रिपोर्ट पाठवण्यापूर्वी आमचा नवीन कंप्यूटर तुम्ही पाहावा ही माझी विनंती आहे. मी आज केव्हाही तुम्हाला कंप्यूटर दाखवू शकतो."

अमेरिकन सेल्समनशिप किती जोरदार असते याची विजयला माहिती होती. ह्या पठ्याची चांगलीच जिरेल असे उत्तर विजयकडे होते. औपचारिक दिलगिरीच्या सुरात विजय म्हणाला,

"डॉ० रशीद! तुमचा गैरसमज झालेला दिसतो. कंप्यूटर कुठला घ्यायचा ते माझ्या हातात नाही. आमचे सरकार ग्रांट देताना आगाऊच कुठल्या कंपनीचा घ्यायचा ते सांगून टाकते. फक्त कुठले मॉडेल घ्यायचे हे ठरवण्याचे काम माझ्या इन्स्टिटयूटने मला दिले आहे."

"पण समजा, सरकारने ग्रांट रद्द केली तर? आम्ही आमचा कंप्यूटर—थोडयाशा अटींवर—तुम्हाला फुकट देऊ!" रशीदचा सेल्स टॉक चालू होता, "सरकारचे प्लॅन्स बदलू शकतात."

"ती शक्यता फार कमी आहे. सरकारने ग्रांट देण्याचे कबूल केले आहे. फक्त चेक यायचा काय तो बाकी आहे—बाकी सर्व फॉर्मॅलिटीज झालेल्या आहेत." विजय सिन्हाने ठामपणे सांगितले. "आता तरी जिरली लेकाची!" असे तो स्वतःशीच उद्गारला.

"बरे, मी तुम्हाला जास्त त्रास देत नाही. पण समजा, तुमची ग्रांट कॅन्सल झाली तर माझी आठवण ठेवाल का? माझा फोन नंबर देऊन ठेवतो."

रशीदची कटकट थांबवायला विजयने त्याचा नंबर लिहून घेतला आणि रिसीव्हर खाली ठेवला.

लवकरच त्याच्या खोलीतून घोरण्याचे आवाज येऊ लागले.

"करर्ऽऽऽकर्रऽऽ..."

टेलिफोनच्या घंटेने विजय जागा झाला. सकाळचे दहा वाजले होते. आपण गजर लावायला विसरलो—बरे झाले, फोनमुळे तरी जाग आली असे मनाशी म्हणत विजयने फोन उचलला.

"डॉ० विजय सिन्हा ?" फोनवरून मंजुळ आवाज आला.

"स्पीकिंग."

"दिस इज वेस्टर्न यूनियन, सर. आय हॅव ए केबल फॉर यू. मे आय रीड इट आउट ?" ऑपरेटरने विचारले. विजयने संमती देताच तिने संदेश वाचला :

"कंप्यूटर ग्रांट कॅन्सल्ड. पोस्टपोन युवर रिपोर्ट. लेटर फॉलोज."

खाली त्याच्या कंप्यूटर सेंटरच्या प्रमुखांचे—प्रोफेसर गुप्तांचे—पाठवणारा म्हणून नाव होते.

"डू यू वॉंट ए कॉपी इन रायटिंग, सर ?" ऑपरेटरच्या प्रश्नाने विजय भानावर आला.

"एस, प्लीज. थँक्स फॉर कॉलिंग." तो कसाबसा उद्गारला. ऑपरेटरचे "यू आर वेलकम" ऐकण्यापूर्वीच त्याने फोन बंद केला.

कंप्यूटरची ग्रांट रद्द झाली हे ऐकून त्याची फार निराशा झाली. नवीन कंप्यूटर कसा वापरायचा, त्यावर काय काय प्रयोग करायचे, याचे त्याने अनेक महिने रचलेले कल्पनांचे सर्व मनोरे कोसळून पडले. ही निराशा त्याची एकट्याची नव्हती. इन्स्टिटयूटच्या वेगवेगळया ग्रुप्सचे अनेक प्लॅन्स नवीन कंप्यूटरवर अवलंबून होते. जुना कंप्यूटर—त्याने इन्स्टिटयूट बाल्यावस्थेत असताना भरपूर काम दिले होते, पण आता त्याला ते पेलत नव्हते. एके काळी भरभर गणिते करण्यात नाणावलेला तो कंप्यूटर आता नवीन कंप्यूटर्सच्या जगात बैलगाडी म्हणून ओळखला जात होता. त्याच्यात सारख्या होणाऱ्या बिघाडांमुळे इन्स्टिटयूटचे लोक कंटाळून गेले होते आणि नवीन कंप्यूटरकडे डोळे लावून बसले होते. पण आता ?

सुन्न होऊन बसलेल्या विजयची नजर फोनजवळ पडलेल्या चिटोऱ्याकडे गेली. त्यावर लिहिले होते : डॉ० रशीद—714–456–2121.

हे नाव आणि टेलिफोन-नंबर कुठले असा प्रश्न त्याच्या डोक्यात येताक्षणीच

त्याला रात्रीचे संभाषण आठवले. "तुमचा कंप्यूटर रद्द झाला तर मला फोन करा" हा रशीदचा संदेश त्याला आठवला. त्याने असे म्हणावे आणि कंप्यूटर रद्द व्हावा ह्या दोन घटनांत काही संबंध असेल का? जास्त विचार करायच्या भानगडीत न पडता विजयने रशीदच्या नंबरची बटणे दाबली आणि त्याच्याशी संपर्क साधला.

"कोण, डॉ० सिन्हा का? मी तुमचा आवाज ओळखला." रशीदचा आवाज फोनवरून येत होता. विजयने त्याला कंप्यूटर रद्द झाल्याचे सांगितले.

"छान! म्हणजे आम्हाला आता चान्स मिळेल." रशीदच्या आवाजात आश्चर्यापेक्षा उत्साह जास्त आहे असे विजयला वाटले. तो पुढे बोलत होता, "आज आमचा कंप्यूटर पाहायला येता का? तुम्ही सांगाल त्या वेळी तुम्हाला आणायला येतो. मात्र मला तिकडे यायला एक तास लागेल."

"मग तुम्ही एक वाजता माझ्या ऑफिसमध्ये या." विजयने फोनवरून पत्ता सांगितला.

"बरोबर एक वाजता हजर होतो. तुम्ही ट्रायलसाठी काही कंप्यूटर-प्रोग्रॅम बरोबर घेऊ शकाल का? तुमच्या कॅलटेकच्या कंप्यूटरवर जे गणित सोडवायला एक तास लागतो ते आमच्या नव्या मॉडेलवर एका सेकंदात सोडवून देऊ. यात अतिशयोक्ती नाही—तुम्ही पाहाच." रशीदचा सेल्स टॉक परत सुरू होतोय असे विजयला वाटले.

विजयने स्वतःचे दोन आणि ब्रायन लोगीचे दोन असे चार कंप्यूटर-प्रोग्रॅम बरोबर घेतले. त्यांतला एक कॅलटेक कंप्यूटरने दोन तासांत सोडवला होता. जास्त वेळ घेणारा प्रोग्रॅम ब्रायनचा होता. त्यावरचे गणित पन्नास तासांचे असून तेवढा वेळ मिळत नाही म्हणून तो प्रोग्रॅम त्याला कॅलटेकच्या कंप्यूटरवर चालवायची संधी मिळाली नव्हती. बाकी तीन प्रोग्रॅम्समधल्या प्रश्नांची उत्तरे छापून आलेली विजयजवळ होती.

ठरल्या वेळी रशीद हजर झाला. दिसायला तो गोरटेला पण अरब देशातला असावा असे विजयला वाटले; मात्र त्याचा पोशाख, वागण्याची पद्धत ह्या सर्वांवर अमेरिकन छाप होती. लाल मस्टॅंगमध्ये विजयला बसवून त्याने गाडी सुरू केली—आणि त्याचबरोबर तोंडाची टकळीसुद्धा.

"प्रथम मी माझ्याबद्दल थोडेसे सांगतो. मी मूळचा मिडिल ईस्टमधल्या एका अलिफ संतूर नावाच्या लहानशा संस्थानातला आहे." संस्थानाचे नाव विजयला परिचयाचे नव्हते. "आमचा देश अगदी लहान, मागासलेला असला तरी शेखसाहेब खूप सुधारलेले, उदारमतवादी आहेत. आपल्या देशाने झपाट्याने पुढे जावे ही त्यांची इच्छा. त्यासाठी त्यांच्याकडे तैलजनित अपार संपत्ती आहे. मात्र त्या संपत्तीचा उपयोग भराभर पाश्चात्त्य तंत्रज्ञ आपल्या देशात न आणता, आपल्या देशातल्या लोकांनी परदेशी जाऊन शिकून यावे यासाठी ते करतात. दरवर्षी ते हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन परदेशी पाठवतात आणि शिक्षण पुरे झाल्यावर त्यांचा देशात सदुपयोग होईल यासाठी ते प्रयत्न करतात. माझी अशा विद्यार्थ्यांत निवड झाली.

माझा इलेक्ट्रॉनिक्सकडे कल होता आणि त्यातूनही कंप्यूटर्सच्या रचनेकडे. कंप्यूटर्स शक्य तितके वेगवान आणि जास्तीत जास्त माहिती साठवू शकणारे कसे निर्माण करता येतील ह्या प्रश्नाकडे माझे संशोधन मी केंद्रित केले. आज मी तुम्हाला दाखवणार आहे ते मॉडेल हे माझ्या संशोधनाचे फळ आहे."

रशीदचे बोलणे अव्याहत चालू होते. विजय फक्त ऐकण्याचे काम करत होता. पण त्याला राहवले नाही. तो उद्‌गारला, "जर तू सकाळी केलेले विधान खरे असेल तर तुम्ही एक अद्वितीय शोध लावलाय असे मी म्हणेन!"

त्यावर किंचित स्मित करून रशीद म्हणाला, "योग्य वेळी मी तुमचे अभिनंदन घेईन."

कार फ्री-वेवरून वेगाने मार्ग कापीत चालली होती. रस्ता विजयच्या परिचयाचा होता. पॅसाडिना फ्री-वेवरून सँटा ॲना फ्री-वेकडे रशीदने कार वळवली. काही वेळाने ॲनहाइम भाग आला. लॉस ॲंजेलिसच्या ह्या उपनगरामध्ये अनेक 'अम्यूजमेंट पार्क्स' आहेत. जॅपनीज व्हिलेज, डिस्नीलँडचा चंदेरी मॅटरहॉर्न डोंगर वगैरे विजयच्या परिचयाचे भाग येऊन गेल्यावर रशीदने हमरस्ता सोडला आणि तो एका छोट्या रस्त्याला लागला. काही वेळाने गजबजलेले भाग मागे पडले. संत्र्यांची लागवड दिसू लागली.

"एके काळी ही ऑरेंज-काउंटी संत्र्याच्या लागवडीसाठी प्रसिद्ध होती. आता उद्योगधंदे, ॲम्यूजमेंट पार्क, कारखाने वगैरेमुळे संत्र्यांची झाडे पाहायला

इतके लांब यावे लागते!" रशीद बोलतच होता. त्याने एका द्राक्षाच्या मळ्यात कार वळवली. "आम्हाला आमचा कारभार शक्य तितका गुप्त ठेवा-यचा आहे. नाहीतर ह्या मोठ्या अमेरिकन कंपन्या आमचे संशोधन पळवून त्यावर अपार संपत्ती कमावतील. म्हणून शेखसाहेबांनी हा मळा विकत घेऊन त्याच्यात माझ्या संशोधनाकरता प्रयोगशाळा बांधून दिली. वास्तविक हे झोनिंगच्या नियमाविरुद्ध आहे, पण आम्ही वातावरण प्रदूषित करत नाही."

कार एका चौरस बैठ्या इमारतीपुढे थांबली. आत जाण्याकरता अनेक 'सेक्युरिटी डिव्हाइसेस' होती. त्या संरक्षक यंत्रणांतून मार्ग काढत रशीदने विजयला आपल्या ऑफिसमध्ये आणले. "मी कॉफी करतो. तोपर्यंत तुम्ही तुमचे प्रोग्रॅम चालवून पाहा" असे म्हणून रशीदने विजयला शेजारच्या खोलीत नेले.

तेथे कंप्यूटर नव्हता—फक्त दोन टोकांना 'इनपुट टर्मिनल' आणि 'आउटपुट टर्मिनल' असे लिहिले होते. आणि तेथे दोन-दोन बटने होती. इनपुट टर्मिनलवर असलेले एक बटन रशीदने दाबताच तेथे एक कोनाडा तयार झाला. त्यात विजयची पहिल्या प्रोग्रॅमची कार्डे त्याने ठेवली. दुसरे एक बटन दाबताच तो कोनाडा बंद झाला. आणि लगेच आउटपुट टर्मिनलवर एक हिरवा दिवा उघडमीट करू लागला.

"तुमचा प्रोग्रॅम कंप्यूटरला मानवलेला दिसतो." रशीद म्हणाला.

"मग उत्तर केव्हा येणार?" विजयने विचारले.

रशीदने आउटपुट टर्मिनलकडे बोट दाखवले. तेथे हिरवा दिवा लागला होता. रशीदने आउटपुट टर्मिनलवरचे एक बटन दाबले. त्याबरोबर तेथे एक कोनाडा तयार झाला. त्यात विजयच्या प्रोग्रॅमचे उत्तर छापून तयार होते. प्रिंट आउटचे छापील कागद विजयकडे देऊन दुसरे बटन दाबून रशीदने तो कोनाडा बंद केला.

"तुमचे बाकीचे प्रोग्रॅम चालवून पाहा आणि मग आपण कॉफी घेऊ." असे म्हणून रशीद आपल्या ऑफिसमध्ये गेला.

विजयने 'प्रिंट आउट' तपासून पाहिला. कंप्यूटरने गणित बरोबर सोडवले होते. पण त्यावर 'टाइम ऑफ एक्जिक्यूशन' म्हणजे गणित सोडवायला लागलेला वेळ दिलेला होता तो पाहून विजयला आश्चर्याचा धक्काच बसला.

विजयचा प्रोग्रॅम कॅलटेकच्या कंप्यूटरने ५८ मिनिटांत सोडवला होता; रशीदच्या कंप्यूटरने त्याकरिता फक्त ·०८३ सेकंद म्हणजे जवळजवळ सेकंदाचा बारावा भाग इतकाच वेळ घेतला होता. म्हणजे कंप्यूटरच्या वेगाबद्दल रशीदने केलेले विधान अतिशयोक्तीचे नसावे.

विजयने आपला दुसरा प्रोग्रॅम आणि लोगीचा पहिला प्रोग्रॅम चालवून पाहिले. प्रत्येक वेळी त्याला तोच अनुभव आला. आणि शेवटी त्याने लोगीचा दुसरा प्रोग्रॅम—जो कॅलटेकच्या कंप्यूटरवर पन्नास तास चालला असता—कंप्यूटरमध्ये भरला.

जवळजवळ एका मिनिटाने आउटपुट टर्मिनलवरचा हिरवा दिवा लागला. विजयने बटन दाबून प्रिंट आउट काढला. अर्थात उत्तर बरोबर आहे की नाही हे कळायला मार्ग नव्हता. ते लोगीच ठरवू शकला असता. पण ते गणित सोडवायला लागलेला वेळ होता फक्त ५० सेकंद !

विजय अत्यंत उत्तेजित होऊन रशीदच्या ऑफिसमध्ये शिरला. "डॉ० रशीद ! यू आर ए जीनियस. मी तुमचे मशीन बघू शकतो का ?"

"थँक्स ! सध्या तरी मी तुम्हाला मशीन दाखवू शकत नाही. त्याबद्दल माफ करा. योग्य वेळ आली तर मी तुम्हाला आनंदाने माझे हे खेळणे दाखवीन."

"पण हा अप्रतिम कंप्यूटर आमच्या इन्स्टिटयूटला फुकट काय म्हणून देण्याची तुमची तयारी आहे ?" विजयला हा प्रश्न भेडसावत होता.

"त्यात आमचाही स्वार्थ आहे. चला, त्यासंबंधी आपण बोलू." रशीदने विजयला ऑफिसकडे नेले.

कंप्यूटरच्या प्रश्नावर काही महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी डायरेक्टरसाहेबांनी इन्स्टिटयूटची खास फॅकल्टी मीटिंग बोलावली होती. सव्वा अकरा वाजता फॅकल्टीचे सर्व सभासद आल्यावर डायरेक्टर बोलू लागले.

"सरकारी ग्रांट रद्द झाल्यामुळे आपल्याला नवीन कंप्यूटर मिळत नाही हे कळल्यावर आपल्या सर्वांची खूप निराशा झाली. पण देशाची आर्थिक परिस्थिती वाईट असल्यामुळे सध्यातरी त्या बाबतीत आपला नाइलाज आहे. परंतु एक आशादायक गोष्ट तीन दिवसांपूर्वी आमच्या निदर्शनास आली आणि म्हणून ही मीटिंग बोलावण्याचा मी निर्णय घेतला. त्यासंबंधी

आता प्रोफेसर गुप्ता तुम्हाला सविस्तर सांगतील.'' डायरेक्टरनी प्रो० गुप्तांच्याकडे नजर टाकली.

"सरकारी कंप्यूटर मिळण्याची शक्यता होती तेव्हा फॅकल्टीने डॉ० सिन्हांना कुठले मॉडेल घ्यायचे ह्यासंबंधाने रिपोर्ट तयार करायला सांगितले होते हे तुम्हा सर्वांना आठवत असेलच.'' प्रो० गुप्ता म्हणाले.

"हे डॉ० सिन्हा कोण?'' गणिताचे एक प्रोफेसर डॉ० सह्याद्री यांनी पृच्छा केली.

"डॉ० सिन्हा कंप्यूटिंग ग्रुपमध्ये फेलो असून सध्या कॅलिफोर्निया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलजीमध्ये एक वर्षासाठी संशोधनाकरता गेले आहेत.'' प्रो० गुप्तांनी खुलासा केला. "डॉ० सिन्हांचा रिपोर्ट येण्यापूर्वीच आपल्याला कंप्यूटर मिळत नाही असे समजले आणि मी त्यांना तशी केबल पाठवली. त्यानंतर मला तीन दिवसांपूर्वी डॉ० सिन्हांचे एक पत्र आले. त्यात एका मिडिल ईस्टर्न संस्थानातून आपल्याला काही अटींवर पण फुकट एक अद्ययावत नवीन कंप्यूटर मिळण्याची शक्यता आहे असे त्यांनी लिहिले आहे. त्या संस्थानाचे नाव इतक्यात मी सांगू शकत नाही—ते नंतर आपणा सर्वांना कळेलच. त्या संस्थानाचे आणि भारताचे संबंध उत्तम असल्यामुळे ही 'गिफ्ट' घेण्याबद्दल सरकारचा विरोध येणार नाही.''

"मी कालच दिल्लीला फोन करून ती खात्री करून घेतली.'' डायरेक्टरनी पुस्ती जोडली. "ज़ोपर्यंत सरकारी डिफेन्स प्रॉजेक्टसाठी तो कंप्यूटर दिवसातून दोन तास वापरण्यात येईल तोपर्यंत सरकार काही आक्षेप घेणार नाही.''

"मग ह्या कंप्यूटरदात्यांच्या अटी काय आहेत? इतक्या मोठ्या भेटीमागे अटी असणारच!'' सॉलिड स्टेट फिजिक्सच्या प्रोफेसर वैद्यांनी विचारले. कुठल्याही नव्या प्रॉजेक्टवर टीका करण्याबद्दल त्यांची ख्याती होती.

"कंप्यूटरची सर्व व्यवस्था त्यांच्या कंपनीतर्फे असेल. जरी कंप्यूटर इन्स्टिटयूटच्या आवारात असला तरी खुद्द त्याच्या खोलीत जायची परवानगी फक्त त्या कंपनीच्या स्टाफलाच असेल. स्टाफ म्हणजे एक मॅनेजर आणि दोनतीन असिस्टंट एवढेच असणार. आपल्याला लागणारा कंप्यूटरचा वापर त्या दोघांच्या तर्फेच होईल. ही पहिली अट आणि दुसरी अट म्हणजे, कंप्यूटर आपल्याला दिवसातून फक्त आठ तासच वापरायला मिळेल. त्यांतले दोन तास सरकारी

कामासाठी जाणार. म्हणजे उरले सहा तास. सकाळी ९ ते ११ सरकारी कामासाठी आणि सकाळी ११ ते संध्याकाळी ५ पर्यंत आपल्या वापरासाठी, असे वेळापत्रक ठरवता येईल." प्रो० गुप्ता म्हणाले.

"फक्त सहाच तास कंप्यूटर वापरायला मिळणार?" प्रो० वैद्य उद्गारले, "आपला जुना कंप्यूटर २४ तास आपल्याला वापरायला मिळत असे."

खुद्द वैद्यसाहेब कंप्यूटर वापरत नसले तरी हा मुद्दा सर्वांना जाणवला. डायरेक्टर म्हणाले, "कंपनीला सॉफ्ट वेअरवर बराच रिसर्च करायचा आहे. आणि त्यांना त्याकरिता एवढा वेळ लागणार आहे. आपल्याकडे या विषयाचे बरेच तज्ज्ञ असल्याने त्यांनी ही भेट आपल्या इन्स्टिटयूटला देण्याचे ठरवले आहे. मला वाटते, यात आक्षेपार्ह काही नाही. आता हा कंप्यूटर सहा तासांत काय करू शकेल ते प्रो० गुप्ता सांगतील."

"मला नाही वाटत आपली इन्स्टिटयूट रोज सहा तास ह्या कंप्यूटरला कामाला जुंपू शकेल. जुन्या कंप्यूटरशी तुलना करायचीच असली तर बैलगाडी आणि सुपरसॉनिक जेटचे उदाहरण मला सुचते." असे म्हणून प्रो० गुप्तांनी विजयकडून मिळालेले कंप्यूटरच्या कर्तबगारीविषयीचे आकडे सांगितले. ते ऐकून जाणकार लोकांनी आश्चर्याने डोळे विस्फारले.

"तुमच्याप्रमाणे मलाही आश्चर्य वाटले होते. पण डॉ० सिन्हांच्या रिपोर्टवर माझा पूर्ण विश्वास आहे. शिवाय काही कंप्यूटर-प्रोग्रॅम प्रत्यक्ष चालवून त्यांनी पाहिले आहेत." प्रो० गुप्ता शांतपणे म्हणाले.

"तसे असले तर आमचे खगोलशास्त्रातले कितीतरी कूटप्रश्न चुटकीसारखे सुटणार." खगोलशास्त्रज्ञ प्रो० राजदेरकर उद्गारले.

"मॉलेक्यूलर बायालॉजीतले आमचे बरेचसे प्रश्न पुढच्या पिढीच्या कंप्यूटरची वाट पाहत होते. हा कंप्यूटर तर चांगला दोन पिढ्या पुढे गेलेला दिसतो." त्या विषयाचे प्रोफेसर अहमद दाढी कुरवाळत म्हणाले.

"मी कधी कंप्यूटरच्या भानगडीत पडलो नाही; पण इतका वेगवान कंप्यूटर नंबर थिअरीतले काही महत्त्वाचे आकडे शोधायला नक्की उपयोगी पडेल." कधी फार न बोलणारे गणितज्ञ प्रो० लक्ष्मणमूर्ती हळूच उद्गारले.

"आणि 'फोर कलर प्रॉब्लेम'सारख्या काही प्रश्नांवरसुद्धा महत्त्वाचे संशोधन करता येईल." प्रो० सह्याद्रींनी पुस्ती जोडली.

डायरेक्टरनी प्रो० गुप्तांच्याकडे डोळे मिचकावून पाहिले. गणितज्ञ लोक कंप्यूटरकडे आतापर्यंत तुच्छतेने पाहत आले होते.

"पण मला नाही वाटत पहिली अट सरकारला पसंत पडेल." प्रो० वैद्यांनी आपली नापसंती चालू ठेवली. "सेक्यूरिटीच्या दृष्टीने त्या कंप्यूटर-रूममध्ये सरकारी इन्स्पेक्शन पाहिजे. सरकारकडून नीट माहीत करून घेतल्याशिवाय आपण पुढचे पाऊल टाकू नये."

"तो मामला सरकारचा आहे; आपला नाही." डायरेक्टर म्हणाले. "मी काल होम आणि एक्स्टर्नल अफेअर्स या दोन्ही मिनिस्ट्रींशी अगदी उच्च स्तरावर संपर्क साधला आणि त्यांना दोन्ही अटींची पूर्ण कल्पना दिली. ह्या कंप्यूटरसंबंधी त्यांच्याकडे त्या संस्थानाच्या शेखनी स्वतः सर्व माहिती पुरवली आहे आणि त्याच्या जोरावर त्यांनी आपल्याला—इन्स्टिटय़ूटला विरोध नसेल तर—कंप्यूटर घेण्याबद्दल परवानगी दिली आहे."

"मग हा एवढा शक्तिशाली कंप्यूटर पुष्कळ जागा व्यापणार असेल. त्याकरिता आपल्याला किती ऑफिस स्पेस खाली करून द्यावी लागेल?" प्रो० वैद्य यांचा विरोध करायचा शेवटचा प्रयत्न.

"मी डॉ० सिन्हांच्या रिपोर्टवरून अंदाज केला आहे की अवघी तीन ऑफिसेसची जागा कंप्यूटर आणि त्याच्यावर काम करणाऱ्यांना पुरी पडेल. आपला जुना कंप्यूटर त्याच्या पाचपट जागा घेतो."

प्रो० गुप्तांच्या या विधानापुढे प्रो० वैद्य यांचा विरोध पूर्ण कोलमडून पडला.

फॅकल्टीची नवीन कंप्यूटरला संमती घेऊन डायरेक्टरनी मीटिंग बरखास्त केली.

त्यानंतर तीन महिन्यांनी इन्स्टिटय़ूटमध्ये नवीन कंप्यूटरची स्थापना झाली. कंप्यूटरचा मॅनेजर खुद्द रशीद होता आणि त्याने स्वतःचे असिस्टंट म्हणून आपले तीन देशबांधव फरूक, कासीम व मन्सूर यांना बरोबर आणले होते. कंप्यूटरला सर्वांत वरच्या मजल्यावर टोकाच्या तीन खोल्या देण्यात आल्या होत्या. त्यांतल्या सर्वांत आतल्या खोलीत कंप्यूटर, मधल्या खोलीत रशीद आणि बाहेरच्या खोलीत फरूक, कासीम व मन्सूर असून कंप्यूटर वापरणाऱ्या बहुतेकांचा संबंध फक्त या तिघांशी येई. कंप्यूटर-प्रोग्रॅम पंच केलेली कार्डे घेण्याचे आणि

उत्तराचे छापील कागद देण्याचे काम त्यांच्याकडे ऑफिसमध्ये होई. रशीदपर्यंत प्रवेश मिळवणारे फार थोडे व्ही० आय० पी० होते. डायरेक्टर आणि प्रोफेसर गुप्ता यांच्याखेरीज विजयला तो मान होता. कॅल्टेकहून तो नुकताच परत आला होता आणि त्याला रीडर म्हणून बढती देण्यात आली होती. शिवाय नवीन कंप्यूटरशी इन्स्टिटयूटचे संधान ठेवण्याचे काम त्याचे होते. रशी-दशी त्याची मैत्री झाली होती. ते एकमेकांना अरेतुरे म्हणत.

इन्स्टिटयूटमधले लोक नवीन कंप्यूटरवर बेहद्द खूष होते. त्याला सहा तास सतत कामाला जुंपणे अशक्य होईल ही प्रो० गुप्तांची भविष्यवाणी कंप्यूटरने खरी करून दाखवली. "आज प्रोग्राम द्या आणि तीन दिवसांनी कदाचित तुमचे उत्तर आलेले असेल" ही जुन्या कंप्यूटरच्या ऑपरेटरची भाषा ऐकलेले लोक "नवीन कंप्यूटरवर प्रोग्रॅम देऊन झाला की लगेच उत्तर तयार" हे फरूकचे आश्वासन खरे आहे याची प्रचीती घेऊ लागले. खुद्द विजय सिन्हा आणि रशीद यांचे मैत्रीचे संबंध वाढत गेले. इन्स्टिटयूटमध्ये होणाऱ्या सॉफ्ट वेअर रिसर्चबद्दल रशीदला खूप उत्सुकता होती आणि त्याचा तो आपला कंप्यूटर सुधारण्यात उपयोग करत होता.

ही सर्व परिस्थिती समाधानकारक असली तरी एक गोष्ट विजयला सारखी खटकत होती. त्याने अद्याप कंप्यूटर पाहिला नव्हता. त्याविषयी त्याने रशीदकडे अनेक वेळा उत्सुकता व्यक्त केली होती; पण प्रत्येक वेळी रशीद विषय बदलून किंवा सबबी सांगून त्याला कंप्यूटर दाखवायचे टाळत असे. रशीदच्या खोलीतून कंप्यूटरकडे जाणाऱ्या वाटेचे दार नेहमी बंद असे. त्यावर सेफप्रमाणे दोन कॉंबिनेशनची कुलुपे होती. कंप्यूटरबद्दलची गुप्तता सुरुवातीपासून कसोशीने पाळण्यात आली होती. त्याची स्थापना झाली तेव्हा त्याचे वेगवेगळे यूनिट्स लहान लहान पॅकेट्समधून आले होते. सरकारच्या खास हुकुमावरून ते यूनिट्स कस्टम्सनी न उघडता आत येऊ दिले होते. त्या-मागे शेखसाहेबांचा शब्द असावा. त्या यूनिट्सवरून कंप्यूटर जोडायचे काम फक्त रशीदने केले असावे—आणि तेदेखील खोलीचे दार बंद करून.

आणि या बंद दारामागे संध्याकाळी ५ ते सकाळी ९ पर्यंत रशीदचे संशोधन चाले. त्याबद्दलदेखील तो चकार शब्द बोलत नसे. आपले महत्त्वाचे संशोधन दुसऱ्यांनी पळवू नये ही त्याची इच्छा असावी. का त्यामागे वेगळाच हेतू होता ?

कंप्यूटरची स्थापना होऊन वर्ष होऊन गेले. तेवढ्या वेळात इन्स्टिट्यूटमध्ये होणाऱ्या संशोधनाची ख्याती जगभर पसरली. तिथला कंप्यूटर वापरायला मिळावा म्हणून तथाकथित प्रगत देशांतले शास्त्रज्ञ मुद्दाम इन्स्टिट्यूटला भेट देण्याचे निमित्त करून यायला पाहू लागले. शेवटी त्यांचा ससेमिरा थांबवण्यासाठी डायरेक्टरना परवान्याची पद्धत चालू करावी लागली.

त्या सुमाराला इन्स्टिट्यूटमध्ये एक दुर्घटना घडली. तिथल्या बागेत काम करणारा एक माळी सखाराम ह्याला अचानक वेड लागले. तसा तो जरा तऱ्हेवाईक समजला जायचा. परंतु त्याला वेडाचा झटका आल्याचे कधी ऐकिवात नव्हते. एके दिवशी सकाळी तो नेहमीप्रमाणे कामावर आला आणि हिरवळ कापायला त्याने सुरुवात केली. एकाएकी त्याने काम करायचे बंद केले आणि जवळच असलेल्या समुद्रकिनाऱ्याकडे धाव घेतली. त्याच्या तोंडून असंबद्ध अशी भाषा बाहेर पडत होती. त्याच्या सहकाऱ्यांनी त्याला वेळीच पाहिले म्हणून तो वाचला. नाहीतर तो समुद्रात उडी मारण्याच्या बेतात होता. त्याला बाकीच्या माळ्यांनी कसेबसे धरून परत आणले, आणि एका खोलीत कोंडून ठेवले.

काही वेळाने त्याचा वेडाचा झटका ओसरला तरी त्याला स्मृतिभ्रंश झाला होता. अनेक उपचारांनंतरही तो बरा झाला नाही. शेवटी त्याला पेन्शन देऊन कायमची रजा देण्यात आली.

रशीदच्या ऑफिसमध्ये बसून त्याच्याशी गप्पा मारीत असताना विजयला इन्स्टिट्यूटचे रजिस्ट्रार शब्दे यांचा फोन आला.

"मला तुमच्याशी महत्त्वाचे आणि कॉन्फिडेन्शियल बोलायचे आहे. मी तुम्हाला तुमच्या ऑफिसमध्ये भेटू का ताबडतोब?"

"अवश्य! मी पाच मिनिटांत माझ्या ऑफिसमध्ये येईन. तुम्हाला सोयीचे असल्यास तुमच्या ऑफिसमध्येच भेटू का?" विजयने विचारले.

"नको! येथे सारखे फोनचे किंवा व्हिजिटर्सचे विक्षेप येत असतात. मीच तुमच्याकडे येतो." शब्द्यांचे हे नेहमीचे उत्तर असे.

रशीदचा निरोप घेऊन विजय आपल्या ऑफिसकडे आला तेव्हा शब्दे त्याची बाहेर वाटच बघत होते. विजयच्या ऑफिसमध्ये गेल्यावर दार नीट बंद

करून आणि खिडकीबाहेर कोणी ऐकत नाही याची खात्री करून ते विजय-समोर येऊन बसले.

"कसल्या 'कटा'ची बातमी लागलीय तुम्हाला?" विजयने विनोदाने विचारले.

पण शब्दे गंभीरपणे उद्गारले, "एक विलक्षण गोष्ट माझ्या कानांवर आली आहे. ती इतकी अविश्वसनीय आहे की तुम्हाला कन्सल्ट केल्याशिवाय डायरेक्टरना त्रास द्यावा असे मला वाटत नाही." विजयची प्रश्नांकित मुद्रा पाहून त्यांनी आपला नेहमीचा हळू आवाज आणखी मंद करून बोलायला सुरुवात केली : "आज सकाळी मी नेहमीप्रमाणे बागेचा राउंड घेत असताना माळ्यांचा फोरमन हरी पवार याने मला गाठले. हरी आणि सखाराम यांची मैत्री होती. सखारामच्या विचित्र स्वभावामुळे त्याचे इतरांशी फारसे पटत नव्हते, पण हरी मात्र त्याच्याकडून योग्य ते काम करून घेई. सखारामच्या वेड-प्रकरणामुळे हरी बराच अपसेट झाला होता. त्याच्या वेडामागे काहीतरी कारण असावे असे त्याला वाटत होते. त्यांच्या मते ते त्याला आज समजले आणि ते त्याने मला सांगितले. ती हकिगत अशी : सखारामला वेड लागले त्याच्या आदल्या दिवशी तो फार खुशीत होता. हरीने त्याला कारण विचारले. त्याने प्रथम बरीच टाळाटाळ केली, पण शेवटी त्याच्यानेच राहवले नाही. त्याला डॉ० रशीदनी शंभर रुपये बक्षीस दिले होते."

"रशीदने काय म्हणून एवढे मोठे बक्षीस दिले?" विजयने आश्चर्याने विचारले.

"मी पण हरीला हाच प्रश्न विचारला." शब्दे म्हणाले. "आणि हाच प्रश्न हरीने सखारामला विचारला! त्याचा खुलासा असा : त्या दिवशी सकाळी सखाराम फारूकच्या खोलीत फुले ठेवायला गेला. रशीदची खोली नेहमी बंद असते म्हणून तेथे आम्ही फुले ठेवत नाही. (इन्स्टिट्यूटच्या ऑफिसमध्ये सकाळी शोभेसाठी फुले ठेवायचा प्रघात होता.) परंतु त्या दिवशी त्याचे दार उघडे होते आणि रशीदने सखारामला आत बोलावले. काही खास प्रसंगासाठी त्याला गुलाबांचा गुच्छ हवा होता. इन्स्टिट्यूटच्या नर्सरी-मधून तसा गुच्छ मिळेल का असे त्याने सखारामला विचारले. सखारामने तसा गुच्छ त्याला आणून दिला. तेव्हा बक्षीस म्हणून रशीदने एक नोट त्याच्या

हातांवर ठेवली. ती सखारामच्या अपेक्षेप्रमाणे एकाची नसून शंभराची होती. त्याने ती चूक असेल म्हणून रशीदच्या निदर्शनास आणली. तेव्हा रशीदने 'दिलेले बक्षीस मी परत घेत नसतो' असे सांगून हसून त्याची बोळवण केली.

सखारामच्या वेडाचा ह्या घटनेशी काही संबंध असेल असे हरीला उगी-चच वाटत होते. म्हणून त्याने त्या दिवसापासून फरुकच्या ऑफिसमध्ये फुले ठेवण्याचे काम स्वतःवर घेतले. एखाद्या दिवशी रशीदशी गाठ पडेल आणि त्या प्रकरणावर थोडा आणखी प्रकाश पडेल असे त्याला वाटत होते. ती त्याची आशा आज पूर्ण झाली. आज सकाळी त्याला रशीद भेटला आणि त्याने परत गुलाबांच्या गुच्छाची मागणी केली. हरी तो गुच्छ घेऊन आला तेव्हा रशीद त्याच्या ऑफिसमध्ये नव्हता—पण कंप्यूटरच्या खोलीचे दार उघडे होते."

"मग, त्याला आत काय दिसले?" विजयची उत्सुकता अनावर झाली.

"तीच तर आश्चर्याची गोष्ट आहे!" शब्दे म्हणाले. "हरी म्हणतो, आत एक लहानसे टेबल असून त्यावर एक पोर्टेबल टाइपरायटरएवढे मशीन होते. बाकी खोली रिकामी होती. कंप्यूटर कॉन्सॉल, टेप यूनिट्स, मेमरी स्टोरेज यूनिट्स हा काही प्रकार नव्हता. पण हरीला आत डोकावून फार तर मिनिटभर झाले असेल, इतक्यात रशीद बाहेरच्या खोलीतून आला. त्याने चटकन कंप्यूटरच्या खोलीचे दार बंद केले आणि हरीकडून फुले घेऊन त्याची बोळवण केली—ह्या वेळी बक्षिसाशिवाय.

हरीला अशी दाट शंका येते की त्या खोलीत कंप्यूटरच नाही आणि हा सगळा खोटा कारभार आहे. त्याची तर खात्रीच आहे की काहीतरी जादू-टोणा करून रशीदने सखारामला वेड लावले.

त्याची हकिगत ऐकून मला मात्र रशीदबद्दल विलक्षण शंका येत आहेत. हरीच्या म्हणण्याप्रमाणे कंप्यूटर जर नसेलच तर इन्स्टिट्यूटच्या लोकांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. पण कंप्यूटरशिवाय त्यांचे प्रश्न बरोबर सुटतात कसे? आणि या सर्व प्रकारामागे उद्देश काय आहे? हरी म्हणतो त्याप्रमाणे तो जादूगार नसला तरी स्पाय तर नसेल? माझे डोकेच चालत नाही. म्हणून म्हटले, प्रथम तुम्हाला विचारावे."

"आहे खरी विलक्षण घटना." विजय उद्गारला. "हरी आता कुठे आहे?"

"तो कँटीनमध्ये जेवायला गेला आहे. तुम्हाला हवे असेल तर त्याला इथे बोलावून त्याच्याकडून परत सर्व घटना ऐकू या." हरीला पाचारण करण्यास रजिस्ट्रारसाहेबांनी फोनचा रिसीव्हर उचलला.

दहा मिनिटांनी हरी हजर झाला. शब्द्यांनी त्याला सकाळची हकिगत परत सांगायला आवाहन केले. हरीच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटले.

"कुठली हकिगत, साहेब ?"

"सखारामसंबंधी ! अरे, तू आज रशीदसाहेबांना भेटलास ना ?"

"नाही साहेब ! मी नेहमीप्रमाणे फरूकसाहेबांची फुले ठेवून आलो. रशीदसाहेब आज मला भेटले नाहीत."

शब्द्यांनी अनेक तऱ्हेने विचारून पाहिले. ती हकिगत घडली तरी नव्हती किंवा हरी ती पूर्ण विसरून तरी गेलेला होता.

शब्दे चरफडत निघून गेले, पण विजय सिन्हा ऑफिसमध्ये बसून राहिला. शब्द्यांनी सांगितलेल्या हकिगतीला दुजोरा मिळणे शक्य नव्हते. बाहेरून दड-पण आणल्यामुळे कोर्टातल्या साक्षीदारांनी जबान्या फिरवल्याचे त्याला माहीत होते. पण येथे जर रशीदने हरी पवारवर दडपण आणले असले तर त्याचा मागमूसही त्याच्या बोलण्या-चालण्यावर किंवा मुद्रेवर दिसला नव्हता. तो खोटे बोलत असता तर ते अनेक वर्षांच्या अनुभवावरून शब्द्यांनी नक्कीच ओळखले असते. मग खरा प्रकार काय होता ?

विजयला रशीदबद्दल नाना तऱ्हेच्या शंका-कुशंका येऊ लागल्या. तो एखाद्या शत्रुराष्ट्राचा (किंवा वरून मैत्री दाखवणाऱ्या राष्ट्राचा) गुप्तहेर तर नसेल ? पण मग कंप्यूटरशिवाय तो सर्व प्रश्न कसे सोडवून देतो ? रशीदच्या 'कंप्यूटर'वर प्रश्न भराभर आणि बरोबर सुटत होते याची ग्वाही द्यायला वेगवेगळ्या विषयांतले शास्त्रज्ञ आणि गणितज्ञ तयार होते. एवढा श्रेष्ठ दर्जाचा कंप्यूटर फक्त छोट्या टाइपरायटरएवढ्या जागेत कसा मावेल ? कदाचित —नाही, बहुतेक—हरीने बरोबर पाहिले नसावे.

कंप्यूटरच्या खोलीत जाण्याची विजयला अनिवार इच्छा झाली. जर रशीद आपल्याला कंप्यूटर पाहू देणार नसेल तर त्याला न सांगता आत प्रवेश मिळवला पाहिजे. रशीद किंवा फरूक कंप्यूटरजवळ नसतील अशी वेळ

शोधून काढली पाहिजे. आणि विजयला आठवले—तसा एक मौका लवकरच येणार होता.

पुढच्या आठवड्यात शेखसाहेब मुंबईस येणार होते; त्या वेळी रशीद आणि त्याचे सहकारी दोन दिवस पूर्णपणे त्यांच्या दिमतीला राहणार होते. स्थापना झाल्यापासून प्रथमच कंप्यूटर बंद राहणार होता—आणि चालक त्याच्यापासून लांब जाणार होते.

विजय शेखसाहेबांच्या आगमनाची उत्सुकतेने वाट पाहू लागला. शेखसाहेबांच्या आगमनाप्रीत्यर्थ मुंबईत अनेक समारंभ, मेजवान्या वगैरे कार्यक्रम होते. त्यासाठी विजयला पण आमंत्रणे होती. पण काहीतरी सबबी सांगून त्याने हजर राहण्याचे टाळले. ज्या रात्री खुद्द शेखसाहेब मेजवानी देणार होते त्या रात्री कंप्यूटरच्या खोलीत शिरकाव करून घ्यायचे त्याने ठरवले होते. त्या दिवशी दुपारी रशीदशी त्याची गाठ पडली.

"येणार ना आमच्या मेजवानीला? रात्री दोनपर्यंत चालेल. अरबी जेवणसमारंभ सावकाश चालतात." रशीदने म्हटले.

"नाही रे बाबा! मी डोकेदुखीची सबब सांगितली आहे; पण खरे म्हणजे मला रात्री उशिरापर्यंतच्या पार्ट्या आवडत नाहीत. मी रात्री दहालाच ताणून देणार. वाईट वाटून घेऊ नको. इन्स्टिट्यूटचे बिग शॉट्स येतीलच."

"मलाही नाही आवडत असले समारंभ. पण माझा नाइलाज आहे. शिवाय शेखसाहेबांचे माझ्यावरचे उपकार मी विसरू शकत नाही." असे म्हणून रशीद निघून गेला.

"रशीदसाहेबांच्या खोलीत एक महत्त्वाचा निरोप ठेवायचा आहे—जरा त्यांच्या खोलीची किल्ली देता का?" विजयने सेक्यूरिटी ऑफिसरला त्या रात्री अकरा वाजता विचारले. विजयला रशीदच्या खोलीत प्रवेश असे. शिवाय आता तो एक इन्स्टिट्यूटमधला एक महत्त्वाचा घटक झालेला होता. त्यामुळे किल्ली मिळायला त्रास पडला नाही. "साहेब, किल्ली मात्र लगेच आणून द्या. खरे म्हणजे मीच ती खोली उघडून द्यायला पाहिजे." सेक्यूरिटी ऑफिसर म्हणाला.

"अरे, तू कशाला दहा मजले वर येतोस? मी लगेच किल्ली परत आणतो. शिवाय नाइट शिफ्ट सुरू झाली आहे तेव्हा तुला इथेच राहणे जास्त जरुरीचे

नाही का ?" विजयने किल्ली घेऊन लिफ्टकडे धाव घेतली. पाच मिनिटांनी त्याने किल्ली परत आणून दिली, पण रशीदच्या खोलीचे दार उघडे ठेवून.

मोठे काम अजून व्हायचेच होते. कारण कंप्यूटरच्या खोलीवरचे भक्कम दार बंद होते. त्यावर कॉम्बिनेशनचे कुलूप आहे हे त्याला माहीत होते. त्यावरची दोन चक्राकार कुलुपे खोलीचे रक्षण करायला समर्थ होती.

विजयने पहिले चक्र पाहिले. खरोखर तेथे एकामागोमाग एक अशी दहा चाके होती. प्रत्येक चाकावर ० पासून ९ पर्यंत अंक आणि त्यावर फिरणारा पॉइंटर होता. प्रत्येक चाकाच्या योग्य अंकावर पॉइंटर ठेवला की ते कुलूप उघडेल असा विजयने तर्क केला. पण योग्य अंक कुठला? उत्तर माहीत नसेल तर १० × १० ... × १० (दहा वेळा दहाने गुणायचे) म्हणजे दहा अब्ज कॉम्बिनेशन्स चालवून पाहावे लागतील. सेकंदाला एक ह्या हिशोबाने-सुद्धा त्याला जवळजवळ तीनशे वर्षे लागली असती! विजयने थोडा अंदाजाचा फायदा घ्यायचा ठरवला आणि पुढच्या काही चाकांकडे निरखून पाहिले.

पहिल्या चाकावर ३ हा आकडा इतर आकड्यांच्या मानाने त्याला किंचित पुसट वाटला. त्यानंतरच्या चाकावर १ आणि त्याच्या मागच्या चाकावर ४ हे आकडे थोडेसे पुसट वाटले. त्यामागच्या चाकावरच्या आकड्याचा फरक पाहणे विजयच्या डोळ्यांना शक्य झाले नाही.

३ १ ४ ...

हे आकडे कुठे पाहिले असतील? विजयच्या मनात एक आशेचा किरण आला. त्याच्या लक्षात लगेच आले की गणितात अत्यंत उपयोगी पडणारा एक आकडा म्हणजे गोलाचा परिघ आणि व्यास ह्यांचे प्रमाण (Ratio), ज्याला π ह्या ग्रीक अक्षराचे नाव दिलेले आहे. त्याला आठवत होते—

π = ३·१४१५९ ...

पहिल्या कॉम्बिनेशनचे दहा आकडे म्हणजे π च्या मूल्यातले पहिले दहा अंक असतील का? विजयला दशांशापुढचे फक्त पाच अंक आठवत होते. आणखी चार अंक पाहिजे होते.

विजयने धावत जाऊन आपला पॉकेट कॅल्क्युलेटर आणला. त्यात 'π' चे बटन दाबले आणि खालील आकडे त्याच्यावर उमटले :

३·१४१५९२६५३

त्याचे मशीन दशांशापुढच्या एकोणीस जागा दाखवू शकत होते. पण विजयने फक्त नऊ जागांची माहिती मागितली होती—म्हणून त्यापुढच्या जागांवर शून्य आले. त्या दहा अंकांवर पॉइंटर फिरवताच कुलपातून कर्ऽऽ असा आवाज होऊन मग 'क्लिक' असा आवाज आला.

विजयने उत्सुकतेने दुसऱ्या कुलपाकडे धाव घेतली. पहिल्या कुलपाप्रमाणेच त्याला पहिले तीन आकडे :

२ ७ १

पुसट झालेले दिसले आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पसरले. त्याची हीच अक्षरे पाहण्याची अपेक्षा होती. कारण π प्रमाणेच दुसरा महत्त्वाचा आकडा म्हणजे 'e'. विजयने पॉकेट कॅल्क्युलेटरवर e चे बटन दाबले आणि त्याला उत्तर मिळाले :

२·७१८२८१८२८

हे दहा आकडे निवडताच दुसरे कुलूप पण उघडले आणि काही आवाज न करता कंप्यूटर रूमचे दार उघडले.

रात्रीचे बारा वाजले होते.

विजयने स्विच दाबून दिवा लावला. कंप्यूटररूमला खिडक्या नसल्याने आत कोणीतरी आहे हे बाहेरून कोणालाही कळणे शक्य नव्हते. खोलीत हरीने सांगितल्याप्रमाणे एक टाइपरायटरएवढे लहान यूनिट होते. उघड्या दाराने झाकल्या गेलेल्या भागात एका शेल्फमध्ये एक मायक्रोस्कोपसारखे यंत्र आणि एक बॉक्स होती. त्या बॉक्सशेजारी एक डायरीसारखे लाल पुस्तक होते. ह्या गोष्टी हरीला दारातून डोकावताना दिसल्या नव्हत्या.

टाइपरायटरसारखे यूनिट प्लगने इलेक्ट्रिक सप्लायशी जोडले गेले होते. त्याच्यातून गॅूंऽऽ असा आवाज येत होता आणि काचेच्या कव्हरखालून दिवे फ्लॅश होताना दिसत होते. हाच कंप्यूटर असावा हा विजयने तर्क केला. एवढा शक्तिशाली कंप्यूटर इतका लहान असेल ही त्याला कल्पना नव्हती. पण थोडा विचार करता ती कल्पनाशक्तीपलिकडली गोष्ट नाही हे त्याच्या ध्यानात आले.

त्याला आठवले कंप्यूटर वंशातले मूळपुरुष. दुसऱ्या महायुद्धानंतर त्यांचा

अवतार झाला. त्यांची यूनिट्स मोठी—असंख्य तारांनी जोडलेली—खोल्याच्या खोल्या व्यापणारी. त्यांचा वेग मात्र आजकालच्या कंप्युटर्सच्या मानाने फारच कमी—स्मरणशक्तीसुद्धा फार मर्यादित. पण त्यांना निर्माण करून मानवाने एक नवीन युग सुरू केले. त्याच्या शास्त्रीय शोधांमुळे कंप्यूटर्सचा आकार लहान होत गेला आणि त्यांचा वेग, स्मरणशक्ती आणि आकडे संग्रह करण्याची क्षमता वाढत गेली. त्याचा पॉकेट कंप्यूटर हा त्याच प्रगतीच्या मालिकेतला एक मणी होता. तळहातावर मावेल असा तो, पण त्याच्यात किती माहिती भरली होती! त्याने तो प्रथम हाताळला तेव्हाच तो पुटपुटला होता, "करमध्ये सरस्वती!"

ट्रांजिस्टर्समुळे हे शक्य झाले. त्यापुढची पायरी कोणती? आणि त्यानंतरची? हा रशीदचा कंप्यूटर तर साक्ष देत होता की मानवाला बरीच पुढची पायरी साध्य झाली आहे. "काय बेट्याला मंत्र मिळालाय कुणास ठाऊक!" विजयमधल्या संशोधकाला हेवा वाटला. पण ही कंप्यूटर्सची वंशावळ कोठपर्यंत जाणार होती? त्याला पूर्वी वाचलेला 'रघुवंश' आठवला. कंप्यूटरवंशात दिलीप, रघू आणि अज झाले—आज आपण पाहतो तो रामावतार आहे का, अशी एक कल्पना त्याच्या मनात येऊन गेली.

पण कविकल्पनांना वेळ नव्हता. आणि कंप्यूटरची पेटी उघडून पाहण्याचे साधन दिसत नव्हते. विजयने बाकीच्या गोष्टींकडे लक्ष वळवले.

मायक्रोस्कोपचे तसले यंत्र त्याने पूर्वी पाहिले नव्हते. त्याच्या आय-पीसमधून त्याने पाहिले. त्याला एक लहानसे इलेक्ट्रिक सर्किटसारखे दिसले. पण त्याची रचना अत्यंत गूढ असून त्याच्या परिचयाची नव्हती. ते सर्किट मुळात किती लहान असेल याचा त्याला अचंबा वाटला. त्याच्या माहितीप्रमाणे अजूनपर्यंत इतकी लहान यूनिट्स तयार करण्याची क्षमता कुठल्याही देशाने आत्मसात केली नव्हती. रशीदच्या कंप्यूटरमागे बहुतेक हेच नवीन तंत्रशास्त्र असणार हा त्याने तर्क केला. त्या यंत्राशेजारची बॉक्स बंद होती आणि त्याला ती उघडता आली नाही. शेवटी तो लाल डायरीकडे वळला.

डायरी त्याच वर्षाची होती आणि त्यात पुढच्या महिन्यातल्या नोंदी होत्या. त्या पाहून विजयला आश्चर्य वाटले. कारण त्यात प्रत्येक तारखेपुढे मुंबईत घडणाऱ्या मोठ्या घटनांपैकी सार्वजनिक समारंभांची नोंद होती. प्रत्येक

समारंभाचे स्थळ, वेळ, अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, वक्ते इत्यादी गोष्टी उपलब्ध असतील तशा दिल्या होत्या. काही नावांमागे ५ फुल्या, काहींवर ४ फुल्या तर काहींवर १, २ किंवा ३ फुल्या होत्या. लिहिणाऱ्याने बहुतेक नावांचे व्ही० आय० पी० ह्या नात्याने वर्गीकरण केले असावे. कारण राष्ट्राध्यक्ष आणि पंतप्रधान यांच्याच नावांमागे फक्त ५ फुल्या होत्या.

प्रथम विजयला वाटले की हा काही तरी राजकारणी डाव असावा. पण सर्व नावे आणि फुल्यांचे वर्गीकरण पाहून त्याने ती शक्यता काढून टाकली. कारण सर्व राजकारणी पक्षांचे लोक, शिवाय राजकारणात भाग न घेणारे पण इतर कारणाने जनतेपुढे येणारे लेखक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील इत्यादी पेशांतले लोक पण त्या नोंदींत होते. त्या सर्व व्यक्तींचा नाश करून समाजाला किंकर्तव्य-विमूढ करायचा तर हा डाव नसेल? पण विजयची ही शंका पण दूर झाली. कारण डायरीवरच्या तारखा पाहताच त्यांपैकी काही सार्वजनिक सभारंभ सुखरूप पार पडले होते हे त्याच्या लक्षात आले. मग इथे कुठली डाळ शिजते आहे?

पण विजयला तर्क करायला वेळ मिळाला नाही. त्याला 'क्लिक' असा आवाज ऐकू आला आणि त्याने चमकून मागे वळून पाहिले.

दार बंद झालेले होते आणि तेथे रशीद उभा होता.

"तू इतक्या लवकर परत आलास? मला वाटलं, तू निदान दोनपर्यंत तरी शेखसाहेबांकडे असशील." आपला आवाज शक्य तितका 'नॉर्मल' ठेवून विजय उद्गारला. आपल्या चौर्यकर्माला रशीद काय शिक्षा करणार ह्या चिंतेत तो होता.

काही न बोलता रशीद प्रथम मायक्रोस्कोपशेजारच्या बॉक्सकडे गेला. ती त्याने उघडून पाहिली आणि बंद करून विजयकडे परत आला. त्याच्या चेहऱ्यावर स्मित होते—त्यामागे दगा होता का? विजय सावध होता.

"प्रथम माझे कॉंग्रॅट्स—येथे प्रवेश मिळवल्याबद्दल." विजयशी शेक हॅंड करत तो म्हणाला. "मी दारांची कॉंबिनेशन्स एखाद्या गणित शिकलेल्या चोरालाच समजतील अशा तऱ्हेची ठेवली होती. तू ती शोधून काढलीस ही मला आश्चर्याची गोष्ट वाटत नाही. तसेच माझे येथे येणे हे अचानक झालेले नाही."

"म्हणजे मी आज येणार हे तुला माहीत होते?" आपण एका सापळ्यात चालून आलो हे विजयला उमगले.

"नाही! तू आजच येशील ही अपेक्षा नव्हती; पण तुझी चौकस बुद्धी तुला लवकरच येथे आणेल ही मला खात्री होती. आणि मी तशी व्यवस्था करून ठेवली होती. माझ्याशिवाय कोणीही दुसरे ह्या खोलीत आले तर ते रिमोट कंट्रोल ट्रान्समिशनने मला कळते. एखाद्या जवाहिऱ्याचे दुकान फोडून चोर आत घुसले तर पोलिसांना कसे समजते? तेच टेक्निक पण पुष्कळ सुधारलेल्या स्वरूपात मी वापरले आहे." रशीदच्या चेहऱ्यावरचे स्मित कायम होते.

"बरे तर मग, मला तू कुठली शिक्षा करणार आहेस?" विजयने पृच्छा केली. त्याने वाचलेल्या अनेक 'सस्पेन्स'च्या गोष्टींत खलनायक हीरोसाठी अनेक तऱ्हेच्या विलक्षण क्रूर शिक्षांचे आयोजन करीत. त्याचा विचार ओळखूनच रशीद म्हणाला,

"मी तुला कुठलीही क्रूर शिक्षा करणार नाही—काळजी करू नको. ते तुला ओघाओघाने कळेलच. मी ज्या पातळीवर काम करतो तेथे ठार मारणे किंवा टॉर्चर करणे असल्या मार्गांना वाव नसतो."

"पण वेड लागण्याला किंवा स्मरणशक्ती जायला मात्र असतो!"—विजय मनाशी म्हणाला. उघडपणे मात्र त्याने विचारले,

"मग त्यापूर्वी माझ्या चौकस बुद्धीच्या काही प्रश्नांना उत्तरे देशील का? तुझे काम काय आहे? मला वाटत होते तसा साधासुधा संशोधक तर तू खचित नव्हेस. त्या लाल पुस्तकावरून तू एक प्रकारचा गुप्तहेर असावास—पण कुठल्या देशाचा? आमच्या देशावर तुझा काही कारणामुळे राग आहे का? आणि हा अत्युत्कृष्ट कंप्यूटर तू खरोखर कशासाठी वापरतोस? कारण आमचे प्रोग्रॅम सोडवणे हा त्याच्या हातचा मळ आहे—त्याचा जन्म इतक्या सोप्या प्रश्नांसाठी झालेला नाही हे मी खात्रीपूर्वक सांगतो."

"तू विचारलेल्या सर्व प्रश्नांची—शिवाय तू आणखी विचारशील त्यांची—उत्तरे द्यायला माझी हरकत नाही. पण प्रथम मी तुला काय सांगतो ते ऐक आणि मग काही विचारायचे असल्यास विचार." असे म्हणून रशीदने विजयला त्या मायक्रोस्कोपमधून पाहायला सांगितले. विजय त्यातून पाहत

असताना रशीद म्हणाला, "तुला दिसते ते यूनिट एक मायक्रॉन*एवढे असेल जेमतेम."

"!!" विजय आश्चर्याने स्तब्ध राहिला. इतके गुंतागुंतीचे यूनिट इतके लहान कसे असेल? पण रशीदच्या मुद्रेवर आपण अतिशयोक्ती किंवा विनोद करतोय हा भाव नव्हता. तो पुढे बोलू लागला.

"ही सबंध टेक्नॉलजी बिलकूल नवीन आहे—भारतालाच नव्हे तर इलेक्ट्रॉनिक्समध्ये सर्वांत पुढे गेलो असे स्वतःला समजणाऱ्या देशांनादेखील. त्याच तंत्रविद्येवर तो टेबलावरचा कंप्यूटर तयार केलेला आहे. पण तुझ्या सुपीक डोक्याने हा अंदाज केला असणारच! पण तुला कल्पना नसेल—ते मायक्रोस्कोपखालचे यूनिट तयार करायला मला वर्षभर लागले. मुंबईत कंप्यूटर आल्यापासून मी ते परफेक्ट करायचा प्रयत्न करतोय. ते यूनिट ह्या कंप्यूटरच्या मदतीने मानवी मेंदूचे काम करू शकते. फार काय, अनेक बाबतींत ते मानवी मेंदूपेक्षा श्रेष्ठ आहे.

हे यूनिट कुठल्याही माणसाच्या शरीरावर असले की ह्या कंप्यूटरच्या साह्याने, तो माणूस पृथ्वीवर किंवा पन्नास हजार मैलांच्या सीमेपर्यंत आकाशात कुठेही असला तरी, त्याच्या मानवी मेंदूवर मी ताबा ठेवू शकतो. थोडक्यात सांगायचे म्हणजे त्याचा शरीरातला मेंदू निकामी करून त्याऐवजी हे यूनिट त्याची जागा घेते."

"म्हणजे ही ब्रेन-वॉशिंगची सुधारलेली—पुष्कळच पुढे गेलेली—आवृत्ती दिसते." विजयच्या डोक्यात एकदम कल्पना आली. त्याने विचारले, "मग तू सखाराम माळ्यावर हे युनिट वापरलेस का?"

रशीदच्या चेहऱ्यावर दुःखाची छटा येऊन गेली. "होय! त्या वेळी ते यूनिट प्रयोगात्मक अवस्थेत होते. माझ्याकडून काहीतरी छोटीशी चूक झाली आणि त्यामुळे त्या बिचाऱ्याचा मानवी मेंदू तर बिघडलाच पण ते यूनिट पण निकामी झाले. पण आता त्याच्या अंगावर नवे यूनिट बसवून मी त्याला परत पूर्ववत करू शकेन."

"कशावरून तुझे यूनिट आता परफेक्ट झाले असे तुला वाटते?" विजयने पृच्छा केली.

* १०,००० मायक्रॉन म्हणजे एक सेंटीमीटर.

"हरी पवार योग्य तो अनुभव विसरला की नाही? तो शब्यांना भेटायच्या आधीच मी त्याचे स्मृतिपटल पुसायला हवे होते—म्हणजे हे प्रकरण तुझ्यापर्यंत गेले नसते. पण बिचारे शब्दे! किती खोदून खोदून त्यांनी हरीला प्रश्न विचारले, नाही?" रशीद हसत म्हणाला.

"म्हणजे तू ते सर्व ऐकलेस?" आणि विजयला वाटले, आपण किती भोळेपणाचा प्रश्न विचारला! ह्या इलेक्ट्रॉनिक्सच्या सुपर-एक्स्पर्टला त्याची खोली 'बग' करणे म्हणजे हातचा मळ होता.

"होय—आणि पाहिलेसुद्धा!" रशीद म्हणाला. "ते प्रोटोटाइप यूनिट हरीवर बसवल्यावर मी आता हजारो यूनिट्स तयार केली आहेत. ती सर्व त्या बॉक्समध्ये आहेत."

"आणि त्यांचा उपयोग कोणावर करणार आहेस?" विजयने विचारले. त्या लाल डायरीतल्या नोंदींचा ह्याच्याशी संबंध असणार हा त्याने तर्क केला.

त्याची दृष्टी त्या डायरीवर रोखलेली बघून रशीद उद्गारला, "बरोबर आहे तुझा अंदाज. माझे पहिले प्रयोग मुंबईतल्या व्यासपीठांच्या मानकऱ्यांवर होणार आहेत. मी ते जास्त स्पष्ट करून सांगतो. जर एखाद्या देशावर प्रभुत्व गाजवायचे असेल तर एक मार्ग म्हणजे बळ वापरण्याचा. पण त्यामुळे प्राणहानी होते आणि त्याशिवाय अलिकडच्या युद्धाच्या साधनांमुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता असते. म्हणजे आक्रमक किंवा जेत्या लोकांना जिंकलेल्या प्रदेशावर वसाहत करणे अशक्य होऊन जाण्याची भीती असते. त्यामुळे आमच्या लोकांनी वेगळा मार्ग अवलंबला आहे. तो म्हणजे ब्रेन-वॉशिंगचा. आणि तो घडवून आणण्यासाठी माझी योजना झाली आहे."

विजयला प्रश्न विचारायचा होता, पण त्याला खुणेने थांबवून रशीद पुढे बोलू लागला :

"तुमच्या गीतेत म्हटले आहे : 'यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरो जनः। स यद् प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥' प्रत्येक मानवामध्ये विचार करायचे यंत्र—त्याचा मेंदू—असते, पण तो त्याचा वापर करतोच असे नाही. त्याचे बरेचसे व्यवहार 'कॉपी' केल्यासारखे होत असतात. अर्थात त्यामुळे समाजाचे कार्य सुरळीतपणे चालते आणि म्हणून ह्या बाबीकडे दुर्लक्ष केले जाते.

अमुक अमुक विषयावर जनमत घडवणे' हा प्रकार चालू असतो आणि त्यासाठी उपयोग केला जातो व्यासपीठाचा, रेडिओ-टेलिव्हिजनचा, आणि लेखणीचा. मी व्यासपीठापासून सुरुवात करणार, कारण तुमच्या देशात ती एक सोपी गोष्ट आहे. तुम्हा भारतीयांना भाषणे करायची आणि ऐकायची आवड फार. समजा, आज 'अ'चे भाषण आहे. त्याला 'ब' हा अध्यक्ष, 'क' हा आयोजक, 'ड' हा स्वागत करणारा, शिवाय समारोपाचे भाषण करणारा कोणीतरी, त्यामध्येच वाटले तर एक मुख्य पाहुणा... असे एक पाच-सहा लोक तरी व्यासपीठ भूषवतात. प्रत्येकाला 'दोन' शब्द बोलायचे असतात. 'अ' बिचारा आपल्याला केव्हा वेळ मिळतो याची वाट पाहत असतो..."

विजयच्या डोळ्यांपुढे मुंबईच्या टी० व्ही०ची ठराविक साच्याची बातमी आली. 'आज फलाण्या हॉलमध्ये अमुकतमुक परिषद भरली होती. त्याचे उद्‌घाटन करायला...हजर होते...प्रमुख पाहुणे होते...' विजय एकानंतर एक अशा प्रकारच्या बातम्या पाहून प्रथम प्रथम चरफडत असे; पण नंतर त्याने टी० व्ही० वरील बातम्या पाहणे बंद केले.

"ह्या तुमच्या व्यासपीठाच्या मानकऱ्यांवर माझे मेंदूचे यूनिट्स चढवणे अगदी सोपे आहे. त्या सर्वांना तुम्ही माळा घालता, गुच्छ अर्पण करता. सत्कार करण्याची ही पद्धत चांगली आहे; पण तेथेसुद्धा तुम्ही 'अती' करता. प्रत्येक संबंधित संस्थेने माळ किंवा गुच्छ दिलाच पाहिजे; नाहीतर झाली भांडणे सुरू. माळ घालताना किंवा गुच्छ देताना मला सहज हे यूनिट त्यांच्यावर चढवता येईल. आणि त्यानंतर हे सर्व लोक माझ्या हातच्या बाहुल्या होतील. त्यांच्याकडून मला हवे तसे जनमत तयार करता येईल.

तुमच्या देशात सामर्थ्य आहे, आत्मविश्वास आहे—पण सुप्त किंवा झोपलेल्या अवस्थेत. परकीय आक्रमण झाले की मात्र ते जागे होतात. आक्रमणाचा धोका गेला की परत तुमची आपापसातली भांडणे सुरू होतात. म्हणून आम्हाला आक्रमण न करता तुमच्यात शिरकाव करायचा आहे. माझ्या स्कीमचा उपयोग तुम्हाला गाफील आणि नामर्द करून तुमचा आत्मविश्वास पूर्णपणे घालवण्याकडे होईल. इतका की शेवटी तुम्ही आमच्या वसाहतीकडे डोळे लावून बसाल. आमच्या ह्या आक्रमणाची सुरवात तुमच्या देशापासून झाली तरी ते शेवटी जगभर पसरणार आहे. हे सर्व अत्यंत सावकाश

घडेल. त्याला पन्नास-शंभर वर्षे लागतील—पण आम्ही वाट पाहू. तुम्हा मानवांच्यावर पूर्ण प्रभुत्व करून तुमचे पृथ्वीवरून उच्चाटन करायला दोनतीन शतके लागली तरी हरकत नाही. आमच्या आयुष्यात हा काही मोठा काळ नाही." रशीदच्या डोळ्यांत थोडासुद्धा फॅनॅटिसिजम नव्हता. तो पूर्वी-सारखाच शांतपणे बोलत होता.

"आम्ही मानव! मग तू स्वतःला देव समजतोस काय?" विजयने हेटाळणीच्या स्वरात विचारले. पण त्याला रशीदचे उत्तर अपेक्षित नव्हते :

"तू 'देव' ह्या शब्दाला जो अर्थ लावतोस त्या अर्थाने मी देव नाही. पण मी मानवसुद्धा नाही—मी ह्या पृथ्वीबाहेरचा आहे."

रशीदच्या ह्या विधानाने विजयला आश्चर्य वाटले, पण 'शॉक' मात्र बसला नाही; कारण रशीदचे बोलणे ऐकून त्याची मती आधीच गुंग झाली होती. हळूहळू सर्व प्रकरणाचे धागेदोरे जवळ येत आहेत असे त्याला वाटले. रशीदचा कंप्यूटर आणि त्याची मेंदूची यूनिट्स मानवी तंत्रशास्त्राच्या आवाक्याबाहेरची आहेत असे त्याला सारखे वाटत होते त्याचे कारण आता कळायला लागले होते.

"सध्या आमची वसाहत अल्फा सेंटाउरी ताऱ्याच्या आसमंतात एका ग्रहावर आहे. त्या ताऱ्यात आता महत्त्वाचे बदल होत आहेत, त्यामुळे आमचा ग्रह पूर्वीसारखा वसती करायला योग्य राहिला नाही. हे ताऱ्यांतले फरक तुम्हालासुद्धा आता थोडे थोडे कळायला लागले आहेत—पण आम्ही ज्याप्रमाणे कुठल्याही ताऱ्याचे भवितव्य अगदी मिनिटा-सेकंदापर्यंत अचूकपणे वर्तवू शकतो तितके अजून तुमच्या खगोलशास्त्रज्ञांना शक्य झालेले नाही. आम्हाला जेमतेम पाचशे वर्षे आमच्या ग्रहावर काढता येतील. त्यापूर्वीच नवीन वसाहत शोधणे अवश्य आहे. आणि आमच्या दृष्टीने सर्वात योग्य जागा पृथ्वीवर आहे. पण ह्या अनेकगुणसंपन्न पृथ्वीचा उपभोग घेण्याची तुम्हा मानवांची योग्यता नाही—तुम्ही तिचा दुरुपयोग करत आहात.

परंतु पृथ्वी आम्हाला संपूर्ण आमच्याकरता पाहिजे—तिथून मानवाचे उच्चाटन करणे आवश्यक आहे. कारण पृथ्वीवरची साधनसामग्री आमच्या वसाहतीला जेमतेम पुरेशी होईल. म्हणून पृथ्वीवर वसाहत केल्यावर लवकरच आम्ही मानवजातीचे निर्मूलन करू."

"म्हणजे तुम्ही गॅसचेंबरमध्ये कोंबणार काय सर्वांना?" विजयने विचारले.

"छे! छे! तसले 'क्रूड' उपाय आम्ही वापरत नसतो. प्रजोत्पादनक्षमता गेली की मानवजात आपोआप नाहीशी होईल. म्हणून मी दोनतीन शतकांचा काळ सांगितला."

"तुमच्यापैकी किती लोक पृथ्वीवर आलेले आहेत?" विजयने विचारले. "तुमचे शेखसाहेब आणि तुझे सहकारी फरूक, मन्सूर, कासीम पण पृथ्वी-बाहेरचेच का?"

"नाही—अजून फक्त एकटा मीच आमच्या ग्रहातून पृथ्वीकडे आलो आहे. माझ्याप्रमाणे इतर काही दूत विश्वात इतरत्र वसाहतीसाठी नवी जागा शोधायला पाठवले होते. त्यांपैकी काही विनाश पावले, काही अजून परत यायचेत, तर काहींनी नकारात्मक रिपोर्ट आणले. माझा रिपोर्ट होकारात्मक होता. मला पुढची व्यवस्था करायला पाठविण्यात आले. मानवी संस्कृतीच्या विविध अंगांचे, भाषांचे, इतिहासाचे शिक्षण मला देण्यात आले. मी तुझ्याशी तुझ्या मातृभाषेत बोलू शकतो."

"तरीच तू भगवद्गीतेचा उल्लेख केलास!" यवनाला ही माहिती कुठून आली या विजयच्या कुतूहलाचे समाधान झाले. "पण ही सर्व माहिती तुझ्या डोक्यात मावली कशी?"

"कारण माझा मेंदू यांत्रिक आहे!" रशीद म्हणाला. "त्याबद्दल नंतर सांगेन. आता इथे कसा आलो ते सांगतो. 'स्पेस कॅप्सूल'मधून मला इथे पाठवण्यात आले. सध्या अलिफ संतूर आहे ती जागा पूर्वी फार मागासलेली होती. पण तिथल्या शेखसाहेबांचा उपयोग होईल असे वाटले. माझ्या प्रारंभिक शिक्षणाबद्दल व संशोधनाबद्दल सांगितलेल्या गोष्टी खऱ्या आहेत, पण हा सर्व प्रकार मी नाटकातला पार्ट केल्याप्रमाणे केला. माझे तिन्ही सहकारी माझ्या हाताखाली शिकलेले खरेखुरे मानव आहेत व त्यांना मी त्यांचा देशबांधवच वाटतो."

इन्स्टिट्यूटला कंप्यूटरची देणगी स्वीकृत करायला कारण ज्या घटना झाल्या त्या विजयला आठवल्या. निश्चित त्या घडवून आणण्याची रशीदची प्रेरणा असणार.

"बरे, आणखी एक प्रश्न! तू ही स्कीम भारतापासून का सुरू केलीस?

आमच्यापेक्षा एखाद्या समृद्ध प्रगत राष्ट्रावर तुम्ही का प्रथम प्रभुत्व मिळवत नाही ?" विजयने विचारले.

"त्याला कारणे आहेत. आणखी शंभर वर्षांनी कुठले राष्ट्र महत्त्वाचे ठरेल ह्याचा आम्ही विचार केला. तुम्ही कधी कधी तर्क करता—पण आम्हाला खात्री आहे की पृथ्वीवर लवकरच 'हिमयुग' येईल. उष्ण कटिबंधातला काही भाग सोडल्यास पृथ्वीवर राहणे मानवाला जवळ जवळ अशक्य होईल. आणि तोपर्यंत ह्या आत्ताच्या प्रगत राष्ट्रांनी बेसुमार अपव्यय करून आपले ऊर्जेचे साठे संपवलेले असणार. भारताजवळ मात्र समुद्रगर्भित तेलाचे पुष्कळ साठे सापडतील आणि शिवाय हिमयुगात तिथला भाग राहण्यास योग्य असेल. म्हणून आम्हाला वसाहत करायला येथे येणे आवश्यक आहे. येथे स्थायिक झाल्यावर आमच्या तंत्रशास्त्राच्या जोरावर आम्ही सूर्याची ऊर्जा वापरून हिमयुगाला तोंड देणार."

"तुम्ही दिसायला मानवांसारखेच दिसता का ? आणि तू स्वतः पृथ्वीवर कसा आलास ?" विजयची प्रश्नमालिका अजून संपली नव्हती.

"होय, आम्ही मूळचे मानवच आहोत—फक्त आमची टेक्नॉलजी तुमच्या पुष्कळ पुढे गेलेली आहे. तुम्ही 'केव्हमॅन'च्या जितके पुढे गेलेले आहात तितके आम्ही तुमच्या पुढे आहोत. एक उदाहरण म्हणजे आमचा शारीरिक मेंदू जन्म झाल्यावरच काढण्यात येतो आणि तेथे यांत्रिक मेंदू बसवला जातो. ही परिस्थिती निर्माण होण्याचे कारण असे : पूर्वी आम्ही तुमच्यासारखेच आपला मेंदू वापरत असू. पण हळूहळू कंप्यूटर्सचा शोध लागला. प्रथम प्रथम आम्ही—सध्या तुम्ही करता त्याप्रमाणे—सोयीसाठी त्यांचा वापर करू लागलो. पण पुढे पुढे त्यांचे आकार लहान होत गेले तसे तसे आम्ही त्यांच्यावर जास्त अवलंबून राहायला लागलो. हातात कंप्यूटर असेल तर डोक्याने बेरीज-वजाबाकी कशाला करा ? शेवटी निसर्गाने ह्या बदलत्या परिस्थितीची दखल घेतली. शरीरातला वापरण्यात न येणारा भाग हळूहळू निकामी होतो. आमच्यात बदल होऊ लागला आणि मेंदू हा भाग निकामी होऊ लागला. शेवटी एका संशोधकाने 'आर्टिफिशियल ब्रेन' शोधून काढला आणि त्याने नैसर्गिक मेंदूची जागा घेतली. ॲपेंडिक्सप्रमाणे नैसर्गिक मेंदू शरीरातला एक निरुपयोगी घटक बनला."

'"पण तुमचे सर्वांचे सारखेच आर्टिफिशियल ब्रेन्स असले तर तुमच्या जीवनात आमच्यासारखी विविधता नसणार—" विजयचा प्रश्न ऐकून रशीद हसला.

"होय! आमचे जीवन यंत्रासारखे आखलेले असते. त्यात भांडणतंटे नसतात. नैसर्गिक गोष्टींचा पुरेपूर उपयोग करून आम्ही राहतो."

मानवजात प्रगती करत गेली तर हेच उद्दिष्ट गाठणार काय? तेथे भांडणतंटे, मारामाऱ्या नसणार. इनएफिशियन्सी, रेड टेप, जरूरी वस्तूंचा अपव्यय असणार नाही. पण तेथे मानवजातीने विविध क्षेत्रांत गाठलेले उच्चांकही नसणार. शेक्सिपयर, कालिदास, न्यूटन, आइन्स्टाइन, व्यास, शुकदेव, मुहम्मद, सॉक्रेटिस, बुद्ध...ही आजवर अव्याहत चालत आलेली मालिका शेवटी 'ऑल मेन आर इक्वल' ह्या वचनात विलीन होणार काय? उत्तर भारतातील दौऱ्यात मोगल आर्किटेक्चर आणि दक्षिणेतली हिंदू मंदिरे पाहून आल्यावर बॅकबे रेक्लमेशनवर उभारलेले ते एकसारखे एक दिसणारे मनोऱ्यांचे 'स्लम्स' पाहून विजयला नेहमी उदास वाटे. त्याला आत्ता तीच आठवण झाली.

रशीद घड्याळाकडे बघत म्हणाला, "मला शेखसाहेबांकडे गेले पाहिजे. चला आपण आता बाहेर जाऊ."

"पण तू मला चौर्यकर्माची शिक्षा काय करणार? गोष्टीतला खलनायक आपली सगळी हकिगत सांगितल्यावर हीरोला जगातून नाहीसा करायची सोय करतो." विजयला राहवले नाही.

"वा! मी खलनायक आणि तू मात्र हीरो!" रशीद खोट्या तक्रारीच्या स्वरात म्हणाला, "तुला मारून मी सृष्टीतल्या एका उपयोगी घटकाचा अपव्यय कशाला करू? इथेच तुमच्यात आणि आमच्यात महत्त्वाचा फरक आहे. मानवी खलनायकाने तुझा खून करून तुझे शव कुठेतरी नाहीसे केले असते. त्यात त्याचा वेळ आणि शक्ती खर्च होणार. त्यानंतर पोलिस एन्क्वायरी—तू कुठे गेलास म्हणून. कोणाला हवी ती कटकट? माझा मार्ग अगदी सोपा आहे. आज रात्री तीन वाजता तुझ्या मेंदूतला स्मृतिपटल अंशतः पुसला जाईल. सखाराम-प्रकरणामुळे आलेली माझ्याबद्दलची शंका, तुझे येथे प्रवेश मिळवणे, माझ्याशी झालेले संभाषण हे सर्व तू विसरून

जाशील. आणि हा कंप्यूटर साधे मशीन आहे—त्याच्यामागे काळेबेरे नाही हे तुला वाटेल अशी मी सोय केली आहे." विजयला कंप्यूटर रूममधून बाहेर आणत रशीद पुढे म्हणाला, "खोलीत शिरल्यावर मी तुझ्याशी शेकहँड केला तेव्हाच माझे यूनिट मी तुझ्या अंगावर चढवले. ते शोधायचा भानगडीत पडू नकोस—त्यापेक्षा एक धुळीचा कण शोधणे जास्त सोपे आहे. आता तुझा मेंदू माझ्या कंट्रोलमध्ये आहे."

रशीद गेल्यावर विजय आपल्या ऑफिसमध्ये आला तेव्हा दोन वाजले होते. आपल्याला तासभर अवकाश आहे, तेवढ्यात लक्षात असलेला सगळा वृत्तांत लिहून काढायचे त्याने ठरवले. त्याने रायटिंग पॅड घेऊन भराभर लिहायला सुरवात केली.

त्याच्या मते महत्त्वाच्या असलेल्या गोष्टी लिहून झाल्यावर त्याने खाली शेरा मारला :

"माझे स्मृतिपटल पुसले गेल्यावर माझी मलाच ही एक फॅण्टसी वाटणार आहे. परंतु ही हकिगत पूर्णपणे खरी आहे."

विजयने घड्याळाकडे पाहिले. २·५५ झाले होते.

त्याने आर्मचेअरवर अंग टाकले. त्याला झोप येत होती; परंतु पुढच्या पाच मिनिटांत आपल्या मनावर कोणता प्रयोग घडणार आहे याबद्दल त्याला उत्सुकता होती. काही झाले तरी आपण त्याला विरोध करायचा असे त्याने ठरवले. जोराचा वारा येत असताना टोपी उडू नये म्हणून आपण ती डोक्यावर हाताने दाबून धरतो, त्याप्रमाणे रशीदचा वृत्तांत त्याने मनात गच्च धरून ठेवला आणि डोळे मिटून घेतले.

...लवकरच मुंबईचे दैनिक व्यवहार चालू होणार. दुधाच्या गाड्या वेगवेगळ्या मार्गांनी चालू लागणार. भाजीमार्केटे जागी होणार. मग कामाला येणाऱ्या लोकांच्या लोंढ्यांनी ट्रेन्स आणि बसेस भरभरून येणार. सर्व काही नेहमीप्रमाणेच असणार.

—पण पृथ्वीवर ताबा ठेवून राहण्याची मानवाची ताकद संपुष्टात येणार होती. परकीय आक्रमण रोखून धरण्याची—तेसुद्धा तात्पुरतेच—एकमेव आशा म्हणजे रशीदचे उच्चाटन आणि त्याच्या कंप्यूटरचा नाश. पण ते कसे शक्य

होते? त्याचे लेखन शाबूत राहिले तरी त्याला स्वतःलाच ते अविश्वसनीय वाटणार होते. त्याची स्मृती, त्याचा मेंदू पूर्ववत राहिले तरी त्याच्यावर कोण विश्वास ठेवणार? सर्वांनी त्याला वेड्यात काढले असते.

आणि हे परकीय आक्रमण अशा प्रकारे होणार की मानव शेवटपर्यंत गाफीलच राहणार. ज्या पृथ्वीचे महत्त्व ओळखून हे परकीय लोक दुरून इथे आले तिचा आपण किती गैरवापर करतोय. स्वार्थ आणि हेवेदावे साधण्यासाठी आपण किती तऱ्हेने पृथ्वीच्या नैसर्गिक सौंदर्याची विटंबना चालवली आहे...

तीन वाजले.

विजयच्या डोक्यात घंटेसारखे आवाज येऊ लागले.

कर्रऽऽऽ...कर्रऽऽ...

त्यांच्याकडे लक्ष दिले तर रशीदचा वृत्तांत डोक्यातून पळून जाईल ह्या भीतीने त्याने त्या वृत्तांतावर मन जास्तच केंद्रित केले.

कर्रऽऽऽ...कर्रऽऽ...

घंटा चालूच होत्या.

विजयने डोळे उघडले. अजून त्याला रशीदचा वृत्तांत आठवत होता—म्हणजे त्याचे स्मृतिपटल पुसले गेले नव्हते. रशीदने चूक केली की काय असे त्याला वाटले. पण घंटा अजून चालू होत्या.

मग त्याच्या लक्षात आले की त्याचा शेजारचा टेलिफोन वाजतोय.

पण तो नेहमीसारखा 'कर्र कर्र...कर्र कर्र...' असा का वाजत नाही? आणि 'डायल'चा 'पुशबटन' कसा झाला? त्याने आजूबाजूला पाहिले आणि एकदम उठून उभा राहिला.

तो आपल्या पॅसाडीनामधल्या अपार्टमेंटमध्ये होता. त्याच्यासमोर थॉमस आणि आर्मस्ट्रॉंग यांच्या चर्चेचा छापील कार्यक्रम पडलेला होता. खोलीतले डिजिटल कॅलेंडर क्लॉक त्या चर्चेच्या नंतरच्या दिवसाची तारीख आणि सकाळी दहाची वेळ दाखवीत होते. त्याने लिहिलेला कंप्यूटर रिपोर्ट टेबलावर पडलेला होता. आपण ह्या सर्व अनुभवातून एकदा गेलो होतो असे त्याला वाटले. त्याने फोन उचलला.

"डॉ० विजय सिन्हा?" फोनवरून मंजुळ आवाज आला.

"स्पीकिंग."

"दिस इज वेस्टर्न यूनियन, सर. आय हॅव ए केबल फॉर यू. मे आय रीड इट आउट?" ऑपरेटरने विचारले. विजयने संमती देताच तिने मेसेज वाचला :

"कंप्यूटर कॅन्सल्ड. पोस्टपोन युवर रिपोर्ट. लेटर फॉलोज.—प्रोफेसर गुप्ता."

ऑपरेटरने विचारले, "डू यू वॉंट ए कॉपी इन रायटिंग, सर?"

"डोंट बॉदर—अँड थँक्स फॉर कॉलिंग." तो अब्सेंट माइन्डेड स्वरात उद्गारला. त्याने रिसीव्हर खाली ठेवला आणि फोनजवळ पाहिले. त्याची नजर काहीतरी शोधत होती. पण टेबल रिकामे होते.

तिथे कुठलाही टेलिफोन-नंबर नव्हता.

२ ∫ कृष्णविवर

“हा कंप्यूटर लेकाचा फार सतावतोय!” तावातावाने कॉफी ढवळत प्रकाश बोलत होता. “गेल्या आठवड्यात मी त्याच्याकडे कमीत कमी पन्नास खेपा तरी घातल्या असतील, पण त्याचं उत्तर सारखं तेच!”

“काय म्हणतो कंप्यूटर?” संजयने साळसूदपणे विचारले. तो शुद्ध गणिताचा विद्यार्थी असल्याने कंप्यूटरकडे तुच्छतेने पाही. एखाद्या चित्रकाराने घर रंगवणाऱ्या रंगाऱ्याकडे पाहावे त्याप्रमाणे.

“कंप्यूटर म्हणतो की माझे मूळ सिद्धांत चुकले आहेत. खरं म्हणजे ‘प्रॉफ’नी दिलेला डेटा कंप्यूटरला सुपूर्द करून मी दिवसभरात मोकळा होईन आणि ठरल्याप्रमाणं हायकिंग टूरवर जाईन असं मला वाटलं होतं; पण ‘मॅन प्रपोजेस अँड कंप्यूटर डिस्पोजेस’ हेच खरं.”

यर्कीस वेधशाळेतून आलेली गुरु-ग्रहाबद्दलची काही नवीन माहिती कंप्यूटरवर पडताळून पाहायला प्रकाशकडे आली होती.

“तुझी बेरीज-वजाबाकी चुकली असेल.” फिजिक्सवाल्यांचे गणित कच्चे असते, असा सर्वसाधारण गणित्याला वाटणारा विश्वास संजयने व्यक्त केला.

“हे बघ, चूक असलीच तर ती माझी नव्हे; न्यूटन आणि आइन्स्टाइनची असली पाहिजे. ग्रहांची गती त्यांच्या सिद्धांतांवरून ठरवली जाते, हे तुझ्यासारख्या अल्पश्रुतालादेखील माहीत आहे. पण कंप्यूटर म्हणतो, हा नवीन डेटा त्यांच्या सिद्धांतांत बसत नाही. डेटा चुकीचा नाही याची प्रॉफना खात्री आहे. मग घोडं कुठं पेंड खातं?” प्रकाशने आपली तक्रार मांडली.

"मला वाटतं, तू खगोलशास्त्रातल्या दशावतारांची नावं घेत बस, म्हणजे तुला प्रेरणा मिळेल!" संजय थट्टेने सूचना करत होता. "म्हण, न्यूटनाय नमः, हॅलये नमः, हर्शलाय नमः, ॲडम्साय नमः, एडिंग्टनाय नमः..."

"ॲडम्स...ॲडम्स...काय लाखाची गोष्ट बोललास! बालादपि सुभाषितं ग्राह्यम्!" संजयच्या पाठीवर जोरदार थाप मारून, कॉफी अर्धी टाकून, प्रकाश तेथून पसार झाला.

संजय पाहतच राहिला. इन्स्टिट्यूटमध्ये चक्रमपणाचा मक्ता फक्त गणिती लोकांनीच घेतला होता. प्रकाशचा विक्षिप्तपणा त्याला आवडला नसावा.

'प्रॉफ' म्हणजे इन्स्टिट्यूटमधले खगोलशास्त्राचे प्राध्यापक रमेश अग्रवाल. ग्रह आणि उपग्रह यांच्या भ्रमणाचे गणित, 'सेलेस्टियल मेकॅनिक्स' या विषयात त्यांनी जागतिक कीर्ती कमावली होती. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला या विषयात संशोधन करणारे फारच थोडे शास्त्रज्ञ होते. त्यामुळे एखादा कूट प्रश्न उद्भवल्यास त्या विषयाशी संबंधित असलेले खगोलशास्त्रज्ञ अग्रवालांकडे धाव घेत. म्हणून गुरूसंबंधी उपलब्ध झालेली नवी माहिती त्यांच्याकडे पाठवण्यात आली होती.

प्रकाश पावटे हा त्यांचा आवडता विद्यार्थी. नुकतीच आलेली माहिती वरकरणी निरीक्षण करून त्यांनी प्रकाशकडे छाननीसाठी पाठवली. "नक्की निष्कर्ष काढल्याशिवाय मला भेटू नको," हे त्याला वेगळे सांगायची आवश्यकता नव्हती.

तरी एक आठवडा झाला आणि अजून तो आला नाही, याचे त्यांना आश्चर्य वाटू लागले होते. आपणच त्याला गाठावे का असा विचार ते करत असताना तोच धावत त्यांच्या खोलीत आला. कंप्यूटरच्या उत्तरांचा सगळा गठ्ठा त्यांच्या टेबलावर आदळून तो भराभरा बोलायला लागला. पण त्यातले एक अक्षरसुद्धा प्रोफेसरसाहेबांना समजेना. त्याला इतका उत्तेजित झालेला त्यांनी पाहिला नव्हता.

"शांत हो! शांत हो! मिनिटाला फक्त एकच वाक्य बोल, म्हणजे मला कळेल तरी!" ते सौम्य स्वरात म्हणाले.

"सर! १८४६ च्या सुमारास युरेनस ग्रहाच्या गतीमध्ये अनियमितता

पाहून ॲडम्सनं केवळ तर्क आणि गणित यांच्या आधारानं युरेनसजवळ असलेला नवा ग्रह नेपच्यून हा शोधून काढला. मला खात्री आहे, गुरूच्या जवळ ग्रहासारखीच एखादी नवीन वस्तू आलेली आहे. कंप्यूटरमधली उत्तरं निश्चितपणं तसं सांगत आहेत."

पुराव्याखेरीज विधान करायचे नाही हा नियम प्रोफेसरसाहेबांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवला होता. तरी प्रकाशचे विधान इतके अनपेक्षित होते की स्वतः या प्रश्नाचा छडा लावायचा निर्णय त्यांनी घेतला. आणि पुढचे दहा दिवस अनेक खगोलशास्त्रीय पद्धती वापरून त्या दोघांनी हे विधान बरोबर आहे असे ठरवले.

लंडनहून निघणाऱ्या शास्त्रीय साप्ताहिक 'नेचर'मध्ये अग्रवाल-पावटे या दोघांचा लेख प्रसिद्ध झाला आणि खगोलशास्त्रज्ञांत मोठी खळबळ उडाली. गुरूच्या गतीमध्ये निर्माण झालेला अनियमितपणा त्याच्या जवळ आलेल्या एका नवीन वस्तूमुळे आहे, असा त्या लेखाचा सारांश होता.

त्या नवीन वस्तूला त्यांनी तात्पुरते 'क्ष' असे नाव दिले आणि 'क्ष'चे वस्तुमान, वेग, गुरूपासून अंतर, इत्यादी माहिती प्रकाशित केली. 'क्ष' म्हणजे काय असेल याबद्दल नाना तऱ्हेचे तर्क चालू झाले. मंगळ आणि गुरू यांच्या दरम्यान फिरणाऱ्या अनेक ॲस्टरॉइड्सपैकी काही एकत्र येऊन त्यांचा नवीन ग्रह झाला असेल किंवा सूर्यमालेच्या बाहेरून आलेले ते एक कॉमेट असावे, असा काहींचा तर्क होता. अर्थात 'क्ष'ला प्रत्यक्ष पाहण्यासाठी जगातील वेधशाळांत चढाओढ उत्पन्न झाली.

परंतु त्यांना काहीच दिसले नाही!

या प्रकाराला तीन वर्षे लोटली. 'क्ष' दिसत नाही पण त्याची उपस्थिती आवश्यक आहे, याची शास्त्रज्ञांना खात्री असल्यामुळे त्यांनी 'क्ष'च्या दिशेने आकाशयान सोडायचे ठरवले. कारण प्रश्न महत्त्वाचा होता. त्यावर शतकानुशतके चालत आलेल्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताचे भवितव्य अवलंबून होते. 'क्ष'चा शोध भारतीय शास्त्रज्ञांनी लावला म्हणून आकाशयानाचे उड्डाण भारतातील 'श्रीहरिकोटा बेस'वरून करायचे ठरले. आणि त्यात प्रवासी

शास्त्रज्ञ म्हणून जाण्याचा मान प्रकाश पावटेला मिळाला. त्याचा एकमेव सहप्रवासी म्हणजे यानाचा अमेरिकन कॅप्टन जॉन फॉकनर. हा एक कुशल तंत्रज्ञ होता. जागतिक अंतराळ संस्थेचे (वर्ल्ड स्पेस ऑर्गनायझेशन) भारतातून गुरूकडे जाणारे ते दहावे यान असल्यामुळे त्याचा नंबर होता डब्ल्यू–आय–जे–१०. गुरूकडे जायला योग्य दिवस ठरवून डब्ल्यू–आय–जे–१० च्या उड्डाणाची तयारी होऊ लागली.

या तीन वर्षांच्या काळात प्रकाश पावटे आणि संजय जोशी पीएच० डी० मिळवून आपल्याच इन्स्टिटयूटमध्ये फेलो झाले होते. संजयचे लग्न होऊन वर्ष झाले होते. पण प्रकाश अजून सडाफटिंगच होता. मात्र दोघांची मैत्री पूर्ववत होती. गप्पाटप्पा, परस्परांची छेडछाड कायम होती. उड्डाणाच्या एक आठवडा पूर्वी संजयच्या नवजात कन्येचे बारसे होते. तिच्यासाठी एक मोठे टेड्डी बेअर घेऊन प्रकाश संजयच्या घरी दाखल झाला.

"वहिनी, काय नाव ठेवलं छोकरीचं?" टेड्डी बेअर पुढे करीत त्याने विचारले.

"अनुपमा! तुम्ही तिला हातात घेऊन पाहणार का?"

"छे बुवा! दुरूनच बरं! मला लहान बाळ हातात घ्यायला फार भीती वाटते."

"मग दुरूनच सांगा, आमची कन्या कुणासारखी दिसते?"

"तुम्हा दोघांसारखी आहे!" प्रकाशचे डिप्लोमॅटिक उत्तर. "छोकरी मोठी गोड आहे यात शंका नाही. आणखी अठरा-वीस वर्षांनी पाहा तिच्यामागे किती रोमियो लागतात ते!"

"पण तुम्हीच थांबा ना अठरा-वीस वर्षे—आम्ही करून घेऊ तुम्हाला जावई!" अनुपमाच्या आईने वरसंशोधनाला सुरुवात केली. पण लग्नाची गोष्ट निघाली—मग ते अठरा दिवसांनी असो किंवा अठरा वर्षांनी—की प्रकाश लाजून जाई. त्याने गडबडीने त्यांचा निरोप घेऊन तेथून पोबारा केला.

"उगीचच त्या ब्रह्मचाऱ्याला बावरवलंस!" संजयने बायकोला चापले.

ठरल्याप्रमाणे डब्ल्यू–आय–जे–१०च्या यात्रेला सुरुवात झाली. यानाचा पृथ्वीवरील अनेक स्टेशनांशी संपर्क चालू होता. संदेशांची देवाण-घेवाण निय-

मित होत होती. पण गुरूच्या आसमंतात आल्यावर परिस्थितीत फरक झाला. प्रकाशने खालील संदेश मिशन कंट्रोलकडे पाठवला :

"'क्ष'जवळ आलो असे वाटते, पण अद्याप काहीच दिसत नाही. परंतु 'क्ष'च्या दिशेने अनेक वस्तू, मीटीओराईट, ॲस्टरॉईड वगैरे वेगाने जाताना दिसत आहेत. 'क्ष' चमकत असता तर म्हटले असते की भगवद्‌गीतेत दिव्यावर तुटून पडणाऱ्या पतंगाचं वर्णन..."

"बरं बरं! कविकल्पना पुरे! तू पुढं काय करणार?" कंट्रोलने हटकले.

"अहो, अणुस्फोट पाहून ओपेनहायमरला गीता आठवली. मला इथं दिसतं ते किंवा दिसत नाही ते अणुस्फोटाहून विचित्र आहे. परवानगी मिळाल्यास अधिक जवळून पाहावं म्हणतो." प्रकाशने निरोप धाडला.

"परवानगी आहे; पण धोका वाटल्यास ताबडतोब परत ये."

"अवश्य! मी डब्ल्यू–आय–जे–१०ची पूर्ण काळजी घेईन." कंट्रोलकडे आलेले प्रकाशचे ते शेवटचे स्पष्ट शब्द होते.

प्रकाशच्या सूचनेवरून जॉनने 'क्ष'च्या दिशेने यान वळवले. हळूहळू त्याचा वेग वाढू लागला. "अरे, जरा सावकाश चालव. आपल्याला फार जवळ जायचं नाही." प्रकाशने जॉनला सावध केले.

"मी एंजिन केव्हाच बंद केलं आहे. वेग का वाढतोय समजत नाही." यानातल्या वेगमापकाकडे चिंतातुर नजरेने पाहत जॉन उद्‌गारला. त्यातला काटा पुढे पुढे सरकत होता.

प्रकाशच्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला. यानातल्या कंप्यूटरकडे त्याने धाव घेतली आणि अद्याप न वापरलेला एक प्रोग्रॅम एका खणातून काढून त्यात भरला. त्याचे लेबल होते 'कृष्णविवर'. यानाच्या वेगवृद्धीची माहिती पंच करून कंप्युटरमध्ये घातली आणि क्षणात त्यातून छापील उत्तर आले. ते वाचून गडबडीने प्रकाश जॉनकडे आला.

"जॉन, जॉन, 'क्ष' काय आहे हा प्रश्न सुटला—पण मला वाटतं, आपल्या दृष्टीनं फार उशीर झाला. 'क्ष' हे कृष्णविवर आहे आणि आपण त्याच्याकडे वेगानं धाव घेत आहोत."

कृष्णविवर म्हणजे अतिशय आकुंचन पावलेली वस्तू. त्याचे गुरुत्वाकर्षण

इतके प्रखर असते की त्यातून प्रकाश बाहेर पडू शकत नाही. म्हणूनच हा 'क्ष' पृथ्वीवरील वेधशाळांना किंवा जवळूनदेखील जॉन आणि प्रकाश यांना दिसत नव्हता. आइन्स्टाइनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांताप्रमाणे कृष्णविवरे विश्वात असू शकतात; पण अद्याप असे कृष्णविवर खगोलशास्त्रज्ञांना सापडले नव्हते. म्हणून 'क्ष' एक कृष्णविवर असेल हा तर्क थोड्याच शास्त्रज्ञांनी मांडला होता आणि त्याचे बहुतेकांनी स्वागत केले नव्हते.

"आता पुढं काय?" उत्तराची जवळजवळ कल्पना असूनही जॉननं प्रश्न विचारला.

"आपण बहुतेक 'क्ष'च्या तोंडावर पडणार. आशेचा एक अंधुक किरण आहे. आपल्या यात्रेचा मार्ग 'क्ष'च्या केंद्रबिंदूकडे नसून त्याला वळसा घालणारा आहे. अजून कंप्यूटर नक्की सांगू शकत नाही. त्याला ऑरबिटचा आणखी डेटा पाहिजे. मी परत त्याला चालू करून येतो. तोपर्यंत तू कंट्रोलशी संपर्क साध."

जॉनने कंट्रोलला संदेश पाठवावयाचा प्रयत्न केला, पण काही उपयोग झाला नाही. कंट्रोलकडून अतिशय वेगाने उच्चारल्याप्रमाणे शब्द येत होते; त्यांचा काहीच अर्थ लागत नव्हता. इतक्यात प्रकाश तेथे आला. त्याचा चेहरा पांढराफटक पडला होता.

"जॉन, कंप्यूटरने आपल्या मृत्यूचंच भविष्य केलं आहे. आपण 'क्ष'च्या जवळ जाऊन त्याला सुमारे दहा लक्ष चकरा मारून नंतर आत पडणार आहोत, असं कंप्यूटर म्हणतो. कंट्रोलची काय सूचना आहे?"

जॉनने त्याला परिस्थितीची कल्पना दिली. कंट्रोलशी संबंध तुटला, आता सर्व निर्णय आपणच घेतले पाहिजेत, हे प्रकाशने ओळखले.

"अजून आशेला थोडीशी जागा आहे. आपण कृष्णविवराभोवती जी अस्थिर गोलाकार कक्षा असते तिच्या जवळून जाणार आहोत. त्या मार्गाच्या अस्थिरतेचा मी फायदा घेणार. योग्य वेळी एक रॉकेट फायर केले की आसपास निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळं आपलं यान कदाचित बाहेर फेकलं जाण्याचा संभव आहे. तसं झालं तर ठीक. नाहीतर जगाला आपला रामराम. आपण आता गोठवलेल्या सुटात प्रवेश केला पाहिजे."

"गोठवलेल्या सुटाची काय जरूरी आहे?" जॉनने पृच्छा केली.

"अरे, जसे जसे आपण 'क्ष'कडे जाऊ, तशी तशी त्याच्या गुरुत्वाकर्षणाची

टायडल पॉवर आपल्याला जास्त जास्त जाणवेल. या टायडल पॉवरमुळेच चंद्राचं गुरुत्वाकर्षण पृथ्वीवर समुद्राच्या भरतीच्या वेळी जाणवतं. आता कल्पना कर, 'क्ष'कडे जाताना तुझं डोकं 'क्ष'च्या सगळ्यात जवळ आणि पाय सगळ्यात दूर आहेत. 'क्ष'च्या गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव तुझ्या डोक्यावर जितका असेल तितका पायांवर असणार नाही. त्याचा परिणाम काय होईल ?"

"माझं शरीर डोक्यापासून पायांपर्यंत ताणलं जाईल ?" जॉनचे डोके आता चालू लागले.

"बरोबर! आणि हा ताण इतका विलक्षण असेल की तो आपल्याला पेलणार नाही. आपणाला गोठवलेल्या अवस्थेत असलो तर कदाचित तो परिणाम आपल्या इंद्रियांना तेवढा जाणवणार नाही." प्रकाशने खुलासा केला. "तू आकाशयान स्वयंचलित अवस्थेत ठेव, म्हणजे कंप्यूटर त्याला पृथ्वीची दिशा दाखवील. नशीब शिकंदर असेल तर बेसवरचे लोक आपल्याला जागं करतील."

सर्व तयारी करून गोठवलेल्या सुटात प्रवेश करण्यापूर्वी दोघांनी आकाश-दर्शन घेतले. तारकासमूह विशेष तेजाने चमकत आहेत, असे त्यांना वाटले. हेच त्यांचे जगाचे शेवटचे दर्शन ठरणार होते काय ?

श्रीहरीकोटा बेसवर डब्ल्यू–आय–जे–१० ही अक्षरे असलेले आकाशयान उतरले, तेव्हा तिथल्या तंत्रज्ञांना आश्चर्याचा धक्काच बसला. त्या नावाचे यान तिथल्या कोणाच्याही स्मरणात नव्हते. फार काय, त्याच्या आगमनाची पूर्व-सूचनादेखील मिळाली नव्हती. या अनाहूत यानाची कसून तपासणी करून त्यांनी आतल्या दोघा कुंभकर्णांना बाहेर काढले आणि त्यांची मॅक्सिमम् सिक्युरिटी मेडिकल सेक्शन (एम्० एस्० एम्० एस्०) कडे रवानगी केली. त्या दोघांची नावे किंवा चेहरे बेसवरच्या सर्वच लोकांना अपरिचित होते.

"अहो, जरा दमानं घ्या—डॉक्टरनी तुम्हाला हालचाल करायची आणि विचार करायची बंदी केली आहे." एम्० एस्० एम्० एस्०मधली परिचारिका अनुपमा प्रकाशला सांगत होती. "लवकरच येथील प्रमुख शास्त्रज्ञ तुमची भेट घ्यायला येतील. त्यांनाच सर्व सांगा."

"मला निदान एकदोन मित्रांना तरी फोन करू दे—फक्त मी सुखरूप आलो हे सांगायला. हे बघ माझं ॲटॉमिक घड्याळ सांगतंय की मी इथून निघून तीन वर्षं झाली. ते लोक काळजी करत असतील की हा कुठं गडप झाला म्हणून..."

"तीन वर्षं?" आत येता येता प्रकाशचे शब्द ऐकून बेसवरचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ० रामस्वामी उद्गारले, "तीन वर्षांपूर्वी येथून कुठलंच यान मानव प्रवासी घेऊन गेलं नव्हतं. गेली पाच वर्षं आम्ही फक्त स्वयंचलित यंत्र असलेली मानवविरहित यानं पाठवतो."

"शक्यच नाही! तुमची रेकॉर्ड्स तपासून बघा." प्रकाश आश्चर्याने ओरडला. "माझ्या घड्याळाप्रमाणं तीन वर्षं पंधरा दिवसांपूर्वी मी आणि जॉन फॉकनर गुरूच्या दिशेनं निघालो होतो. जॉनला विचारा. नाहीतर प्राध्यापक रमेश अग्रवाल यांच्याशी संपर्क साधा, म्हणजे तुमची खात्री होईल."

"जॉन अजून बेशुद्ध आहे. पण तू म्हणतोस ते प्रोफेसर अग्रवाल नुकतेच रिटायर झाले. पाहतो त्यांचा घरचा पत्ता मिळतो का." रामस्वामींनी माहिती दिली.

प्रकाशचे डोके गरगरायला लागले. तो डब्लू–आय–जे–१० वर प्रवासाला निघाला तेव्हा प्रोफेसरसाहेबांनी नुकतीच चाळिशी ओलांडली होती. त्याने घाबरत घाबरत विचारले, "सध्या कोणतं साल चालू आहे?"

उत्तरादाखल रामस्वामींनी त्याच्या हातात त्या दिवसाचे बातमीपत्र दिले. त्यावरची तारीख पाहून प्रकाशला घेरी आली.

तो वीस वर्षांनी पृथ्वीवर परत आला होता.

प्रकाशला ताळ्यावर यायला दोन आठवडे लागले. त्याचे डोके ठिकाणावर यायला नर्स अनुपमाचा फार मोठा हात होता. आणि त्या ब्रह्मचाऱ्याची विकेट पडणार अशी चिन्हे दिसू लागली. त्याच्या प्रेमप्रकरणात अवकाशयात्रेचा विषय काढायचा नाही, ही डॉक्टरी ताकीद अनुपमा कटाक्षाने पाळत होती.

प्रकाश बरा झाल्यावर रामस्वामींनी त्याची अग्रवालसाहेबांशी गाठ घालून दिली. प्रथम त्यांनी प्रकाशचे सुखरूप परत आल्याबद्दल आणि अनुरूप

वधू मिळवल्याबद्दल अभिनंदन केले आणि मग कालहरणाचा खुलासा केला. ही सर्व कृष्णविवराच्या प्रखर गुरुत्वाकर्षणाची किमया होती. निद्रावस्थेत कृष्ण-विवराभोवती चकरा मारताना त्यांच्या कालमापनाप्रमाणे सेकंदाचाच अवधी पुरला होता, कारण गुरुत्वाकर्षणाने त्यांची काळगती जवळ जवळ गोठवून टाकली होती. त्या अवधीत बाकीचे जग सतरा वर्षांनी पुढे गेले होते. जॉन आणि प्रकाश यांचे विशीतले तारुण्य अजून टिकून होते. आइन्स्टाइनच्या 'रिलेटिव्हिटी'चे ते दोघे सजीव दाखले होते.

"बरं, संजय कुठं आहे? मला पाहून त्याला चांगलाच शॉक बसेल." हसत हसत प्रकाशने विचारले.

"संजय कोण?" अनुपमाने पृच्छा केली.

"संजय जोशी. माझा मोठा मित्र आहे. आम्ही दोघे एकाच इन्स्टिटयूटमध्ये संशोधन करत होतो. त्याचा माझा अनेक वेळा वाद...अग, रडायला काय झालं?"

"ते माझे बाबा. त्यांना आणि आईला विमानअपघातात मृत्यू आला आणि मी पोरकी झाले..." स्फुंदत स्फुंदत अनुपमाने खुलासा केला.

अनुपमाच्या आईचे वरसंशोधन सफल झाले होते. कृष्णविवराच्या कृपेने.

३ उजव्या सोंडेचा गणपती

२१ डिसेंबर २००४.

आज जवळजवळ पंधरा वर्षांनी मी क्रिकेटचा कसोटी सामना प्रत्यक्ष पाहायला गेलो. वास्तविक क्रिकेट हा माझा आवडता खेळ आहे. सुट्टीच्या दिवशी आमच्या हाउसिंग कॉलनीच्या क्रिकेट क्लबच्या सामन्यात मी उत्साहाने भाग घेतो. वेळ मिळाल्यास टी० व्ही०वर मोठे सामने—विशेषकरून कसोटी सामने—पाहायचा माझा प्रयत्न असतो. नाहीच जमले तर व्हिडिओरेकॉर्डर-वर सामन्यातले महत्त्वाचे प्रसंग पाहायला मला आवडते. परंतु सकाळ ते संध्याकाळ मैदानावर जाऊन सामना पाहायला मला वेळ मिळत नाही. म्यूझियमच्या क्यूरेटरचे कामच असे आहे!

परंतु आजची गोष्ट वेगळी होती. माझा शाळकरी मित्र प्रमोद रांगणेकर याचा हा शेवटचा कसोटी सामना होता. सीझन तिकीट पाठवून "एखादा दिवस तरी मॅच बघायला ये" अशी त्याने कळकळीची विनंती केली होती. म्हणून मला सामना पाहायला हजर राहणे भाग होते. तो गोलंदाज असल्यामुळे भारताच्या क्षेत्ररक्षणाचा दिवस मी निवडला.

आज मॅचचा दुसरा दिवस होता. पहिल्या दिवशी भारताने ३०८ धावा काढून आपला डाव संपवला होता. कसोटी सामन्यांच्या मालिकेतला हा निर्णायक सामना होता. अनेक वर्षांनी एम्० सी० सी० वर विजय मिळवण्याची संधी यंदा मिळेल अशी अनेक भारतीय क्रिकेटशौकिनांना आशा वाटत होती. ओलीसुकी जिंकून फलंदाजी घेऊन भारताने पाचशे-सहाशेच्या दरम्यान धावा कराव्या अशी त्यांची अपेक्षा होती. कारण भारतीय गोलंदाजीचा एम्० सी०

सी० च्या फलदाजांना पूर्ण सराव झाला होता. खुद्द रांगणेकरला आणि इतर काही गोलंदाजांना 'ड्रॉप' करावे असे अनेक टीकाकार सुचवीत होते. परंतु निर्णायक सामन्यात नवीन गोलंदाज वापरण्याचे धाडस सिलेक्शन बोर्डाला करवले नाही. तेच टीकाकार आज एम्० सी० सी० चा संघ ३०८ चा आकडा सहज ओलांडेल असे भाकीत करत होते.

त्यांच्या अपेक्षेप्रमाणे एम्० सी० सी० च्या फलंदाजीला सुरुवात झाली. आघाडीच्या फलंदाजांनी सावधगिरी आणि आक्रमक पद्धती यांचा सुंदर वापर करून पहिल्या तासात ४० नाबादचा स्कोअर गाठला. पेयांसाठी दिलेल्या सुटीनंतर कर्णधार भंडारीने रांगणेकरला गोलंदाजी दिली. त्याचा शेवटचा सामना म्हणून प्रेक्षकांनी टाळ्यांनी त्याचे स्वागत केले. परंतु पुढे काय घडणार आहे याची कोणाला कल्पना होती ?

रांगणेकरने पहिला आश्चर्याचा धक्का दिला अंपायर कालियांना. पूर्वीच्या अनुभवावरून 'राइट आर्म ओव्हर द विकेट' अशी गोलंदाजी रांगणेकर करील असे त्यांना वाटले आणि त्याप्रमाणे ते फलंदाजाला सूचना करण्याच्या बेतात असतानाच रांगणेकरने त्यांना सांगितले, "मी लेफ्ट आर्म ओव्हर दी विकेट बोलिंग करणार." आणि त्याप्रमाणे त्याने क्षेत्ररक्षकांची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली.

दुसरे आश्चर्य म्हणजे भंडारीलासुद्धा रांगणेकर डाव्या हाताने गोलंदाजी करणार याची आगाऊ कल्पना नव्हती. रांगणेकरने पूर्वी कधीच अशी गोलंदाजी केली नव्हती आणि अशा महत्त्वाच्या प्रसंगी त्याने हा प्रयोग करावा हे अर्थातच भंडारीला आवडले नाही. पण एकदा एखाद्या खेळाडूला गोलंदाजी दिली तर ती काढून घेता येत नाही, आणि त्यातून रांगणेकरचा हा शेवटचा सामना. "सध्यापुरती एखादी ओव्हर टाकू दे" असा मनाशी निर्णय करून त्याने रांगणेकरला "सुरू कर" अशी सूचना दिली. आणि मग ते अभूतपूर्व घटनाचक्र सुरू झाले.

उजव्या हाताचा सराव असलेला गोलंदाज एकाएकी डाव्या हाताने बोलिंग कशी करू शकेल ? केलीच तरी ती नेहमीप्रमाणे अचूक आणि प्रभावी असणार नाही अशी सर्वांची अपेक्षा होती. ही ओव्हर भारताला भलतीच महाग जाणार अशी अटकळ रेडिओ आणि टी० व्ही० चे

कॉमेंटेटर करत असतानाच; रांगणेकरच्या पहिल्याच चेंडूने एम्० सी० सी० च्या फलंदाजाची विकेट उडाली! पॅव्हिलियनकडे परतताना नवीन फलंदाजाला "चेंडू फारच अनपेक्षित आला. काळजी घे," अशी त्याने सूचना केली. परंतु दोन चेंडू कसेबसे टोलावून तो फलंदाजही विकेट गमावून परतला. आणि त्या महाग ठरणाऱ्या ओव्हरच्या शेवटच्या चेंडूला रांमणेकरने एम्० सी० सी० च्या कर्णधाराला—अनुभवी फलंदाज हेडलेला—पॅव्हिलियनची वाट दाखवली. प्रेक्षकांत भयंकर खळबळ माजली. परंतु ही फक्त सुरुवातच होती.

रांगणेकरच्या उजव्या हाताच्या गोलंदाजीचा भरपूर सराव असलेले एम्० सी० सी० चे फलंदाज त्याच्या डावऱ्या गोलंदाजीपुढे अक्षरशः कोलमडून पडले. त्यांचा पहिला डाव ७८ धावांवर आणि दुसरा डाव ४५ धावांवर आटोपला. त्यांच्या एकुलत्या एक डावऱ्या फलंदाजाने—जोन्सने—थोडाबहुत प्रतिकार केला नसता तर एवढ्या धावासुद्धा झाल्या नसत्या! रांगणेकरच्या गोलंदाजीचे पृथक्करण मात्र अभूतपूर्व होते : पहिली इनिंग १५ ओव्हर्स, ५ मेडन्स, २० रन्स, १० विकेट आणि दुसरी इनिंग १० ओव्हर्स, ३ मेडन्स, १५ रन्स, १० विकेट.

कसोटी सामना चहापानापूर्वीच आटोपला. अभिनंदन करणाऱ्या प्रेक्षकांपासून बचाव करण्यासाठी रांगणेकरला 'पोलिस एस्कॉर्ट' देण्यात आला. त्याची मुलाखत घेण्यासाठी वार्ताहरांचा गराडा त्याच्याभोवती पडला. पण "मी फार दमलोय—उद्या तुम्हाला भेटेन" अशी सूचना देऊन मैदानाबाहेर उभ्या असलेल्या एका बंद ॲम्ब्युलन्समधून तो पसार झाला. ॲम्ब्युलन्समध्ये पांढराशुभ्र युनिफॉर्म घातलेली एक व्यक्ती वृत्तपत्रांच्या लोकांना ओझरती दिसली आणि ती डॉक्टर असावी असा त्यांनी तर्क केला.

त्यानंतर एक आठवडाभर रांगणेकर अज्ञातवासात होता. भारतीय संघाला, कंट्रोल बोर्डाला, पोलिसांना, कोणालाच तो कुठे आहे ह्याची माहिती नव्हती. त्याला घेऊन गेलेली ॲम्ब्युलन्स निनावी असून शहरातल्या कुठल्याही नर्सिंगहोममध्ये किंवा हॉस्पिटलमध्ये त्याला घेऊन गेली नव्हती. मात्र "मी सुरक्षित आहे आणि २८ डिसेंबरला प्रगट होईन. तोपर्यंत मला शोधण्याचा

प्रयत्न करू नये." असा एक संदेश त्याच्यातर्फे एका अज्ञात इसमाने पोलिसांकडे आणि मोठ्या वर्तमानपत्रांकडे पाठवला.

दरम्यान क्रिकेटचे शौकीन आणि टीकाकार त्या अभूतपूर्व सामन्याचा आढावा घेण्यात गुंतले होते. 'इंडियन रोप ट्रिक', 'जिम लेकरचा सवाई रांगणेकर', 'क्रिकेट की मेस्मेरिझम?' अशा तऱ्हेच्या अनेक मथळ्यांखाली रांगणेकरच्या गोलंदाजीची चर्चा झाली. त्याच्या गोलंदाजीची फिल्म स्लो मोशनवर उलटीसुलटी अनेक वेळा तपासून झाली. तज्ज्ञांना त्यात 'थ्रोइंग' किंवा इतर कुठलेही वैगुण्य आढळले नाही. त्यात सराईतपणा होता आणि तो मुळात डावरा नसलेल्या माणसात एकाएकी कसा आला याचे सर्वांनाच कोडे पडले.

२८ डिसेंबरला रांगणेकर एका पोलिसस्टेशनवर दाखल झाला. गेला आठवडा आपण कोठे होतो हे त्याला बिलकूल आठवत नव्हते. फार काय, स्वतःच्या पराक्रमाचीसुद्धा त्याला माहिती नव्हती! एरव्ही त्याच्यात कुठलाही शारीरिक दोष नव्हता. २१ डिसेंबरपूर्वीच्या आणि २८ डिसेंबर-नंतरच्या घटनांची स्मृती त्याच्या मेंदूत होती. फार काय, आपल्याला डाव्या हाताने गोलंदाजी करता येते ही कल्पनाच त्याला हास्यास्पद वाटली. त्यामुळे त्याच्या पराक्रमाचे कोडे उलगडू शकले नाही आणि वेगवेगळ्या कल्पनांना वाव मिळाला.

२१ ते २८ डिसेंबरच्या आठवड्यात रांगणेकरच्या आयुष्यात काय घडले होते? खरा प्रकार कळल्यापासून सत्य हे मानवी कल्पनेपेक्षा विलक्षण असू शकते याची मला खात्री पटली.

५ फेब्रुवारी २००५ ही तारीख माझ्या सदैव स्मरणात राहील. त्या दिवशी सकाळी आठ वाजता मला संजू गोळेचा फोन आला. जवळजवळ पाच वर्षांनी मी त्याचा आवाज ऐकत होतो.

"प्रताप, मी तुला आज रात्री भेटायला येऊ का? नऊच्या सुमाराला? फार जरुरीचं काम आहे."

"हो, जरूर ये. जेवायलाच ये." मी आग्रह केला. "पण कशासाठी तुला माझी आठवण झाली हे तरी सांगशील का?" मी विचारले.

"प्रमोदसंबंधी तुला काही सांगायचं आहे. आणखी पुष्कळ चर्चा करायची आहे. पण हे सर्व गुप्त ठेव. जेवायला इतर कोणाला बोलावू नकोस."

"बरं बरं! आणखी काही सूचना?" मी थट्टेने विचारले.

"होय. वहिनींना म्हणावं, मला जेवायला काटासुरी लागते." ह्या चमत्कारिक सूचनेचा जास्त खुलासा न करताच संजूने फोन बंद केला.

संजू, प्रमोद आणि मी शाळेत एकत्र शिकलो आणि खेळलो. आमचे त्रिकूट शाळेत प्रसिद्ध होते. जीवश्चकंठश्च मित्र असलो तरी आमचे स्वभाव अगदी वेगळे होते आणि आमची गती वेगवेगळ्या विषयांत होती. मी स्वभावाने हळवा आणि कलात्मक विषयांत रस घेणारा, तर संजू अबोल आणि विज्ञानाची व गणिताची आवड असलेला. त्याउलट प्रमोद बहिर्मुख आणि खेळांत पुढाकार घेणारा म्हणून प्रसिद्ध. कॉलेजपर्यंत आमचे त्रिकूट कायम राहिले. पुढे प्रमोदने बँकेत नोकरी करून क्रिकेटमध्ये नाव मिळवले. मी एका प्रख्यात म्युझियमची क्युरेटरशिप पत्करली. आणि संजू? विज्ञानाचे उच्च शिक्षण घेऊन त्याने डिफेन्स लॅबॉरेटरीमध्ये नोकरी मिळवली आणि तिथल्या गुप्त रिसर्च प्रॉजेक्ट्समध्ये तो असा गडप झाला की गेली अनेक वर्षे आमची दोघांची एका शहरात असूनही गाठ पडली नव्हती.

परंतु त्याच्या बोलण्याला मान द्यायचे माझ्या अंगवळणी पडले होते. म्हणून त्याची सूचना आम्ही तंतोतंत पाळली. इतर कोणाला बोलवायचा मोह मी टाळला आणि त्याच्या आग्रहाप्रमाणे माझ्या पत्नीने पाश्चात्त्य पद्धतीचे जेवण तयार केले. नाहीतरी पाश्चात्त्य पाककृती करून दाखवायचे फारसे प्रसंग येतच नाहीत, अशीच तिची तक्रार होती. संजूसाठी प्रॉन कॉकटेल, कॉकोव्हॅं आणि क्रेप सुझेट असा उत्कृष्ट बेत तिने केला.

प्रमोदसंबंधी संजू काय सांगणार असेल याचा तर्क करण्यात माझा सबंध दिवस गेला. अनेकांनी त्याच्याबद्दल उलटसुलट विधाने केली होती. त्यांच्यात हा आणखी काही भर घालणार आहे का? पण वैज्ञानिक प्रवृत्तीचा आणि मूळचा अबोल असा संजू आपण होऊन ह्या विषयावर बोलू इच्छितो त्या अर्थी त्याला नक्कीच काहीतरी महत्त्वाची माहिती सापडली असणार. तो येईपर्यंत माझी उत्सुकता शिगेला पोचली होती.

ठरल्या वेळी दाराची घंटा वाजली आणि संजू उगवला. एखाद्या परिचित माणसाला अनेक वर्षांनी पाहिल्याबरोबर त्याच्यात थोडाफार बदल झालेला वाटतो त्याप्रमाणे संजूही थोडा बदललेला दिसला. पूर्वीच्यापेक्षा जास्त प्रौढ आणि गंभीर वाटला. परंतु आणखी कसलातरी वेगळाच बदल त्याच्यात झालेला आहे असे माझे अंतर्मन सांगत होते—पण तो नेमका कुठे आहे ते मलाच सांगता येत नव्हते! त्याचे बोलणेचालणे नेहमीप्रमाणे होते आणि पूर्वीच्या गप्पागोष्टींत मी माझा प्रथमदर्शनी झालेला ग्रह विसरून गेलो.

जेवण उत्तम प्रकारे पार पडले. गेली पाच वर्षे काय करत होतास, कसले शोध लावलेस वगैरे माझ्या आणि हिच्या प्रश्नांना गुळमुळीत उत्तरे देऊन संजू आम्हा दोघांनाच जास्त बोलायला लावत होता. हिच्या पाककौशल्याची स्तुती करणे आणि त्याचा माझ्या स्थूलपणाशी संबंध जोडणे, आमच्या मुलांची चौकशी, तिचे सोशल सर्व्हिसचे अनुभव वगैरे विषय तिला बोलायला उद्युक्त करायला पुरेसे होते. परंतु माझे मात्र समाधान झाले नाही. तो स्वतःबद्दल बोलायचे मुद्दाम टाळतो आहे अशी मला दाट शंका येत होती. शिवाय, नेहमी भरभर जेवणारा संजू आज इतक्या सावकाश का जेवतो आहे? पूर्वी-प्रमाणे त्याची नजर भेदक नसून स्वप्नाळू का वाटते?—अशा लहानसहान शंका मधूनमधून माझ्या मनात येत होत्या आणि मी त्या दूर सारत होतो.

जेवण संपताना मात्र त्या शंकांना पुष्टी देणारी, एक किंचित विसंगत अशी घटना घडली.

माझा बारा वर्षांचा मोठा मुलगा अरुण एक गोष्टीचे पुस्तक घेऊन आला. पाच वर्षांपूर्वी त्याची आणि संजूची मोठी दोस्ती होती.

"संजूकाका, हे पुस्तक तुम्ही मला मागं प्रेझेंट केलं होतं. पण तुम्ही किती विसराळू! 'चि० अरुणला सप्रेम भेट' असं लिहिलंत आणि सही मात्र करायला विसरलात! आता करा पाहू सही."

संजूने ते पुस्तक हातात घेऊन पाहिले-न-पाहिल्यासारखे करून परत दिले "अरुण बेटा! मी आज सही करत नाही. पुन्हा येईन तेव्हा करीन. आज माझे डोळे दुखताहेत."

"अरे, नुसती सही करायला कसली सबब पुढं करतोस! सही तर डोळे मिटूनदेखील करता येते!" मी संजूला हटकले.

"तसं नाही रे! डॉक्टरनं मला बिलकूल लिहायचं नाही अशी सक्त ताकीद दिली आहे. हे बघ अरुण, मी पुन्हा येईन तेव्हा सही तर करून देईनच; शिवाय तुला आणखी एक प्रेझेंट आणीन."

अरुण थोडा नाखूष होऊनच गेला.

जेवण संपल्यावर संजू आणि मी माझ्या अभ्यासिकेमध्ये आमच्या गुप्त चर्चेसाठी गेलो. अभ्यासिकेचे दार बंद करून मी लगेच माझ्या मनातला प्रश्न संजूपुढे टाकला.

"प्रमोदसंबंधानं तू काय सांगणार आहेस?"

संजू एका आरामखुर्चीवर टेकून शांतपणे उद्गारला, "जरा दमानं घे प्रताप! मला बरंच काही सांगायचंय आणि प्रमोदचं प्रकरण त्यात ओघाओघानं येईलच. प्रथम मला ह्याच्यावर आपलं मत दे." असे म्हणून त्याने खिशातून एक पॅकेट काढले आणि काळजीपूर्वक उघडले.

त्यात एक नाचणाऱ्या गणपतीची सुरेख पण लहानशी प्रतिमा होती. त्याची घडण, कारागिरी सर्व माझ्या परिचयाची होती. कारण तसलीच एक प्रतिमा आमच्या म्युझियममध्ये होती. ती प्रतिमा पेशवाईच्या काळातली असून, एके काळी शनिवारवाड्यातल्या पेशव्यांच्या एका देवघरात विराजत होती असे तज्ज्ञांचे मत होते. ती प्रतिमा आमच्या म्युझियममध्ये कशी आली हा एक मोठा इतिहास आहे, पण त्याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. परंतु तसलीच प्रतिमा संजूकडे कशी आली? नव्हे, चुकलो! ती प्रतिमा एका अर्थाने वेगळी होती. तो गणपती उजव्या सोंडेचा होता.

उजव्या सोंडेचे गणपती दुर्मिळ असले तरी अस्तित्वात आहेत. तरीपण पेशवाईच्या काळातला आणि मुळातच दुर्मिळ असलेला गणपती संजूने कुठे मिळवला? तो नकली माल नव्हे हे माझ्यातल्या तज्ज्ञाने केव्हाच ओळखले होते. तरी मी माझी उपकरणे वापरून त्याची शहानिशा केली.

"काय क्युरेटरसाहेब! आहे की नाही ही एक दुर्मिळ वस्तू?" मिष्किल-पणे हसत संजूने विचारले.

"होय, आहे खरी! ती इतकी दुर्मिळ आहे की ती नकली असावी असा मला प्रथम संशय आला. परंतु हा खरा माल आहे असं मी खात्रीपूर्वक सांगू

शकतो. फार काय, असलाच डाव्या सोंडेचा गणपती माझ्या म्युझियममध्ये आहे." मी माझे मत दिले.

"खरं की काय?" संजूच्या उद्गारात मला आश्चर्यापेक्षा मिष्किलपणा दिसला. "बरं, सवडीने तो मला तू दाखव! पण मला तर शंका वाटते की तसला गणपती तुझ्याकडे असेल. मात्र हा गणपती तुझ्या म्युझियमला माझी भेट म्हणून ठेव."

"म्युझियमच्या ट्रस्टींच्यातर्फे तुझे आभार मानतो संजू! त्यांचं तुला पत्र येईलच. तुला कल्पना नाही ही किती मोलाची वस्तू तू म्युझियमला देत आहेस." माझा स्वर भारावून गेला. "पण मला हे सांगशील का, की हा गणपती तुझ्याकडे कसा आला? म्युझियममध्ये असलेल्या दुर्मिळ वस्तूंबद्दल हे कुतूहल सर्वांनाच असतं."

"तो इतिहास मी तुला सांगतो. पण तो तुला गुप्त ठेवावा लागेल." संजू उद्गारला. "शिवाय त्याचा प्रमोदच्या पराक्रमाशी संबंध आहे."

गणपतिप्रकरणामुळे मी मूळचा मुद्दा जवळजवळ विसरूनच गेलो होतो. संजूच्या उद्गाराने माझे कुतूहल कमालीचे वाढले.

"गणपतीचा इतिहास सांगण्यापूर्वी मी तुला आणखी एक प्रश्न विचारतो. तू माझा लहानपणापासूनचा मित्र आहेस. प्रताप, तुला जर कोणी विचारले की संजूला ओळखण्यासाठी त्याच्या शरीरावर काही खूण आहे का, तर तू काय उत्तर देशील?"

ह्या प्रश्नाने माझे कुतूहल आणखीच वाढले. प्रमोदची गोलंदाजी, उजव्या सोंडेचा गणपती आणि हा प्रश्न यांचा संबंध काय? माझे डोके गरगरायला लागले. तरी संजूच्या प्रश्नाचे उत्तर मला माहीत होते.

"तुझ्या डाव्या दंडावर फुलपाखरासारखी दिसणारी एक जन्मखूण आहे. लहानपणी मी आणि प्रमोदनं तुझी त्यावरून बरीच थट्टा केली होती."

संजूने आपल्या शर्टाची डावी बाही वर केली. ती जन्मखूण दंडावरून नाहीशी झाली होती. माझे डोके जास्तच गरगरायला लागले आणि मग संजूने शांतपणे आपल्या उजव्या दंडाकडे बोट दाखवले.

ती जन्मखूण उजव्या दंडावर होती.

"अरे पत्या, ऊठ लेका! किती कुचकामाचा तू!" सजू मला शुद्धीवर आणायचा प्रयत्न करत होता. क्षणभर मला वाटले की मी झोपेतून उठत आहे आणि मला कसले तरी विचित्र स्वप्न पडले आहे. खरे म्हणजे माझी शुद्ध हरपली होती संजूशी चर्चा करताना.

"सॉरी! माझ्या गोष्टींचा तुझ्यावर इतका परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती. मी हाडामासाचा संजूच आहे—भूतबीत नव्हे."

"मग तुझी जन्मखूण कशी बदलली?" मी भीतभीतच विचारले. उत्तरादाखल संजूने माझा हात पकडून स्वतःच्या छातीवरून सावकाश फिरवला. त्याचे हृदय उजवीकडे धडधडत होते!

प्रमोदची डावरी गोलंदाजी, उजव्या सोंडेचा गणपती, उजवीकडे हृदय असलेला संजू ह्या वेगवेगळ्या गोष्टींतून कसलातरी धागा जात आहे याची मला अंधुकशी कल्पना येऊ लागली. ही सर्व आरशातील प्रतिबिंबे असावीत असा एक वेडसर विचार मनात येऊन गेला. हाडामांसाची किंवा भरीव प्रतिबिंबे? गणपती मी हाताळला होता. संजूला चाचपून पाहिले होते. फलंदाजांना बाद करताना प्रमोदला मीच नव्हे तर अनेकांनी पाहिले होते. फार काय निर्जीव टी० व्ही० नेसुद्धा! ती आरशातली प्रतिबिंबे नव्हती, तर विश्वात प्रत्यक्ष अस्तित्व असलेल्या गोष्टी होत्या!

तरीपण मी संजूला आरशासमोर उभे केले आणि मला प्रथमदर्शनी झालेल्या शंकेचे समाधान झाले. आरशातला संजू मला जास्त परिचयाचा वाटला. प्रतिबिंबावरून आपण कसे दिसतो याची आपल्याला कल्पना येते. परंतु मूळ व्यक्तीत आणि तिच्या प्रतिबिंबात थोडेफार फरक असतातच. माझ्या अंतर्मनाला वाटलेला फरक संजूचे प्रतिबिंब आणि मूळ संजू यांच्यातला होता. आज माझ्याकडे आलेला संजू मूळचा संजू नसून त्याचे हाडामांसाचे प्रतिबिंब होते. पण हे कसे शक्य झाले? आणि मूळचा संजू कुठे गेला?

"तुला वाटतं, की मी कोणीतरी वेगळा प्राणी संजूचं प्रतिबिंब बनून आलेला आहे?" संजूने किंवा त्या 'जीवा'ने माझी विचारशृंखला बरोबर ताडली. "नाही. मी मूळचा संजूच आहे. फक्त माझं माझ्या प्रतिबिंबात रूपांतर झालेलं आहे."

"पण हे कसं शक्य झालं?"

"तेच सांगायला मी येथे आलो आहे. मी सांगतो ती गोष्ट सत्य आहे—मग तुला ती खरी वाटो न वाटो. मात्र तिला तुझ्या पलीकडे जाऊ देऊ नकोस."

संजूने सांगितलेला आश्चर्यजनक वृत्तांत त्याच्याच शब्दांत देतो :

"तुला आठवत असेल, मी पाच वर्षांपूर्वी एका सरकारी जागेकरता अर्ज केला होता. त्या जागेसाठी शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ असलेल्या माणसाची आवश्यकता होती आणि काम गुप्त स्वरूपाचं होतं. फंडामेन्टल फिजिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स ह्या दोन्ही विषयांत मी उच्च शिक्षण मिळविलेलं असल्यानं मला ती जागा सहज मिळाली.

महत्त्वाचं काम करायला मिळणार म्हणून मी प्रथम उत्साहात होतो. पण लवकरच माझ्या आनंदावर विरजण पडलं. माझ्या कामात डेस्कवर्क जास्त आणि प्रयोगशाळेतलं काम कमी होतं. त्याशिवाय लाल फीत, वरिष्ठांची हुकमत आणि मर्जी सांभाळणं, नवीन कल्पना वापरायला निरुत्साह, सहकाऱ्यांचे हेवेदावे वगैरे प्रकार येथेसुद्धा मला आढळले. त्यामुळं मी इतरांच्याशी संपर्क कमी केला—फक्त कामापुरता त्यांच्याशी संबंध ठेवला. माझे बहुतेक सहकारी गप्पागोष्टी, चहापाणी ह्याच्यातच वेळ खर्च करायचे. मी मात्र माझे स्वतःचे अध्ययन आणि प्रयोग यांच्यात जास्त वेळ घालवीत असे. मला दिलेले ऑफिसचे काम मी व्यवस्थित पूर्ण करत असल्याने माझ्याविरुद्ध तक्रारींना वाव नव्हता. त्यामुळं मी माझा इतर वेळ कसा खर्च करतो इकडे कोणी लक्ष दिलं नाही.

गुरुत्वाकर्षण आणि मूलकण यांच्याविषयी मला स्वतःला संशोधन करायचं होतं. गेली कित्येक वर्षे एक विलक्षण कल्पना माझ्या मनात येत असे; तिला मूर्त स्वरूप देण्याचा मी निर्धार केला. त्यासाठी लागणारी उपकरणं आमच्या प्रयोगशाळेत उपलब्ध होती. माझ्या प्रयोगाविषयी सांगण्यापूर्वी ती मूळ कल्पना थोडक्यात सांगतो.

आइन्स्टाईनच्या 'गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणं अवकाश आणि काल (Space and Time) यांचे गुण त्यात उपस्थित असलेल्या वस्तूंवर अवलंबून असतात. जर एखाद्या भागात कोणतीही वस्तू नसेल तर तेथील

अवकाश आणि काळ यांची भूमिती युक्लिडची असते—जी आपण प्रथम शाळेत शिकतो. याउलट, जर त्या अवकाशात एखादी मोठ्या वस्तुमानाची, मोठया उर्जेची वस्तू ठेवली तर त्या भागातली भूमिती बदलते. त्यातील सरळ रेषांची दिशा बदलते. आपण म्हणतो की प्रकाश सरळ रेषेत जातो; पण एखाद्या मोठया वस्तूशेजारून जाताना प्रकाशाची दिशा बदलते. खगोलशास्त्रातील वेधांनी अशा तऱ्हेचे परिणाम शास्त्रज्ञांनी पडताळून पाहिले आहेत आणि हे सर्व परिणाम 'वस्तुजनित गुरुत्वाकर्षणामुळं अवकाशकालाचं वक्रीकरण होतं' ह्या आइन्स्टाईनच्या सिद्धांतावर आधारलेले आहेत.

मी तुला वक्रीभूत अवकाश-काल, त्यातील वेगळ्या भूमितीचे नियम वगैरे सांगून बोअर करू इच्छीत नाही. पण मला सुचलेली कल्पना सांगण्यापूर्वी ही प्रस्तावना करणं आवश्यक होतं. कारण मला ह्यापुढची पायरी गाठायची होती. ती म्हणजे अवकाश-कालाला 'पीळ' पाडण्याची.

तू मोबियसच्या पट्टीचं नाव ऐकलं असशील. पँटचा पट्टा जर आपण सपाट टेबलावर पसरला तर त्याचे पृष्ठभाग (खालचा आणि वरचा असे दोन पृष्ठभाग त्याला असतात) समतल असतात. त्यांना युक्लिडची भूमिती लागू पडते. तोच पट्टा जर कमरेभोवती बांधला तर त्याचे वक्रीकरण होते आणि त्याला 'अयुक्लिडीय' भूमितीचे नियम लागू होतात. पण पूर्वीप्रमाणंच त्याला दोन पृष्ठभाग असतात—आतला आणि बाहेरचा. आता त्यापुढची पायरी म्हणजे त्या पट्ट्याला एक पीळ देऊन कमरेभोवती बांधण्याची. ह्या पट्ट्याला आता एकच पृष्ठभाग असतो! हीच मोबियसची पट्टी.

समज, पट्टीवर सरपटणारे चपटे जीव आहेत. त्यांना लांबी आणि रुंदी आहे पण उंचीची कल्पना नाही. असा एक मनुष्याकृती जीव—पण फक्त डावा हात असलेला—त्या पट्टीवर राहतो. तो एकाच ठिकाणी त्या पट्टीवर किती जरी गोलगोल फिरला तरी डावरा तो डावराच राहणार. पण जर तो त्या पट्टीवर एक सबंध फेरी मारून आला तर त्याचा डावा हात जाऊन उजवा हात आलेला असेल! तुला खरं वाटत नसेल तर कागदाची मोबियस पट्टी तयार करून त्यावर असा जीव फिरवून तुला सहज माझं विधान तपासून पाहता येईल. हे चित्र पाहा :



त्या सरपटणाऱ्या चपट्या जीवाला वाटणारा चमत्कार आपल्याला मात्र चमत्कार वाटत नाही, कारण आपण त्या पट्टीकडे तीन परिमाणे म्हणजे लांबी, रुंदी आणि उंची असलेल्या अवकाशात पाहतो. त्या पट्टीला असलेल्या पिळामुळे तो चपटा माणूस त्याच्या आपादमस्तक रेषेभोवती निम्मा फिरवला जातो आणि त्यामुळं त्याचा डावा हात उजवीकडे जातो. हे चित्र पाहा :



समजा, असाच पीळ आपल्या तीन परिमाणांच्या अवकाशात पडला तर? आपल्यासारख्या लांबी-रुंदी-उंची असलेल्या माणसांनासुद्धा तोच चमत्कार दिसून येईल. विशिष्ट प्रकारचा पीळ असलेल्या अवकाशातून चक्कर मारून आल्यावर कुठल्याही वस्तूचे तिच्या प्रतिबिंबात रूपांतर होईल. अर्थात हा प्रकार आपल्याला डोळ्यांपुढं आणता येत नाही, कारण त्यासाठी चौथ्या परिमाणाची जरुरी आहे. पण गणितज्ञांना गणिताच्या रूपानं ह्या प्रकाराचं चित्रण करता येतं. जे आपल्या इंद्रियांच्या अनुभवापलीकडचं आहे ते अमूर्त गणिताला सहज साध्य होतं!

हा सर्व झाला कल्पनाशक्तीचा खेळ. अवकाशात खरोखर असा पीळ निर्माण करता येईल का? ह्याविषयी अनेक शास्त्रज्ञांनी सिद्धांत मांडले

आहेत. ते सर्व अपरिपक्व असून, अजून त्यांना मान्यता मिळालेली नाही. पण त्या सर्वांच्या मुळाशी एक कल्पना आहे. ती म्हणजे मूलकणांचा उपयोग करून पीळ निर्माण करण्याची शक्यता. काही विशिष्ट मूलकणांमध्ये फिरकी (Spin) सारखे काही आंतरिक गुण आहेत. 'फिरकी' हा शब्द जरी आपल्या दैनंदिन जीवनातल्या एखाद्या अक्षाभोवती फिरणाऱ्या वस्तूंवरून घेतला असला तरी मूलकणांच्या संदर्भात त्याला वेगळा अर्थ येतो. आणि अमूर्त स्वरूपाच्या वेगळेवेगळ्या फिरक्या मूलकणांच्या गणितात असतात. एका विशिष्ट तऱ्हेची फिरकी असलेले मूलकण मोठ्या संख्येने अवकाशात सोडले तर पीळ निर्माण होण्याची शक्यता असते, असा कयास केला जातो. मात्र हे सर्व मूलकण एकजुटीने फिरकी करणारे पाहिजेत. ते वेगवेगळ्या दिशेने फिरकी करत असले तर त्यांचा परिणाम होत नाही.

आमच्या प्रयोगशाळेत मूलकणांचे स्रोत तयार करणारं मोठं यंत्र असल्यानं अशा तऱ्हेचे स्रोत तयार करून पाहण्याचं मी ठरवलं. नवीन प्रयोग करायला सरकारी लाल फितीला तोंड देण्याचा धीर माझ्यात नव्हता. माझं प्रपोजल वेगवेगळ्या फायलींतून प्रवास करून नकारघंटा घेऊन परत येईपर्यंत मी निवृत्त होण्याची वेळ आली असती! त्या फाइलवाल्यांच्या समाधानासाठी मी हा प्रयोग माझ्या नेहमीचा सरकारी कामाचाच एक भाग आहे अशी थाप मारली आणि त्या मूलकणांच्या यंत्राशेजारी एक कॅबिन माझ्यासाठी राखून घेतलं. त्यावर 'टॉप सीक्रेट', 'डेंजरस', 'डू नॉट एंटर' वगैरे पाट्या लावून मला कोणी त्रास देणार नाही याची काळजी घेतली.

सडाफटिंग असल्यामुळं मला हवा तेवढा वेळ प्रयोगासाठी काढता आला. पण मी हाती घेतलेलं काम अतिशय अवघड होतं. त्या यंत्रातून हव्या त्या अवस्थेत एकजुटीनं सर्व मूलकण बाहेर काढण्याच्या प्रयत्नात, रात्रीचा दिवस करूनही, मला दोन वर्षं लागली. शेवटी, जवळजवळ सहा महिन्यांपूर्वी मी त्यात यश मिळवलं.

माझ्या प्रयोगाकरता मी माझं रिस्टवॉच वापरलं. त्याचं प्रतिबिंबात रूपांतर होताना त्याची कालमापनपद्धती बदलते का हे मला पाहायचं होतं. ते घड्याळ योग्य ठिकाणी ठेवून मी त्यावर मूलकणांचा स्रोत टाकला. घड्याळ त्या स्रोतामध्ये एका विशिष्ट वर्तुळाकृती मार्गानं फिरवल्याबरोबर एकदम त्याचं

प्रतिबिंबात रूपांतर झालं आणि त्याच्या कालमानात फरक पडला नाही. प्रयोग यशस्वी झाल्याच्या आनंदात मी झोत बंद केला आणि घड्याळ पूर्ववत झालं! अजून रूपांतर टिकवण्यात मला यश आलं नव्हतं.

मी तोच प्रयोग वेगवेगळ्या पद्धतीनं करून पाहिला आणि शेवटी मला पूर्ण यश लाभलं. मूलकणांच्या झोतात घड्याळाचं रूपांतर झाल्यावर तो झोत बंद करण्यापूर्वीच ते घड्याळ बाहेर काढलं की त्याचं रूपांतर टिकून राहायचं. मी हाच प्रयोग वेगवेगळ्या वस्तूंवर करून पाहिला, आणि मला प्रत्येक वेळी हा अनुभव आला. ह्या प्रकारामागं काय गूढ आहे ते मला अजून उकललेलं नाही.

चार डिसेंबरला मी हा प्रयोग स्वतःवर करून पाहायचं ठरवलं. अर्थातच त्यापूर्वी किडे, फुलपाखरं, गिनीपिग वगैरेवर प्रयोग करून जीवाला अपाय होणार नाही याची मी खात्री करून घेतली होती. तरी पण जर काही कारणाने माझं बरंवाईट झालं तर इतर शास्त्रज्ञांना माझ्या संशोधनाचा फायदा मिळावा म्हणून मी प्रयोगाची सर्व तांत्रिक माहिती लिहून काढली आणि एका सुरक्षित ठिकाणी ठेवली आणि माझं रूपांतर झाल्यावर माझे त्या खोलीतले व्यवहार व्हिडियोटेपवर रेकॉर्ड करण्याची व्यवस्था केली. शिवाय इतर यंत्र माझ्या शरीरातल्या वेगवेगळ्या प्रक्रिया मोजूनमापून पाहणार होतीच. इतकी सर्व व्यवस्था करून मग मी त्या मूलकणांचा प्रवाह सुरू करून त्याच्यात प्रवेश केला.

त्या झोतामध्ये योग्य मार्गानं राउंड पुरा केल्यावर माझंसुद्धा प्रतिबिंबात रूपांतर झालं आणि मला ते होत असल्याची जाणीव झाली नाही! कसल्याही वेदना न होता, डोक्याला चक्कर न येता माझं रूपांतर झालं. माझ्याबरोबरच माझ्या अंगावरचे कपडे, घड्याळ, बूट सर्व त्याचप्रमाणं बदललं! मी झोताच्या बाहेर येऊन स्वतःचीच परीक्षा केली. मला अक्षरं वाचता येईनात—कारण माझ्या डोक्यात उलटी अक्षरं वाचायची माहिती उपलब्ध होती. बाटलीचं झाकण स्क्रू करून उघडताना, बंद करताना माझा घोटाळा होई. कारण स्क्रूची रचना माझ्या डोक्यात आणि प्रत्यक्षात एकमेकांविरुद्ध होती. माझ्या उजव्या हातातला सराईतपणा जाऊन तो डाव्या हातात आला. मला अनुभवाला येणाऱ्या सर्व गोष्टींची मी नोंद केली. शिवाय यंत्रावर माझं निरीक्षण केलं जातच होतं.

शेवटी मी 'सुलटा' होण्यासाठी परत त्या झोतामध्ये शिरलो आणि बाहेर आल्यावर पूर्ववत झालो. पण माझ्या मेंदूवर एक परिणाम झालेला होता. माझी उलटेपणातली सर्व स्मृती पुसली गेली होती! मी प्रयोगाला सुरुवात करीपर्यंतची सर्व स्मृती शाबूत होती. पण प्रतिबिंबात्मक अवस्थेत मी काय केलं ते बिलकूल आठवत नव्हतं. मात्र व्हिडिओटेपवर मला ते सर्व रेकॉर्ड झालेलं पाहायला मिळालं. तसेच, माझे अनुभव, माझ्या हस्ताक्षरातलेच वाचायला मिळाले. पण ते वाचताना मला आरसा समोर धरावा लागला. कारण ती अक्षरं उलटी होती!"

संजूची सर्व हकिगत ऐकताना एक 'अरबी भाषेतील सुरस आणि चमत्कारिक कथा' ऐकतो आहे असे मला वाटत होते. पण त्यावर अविश्वास ठेवायला जागा नव्हती. कारण त्याचे प्रतिबिंबच माझ्या समोर बसले होते. त्याची गोष्ट चालू असताना माझी नजर त्या उजव्या सोंडेच्या गणपतीकडे गेली आणि माझ्या मनात एकाएकी एक विचार आला.

"थांब संजू! हा गणपतीसुद्धा रूपांतरितच आहे का?" मी त्याला विचारलं.

"होय प्रताप! तुला खरं वाटत नसलं तर म्युझियममध्ये जाऊन खात्री करून घे." संजूच्या डोळ्यांत परत मिष्किलपणाची झाक दिसू लागली.

मी त्याला घेऊन शेजारीच असलेल्या म्युझियमच्या इमारतीत गेलो. पेशवाईच्या काळातल्या वस्तूंच्या सेक्शनमध्ये जाऊन मी तिथल्या एका कॅबिनेटकडे धाव घेतली. तेथे डाव्या सोंडेच्या गणपतीची जागा रिकामी होती! मी संजूनं दिलेला गणपती तेथे ठेवला आणि मुकाट्यानं त्याला घेऊन माझ्या स्टडीमध्ये परत आलो.

"सॉरी! मी तुला फसवलं, प्रताप. तुला पाहिजे असल्यास मी तो गणपती पूर्ववत करून देईन. तुला भेटण्यापूर्वी थोडी गंमत करावी म्हणून मी गेल्या आठवड्यात तुझ्या म्युझियमला भेट देऊन तिथला गणपती लंपास केला. तोच आज तुला परत भेट म्हणून दिला." संजूने स्पष्टीकरण केले.

माझे डोके आता काम करायला लागले होते. प्रमोद रांगणेकरचा विक्रम त्याने केला नसून त्याच्या प्रतिबिंबाने केला असणार! तरीच तो डाव्या हाताने सराईतपणे बोलिंग करू शकला, आणि त्याचे ते अनपेक्षित तऱ्हेचे बोलिंग

एम० सी० सी० च्या खेळाडूंना अवघड वाटले. मी माझा तर्क संजूला सांगितला.

"बरोबर आहे. प्रमोद वीस तारखेला संध्याकाळी माझ्याकडे आला. तो फार उदास मनःस्थितीत होता. त्याची शेवटची मॅच असून ती स्मरणीय व्हावी अशी त्याची इच्छा होती. पण ते शक्य दिसत नव्हतं. त्याची बोलिंग पूर्वीसारखी प्रभावी पडत नव्हती, कारण ती प्रतिस्पर्ध्यांच्या परिचयाची झाली होती. दुसऱ्या दिवशी त्याला बोलिंग करायची होती आणि ती यशस्वी झाली नाही तर टीकाकार आपल्याला फार त्रास देतील अशी त्याला भीती वाटत होती." संजू म्हणाला. तो पुढे काय सांगणार ह्याकडे माझे सर्व लक्ष होते. तो पुढे म्हणाला, "प्रमोदशी बोलताना माझ्या मनात एक विलक्षण कल्पना आली. समजा, आपण त्याचं प्रतिबिंबात रूपांतर केलं तर? अर्थात मी माझं गुपित त्याला सांगणार नव्हतो.

मी त्याला कॉफीमधून झोपेचं औषध दिलं. तो निद्राधीन झाल्यावर कारमधून त्याला प्रयोगशाळेत आणलं. एखाद्या 'टॉप सीक्रेट' प्रयोगशाळेत बाहेरच्यांना मज्जाव असतो. परवानगीशिवाय आत येता येत नाही. पण हे नियम कसे मोडायचे ते मला समजलं होतं आणि प्रमोदला आत घेऊन जाताना मला कसलाही त्रास झाला नाही. त्याचं प्रतिबिंबात रूपांतर करून मी त्याला त्याच्या घरी पोचवलं.

दुसऱ्या दिवशी त्याचा फोन आला. तो फार हिस्टेरिकल झालेला होता. 'आपला उजवा हात फार अशक्त झालाय, डोळ्याला वाचताना अक्षरं उलटी दिसतात' वगैरे तक्रारी करून मी आदल्या रात्री त्याला काही भयंकर औषध दिलं होतं का अशी त्यानं पृच्छा केली. मी त्याच्या फ्लॅटवर जाऊन त्याला दिलासा दिला आणि उजवा हात अशक्त वाटत असला तर डाव्या हातानं बोलिंग कर असा सल्ला दिला. प्रथम त्याला मी थट्टा करतोय असं वाटलं. पण थोडी नेटप्रॅक्टिस केल्यावर त्याला माझ्या सल्ल्याचं महत्त्व पटलं. तो सल्ला किती प्रभावी ठरला हे तुला माहीतच आहे.

मॅचनंतर मीच त्याला घेऊन आलो. गावाबाहेर एका खेड्यात लहानशा झोपडीत त्याला मी सहा दिवस ठेवलं. कारण त्याच्या शरीरावर व मनावर फार ताण पडला होता. पोलीस आणि वृत्तपत्रांना फोन करणारा मीच होतो.

सातव्या दिवशी तो जरा नॉर्मल झाल्यावर मी परत त्याचं रूपांतर करून त्याला शहरात आणून सोडला. अर्थात त्याला गेल्या सात दिवसांतील घटना काहीच आठवत नव्हत्या."

प्रमोदच्या अभूतपूर्व गोलंदाजीचा खुलासा झाल्यावर मला इतर लहान-सहान गोष्टींचा पण खुलासा झाला. आपला डावरेपणा उघडकीला येऊ नये म्हणून संजूने आमच्या घरी हाताने न जेवता काटासुरीची मागणी केली. तरीसुद्धा त्याला खायला वेळ लागत होता. त्याच कारणामुळे त्याने अरुणच्या पुस्तकावर सही करण्याचे नाकारले. आरशात दिसते तशी सही प्रत्यक्षात करणे किती अवघड आहे हे थोडा विचार केल्यावर लक्षात येते.

"संजू, तू लवकरात लवकर आपल्या शोधांना प्रसिद्धी दे. तुला नोबेल प्राइझ नक्कीच मिळेल." मी त्याला सल्ला दिला.

"नाही प्रताप! तू म्हणतोस ते मला पटत नाही. एक तर अजून माझा शोध पूर्णावस्थेत गेलेला नाही. प्रतिबिंबावस्थेत असताना केलेले व्यवहार स्मृतिपटलावरून पूर्ण पुसले जातात ते का, त्याचं कारण आणि तसं होऊ नये ह्याला उपाय मला सापडले पाहिजेत. तरच मला समाधान वाटेल. मी आज तुझ्याकडे आलो, आपलं दीर्घ संभाषण झालं, मी केलेला खुलासा हे सर्व मी पूर्ववत झालो की विसरून जाणार. ही माझ्या शोधातली अपूर्णता मला भरून काढायची आहे." संजूतला परफेक्शनिस्ट बोलत होता. "त्या प्रयोगासाठी मला आमच्या लॅबोरेटरीतील दुर्मिळ अशी एक विशिष्ट वस्तू पाहिजे आहे. ती मिळवण्याच्या प्रयत्नात मी आहे."

"कबूल आहे! पण एक व्यवहारी सल्ला तरी ऐकशील का?" मी कळकळीने विचारले, "तू ज्या अज्ञात शक्तीशी खेळत आहेस त्यात तुझं बरंवाईट होण्याची शक्यता आहे. निदान आपल्या आतापर्यंतच्या प्रयोगांचा अहवाल तरी व्यवस्थित लिहून एका सुरक्षित ठिकाणी ठेवून दे, म्हणजे तुझ्या शोधांना आणि जगाकडून मिळणाऱ्या श्रेयाला तू मुकणार नाहीस!"

"मला जगाकडून श्रेय नको की नोबेल प्राइझ नको. माझ्या अपेक्षा काही वेगळ्याच आहेत, आणि त्यांत मला तुझी मदत लागणार आहे. मात्र तू म्हणतोस त्याप्रमाणं मी माझ्या प्रयोगांचा सविस्तर अहवाल लिहून ठेवला आहे, फक्त मलाच माहीत असलेल्या ठिकाणी! तो वाचून कोणालाही

म्हणजे कोणाही तज्ज्ञ मनुष्याला स्वतःचं प्रतिबिंबात रूपांतर करता येईल. तेथे 'पुष्पक विमान इफेक्ट' नाही!" संजू हसून उद्गारला.

'पुष्पक विमान इफेक्ट' हे शब्द आमच्या पूर्वीच्या चर्चेला अनुलक्षून होते. अनेक वर्षांपूर्वी, आपले पूर्वज खूप शिकलेले, विज्ञानात प्रगत असे होते असा मी आपल्याकडील पुराणग्रथांच्या आधारे मुद्दा मांडला होता. त्याला संजूने दिलेले उत्तर समर्पक होते. पुष्पक विमान म्हणजे 'हेलिकॉप्टर', दूरवर इच्छित स्थळी जाणारी, घटोत्कचाला मारणारी इंद्राने दिलेली शक्ती म्हणजे 'गाइडेड मिसाइल' वगैरे दाखले शास्त्रज्ञाला पुरेसे नाहीत. जोपर्यंत ती कशी तयार करायची ह्याची शास्त्रीय माहिती पुराणग्रंथात सापडत नाही तोपर्यंत ती वस्तू शास्त्रज्ञाच्या दृष्टीने कविकल्पनाच ठरते, ह्या त्याच्या मुद्द्याला मला आजपर्यंत उत्तर सापडले नव्हते.

"माझी तुला कोणत्या प्रकारे मदत पाहिजे?" मी विचारले. माझ्या ज्ञानाचा किंवा अनुभवाचा त्याच्या शोधाशी कसा संबंध येत होता हे मला कळेना. संजूने त्याचा उलगडा केला.

"तू एका मोठ्या म्युझियमचा क्युरेटर आहेस. तरी मी केलेला उजव्या सोंडेचा गणपती बघून तू फसलास. तुला तो दुर्मिळ असा एक नवीन शोध वाटला. अशाच अनेक 'दुर्मिळ', 'अमोल' वस्तू तयार करून जगाकडून त्यांची किंमत वसूल करायचा माझा विचार आहे. एखादा स्टँप उलटा छापला की दुर्मिळ होतो. त्याला खूप किंमत येते. तुझ्याकडे खासगी कलेक्टर्सकडून दुर्मिळ वस्तूंबद्दल पृच्छा केली जात असणार. मी तयार केलेली वस्तू स्वतःच्या ऑथॉरिटीवर तू सहज खपवू शकशील. त्यात मिळणाऱ्या पैशात तुझी-माझी भागीदारी असेल."

संजूने केलेला प्रस्ताव मला पसंत पडला नाही. तो म्हणत होता त्याप्रमाणे पुराणवस्तूंच्या किंवा दुर्मिळ वस्तूंच्या बाजारात संजूला पुष्कळच पैसा कमवता आला असता. त्याने केलेली प्रतिबिंबे, अर्थात काही खास वस्तूंचीच, पण डोके वापरून वेगवेगळ्या कलेक्टर्सकडे मला खपवणे अशक्य नव्हते. परंतु हा सर्वच प्रकार मला अनीतीचा वाटला. माझ्या अनुभवाचा, माझ्या मोठ्या पदाचा तो एक गैरवापर ठरला असता.

मी संजूशी बराच वाद घातला आणि त्याला ह्या मार्गापासून परावृत्त

करण्याचा प्रयत्न केला. परंतु एकदा डोक्यात घेतले की ते हट्टाने खरे करून दाखवायचे हा त्याचा अंगचा गुण पूर्वीसारखाच होता.

"बरं प्रताप! तुला नीतीच्या मार्गानं जायचं असलं तर खुशाल जा. मात्र मला तुझे उपदेशाचे डोस पाजू नको. निदान माझी सर्व हकिगत तरी गुप्त ठेवशील का?" शेवटी त्याने विनविले.

"तुझी हकिगत मी पूर्णपणं विसरून जायला तयार आहे. ती माझ्याकडून दुसऱ्या कोणाकडे जाणार नाही—काळजी करू नको."

आणि मग संजू माझा निरोप घेऊन गेला.

काही दिवसांनी डिफेन्स लॅबोरेटरीत एक मोठी चोरी झाली. एक अत्यंत दुर्मिळ असा धातू तिथल्या एका सेफमधून चोरीला गेला. सेफचे कॉंबिनेशन फार थोड्या लोकांना माहीत होते आणि गंमत म्हणजे चोराने आपल्या हाताच्या बोटांचे ठसे सेफवर जसेच्या तसे ठेवले होते.

त्या धातूचा सामान्य माणसाला उपयोग होणार नाही आणि सेफचे कॉंबिनेशन गुप्त होते म्हणून ह्या चोरीमागे लॅबोरेटरीतला एखादा वैज्ञानिकच असावा असा पोलिसांचा अंदाज होता. परंतु बोटांचे ठसे, लॅबोरेटरीतल्या कोणाही वैज्ञानिकाच्या किंवा तंत्रज्ञाच्या बोटांच्या ठशांशी जुळत नव्हते. त्याउलट, ती सेफ खास धर्तीची असून सामान्य चोराला ती उघडता आली नसती असा ती सेफ तयार करणाऱ्यांचा दावा होता.

मला मात्र वेगळाच संशय येत होता. हे काम संजूचे असावे. कारण त्याला प्रयोगासाठी काही विशिष्ट वस्तू हवी होती असे तोच बोलून गेला होता. ठसे सेफवर ठेवण्यामागे त्याची विकृत विनोदबुद्धी होती. ठशांचे प्रतिबिंब पाहायचे पोलिसांच्या कुठून डोक्यात येणार?

'डिफेन्स लॅबोरेटरीत अपघात! शास्त्रज्ञाची परिस्थिती चिंताजनक!' हे शीर्षक वर्तमानपत्रामध्ये पाहून हृदयात चर्र झाले. तो शास्त्रज्ञ कोण हे काही कारणास्तव गुप्त ठेवले जात होते. पण तो संजू असावा असे मला सारखे वाटत होते.

मी वशिला लावून बराच तपास केल्यावर माझी शंका खरी असल्याचे मला कळले.

संजू प्रयोग करत असताना एक मोठा स्फोट झाला आणि त्याच्या सर्व सामग्रीच्या ठिकऱ्या उडाल्या. खुद्द संजू नशीबवान म्हणून स्फोटाच्या मुख्य मारापासून वाचला. तरी जवळजवळ महिनाभर तो बेशुद्ध होता.

"संजू माझा जवळचा मित्र आहे आणि स्फोटाच्या काही दिवस आधी तो माझ्याकडे जेवायला आला होता" असे मी सांगताच त्याच्या डॉक्टरांनी मला मुद्दाम बोलावले. कारण स्फोटाच्या पूर्वी अनेक दिवस संजूशी बोललेले कोणीच त्यांना सापडले नव्हते. तो अत्यंत एकटेपणाचे जीवन जगत असून खुद्द प्रयोगशाळेतल्या सहकाऱ्यांशीसुद्धा बोलत नसे. संजू शुद्धीवर येण्याची शक्यता होती म्हणून मी त्या वेळी जवळ असावे अशी डॉक्टरांची इच्छा होती.

परंतु शुद्धीवर आल्यावर संजूने मला ओळखले नाही. आणि त्याचे कारण उमगायला फार वेळ लागला नाही. त्याचे स्मृतिपटल पूर्णतया पुसले गेले होते!

आपला प्रयोग संपूर्ण यशस्वी करण्यासाठी त्याने कसला तरी धाडसी प्रयत्न केला असणार. प्रतिबिंबातून मूळ स्वरूपात आल्यावर स्मरणशक्ती शाबूत राहावी हे ध्येय गाठताना तो आपली संपूर्ण स्मरणशक्ती गमावून बसला होता. त्याचे नशीब बलवत्तर म्हणून तो मूळ स्वरूपात तरी सुखरूप आला आणि त्याचा मेंदू इतर बाबतीत तरी व्यवस्थित आहे. पण स्वतः आपण किती महत्त्वाचा शोध लावला होता हे त्याचे त्यालाच माहीत नाही! त्याने लिहून ठेवलेली माहिती कुठल्या 'सुरक्षित' ठिकाणी त्याने ठेवली आहे? ती मिळेपर्यंत मला त्याने सांगितलेली हकिगत जगाला अविश्वसनीयच वाटणार.

जगालाच काय, मला स्वतःला कधीकधी ही सर्व हकिगत स्वप्नवत वाटते. प्रमोदच्या गोलंदाजी-प्रकरणाच्या मुळाशी इतकी विलक्षण घटना होती का? मी खरेच संजूला प्रतिबिंबावस्थेत पाहिले का?

शंकांचे काहूर उठले की मी म्युझियमकडे जाऊन स्वतःचे समाधान करून घेतो. कारण तेथे कोनाड्यात ह्या सर्व घटनेची साक्ष देत उभा आहे उजव्या सोंडेचा गणपती.

४ / गंगाधरपंतांचे पानिपत

तारीख ३१ ऑगस्ट १९७५. संध्याकाळची वेळ.

प्राध्यापक गंगाधरपंत गायतोंडे एका विलक्षण परिसंवादाचे अध्यक्षपद भूषवून परत येत होते. परिसंवादाचा विषय होता 'कॅटॅस्ट्रॉफे थियरी' किंवा स्वैर मराठी भाषांतर करायचे तर 'आकस्मिक विपत्तीचा सिद्धांत'. हा वास्तविक अमूर्त गणितातला एक नवा भाग. पण अमूर्त असूनही, त्याचे प्रात्यक्षिक जीवनात अनेकदा दिसून येते. उदाहरणार्थ...पण थांबा! ह्या गणिताच्या शाखेचा परिचय करून घेण्यापूर्वी आपण प्रथम गंगाधरपंतांचा परिचय करून घेतला पाहिजे.

गंगाधरपंत हे इतिहाससंशोधक आणि प्राध्यापक म्हणून पुण्यात, महाराष्ट्रात, फार काय भारतात प्रसिद्ध आहेत. पण त्यांची विद्वत्ताप्रचुर पुस्तके न वाचलेले किंवा त्यांची प्रभावी भाषणे कानांवर न पडलेले असेही लोक असतील. म्हणून ही प्रस्तावना. गंगाधरपंतांची एक ख्याती म्हणजे सार्वजनिक समारंभांच्या अध्यक्षपणाबद्दल. ५५ वर्षे वयापर्यंत गंगाधरपंतांनी ९९९ वेळा अध्यक्षपद भूषविले होते. हा आकडा वाटतो तितका मोठा नाही, कारण हिशोब सरळ आहे. आठवड्यातून एकदा ह्या 'रेट'ने वर्षातून ५२ वेळा म्हणजे ९९९ हा आकडा ओलांडायला वीस वर्षेसुद्धा लागत नाहीत. हा हिशोब गंगाधरपंतांनी पूर्वीच करून ठेवला होता. तिशीत असताना त्यांना समारंभाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास निमंत्रणे येऊ लागली. प्रथम प्रथम ते फक्त आपल्या विषयाशी संबंधित असलेल्या समारंभांचीच आमंत्रणे स्वीकारीत. पण पुढे पुढे हा संयम कुठल्या कुठे गेला. शेवटी कुठल्याही समारंभाला

सहजपणे मिळणारे अध्यक्ष म्हणून ते ओळखले जाऊ लागले. कुठल्यातरी पुस्तकाचे प्रकाशन, शाळांचे वार्षिक दिन, सटरफटर परिसंवाद, एकसष्ठावे, एकाहत्तरावे किंवा कुठलेही वाढदिवस—मग ते व्यक्तीचे असोत किंवा संस्थेचे...गंगाधरपंत अध्यक्ष म्हणून हजर! कधी एखाद्या समारंभाचे अध्यक्ष नसूनही सवयीने ते व्यासपीठावरची मुख्य खुर्ची पटकावीत आणि मग नियोजित अध्यक्षाला माघार घ्यावी लागे. तेव्हा ५५ वर्षे वयातच त्यांनी ९९९-पर्यंत मजल मारावी यात नवल नाही. मात्र १००० वा अध्यक्षीय प्रसंग त्यांनी इतिहासाकरता राखून ठेवला होता. आणखी दोन आठवड्यांनी 'पानिपत'वरच्या परिसंवादाचे ते नियोजित अध्यक्ष होते. तोपर्यंतची इतर वीसपंचवीस आमंत्रणे त्यांनी मोठ्या संयमाने नाकारली होती.

'कॅटॅस्ट्रॉफे थियरी' म्हणजे काय? ह्या प्रश्नाचे उत्तर माहीत नसूनही त्यांचे ९९९ वे अध्यक्षपद त्या विषयावरील परिसंवादाचे होते. पण ह्या कथानकासाठी आपल्याला त्या विषयाची माहिती—निदान थोडी कल्पना—असणे आवश्यक आहे. कारण गंगाधरपंतांना आलेला विलक्षण अनुभव त्याच्याशी संबंधित आहे.

न्यूटनपासून चालत आलेल्या गणिताचा शास्त्रज्ञांनी भरपूर उपयोग करून घेतला. सृष्टीत घडणाऱ्या घटनांची कारणमीमांसा करण्यासाठी शास्त्रज्ञांनी काही मूलभूत नियम तयार केले. त्यांच्या मुळाशी कल्पना एकच : कुठल्याही परिणामामागे काही कारण असते आणि कारणात थोडा बदल केला की परिणामातही थोडा बदल होतो. आपण ठराविक वेगाने वर फेकलेला चेंडू ठराविक उंची गाठतो. त्या वेगामध्ये कमीजास्त बदल केल्यास चेंडूने गाठलेल्या उंचीत त्यानुसार कमीजास्त बदल होतो. ह्यामागे न्यूटनचे गुरुत्वाकर्षणाचे आणि गतीचे सिद्धांत आहेत. गणिताद्वारे शास्त्रज्ञाला ह्या सिद्धांतांची मांडणी करता येते.

पण सृष्टीतले सर्वच व्यापार त्या तऱ्हेचे गणित वापरत नाहीत. उदाहरणार्थ, दोन कुत्री भांडतात. त्यांच्या भांडणाचा शेवट एका कुत्र्याने पळ काढण्यात होतो. हे भांडण चालू असताना प्रत्येक कुत्र्यामध्ये भय आणि क्रोध दोन्ही असतात. त्यांच्या प्रमाणात मात्र बदल होत असतो. आणि एकाएकी एका कुत्र्यात भय ठराविक मर्यादेपलीकडे वाढते आणि तो पळ काढतो. हा फरक अचानक घडतो. हाच प्रकार खेळात आढळतो. क्रिकेटमध्ये बॅटिंग करताना

एखादी बाजू एकदम कोलमडते! पहिल्या एकदोन विकेट्स पडल्या तरी अजून डाव सावरेल हा आत्मविश्वास असतो. पण आणखी काही विकेट्स लवकरच पडल्या की एकदम त्याचे 'नर्व्हसनेस'मध्ये परिवर्तन होते.

अशा तऱ्हेच्या घटनांची कारणमीमांसा ह्या जुन्या गणितीय पद्धतीने देता येत नाही. म्हणून शास्त्रज्ञांना वाटे, ह्या घटना गणितीय कक्षेपलिकडल्या आहेत. पण गेल्या दशकात ह्या घटनासुद्धा गणितीय व्यवहारात बसतील असे नवे गणित निर्माण झाले आणि ते म्हणजे 'कॅटॅस्ट्रॉफे थियरी'.

संयत जनसमुदाय एकाएकी बिथरतो, शेअर-बाजारात अचानक घबराट निर्माण होऊन किंमती घसरतात, युद्धांना एकदम कलाटणी मिळते...ह्या सर्व घटनांमागे हे नवे गणित असते. घटना एका विशिष्ट स्थितीला पोचली की कारणात थोडासा बदल केला तरी परिणामात विलक्षण बदल झालेला दिसून येतो. ह्या परिस्थितीचे वर्णन करायला हे गणित समर्थ आहे.

ह्या परिसंवादात अनेक भाषणे झाली. पण त्यांत सर्वात प्रभावी भाषण झाले राजेंद्र देशपांडेचे. हा एक तरुण पण प्रतिभाशाली शास्त्रज्ञ होता आणि त्याची कीर्ती भारताबाहेरही पसरलेली होती. त्याची आणि गंगाधरपंतांची घनिष्ठ मैत्री होती. आजच्या भाषणात त्याने कॅटॅस्ट्रॉफे थियरीचा वापर किती वेगवेगळ्या परिस्थितीत होतो हे सुंदरपणे दाखवून दिले.

परिसंवाद संपल्यावरसुद्धा गंगाधरपंत त्याच्याच भाषणावर विचार करत होते. त्यांचे इतिहाससंशोधकाचे मन वेगळ्याच दिशेने भराऱ्या मारू लागले. इतिहास कसा तयार होतो? काही ठळक घटना—एकमेकांत गुंतलेल्या—यातूनच इतिहासाला वळण मिळते. अनेकदा ही घटनांची साखळी एका विशिष्ट मुळातून सुरू होते. ते मूळच जर बदलले तर ही साखळी कुठच्या कुठे जाईल! कॅटॅस्ट्रॉफेला इथे किती महत्त्व आहे? गंगाधरपंतांना आपल्या १००० व्या अध्यक्षीय भाषणाचा विषय सापडला. समजा...

"बाजू हटो. अरे!"

हॉर्नच्या कर्कश आवाजात ट्रकड्रायव्हरची गर्जना जिरून गेली. आणि गंगाधरपंतांना जबर धक्का बसला. त्यांची शुद्ध हरपली.

ट्रक-ड्रायव्हर आणि क्लीनर ट्रक थांबवून उतरले. सेनापती बापट मार्गावर रहदारी कमी म्हणून ट्रक ड्रायव्हरने गाडी जोरात चालवली होती. त्याला

काय कल्पना की माणूस विचार करू शकतो आणि विचारांच्या तंद्रीत त्याचे भान हरपू शकते? एकाएकी सुटाबुटातले प्रा० गायतोंडे समोर दिसल्यावर त्याने ब्रेक दाबला—पण पंतांना धडक बसलीच. आपण एका प्रतिष्ठित व्यक्तीला ॲक्सिडेंट केला हे ट्रकवाल्याच्या ध्यानात आले. त्याने आणि क्लीनरने घाबरत घाबरत ट्रकच्या पुढे जाऊन पाहिले.

ट्रकपुढे कोणीच नव्हते.

ड्रायव्हर आणि क्लीनर दोघांनी ट्रकच्या चारी बाजूला, खाली-वर, सगळीकडे पाहिले. पण पंतांचा पत्ताच नव्हता! रस्ता निर्मनुष्य होता. हा काही भुताटकीचा प्रकार आहे असे वाटून त्या दोघांनी ट्रकमधून पोबारा केला.

वरील घटनेनंतर साठ तासांनी प्राध्यापक गायतोंडे मुंबईच्या आझाद मैदानावर 'अवतीर्ण' झाले. पहाटे पाच वाजता अस्ताव्यस्त पोशाखात, कोटाची बटने तुटलेली, कॉलर फाटलेली, खिसे रिकामे, पण विशेष इजा न झालेले असे त्यांना आसपासच्या लोकांनी झोपेतून जागे केले.

"साहेब, कोण तुम्ही? आणि इथं काय झोपलात?" एका पोलीस कॉन्स्टेबलने विचारले. ह्या प्रतिष्ठित आणि रुबाबदार दिसणाऱ्या गृहस्थाला मुंबईच्या एखाद्या भामट्याचा तर प्रसाद मिळाला नाही?

"मी गंगाधर गायतोंडे, इतिहासाचा प्राध्यापक, पुण्याचा रहिवासी! पण मी इकडे कुठं आलो?" पंतांनी कण्हत विचारले. त्यांची विचारशक्ती आणि स्मरणशक्ती नीट काम करत नव्हत्या.

"अहो, हे ते परवापासून हरवलेले इतिहासकार गायतोंडे!" पोलीस शिपायाने उत्तर देण्याआधीच एक बघ्या उद्गारला.

गायतोंड्यांना पोलीस-स्टेशनवर आणण्यात आले. मुंबईत काम करणाऱ्या त्यांच्या एकुलत्या एक मुलाला, विनयला, निरोप गेला.

विनय गायतोंडे वडिलांना घरी घेऊन गेला. त्यांना गेले काही तास आपण कुठे होतो हे बिलकूल आठवत नव्हते. वैद्यकीय तपासणीत त्यांच्यात काहीही शारीरिक वैगुण्य आढळले नाही. 'त्यांना एखादा मानसिक झटका येऊन त्यांच्या स्मरणशक्तीचा काही भाग तात्पुरता लुप्त झाला असावा असे मुंबईच्या एका प्रख्यात मानसशास्त्रज्ञाने निदान केले.

खुद्द गायतोंड्यांना हे गूढ उकलत नव्हते. स्मरणशक्ती जाण्यासारखे आपल्याला काही झालेले नाही असे त्यांचे ठाम मत होते. दोनतीन दिवस मुंबईत काढून त्यांनी पुण्याला परत जाण्याचा आग्रह धरला. कारण लवकरच त्यांना पानिपतवरच्या परिसंवादाचे अध्यक्षपद भूषवायचे होते. अखेर विनयने त्यांना डेक्कनक्वीनमध्ये बसवून दिले.

गाडीमध्ये बसल्या बसल्या गंगाधरपंत विचार करू लागले. आपण पुण्याहून मुंबईपर्यंत आलो कसे? जरी आपल्याला स्मृतिभ्रंश झाला असला तरी हा शंभर मैलांहून जास्त लांबचा प्रवास आपण केला तरी कसा? कारण मुंबईला येण्याजोगे कुठलेही कारण त्यांना आठवत नव्हते...आणि त्या साठ तासांत आपण कुठे भटकलो? खाल्ले काय? झोपलो कुठे? ह्याचा पुरावा कुठे असेल का?

त्यांचे नेहमीचेच कपडे त्यांच्या अंगावर होते. त्या साठ तासांतल्या त्यांच्या अनुभवातून ते कपडे पण गेले होते. त्यांवर काहीतरी अत्याचार झाले. खिशातले पैशाचे पाकीट गेलेले होते...आज तोच सूट त्यांच्या अंगावर होता.

लोणावळा स्टेशन गेल्यावर वेटरने त्यांच्या चहापाण्याचे बिल पुढे केले. ते चुकते करायला त्यांनी खिशात हात घातला...आणि कोटाच्या लायनिंगमध्ये त्यांना काहीतरी जाडसर कागद गेल्याचे जाणवले. वेटरचे बिल देऊन त्यांनी परत खिशात हात घालून लायनिंगला पडलेल्या भोकातून तो कागद बाहेर काढला.

एका जुन्या पुस्तकाच्या पानाचा तो भाग होता. त्यावरील मजकूर डोळ्यांसमोर येताच गंगाधरपंतांची सर्व सुप्त स्मृती खाडकन जागी झाली. त्या साठ तासांत काय घडले होते ते सर्व त्यांच्या मनःचक्षूंपुढे उभे राहिले आणि ते शहारले.

"कोण याच्यावर विश्वास ठेवील?" ते स्वतःशीच पुटपुटले. "हा कागदी पुरावा...छे! छे! तो माझी स्मृती परत आणण्यास कारणीभूत झाला असला तरी लोकांना पटेल का?"

शेवटी बराच विचार केल्यावर त्यांनी राजेंद्र देशपांडेला भेटण्याचा निश्चय केला.

आणि त्यांनी एक महत्त्वाचा निर्णय घेतला : "यापुढं कुठल्याही सभेत मी अध्यक्षस्थान स्वीकारणार नाही."

ह्या भीष्मप्रतिज्ञेमागे कारण काय असेल? उगीच वेगवेगळे तर्क करण्या-ऐवजी त्यांनी राजेंद्रला सांगितलेली गोष्ट ऐकू या. पण गंगाधरपंतांना पाल्हाळ लावायची सवय असल्यामुळे ती गोष्ट थोडक्यात आणि तृतीयपुरुषात सांगित-लेली बरी.

ट्रकच्या धक्क्याने गंगाधरपंतांची शुद्ध हरपली. ती परत आली तेव्हा ते एका हॉस्पिटलच्या खाजगी वॉर्डातल्या बिछान्यावर होते. त्यांच्या शेजारी एक सफेत साडी नेसलेली नर्स आणि गळ्यात स्टेथॉस्कोप अडकवलेले डॉक्टर असे दोघे उभे होते.

"तुम्ही आता शुद्धीवर याल असं वाटत होतं म्हणून मी थांबलो होतो. आता परत थोड्या वेळानं येईन काही प्रश्न विचारायला! तोपर्यंत मला वाटतं, तुम्ही काही तास विश्रांती घ्यावी." स्मित करत डॉक्टर म्हणाले.

"मला बरं वाटत आहे—फक्त थोडा थकवा जाणवतोय. विचारून टाका तुमचे प्रश्न! पण आधी मीच प्रश्न विचारतो तुम्हाला. मी कुठं आहे?" पंतांनी विचारले.

"अगदी हिंदी फिल्ममधल्या नायकाचा प्रश्न विचारलात तुम्ही! 'मैं कहाँ हूँ?'" डॉक्टर म्हणाले. "तुम्ही आहात विश्वासराव रुग्णालयात."

पंतांना पुण्यातली प्रसिद्ध रुग्णालये माहीत होती. पण हे नवीनच होते. ह्याच्या पायाभरणीला किंवा उद्घाटनाला वा ते जुनेच असल्यास त्याचे नवीन नामकरण करायच्या समारंभाला आपण अध्यक्ष कसे नव्हतो ह्याचे त्यांना जरा आश्चर्यच वाटले. त्यांनी विचारले, "कुठं आहे हे रुग्णालय?"

"विश्वासराव पेशवे मार्गावर!" डॉक्टरांनी खुलासा केला. "रुग्णालय आणि मार्ग दोन्ही शंभर वर्षांचे जुने आहेत. आता मार्गावरून रुग्णालयाला नाव पडलं का रुग्णालयामुळं मार्गाला, ते कोडं मला अजून उलगडलं नाही. कोंबडी आधी की अंडं आधी इतका गहन प्रश्न आहे तो! ह्यः! ह्यः! ह्यः!" आपण विनोद केला असे समजून डॉक्टर हसले.

"म्हणजे मी पुण्यात नाही का?" पंतांनी विश्वासराव मार्ग हे नाव पण एकले नव्हते.

"अहो, पुण्यातच आहात तुम्ही! आणि तुम्ही गणेशखिंडीच्या जंगलात

काय करत होता? नशीब तुमचं की काही हाइकर्सना तुम्ही सापडलात. नाहीतर रुग्णालयापेक्षा...”

“मी जंगलात-बिंगलात नव्हतो.” डॉक्टरांची मुक्ताफळे मध्येच कटवत पंत म्हणाले. “चांगला बापट मार्गानं चालतो होतो.”

“बापट मार्ग?” नर्सने आश्चर्याने विचारले. पण तिला खुणेने गप्प करत, विषय बदलून डॉक्टर म्हणाले, “बरं आपलं नाव, कामधंदा, पत्ता वगैरे...?”

“मी गंगाधरपंत गायतोंडे. इतिहासाचा संशोधक आणि प्राध्यापक.” ज्या अर्थी आपले नाव डॉक्टरला माहीत नाही त्या अर्थी तो पुणेकर नसावा असे वाटून त्यांनी पृच्छा केली, “तुम्ही पुण्यात नवीन दिसता!”

“छे! छे! मी अस्सल पुणेरी—सदाशिवपेठी—आहे. फक्त पाच वर्षे शिक्षणासाठी हिंदुस्थानाबाहेर होतो—विलायतेत.” डॉक्टरांनी विचारले, “पण तुम्ही राहता कुठं?”

“फर्ग्युसन कॉलेजमागं वरुण हाउसिंग कॉलनीत.” पंतांनी पत्ता सांगितला.

“म्हणजे तुम्ही बॉंबेकडचे आहात तर!”

“अहो, असं काय करता? फर्ग्युसन कॉलेज पुण्यात आहे, मुंबईत नाही!” पंतांना राहवले नाही.

नर्स पुन्हा काही बोलायच्या बेतात होती. पण डॉक्टरांनी डोळे वटारले आणि कोपऱ्यात नेऊन हळूच तिला काही सूचना दिल्या. तरी “...मानसिक धक्का...वाद नको...ऐकून घ्या...” वगैरे काही शब्द पंतांच्या तीक्ष्ण कानांवर पडलेच. डॉक्टर परत येऊन म्हणाले, “सॉरी! माझी चूक झाली.” पण त्यांचा स्वर लहान मुलाची समजूत घालावी तसा होता. ते पुढे म्हणाले, “तुमचा इतिहास हा विषय मात्र मला लहानपणापासून अवघड वाटतो. त्या सतरा पेशव्यांची आणि वीस मोगल बादशहांची नावं पाठ करता करता नाकी नऊ यायचे! मग ती तहाची कलमं तर दूरच राहोत.”

सतरा पेशवे? वीस मोगल बादशहा? ह्या बेट्याचा इतिहास कच्चा आहे का गणित?—पंतांना प्रश्न पडला. पण त्यांनीदेखील ह्या चक्रम गृहस्थाबरोबर वाद नाही घालायचा असे ठरवले. मात्र त्यांना भेडसावणारा एक प्रश्न त्यांनी विचारला, “आजची तारीख काय?”

"आज आहे श्रावण वद्य दशमी शके १८९७. तुम्हाला बॅबेतली तारीख पाहिजे असली तर—१ सप्टेंबर १९७५." डॉक्टरांनी लगेच सांगितले.

पुणे आणि मुंबई, दोन ठिकाणी वेगळी कॅलेंडरे हा काय प्रकार आहे? का आपण इतिहाससंशोधक आहोत म्हणून डॉक्टरांनी दडपून भारतीय कॅलेंडरमधली तिथी सांगितली? पण डॉक्टरांच्या चेहऱ्यावर मिस्कील भाव नव्हता आणि हिशोब करून पाहता तिथीपण बरोबर निघाली!

त्यांना ट्रकचा धक्का लागून फक्त एक रात्र उलटली होती.

डॉक्टर त्यांचा निरोप घेऊन गेले ते दुसऱ्या दिवशी सकाळी सातला उगवले. दरम्यान त्यांनी गंगाधरपंतांना स्वस्थ पडायला सांगितले होते. वाचनाची पूर्ण मनाई केली होती. त्यामुळे पंतांना फक्त विचार करण्याखेरीज इलाज नव्हता. पण विचार करूनसुद्धा डॉक्टरांच्या असंबद्ध विधानांचा अर्थ लागत नव्हता.

डॉक्टरांनी पंतांची कसून वैद्यकीय तपासणी केली. ती करताना त्यांच्या तोंडाची टकळी चालूच होती. पंधरा मिनिटांच्या तपासणीत कमीत कमी पंधरा जोक्स पेशंटच्या कानावर पडले पाहिजेत असे त्यांचे मत होते. शेवटी ते म्हणाले, "प्राध्यापकसाहेब, तुम्ही आता काळजी करण्याचं कारण नाही. तुमचं नशीब बलवत्तर म्हणून आम्हाला तुमचं योग्य वेळी संशोधन झालं. नाहीतर तुम्हीच इतिहासात जमा झाला असता! ह्यः ह्यः ह्यः! बरं, मी रात्रभर ड्यूटीवरच होतो आणि आता घरी चाललोय. तुम्हाला कुठं सोडू का?"

गंगाधरपंतांनी त्यांचे आभार मानले. आपला हॉस्पिटलचा गणवेश उतरविला आणि नेहमीचा सूट चढवून पंत त्यांच्याबरोबर निघाले. आणखी अर्धा तास जोक्स ऐकण्यासाठी त्यांनी मन घट्ट केले. हॉस्पिटलमधून बाहेर पडताना तेथील वातावरण, कर्मचाऱ्यांचे गणवेश, वेगवेगळ्या विभागांना दिलेली नावे हे सर्व त्यांना अपरिचित वाटले. वेगवेगळ्या सूचना उर्दू, इंग्रजी आणि मराठीत होत्या. काही ठिकाणी 'हिंदुस्थानी'चा वापर केलेला होता. हा काय प्रकार आहे याचा ते विचार करत असतानाच डॉक्टर दाराशी कार घेऊन आले. कारचे मॉडेल पण पंतांना वेगळे वाटले. ते चांगले ऐसपैस असून त्याचे नाव होते 'चक्रवर्ती'. हे नवीन मॉडेल आहे का अशी त्यांनी पृच्छा केली.

"छे हो! हे मॉडेल केव्हा मोडेल याची मला सारखी भीती वाटते. आता चांगली पाच वर्षं झाली विकत घेऊन." त्यांच्याकडे चमत्कारिकपणे पाहत डॉक्टर पुढे म्हणाले, "गायतोंडेसाहेब, माफ करा. मी अजून तुम्हाला माझी ओळख करून दिली नाही. मी अरविंद मोडक. स्वारगेटजवळ राहतो मी."

"मग एस० टी० स्टँडचा त्रास होतो का तुम्हाला?"

"एस० टी० स्टँड म्हणजे काय?" डॉक्टरांनी प्रतिप्रश्न केला. पुन्हा पंतांना फार अस्वस्थ वाटू लागले. आपण विचारलेला औपचारिक प्रश्नसुद्धा डॉक्टरांना काय म्हणून विचित्र वाटावा? कसाबसा त्यांनी खुलासा केला. "एस० टी० म्हणजे स्टेट ट्रान्सपोर्ट. सरकारी बसेस सुटतात ना स्वारगेटाहून!"

"तुम्ही म्हणता तशा बसेस रेल्वे-स्टेशनावरूनही सुटतात—पण त्या सरकारी नव्हेत, खासगी कंपन्यांच्या आहेत. स्वारगेटात नावाप्रमाणे गेट आहे आणि तेथे स्वारही आहेत. पण मी तुम्हाला कोणीकडे सोडू?" हॉस्पिटलच्या आवारातून कार बाहेर काढत डॉक्टर म्हणाले.

पंतांना हा परिसर अपरिचित वाटत होता. त्यामुळे त्यांना रस्ता सांगता येईना. शेवटी ते म्हणाले, "मला शनिवारवाड्यासमोरून घेऊन चला—तेथून, मी तुम्हाला मार्ग सांगेन." निदान शनिवारवाड्याबद्दल तरी त्यांच्या आणि डॉक्टरांच्या मध्ये समजुतीचा गोंधळ होऊ नये! डॉक्टरांनी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे "शनिवारवाडा म्हणजे काय?" असे विचारले नाही आणि त्यांना हायसे वाटले.

"मी काल इतिहासाबद्दल अनुदार उद्‌गार काढले त्याबद्दल माफ करा! पण काय सांगू? लहानपणी आम्हाला तुमच्याच नावाच्या एका गृहस्थाची पुस्तकं अभ्यासाला होती. विद्वत्ताप्रचुर, पण आम्हा शाळकरी मुलांच्या डोक्यावरून जाणारी." डॉक्टर एका रेल्वे-पुलाखालून जात म्हणाले, "पुढं ते गायतोंडे अकाली निधन पावले आणि त्यांच्या पाठोपाठ त्या पुस्तकांचा ससेमिराही टळला! त्या पाच खंडांपैकी तीन खंड मी कसेबसे पचवले."

गंगाधरपंतांनी दहा वर्षांपूर्वीच भारताचा पाचखंडी शालेय इतिहास लिहिला होता. 'भारताचा संक्षिप्त इतिहास' म्हणून. त्यांनी भीतभीतच विचारले, "काय नाव होतं त्या पुस्तकाचं? आणि हे गायतोंडे केव्हा गेले?"

"नाव मला नक्की आठवत नाही, पण हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास—किंवा असंच काहीतरी होतं. आम्ही विद्यार्थी पार वैतागलो होतो. ही जाडजूड पुस्तकं म्हणजे जर संक्षिप्त म्हणायची तर विस्तारानं लिहिलेला इतिहास केवढा मोठा असेल ह्याबद्दल आम्ही तर्क करीत असू. माझा स्वतःचा असा अंदाज होता की असाच एखादा 'विस्तृत' इतिहास लिहिण्याचा उपक्रम करताना गायतोंडे कामास आले असावेत!" मनात थोडासा हिशोब करून डॉक्टर म्हणाले, "मला वाटतं, सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांना मृत्यू आला. पण तुम्हाला ते माहीत नाहीत याचं मला आश्चर्य वाटतं."

आपण एक 'टॅक्ट्लेस' विधान केले असेल याची डॉक्टरांना किंचितही कल्पना आलेली नव्हती.

गंगाधरपंतांनी उत्तर दिले नाही. आपल्याच नावाचे इतिहासकार आपल्यासारखीच पुस्तके लिहून जातात हे कसे? त्यांना दुसरे इतिहासकार गायतोंडे माहीत नव्हते. क्षणभर त्यांना एक विचित्र शंका आली : आपणच गायतोंडे नसलो तर? आणि चुकून काही अज्ञात कारणाने भविष्यकाळात पंचवीस-तीस वर्षे पुढे तर आलो नाही? पुन्हा त्यांनी डॉक्टरांना तारीख विचारली. घड्याळात पाहून डॉक्टर म्हणाले : "श्रावण वद्य एकादशी, शके १८९७."

म्हणजे २ सप्टेंबर १९७५! ते वर्तमानकाळातच होते. अजून कशाचाच मेळ बसत नव्हता. गंगाधरपंतांनी ह्या बाबतीत तर्क करायचे तहकूब केले. इतक्यात लांबून शनिवारवाड्याचा परिसर दिसू लागला.

"आज वाड्यासमोर पहारेकरी कुठून आले? काही ओपन एअर प्ले वगैरेची तयारी आहे का?" त्यांनी लांबून दिसणाऱ्या डगलेवाल्यांच्याकडे पाहत विचारले.

"हे तर नेहमीचेच द्वारपाल. आज काही विशेष नाही." असे डॉक्टरांनी म्हणेपर्यंत कार वाड्यासमोर येऊन ठेपली. आणि पंतांना आश्चर्याचा जबर धक्का बसला.

शनिवारवाड्याची सर्व वास्तू अखंड स्थितीत—पेशवेकालीन दिमाखात—त्यांच्यासमोर उभी होती.

गरगरणाऱ्या डोक्याला सांभाळत पंतांनी डॉक्टरांना थोडा वेळ थांबायला

सांगितले. ते कसेबसे कारमधून बाहेर आले आणि त्यांनी मुख्य द्वारावरची नोटीस वाचली :

'हा पेशव्यांचा ऐतिहासिक वाडा आम जनतेकरता दुपारी एक ते पाच उघडा राहील. प्रवेशशुल्क रु० १/-. बारा वर्षांखालील मुलांना मोफत प्रवेश.

त्र्यंकोजी नाईक
कोतवाल, पुणे'

हीच नोटीस उर्दूत पण होती.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या अध्ययनाने ज्याचे चित्र त्यांनी आजवर डोळ्यांसमोर ठेवले होते तोच हा शनिवारवाडा आतून पाहण्याची अनिवार इच्छा त्यांना दाबून ठेवावी लागली. कारण अजून सकाळची वेळ होती.

"आता कुठं जायचं?" डॉक्टरांच्या प्रश्नाने ते भानावर आले आणि परत कारमध्ये जाऊन बसले. आपल्या घराच्या दिशेने मार्गदर्शन करायला त्यांनी सुरुवात केली. पण त्यांच्या परिचयाचे पुणे पुन्हा लवकरच मागे पडले. डेक्कन जिमखाना येईपर्यंत त्यांना आपण परत वेगळ्या शहरात आलो आहो असे वाटायला लागले. फर्ग्युसन कॉलेज असायला पाहिजे तिथे तर जंगलच होते. ह्या भागात येईपर्यंत कार जाण्याजोगा मार्ग संपून गेला, आणि डॉक्टरांनी कार नाइलाजाने थांबवली. ह्या विसरभोळ्या प्राध्यापकाने आपल्याला कुठे भलतीकडे आणले? किंवा याच्या मेंदूवर तर परिणाम झाला नसेल?

पंतांना काही वेळ काय करायचे ते सुचेना. ह्या भागात असलेली मनुष्य-वस्ती, इमारती, घरे, दुकाने, एकाएकी कुठे गेली? आपल्या घराचे काय झाले? आता आपण कुठे जाणार?...ते बावरून गेले.

पण काही मिनिटेच! लवकरच त्यांच्या चेहऱ्यावर एक निश्चयी भाव दिसू लागला. "डॉक्टरसाहेब, तुम्ही मला विसरभोळा, चक्रम किंवा माथेफिरू समजत असाल. पण खरी वस्तुस्थिती तशी नाही. खरी परिस्थिती काय आहे ते माझं मलाच सांगता येत नाही. अगदी परवापर्यंत हा भाग गजबजलेला मी पाहिलेला आहे. माझं घर इथून लांब नव्हतं. माझी मित्रमंडळी येथे राहत असत. हा भाग निर्मनुष्य कसा झाला? हे जंगल केव्हा आलं? की मी स्वप्न पाहतोय? मला काही कळत नाही..."

डॉक्टर सहानुभूतिपूर्वक ऐकत होते. पंत पुढे म्हणाले,

"माझा मुलगा मुंबईत फोर्बस, फोर्बस आणि कँपबेल कंपनीत काम करतो —निदान करत असे, असं मी म्हणेन. तोच एक माझा एकुलता जवळचा नातेवाईक. मला वाटतं, मी आजच मुंबईला त्याच्याकडे जाईन...पण ती कंपनी तरी आहे का?"

"होय, त्या नावाची एक मोठी कंपनी बाँबेत आहे, आणि तुमचा निर्णय पण योग्य आहे." घड्याळाकडे पाहत डॉक्टर म्हणाले, "जिजामाता एक्स्प्रेस एका तासानं मुंबईला जायला निघेल. चला, मी तुम्हाला ताबडतोब स्टेशनावर घेऊन जातो. पण तिकिटाचे पैसे आहेत का तुमच्याजवळ?"

पंतांनी खिशातून पाकीट काढले. त्यात दहाच्या पंधरा नोटा होत्या. पण त्या पाहून डॉक्टर म्हणाले, "ह्या कुठल्या वेगळ्याच नोटा तुम्ही आणल्यात? ह्या तुम्ही 'मोनॉपली' खेळायला वापरा! ह्या काही खऱ्या नोटा तुम्ही घ्या आणि तुमच्या मला द्या. माझ्या मुलांना गंमत वाटेल तुमच्या नोटा पाहून."

पंतांनी न बोलता नोटांची अदलाबदल केली. डॉक्टरांनी दिलेल्या शंभराच्या नोटेवर कुतुबमिनारचे चित्र असून 'मैं हिन्दुस्थान के शाहेनशाह के खजॉन्ची की हैसियत से इसके लानेवाले को सौ रुपये देनेका वादा करता हूँ' असे हिंदीत आणि उर्दूत लिहिले होते आणि खाली सही होती. दहाच्या नोटेवर दक्षिणेतल्या एका मोठ्या देवालयाचे चित्र होते.

पुणे स्टेशनावर कार थांबवून डॉक्टरांनी पंतांना तिकीट-ऑफिसकडे नेले. मुंबईकरता वेगळी खिडकी असून तिथे नोटीस होती : 'परवान्याशिवाय तिकीट मिळणार नाही.' हा परवाना कसला? पंतांना प्रश्न पडला.

"अहो, साहेबाच्या राज्यात जाताना परवाना लागतो हे तुम्ही विसरलात काय? तुमच्याकडे नसलाच तर या माझ्याबरोबर शेजारच्या ऑफिसात." डॉक्टरांनी त्यांना जवळच्या ऑफिसमध्ये नेले.

त्या ऑफिसमध्ये एका फॉर्मवर त्यांचे नाव, पत्ता, मुंबईतला रेफरन्सचा पत्ता आणि त्यांची सही ही माहिती त्यांच्याच हस्ताक्षरात घेण्यात आली. एका पोलरॉइड कॅमेऱ्याने त्यांचा रंगीत फोटो घेण्यात आला. कॅमेरा बसवलेल्या मशीनचे एक बटन दाबताच त्यातून दोन इंच रुंदीचे व तीन इंच लांबीचे कार्ड बाहेर आले. त्यावर एका बाजूला त्यांचा सहीसकट फोटो आणि दुसऱ्या

बाजूला फॉर्ममधली बाकीची माहिती होती. कार्ड एका पारदर्शक प्लास्टिकच्या वेष्टनात व्यवस्थित गुंडाळलेले होते. ह्या परवान्यासाठी त्यांना फी पडली दहा रुपये.

परवाना दाखवून, मुंबईचे फर्स्टक्लासचे तिकीट घेऊन झाल्यावर डॉक्टरांनी त्यांना प्लॅटफॉर्म नंबर एकवर जिजामाता एक्स्प्रेसमध्ये बसवले. डॉक्टरसाहेबांचे मनःपूर्वक आभार मानून पंतांनी त्यांना निरोप दिला.

जिजामाता एक्स्प्रेसचे डबे बाहेरून भगव्या रंगाचे होते आणि त्यावर 'मराठा रेल्वे' असे लिहिले होते. पंतांचा डबा ब्रिटिश अमदानीतल्या फर्स्ट क्लाससारखा सुसज्जित होता. त्यांचे सहप्रवासी होते दोघे गोरे साहेब आणि पोशाखावरून मुसलमान वाटणारे एक गृहस्थ. साहेब वर्तमानपत्रात डोके खुपसून होते आणि मियाभाई बरोबर आणलेले पदार्थ खाण्यात दंग होते. "आप किधर जा रहे हैं जनाब?" पंतांनी त्यांना विचारले.

"जी मै तो बॉंबे होते हुए पेशावर जाऊंगा।"

"पेशावर? वहॉं जाने के लिये पासपोर्ट की जरूरत पडती है?" पंतांनी दबकत दबकत विचारले आणि मियाभाईचे तोंड पाहून त्यांना कुठून हा प्रश्न विचारला असे झाले.

"अजीब सवाल पूछा आपने, भाईसाहब! अपने ही वतन में जाने के लिये पासपोर्ट की क्या जरूरत? हां, बॉंबे जाने के लिये परमिट चाहिये."

म्हणजे पेशावर भारतात आणि मुंबई 'साहेबाच्या राज्यात'! इतिहास-संशोधक असूनही गंगाधरपंत हतबुद्ध झाले. नोटेवर लिहिलेला हिंदुस्तानचा शाहेनशाह म्हणजे काय प्रकार आहे? शनिवारवाडा अजून कसा पेशवे-कालीन ऐश्वर्यात मिरवतो? आपण भूतकाळात गेलो म्हटले तर मोटर कार, ट्रेन, स्टेशनवरचे फोटोचे मशीन वगैरे अद्ययावत गोष्टी ते अनुमान चुकीचे ठरवीत होत्या. भविष्यकाळात गेलो म्हणावे तर ब्रिटिश राजवट, दिल्लीतला बादशहा, शनिवारवाडा हे अजून कसे! शिवाय तारीख तर २ सप्टेंबर १९७५ होती! म्हणजे ट्रकने धडक दिल्यावर त्यांची शुद्ध गेल्यापासून दोन दिवससुद्धा झाले नव्हते.

त्यांना परिचित असलेल्या पुणे-मुंबई मार्गावरून गाडी भरधाव चालली

होती. पुणे परिसरात औद्योगिकीकरण झाले नव्हते. खडकीजवळ छावणी नव्हती. लोणावळा स्टेशन लहान होते. खंडाळा ते कर्जत हा त्यांचा परिचयाचा घाटमार्ग होता. हे छोटेमोठे फरक पाहायला त्यांचे मन आता तयार झाले होते. जे दिसते ते निमूटपणे पाहायचे, अगदी जरुरीपुरते प्रश्न इतरांना विचारायचे आणि शक्य तितके मौन पाळायचे त्यांनी ठरवले. ह्या प्रकाराचा उलगडा करायचा एक मार्ग त्यांना सुचला : आपण पाहतो तो देश बदलला असला तरी त्याचा वेगळा इतिहास लिहिलेला असेलच. मुंबईच्या एखाद्या प्रसिद्ध पुस्तकालयात त्या इतिहासाचे संशोधन करून पाहायचे.

त्यांना राजेंद्र देशपांडेच्या काही कल्पना आठवल्या. काही आठवड्यांपूर्वी त्याच्याशी झालेल्या चर्चेचा त्यांच्या अनुभवाशी मेळ बसेल का? त्याच्या कल्पना आपल्याला चमत्कारिक वाटल्या तरी त्या नेहमीच विचारणीय असतात. त्याला पुण्यात गाठायचे त्यांनी ठरवले.

पण ह्या आपण पाहत असलेल्या सृष्टीत राजेंद्र नसलाच तर?...आणि त्याच्या पाठोपाठ दुसऱ्या एका विचाराने त्यांना अस्वस्थ केले. आपला विनय तरी अस्तित्वात असेल काय? निघण्यापूर्वी आपण फोनवरून याची शहानिशा करायला हवी होती.

कल्याण स्टेशन येऊन गेले. पारसिकचा बोगदा येऊन गेल्यावर एक लहानसे स्टेशन आले: 'सरहद' गाडीत एक ॲंग्लो इंडियन वर्दीधारी चढला आणि क्रमाक्रमाने त्यांच्या कंपार्टमेंटमध्ये आला. "परमिट प्लीज." डब्यातील उतारूंनी आपापली कार्डे दाखवली. "क्यू" हे थॅंक्यूचे ऱ्हस्वीकरण करीत त्याने परमिटे तपासून परत दिली.

"अब यहाँसे अंगरेजी राज शुरू हो गया।" मियाभाईंनी माहिती पुरवली. "आप, जान पड़ता है, पहली बार बंबई जा रहे हैं?"

"जी हाँ!" हे त्यांचे उत्तर म्हणण्यासारखे असत्य नव्हते. नाही तरी ते ह्या मुंबईत पूर्वी कुठे आले होते? "आप पेशावर कैसे जायेंगे?" त्यांनी प्रतिप्रश्न केला.

"मैं तो फ्रंटियर मेल से जाऊँगा। आज रातको बॉंबे सेंट्रल से परसोंतक पहुँच जाऊँगा।"

त्यानंतर त्यांचे बरेच संभाषण झाले—म्हणजे बोलण्याचे काम मियाभाई करत होते आणि ऐकण्याचे गंगाधरपंत. वास्तविक पंतांना हा अनुभव नवीन होता, पण आपण जास्त बोलून आपलेच हसे करून घेऊ ह्या भीतीने त्यांची वाचाच खुंटली होती.

मुंबईची उपनगरे ओलांडून आणि उपनगरी गाड्यांशी शिवाशीव खेळत त्यांची गाडी व्हिक्टोरिया टर्मिनसवर पोचली. स्टेशनस्टाफमध्ये गोरे साहेब, पारशी आणि अँग्लो इंडियन यांचे प्रामुख्य दिसून येत होते. वेगवेगळ्या सूचना इंग्रजीतच होत्या. स्टेशनवर स्वच्छता आणि टापटीप नजरेत भरण्याजोगी होती. स्टेशनच्या आवारातून बाहेर पडताच त्यांना पुढे एक सहा मजली इमारत मोठ्या दिमाखाने उभी दिसली. त्यावर ठळक अक्षरांत नाव होते :

EAST INDIA HOUSE
THE HEADQUARTERS OF THE EAST INDIA
COMPANY

ईस्ट इंडिया कंपनी? जिचा १८५७ मधल्या बडामोडीनंतर अस्त झाला ती पुन्हा कशी मिरवते?...पण खरेच तिचा अस्त झाला का? पंतांचे मन द्विधा झाले. आपल्याला दिसणारे इतर बदल लक्षात घेता हा इतिहासातला फरक काही फार नाही. इतिहास कसा आणि कुठे बदलला?...त्यांचे मन वेगाने धावू लागले. पण पाय मात्र नेहमीच्या गतीने त्यांना फोर्ब्स कंपनीकडे नेत होते. राजमार्ग त्यांच्या परिचयाचा होता. पण दुकाने, ऑफिसेस वेगळीच होती. हँडलूम हाऊस नव्हते, विदेश संचार भवन मागून डोकावत नव्हते... पण बूट्सचे डिपार्टमेंट स्टोअर, लॉइड्स आणि बार्कलेज बँकांच्या शाखा, वगैरे ब्रिटिश छापाची ठिकाणे होती.

होम स्ट्रीटला वळून ते फोर्ब्स बिल्डिंगमध्ये शिरले. "मला मिस्टर विनय गायतोंडे यांना भेटायचेय." त्यांनी इन्क्वायरी ऑफीसमधल्या गौरांगनेला सांगितले. तिने स्टाफ लिस्ट, टेलिफोन लिस्ट वगैरे पाहून, दोघातिघांना फोन करून शेवटी सांगितले,

"विनय गायतोंडे म्हणून कोणी कर्मचारी येथे नाहीत. फार काय, ते कंपनीच्या कुठल्याच शाखेत नाहीत."

हा धक्का पंतांना अपेक्षितच वाटला, इतके त्यांचे मन तयार झाले होते. मुलाचा पत्ता लागत नाही तर आपण मुंबईत राहणार कुठे? पुण्यात परत जाण्याची सोय नाही. कारण तिथेसुद्धा त्यांचे घर कुठे होते? आणि त्यांचे कोणी मित्र हयात असलेच तर ते पण गायतोंडे अनेक वर्षांपूर्वी स्वर्गवासी झाले अशा समजुतीत असणार. पण ह्या मनाला अस्वस्थ करणाऱ्या विचारांना बाजूला सारून त्यांची इतिहास-संशोधकाची वृत्ती त्यांना सारखी डिवचत होती. प्रथम ह्या प्रकरणाचा छडा लावायचा, कुठल्यातरी पुस्तकालयात जाऊन. फोर्टमधल्या एका रेस्टोरॉंमध्ये जेवण उरकून त्यांनी रॉयल एशियाटिक सोसायटीकडे पाय वळवले.

तेथील लायब्ररीत गेल्यावर त्यांनी भारतीय इतिहासाची बरीचशी पुस्तके वाचायला घेतली. त्यांची स्वतःची ग्रंथमाला पण त्यांत होती. ती पाहायला त्यांनी सुरुवात केली.

पहिला खंड खिस्तकालापूर्वीचा, दुसरा समुद्रगुप्तापर्यंत, तिसरा महंमद घोरीपर्यंत आणि चौथा औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत. हे सर्व खंड त्यांना माहीत असलेलाच इतिहास सांगत होते. पाचवा खंड मात्र बदललेला दिसला...ह्या खंडाचा प्रारंभ त्यांच्या माहितीचा, पण शेवट वेगळा होता. हा खंड दोन्ही बाजूंनी चाळत चाळत शेवटी ते अशा ठिकाणी येऊन पोचले—जेथून इतिहासाला कलाटणी मिळत होती.

त्या पानावरची महत्त्वाची घटना म्हणजे पानिपतचा संग्राम. तो बदललेला इतिहास सांगत होता की हा संग्राम मराठ्यांनी जिंकला. अब्दालीचा पूर्ण पराभव होऊन, बरीच मालमत्ता गमावून आणि मनुष्यहानी पत्करून त्याला उत्तरेकडे पळून जावे लागले आणि त्याचा अटकेपर्यंत पाठलाग करून त्याला काबुलच्या मार्गावर घालवून सदाशिवराव भाऊ आणि विश्वासराव परतले.

खुद्द पानिपतच्या युद्धाची फारशी माहिती त्यांच्या पुस्तकात नव्हती, पण त्याचे परिणाम काय झाले याची दीर्घ चर्चा होती. पंतांनी पुस्तकाचा उरलेला भाग अधाशासारखा भरभर वाचून काढला. लिहिण्याची शैली त्यांची होती पण मजकूर ते पहिल्यांदाच पाहत होते...

पानिपतच्या विजयामुळे मराठ्यांचा हिंदुस्थानावर जबरदस्त वचक बसला. उत्तरेतले नबाब, सुभेदार वगैरे, आणि ईस्ट इंडिया कंपनी त्यांना घाबरून

वागू लागली. बळाच्या जोडीला मुत्सद्देगिरी वेळोवेळी मिळत गेल्याने पेशव्यांनी इंग्रजांची डाळ शिजू दिली नाही. फ्रेंच आणि पोर्तुगीज वसाहतींप्रमाणे कंपनीचा अधिकार मुंबई, कलकत्ता आणि मद्रास ह्या परिसरातच मर्यादित राहिला. भारतीय राज्यकर्त्यांनी इंग्रजांच्या तंत्रज्ञानाचा आणि शिस्तबद्ध कार्यप्रणालीचा फायदा घेतला. पण तो स्वतःचे सार्वभौमत्व राखून. ईस्ट इंडिया कंपनीनेही हिंदुस्थानात वसाहत वाढवता येत नाही हे पाहून व्यापारी वृत्तीने आपल्या ज्ञानाचा विक्रय सुरू केला. रेल्वे, टेलिग्राफ, इत्यादी यांत्रिक शोध यांचा प्रसार कंपनीतर्फे सुरू झाला—'कॉन्ट्रॅक्ट बेसिस'वर. हे ज्ञान महागात पडणार असे दिसून आल्यावर राज्यकर्त्यांनी भारतीयांना त्यात दीक्षा देण्यास सुरुवात केली. आणि कंपनीचे महत्त्व कमी होत गेले. हळूहळू कंपनीला स्वतःचे हक्क कमी करावे लागले. विसावे शतक उजाडण्यापूर्वी मद्रास आणि कलकत्ता सार्वभौम हिंदुस्थान सरकारला परत मिळाले. ब्रिटिश सरकारशी केलेल्या एका तहान्वये मुंबई शहर २००० सनापर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या रक्षणाखाली राहून मग भारतात विलीन होणार होते.

पानिपतनंतर भाऊसाहेब आणि विश्वासराव यांस मोठी प्रतिष्ठा लाभली आणि दादासाहेबांचे पेशवे दरबारातले वजन पुष्कळ कमी झाले. खुद्द नानासाहेब पेशवे १७८० सनापर्यंत मराठेशाहीची धुरा संभाळत होते. त्यांच्या राजवटीत विश्वासराव आणि माधवराव ह्या बंधुद्वयांनी बाजीराव-चिमाजीअप्पांची आठवण करून देणारा पराक्रम गाजवला. हैद्राबादच्या निजामाला एका तहाद्वारे त्यांनी एका मर्यादित सीमेपलीकडे लष्कर बाळगण्यास मनाई करून शक्तिहीन करून टाकला. उत्तरेकडे अफगाणिस्तानच्या सीमेपर्यंत आणि पूर्वेकडे बंगालपर्यंत वेळोवेळी स्वाऱ्या करून आणि विश्वासू सुभेदार नेमून पेशव्यांनी दिल्लीच्या बादशहाला पत्त्यातल्या राजाइतके निःसत्त्व केले. नानासाहेबांनंतर विश्वासराव, त्यानंतर त्यांचे वंशज ही प्रथा एकोणिसाव्या शतकाअखेरपर्यंत टिकली. पण तोपर्यंत पेशवाईदेखील निष्प्रभ होत चालली. अमेरिकन 'सिव्हिल वॉर'मुळे निर्माण झालेले वारे हिंदुस्थानात पोचले. पाश्चात्त्य देशात प्रचलित होत चाललेली लोकशाही भारतातही यावी अशी इच्छा असणारे आणि ती कृतीत आणायला झटणारे राष्ट्रपुरुष जन्माला आले. म्हणून सतराव्या पेशव्याच्या जमान्यात निर्माण होऊ घातलेल्या अराजकतेला

वेगळीच कलाटणी मिळाली आणि त्यातून लोकसत्ताक राज्याची निर्मिती झाली. ब्रिटिश राजघराण्याप्रमाणे दिल्लीचा बादशहा ह्या राज्याचा नाममात्र 'शाहेनशहा' होता. ऐतिहासिक कारणामुळे देशाचे नाव 'हिंदुस्थान' राहिले तरी त्याची घटना धर्मनिरपेक्ष होती...

हे सर्व वाचून गंगाधरपंतांना अनेक प्रश्नांचा उलगडा झाला. ते पाहत असलेला 'हिंदुस्थान' हा एक वेगळाच इतिहास असलेला देश होता. त्याला पाश्चात्त्य राष्ट्रांची गुलामगिरी माहीत नव्हती. त्याच्या घडवणुकीमागे एक प्रकारचा आत्मविश्वास होता, न्यूनगंड नव्हता. भारतीय बनावटीचे सामान म्हणजे दुय्यम श्रेणीचे; आणि 'इंपोर्टेड', परदेशी सामानच उत्तम ह्या भावनेला इथे स्थान नव्हते. मुंबईतला गोरा साहेबदेखील 'नेटिव्ह' लोकांशी नम्रतेने वागत होता. कारण त्या 'काळ्या' माणसामागे एक सामर्थ्यशाली राष्ट्र उभे आहे याची त्याला जाणीव होती.

त्यांना सम्राट अशोकाच्या काळच्या भारताची आठवण झाली. आणि मग त्यांच्या माहितीतला भारत देश आठवला—अनेक शतकांच्या गुलामगिरीतून नुकताच स्वतंत्र झालेला भारतदेश. अठ्ठावीस वर्षे हा राष्ट्राच्या आयुष्यात एक छोटाच कालखंड ठरेल. वाजवीपेक्षा जास्त आत्मविश्वास आणि न्यूनगंड ह्या दोन बाजूंना असलेल्या दऱ्यांत न कोसळण्याची काळजी घेत अरुंद मार्गावरून गेल्यास आपला पण देश आणखी साठसत्तर वर्षांनी ह्या परिस्थितीला नक्कीच पोचेल! मात्र त्याकरता भारतीयांत शिस्तबद्धता आणि जबाबदारीची जाणीव पाहिजे...गंगाधरपंत भविष्यकाळाबद्दल आशावादी होते.

आपले भरकटणारे विचार आवरून त्यांनी इतर पुस्तके, कागदपत्रे, बखरी वगैरे पाहण्यास सुरवात केली. त्यांच्या परिचयाची भाऊसाहेबांची बखर वेगळ्याच दृष्टिकोनातून लिहिली होती. लढाईचे वर्णन वाचता वाचता त्यांच्यापुढे एक उतारा आला :

"...ते समयीं विश्वासराव यांनी हुजुरातीच्या लोकांत येऊन घोडा घातला आणि घाव केला. तो ईश्वरी लोभ जाहाला. एकाएकी त्यांचे कानाजवळोन गोळा गेला. तीळभर फरक पडता तर नानासाहेबांचे निधान ठार पडते..."

रात्रीचे आठ वाजले आणि ग्रंथपालाने आता लायब्ररी बंद होणार

अशी त्यांना नम्र सूचना केली. पंत आपल्या अभ्यासाच्या तंद्रीतून ताडकन उठले. "मला हे सर्व कागदपत्र उद्या सकाळी पाहायला पाहिजेत—" अशी सूचना देऊन ते बाहेर पडले.

विसरभोळेपणाने भाऊसाहेबांची खबर मात्र त्यांच्या खिशात राहिली.

एका गेस्ट हाउसमध्ये रात्रीपुरती खोली घेऊन, जेवण उरकून, पाय मोकळे करायला ते आझाद मैदानाकडे निघाले. मैदानात एका बाजूला मंडप घातलेला असून तेथे बरीच गर्दी दिसत होती. कोणाचे तरी व्याख्यान चालू होते. व्यासपीठावर एकच खुर्ची असून ती रिकामी होती. समोर टेबलावर फुलदाणी फुलाने सजवून ठेवली होती.

व्यासपीठ...रिकामी खुर्ची...भाषण...दिव्याकडे पतंग आकृष्ट व्हावा तसे पंत त्या खुर्चीकडे खेचले गेले. आपल्या विचारांच्या तंद्रीतच त्यांनी खुर्चीवर आसन मांडले. तो प्रकार पाहून वक्त्याचा वाक्प्रवाह बंद पडला. पण श्रोते मात्र ओरडू लागले :

"खुर्ची खाली करा—"

"ह्या व्याख्यानमालेला अध्यक्ष नसतो."

"Get off the chair—"

"The chair is symbolic—"

"खुर्चीवर कोणीच बसायचे नाही."

अध्यक्षावाचून सभा ? हा कसला चावटपणा ! गंगाधरपंतांचे पित्त खवळले. माइककडे जाऊन वक्त्याला बाजूला सारून ते बोलू लागले, "सभ्य स्त्री-पुरुषहो ! अध्यक्षावाचून सभा म्हणजे डेन्मार्कच्या राजपुत्रावाचून हॅम्लेट हे नाटक—"

पण श्रोत्यांनी त्यांना बोलू दिले नाही. "पुरे पुरे ! स्वागतपर, अध्यक्षीय आणि समारोपाची रटाळ भाषणं ऐकायचा आम्हाला कंटाळा आलाय."

"आम्हाला फक्त वक्त्याचंच भाषण ऐकायचं आहे."

"ती अध्यक्षाची जुनी प्रथा नको."

९९९ सभा गाजवलेले गंगाधरपंत ह्या गर्जनांना न जुमानता बोलत राहिले. त्यांच्या अंगावर अंडी, टमाटो, बटाटे, भाजीपाला वगैरे पदार्थांचा भडिमार सुरू झाला. तरी ते बोलतच होते. तेव्हा मात्र श्रोतृसमुदायाने व्यासपीठावर आक्रमण केले.

आणि त्या गर्दीत गंगाधरपंत जे अदृश्य झाले ते कोणालाच दिसले नाहीत!

"पुढची हकिगत तुला माहीत आहे. दुसऱ्या दिवशी मी आझाद मैदानात सापडलो." आपला वृत्तांत संपवत प्राध्यापक गायतोंडे उद्‌गारले, "राजेंद्र, हे सर्व मी फक्त तुलाच सांगितले आहे. कदाचित तू ह्या सर्व प्रकाराची कारण-मीमांसा करू शकशील."

"पंत, तुम्ही हा अनुभव येण्यापूर्वी काय करत होता?" राजेंद्राने विचारले.

"मी कॅटॅस्ट्रॉफेवरचा परिसंवाद आटपून घरी चाललो होतो. तुझ्याच भाषणाबद्दल मी विचार करत होतो." पंत उत्तरले.

"त्या परिसंवादात मांडलेले विचार तुमच्या मनात घोळत असणार. तुम्ही पानिपताबद्दल पण विचार करत होता का?" राजेंद्रच्या चेहऱ्यावर मिश्किल-पणा होता.

"हो. आणि तेवढ्यात ट्रकच्या धक्क्यामुळं माझा स्मृतिभ्रंश झाला आणि हे विचार माझ्या अबोध मनामध्ये असल्यामुळे मी सांगितलेली गोष्ट खरो-खर घडली असं मला वाटतं. मला माहीत आहे तुला काय म्हणायचं आहे ते. माझी पण प्रथम प्रथम तीच कल्पना होती. स्मृतिभ्रंश झाला आणि त्यामुळं मी कसातरी मुंबईला गेलो असेन असं मला आधी वाटत होतं आणि इतरांचा पण तोच अंदाज आहे. तेवढ्यासाठी मी तुझ्याकडे आलो नसतो. पण मला आलेला अनुभव सत्यसृष्टीतला होता ही मला खात्री आहे. हा पाहा त्याचा पुरावा." खिशातून त्यांनी एक कागदाचा तुकडा काढला. भाऊसाहेबांच्या बखरीतले ते एक छापील पान होते. त्यावरचा मजकूर वाचताच, इतिहासाचा फारसा अभ्यास नसूनही राजेंद्राची चर्या गंभीर झाली.

पंत पुढे म्हणाले, "हा कागद मला माझ्या सुटाच्या लायनिंगमध्ये सापडला. ती बखर चुकून माझ्या कोटाच्या खिशात राहिली आणि मी ती दुसरे दिवशी परत करणार होतो. पण आझाद मैदानावरच्या धक्काबुक्कीत ती गहाळ झाली आणि हे एकच पान शिल्लक राहिले."

राजेंद्र विचार करत होता. बखरीच्या पानाची पुनःपुन्हा तपासणी करून घसा खाकरून त्याने बोलायला सुरुवात केली. पंत लक्ष देऊन ऐकू लागले.

"मी तुमच्या बोलण्यावर अविश्वास दाखवत नाही. तुम्हाला आलेले अनुभव

खरे होते असं गृहीत धरूनच मी कारणमीमांसा करतो. ती दोन तर्कांवर आधारलेली आहे. पण ते तर्क इतके विलक्षण आहेत की प्रत्यक्ष ह्या अनुभवातून गेल्यानंतरसुद्धा तुम्हाला ते पटतील अशी माझी खात्री नाही. तरी मी प्रयत्न करून पाहतो. काही दिवसांपूर्वी मी तुम्हाला कॅटॅस्ट्रॉफेबद्दल थोडंसं सांगितलं होतं."

"होय. मी परिसंवादातलं तुझं भाषण लक्ष देऊन ऐकलं होतं." अध्यक्ष असूनही इतरांची भाषणे लक्षपूर्वक ऐकण्याचा पंतांचा प्रघात होता.

"आता त्या सिद्धांताचा वापर आपण पानिपतच्या युद्धासंबंधात करू." राजेंद्र उद्‌गारला. "मी इतिहाससंशोधक नाही. तेव्हा पानिपतच्या युद्धात मराठे का पराजित झाले याचा पोस्टमॉर्टेम मी करत बसणार नाही. पण युद्धं—निदान पूर्वीप्रमाणं रणांगणात समोरासमोर घडलेली—ही कॅटॅस्ट्रॉफे थियरीची उत्कृष्ट उदाहरणं आहेत. युद्धसामग्री, सैन्यबळ इत्यादी पुरेसं असूनही युद्धाचे परिणाम नेतृत्वावर बरेचसे अवलंबून असतात. अगोदरच जेरीला आलेल्या मराठ्यांना 'विश्वासराव गोळी लागून ठार झाले' ही घटना म्हणजे कॅटॅस्ट्रॉफेची मर्यादा ठरली. ही मर्यादा ओलांडली की परिस्थितीत झपाट्यानं बदल होतो असा सिद्धान्त आहे. भाऊसाहेब गर्दीत शिरले आणि नाहीसे झाले. इतर सरदार हतबुद्ध झाले. सैन्याच्या शिस्तीची घसरगुंडी सुरू झाली. आणि शेवटी मराठ्यांचा नायनाट झाला."

"होय, हा आपला इतिहासच आहे." पंत म्हणाले.

"परंतु तुम्ही आता दाखवलेलं बखरीचं पान वेगळंच सांगतं : शत्रूची गोळी विश्वासरावाला इजा न करता जवळून गेली! ह्या घटनेचा उलटा परिणाम झाला. हा ईश्वरी संकेत समजून मराठे नव्या जोमानं लढले आणि त्यांनी अब्दालीचा पराभव केला. इतिहासात अशी अनेक युद्धं सापडतील की जिथं विपरीत परिणाम व्हायला लहानसंच कारण पुरलं असतं. मात्र ते कॅटॅस्ट्रॉफेच्या विशिष्ट मर्यादेच्या आसपास यायला पाहिजे होतं. वॉटरलूच्या युद्धाबद्दलसुद्धा अशी विधानं केली जातात."

"हे सर्व कबूल केलं तरी पानिपताचा परिणाम काय झाला ते आपल्याला माहीत आहे. त्या संबंधात 'असं घडलं असतं तर' अशा तऱ्हेची चर्चा अवास्तव आहे." गंगाधरपंत ठामपणे उद्‌गारले.

"अवास्तव म्हणजे काय? येथेच माझा दुसरा तर्क येतो. प्रत्यक्ष सृष्टीत काय घडतं ते आपण आपल्या अनुभवांनी ठरवतो. अनुभव आपल्या इंद्रियांनी प्रत्यक्ष, किंवा यंत्रांचा उपयोग करून अप्रत्यक्ष अशा दोन पद्धतींनी आपण घेत असतो. आपला दर्जा दर्शकाचा आहे. पण आपण पाहतो तेच प्रत्यक्षात घडतं की त्याची आणखी विविध स्वरूपं आहेत?"

स्वतःच्या प्रश्नाचे स्वतःच उत्तर देत राजेंद्र पुढे म्हणाला :

"ह्या अनेकरूपतेचा अनुभव शास्त्रज्ञांनी अतिसूक्ष्म वस्तूंच्या व्यवहारासंबंधी घेतलेला आहे. अणू किंवा त्यात असणारे इलेक्ट्रॉन-प्रोटॉनसारखे मूलकण आपल्या व्यवहारासंबंधी बहुरूपीपणा दाखवतात. अमुक एका दिशेनं भिरकावलेला ठराविक वेगाचा चेंडू भिंतीवर आपटून कुठं जाईल हे आपण निश्चितपणं, गणितानं किंवा अनेक वेळा प्रयोग करून सांगू शकतो. पण सूक्ष्म वस्तूंबद्दल तसं काही नसतं. एका प्रोटॉनच्या दिशेनं ठराविक वेगानं भिरकावलेला इलेक्ट्रॉन पुढं कुठं जाईल हे निश्चितपणं सांगता येत नाही. फार काय, अमुक वेगाचा इलेक्ट्रॉन अमुक ठिकाणी आहे हे विधानदेखील निश्चितपणं करता येत नाही. ह्याचा अर्थ अणूंचं गणित अपूर्ण आहे असा नसून, अनिश्चितता हा सृष्टीचा एक मूलभूत नियमच आहे हे आता सिद्ध झालं आहे." राजेंद्र सावकाश सांगत होता.

"माझ्यासारख्या वैज्ञानिक विषयांबद्दल अनभिज्ञ असलेल्याला हे सर्व फारच अजब वाटतं! पण ह्याचा माझ्या अनुभवांशी कसा संबंध जुळतो?"

"ते ओघानं येईलच! मी सांगितलेला सिद्धान्त आत्मसात करायला १९२० ते १९३० च्या दरम्यानच्या प्रमुख शास्त्रज्ञांनादेखील फार कष्ट पडले. सध्या ज्याला पुंजवाद म्हणतात तो ह्याच सिद्धान्तावर आधारलेला आहे. त्यात प्रथम हे शिकावं लागतं की कुठलीही वस्तू एका ठराविक स्थितीतच असते असं नाही. तिच्या अनेक स्थिती असू शकतात. विशेषतः अतिसूक्ष्म वस्तूंबाबत ह्या वेगवेगळ्या स्थिती आणि त्यांची स्थित्यंतरं घडणं हे फार महत्त्वाचं आहे. अणूमध्ये इलेक्ट्रॉन केंद्राभोवती वेगवेगळ्या कक्षांत फिरत असतो. परंतु तो अमुक कक्षेत अमुक ठिकाणी आहे (ज्याप्रमाणं पृथ्वी सूर्याभोवती ठराविक कक्षेत, ठराविक वेळी, ठराविक ठिकाणी असते) असं विधान करता येत नाही. त्याची कक्षा बदलत असते. कधीकधी आपण होऊन इलेक्ट्रॉन

आपली कक्षा बदलतो आणि अशा वेळी अणूतून ऊर्जेचं प्रक्षेपण होतं. हे आपण होऊन कक्षा बदलणं आणि ऊर्जा बाहेर पडणं केव्हा घडेल आणि ऊर्जा कुठल्या दिशेनं फेकली जाईल याची संभाव्यता फार तर सांगता येते."

"म्हणजे रेसमध्ये अमुक घोडा पहिला येणार अशी संभाव्यता आकड्यांनी व्यक्त करतात तसंच का?" पंतांनी मध्येच विचारले.

"होय! पण पुंजवादाच्या गणितानं व्यक्त केलेली ही संभाव्यता रेसच्या संभाव्यतेपेक्षा निश्चितच जास्त बरोबर असते." राजेंद्र मिश्किलपणे म्हणाला, "पण मी पुंजवादाबद्दल आता फार बडबडत नाही; नाहीतर हे एक लेक्चरच होऊन बसेल. तात्पर्य एवढंच, की पुंजवादाचे अनेक नियम प्रयोगसिद्ध झालेले आहेत. माझा तर्क असा की अशा तऱ्हेचेच नियम सूक्ष्म सृष्टीप्रमाणंच मोठ्या सृष्टीलादेखील लागू पडले तर? त्याचा अर्थ असा होईल की आपण पाहतो ती सृष्टी ही एका विशिष्ट परिस्थितीतली आहे. सृष्टीच्या अन्य परिस्थितीदेखील असतील आणि इलेक्ट्रॉनचं स्थित्यंतर होतं तशा मोठ्या वस्तूदेखील एका परिस्थितीतून दुसरीकडे एकाएकी संक्रमण करू शकतील." राजेंद्र आपला मुद्दा पंतांना किती पटतो ते पाहायला थांबला.

"आता माझ्या डोक्यात थोडा प्रकाश पडायला लागलाय." पंत एकदम उत्तेजित होऊन खोलीत येरझारा घालू लागले. "माझं स्थित्यंतर होऊन मी ह्या पृथ्वीवर ह्या भरतखंडावरच घडत असलेल्या वेगळ्या सृष्टीत जाऊन आलो, नाही का?"

"बरोबर! आणि तुम्ही पाहिलेली सृष्टी पानिपतात मराठे विजयी झाले असते तर काय झालं असतं याचा नमुना होता. त्यातील लोकांना ती सृष्टी तितकीच खरी वाटते, जितकी आपल्याला आपल्या भोवतालची सृष्टी खरी वाटते."

"अशा किती सृष्टी अस्तित्वात असतील?"

"सृष्टीची अनेक, असंख्य रूपं असतील. कॅटॅस्ट्रॉफेमुळं अनेकदा त्यांचं विभक्तीकरण होत असणार. पानिपतच्या युद्धाच्या दोन संभाव्य परिणामांप्रमाणं झालेलं विभक्तीकरण तुम्हाला पाहायला मिळालं. तुमच्या स्थित्यंतरात स्थळ आणि काळ बदललं नाही. 'त्या' सृष्टीत जाताना तुमचं स्थित्यंतर पुण्यात ३१ ऑगस्ट १९७५ रोजी झालं आणि परत येताना

तेच स्थित्यंतर मुंबईत रात्री २ सप्टेंबर १९७५ला घडलं. त्या सृष्टीत सबंध राष्ट्राची परिस्थिती जशी बदललेली तुम्हाला दिसली तसेच सर्वसाधारण व्यक्तींच्या जीवनातले फरक पण दिसून आले. इतिहासकार गायतोंडे अगोदरच निधन पावले होते. त्यांच्या मुलांचं अस्तित्वच आपल्याला खात्रीपूर्वक माहीत नाही. शनिवारवाडा संपूर्णावस्थेत होता, पण विदेश संचार भवन नव्हतं. कारचं मॉडेल वेगळं होतं. ह्या तुम्हाला जाणवलेल्या गोष्टी तुमच्या वेगळ्या परिस्थितीच्या द्योतक होत्या."

"हे माझं स्थित्यंतर होण्याला कारण काय झालं?" पंतांनी विचारले.

"पंत, हे मी सांगू शकलो असतो तर सर्वच कोडं सुटलं नसतं का?" राजेंद्र गंभीरपणे म्हणाला. "अजून विश्वातल्या अनेक गूढ घटनांचे अर्थ शास्त्रज्ञांना लावायचे आहेत. काही बाबतींत तर विचारण्याजोगा योग्य प्रश्न कोणता हेदेखील त्यांना माहीत नाही, मग उत्तराची गोष्टच वेगळी. पण माझा तर्क असा आहे की स्थित्यंतर होताना दोन्ही स्थितींना जोडणारे दुवे लागत असावेत. तुमच्या बाबतीत एक म्हणजे तुमचं कॅटॅस्ट्रॉफे परिसंवादाचं अध्यक्षपण आणि तुम्ही जर पानिपताबद्दल विचार करत असाल—ट्रकची धडक बसली तेव्हा—तर तो दुसरा, असे हे दोन दुवे असावेत. ट्रकची धडक आणि आझाद मैदानातली धक्काबुक्की हे त्या स्थित्यंतराला निमित्तमात्र असणार."

"एवढं खरं, की मी पानिपतावरच्या परिसंवादातला अध्यक्षीय भाषणाचा मसुदा तयार करत होतो. त्या युद्धाचा वेगळा परिणाम झाला असता तर पुढं इतिहास कसा बदलला असता याचा मी तर्क करत होतो." पंत विचार करत म्हणाले. "ते माझं हजारावं अध्यक्षीय भाषण ठरलं असतं!"

"मग आता तर तुम्ही प्रत्यक्ष अनुभव घेऊन ते भाषण करू शकाल! मी अवश्य येईन ऐकायला." राजेंद्र म्हणाला. पण पंतांनी नकारात्मक मान हालवली.

"नाही राजेंद्र! माझं हजारावं आणि शेवटचं अध्यक्षीय भाषण २ सप्टेंबरला रात्री आझाद मैदानात झालं. 'सभेला अध्यक्ष असणं आवश्यक आहे' ह्या तत्त्वाचा पुरस्कार करता करता तिथल्या भाऊगर्दीत अदृश्य झालेले प्राध्यापक गायतोंडे आता कुठल्याही व्यासपीठावर दिसणार नाहीत. मी पानिपत-परिसंवादाच्या आयोजकांना कालच माझा नकार कळवला."

५ ∫ धूमकेतू

सप्टेंबर महिना. अमावास्येची रात्र.

गार वाऱ्याचा झोत अंगावर आल्यामुळे इंद्राणीदेवींना जाग आली. त्यांनी कुशी बदलून पाहिले; शेजारचा दत्तबाबूंचा बिछाना मोकळा होता. नेहमीच्या सवयीने त्यांनी गॅलरीच्या दाराकडे नजर टाकली. त्यांच्या अपेक्षे-प्रमाणे दार उघडे होते.

"गेले वाटतं परत सवतीकडे." त्या पुटपुटल्या. "निदान दार तरी लोटून घ्यायचं! पण स्वतःलाच थंडीचं भान नाही तर दुसऱ्यांची काळजी कशी करणार?" शाल पांघरून दत्तबाबूंचा स्वेटर घेऊन त्या गॅलरीकडे निघाल्या. गॅलरीत छताकडे जाणारी एक शिडी होती. तिच्यावरून त्या सावकाश वर गेल्या. त्यांचे पतिराज सवतीच्या डोळ्याला डोळा लावून बसले होते.

ही सवत म्हणजे आठ इंच 'व्हायटल स्टॅटिस्टिक' असलेली दुर्बीण.

दत्तबाबू एक उत्साही 'ॲमॅटर ॲस्ट्रॉनॉमर' होते. लहानपणापासून आकाशाकडे पाहायचा त्यांना छंद होता. मोठेपणी भरपूर पैसा कमावल्यावर त्यांना आपली हौस पुरवता आली. कलकत्त्याच्या पश्चिमेकडे पण शहरी दिव्यांच्या प्रकाशापासून दूर एका टेकाडावर त्यांनी लहानसा बंगला बांधला. आणि त्याच्या छतावर एका आठ इंच दुर्बिणीची स्थापना केली. अमा-वास्येच्या आसपास रात्रींचे तासन् तास त्या दुर्बिणीतून पाहण्यात त्यांनी खर्च केले होते.

"हे काय! निदान शाल तरी पांघरायची. उद्या सर्दी झाली की नवीनबाबू

बेडरेस्टची शिक्षा फर्मावतील—मग पस्तावाल!" त्यांच्या अंगावर स्वेटर चढवत इंद्राणीदेवी उद्गारल्या. दत्तबाबूंनी न बोलता स्वेटर घालून घेतला आणि परत दुर्बिणीकडे डोळे फिरवले.

"रोज रोज तेच तेच तारे. पाहायचं तरी काय एवढं त्यांच्यात तासन् तास?"

बायकोच्या प्रश्नाकडे दत्तबाबूंनी दुर्लक्ष केले. सवतीने झपाटले असताना त्यांच्याशी बोलण्यात अर्थ नाही हे इंद्राणीदेवींना माहीत होते. त्या मुकाट्याने खाली परतल्या आणि लवकरच निद्राधीन झाल्या.

दत्तबाबू आज जास्तच तल्लीन झालेत हे त्यांच्या ध्यानात आले नाही.

"रोज रोज तेच तेच तारे. पाहायचं तरी काय एवढं त्यांच्यात तासन् तास?" त्या प्रश्नाचे उत्तर दत्तबाबू देऊ शकले नसते. एखाद्या गवयाला 'सारखा तोच राग काय म्हणून आळवीत बसतोस?' किंवा चित्रकलेच्या शौकीनाला 'इतका वेळ पाहण्यासारखं काय आहे त्या चित्रात?' असे विचारले तर त्या प्रश्नाचे सामान्य माणसाला पटण्याजोगे उत्तर कुठे आहे?

मात्र 'रोज रोज तेच तेच तारे' हे विधान त्यांनी सप्रमाण खोडून काढले असते. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती फिरते, सूर्याभोवती चक्कर मारते, सूर्य पण एका जागी स्थिर नाही—म्हणून आकाशातले चित्र नेहमी बदलत असते. शिवाय ग्रह सूर्याभोवती आपापल्या मार्गाने जातात, चंद्रासारखे उपग्रह त्यांच्याभोवती पिंगा घालतात, मध्येच कुठून तरी एखादा धूमकेतू येतो...

धूमकेतू!...दत्तबाबूंच्या मनात एक अभिलाषा होती. आपण एक धूमकेतू शोधून काढावा. हे धूमकेतू लांबून सूर्यमालेत येतात आणि सूर्याला परिक्रमा करून परत जातात. काहींची कक्षा गुरू ग्रहामुळे—त्याच्या गुरुत्वाकर्षणामुळे—बदलते तर काही नियमाने ठराविक वर्षांनी सूर्याच्या सान्निध्यात येतात. दर शहात्तर वर्षांनी येणारा हॅलेचा धूमकेतू त्यांनी नुकताच १९८६ मध्ये पाहिला होता. सूर्यमालेत नव्यानेच येणारा—निदान प्रथमच मानवाला दिसलेला—धूमकेतू त्याला पहिल्यानेच पाहणाऱ्याच्या नावाने ओळखला जातो. तसे 'दत्त धूमकेतू'...'कॉमेट दत्त'...हे नाव खगोलशास्त्रीय नोंदीत अजरामर व्हावे हीच दत्तबाबूंची अभिलाषा होती. सध्याच्या यांत्रिक युगात, मोठमोठ्या दुर्बिणी आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या असताना आपल्या-

लाच नव्या धूमकेतूचे प्रथम दर्शन घडावे हे फारसे संभाव्य नाही याची दत्तबाबूंना जाणीव होती. पण ते आशावादी होते. मोठाल्या दुर्बिणी तारे, क्वेसार, आकाशगंगा वगैरेंचे महत्त्वाचे वेध घेण्यात गुंतलेल्या असताना एखाद्या हौशी खगोलशास्त्रज्ञाने आपल्या छोट्याशा दुर्बिणीच्या साहाय्याने नवागत धूमकेतू शोधला असे पूर्वी अनेकदा घडले होते.

आणि आज त्यांची इच्छापूर्ती होण्याची लक्षणे दिसत होती.

आज त्यांना ओळखीच्या एका तारामंडलात एक पुसट पुसट पण वेगळीच वस्तू दिसत होती. त्यांनी स्टारचार्ट तपासून पाहिला, माहीत असलेल्या धूमकेतूंची यादी तपासली, हा आपल्या दुर्बिणीतल्या काचेवरचाच धुळीचा ठिपका नाही ना याची खात्री करून घेतली; त्यांना माहीत असलेले इतर प्रकार तपासणी करण्यात वापरले. पण त्यांच्या शंकेचे खात्रीतच रूपांतर झाले : आपण पाहतो तो नवागत धूमकेतूच आहे.

रात्रीचे दोन वाजून गेले. ताऱ्यांच्या दिशा बदलत होत्या. धूमकेतू(?)ची दिशा पण बदलत होती. दत्तबाबू टॉर्चच्या उजेडात लहानशा टिपणवहीत नोंदी करत होते. अघळपघळ वेशात फिरणारे आणि इतर व्यवहारात अजागळपणाकरता प्रसिद्ध असलेले दत्तबाबू खगोलशास्त्राच्या बाबतीत मात्र पद्धतशीरपणाचा नमुना होते. हाडाच्या शास्त्रज्ञाकडे असणारी चिकित्सक बुद्धी त्यांच्यात होती. त्यांच्या मनाची खात्री पटेपर्यंत सूर्यनारायण उगवण्याची पूर्वचिन्हे दिसू लागली.

दूरवरचे दक्षिणेश्वर मंदिर जागे झाले. बेलूर मठात हालचाली सुरू झाल्या. मानवी व्यवहार वाढायला लागले तसतशा तारका हळूहळू आपली नाइट ड्यूटी संपवून जाऊ लागल्या. दत्तबाबू दुर्बीण बंद करून खाली आले. बायकोला उठवून आपल्या शोधाबद्दल सांगावे असे एकदा त्यांना वाटले. पण "नको! झोपू दे बिचारीला. दिवसभर फार काम करते...नंतर सावकाश सांगू." असा विचार करून त्यांनी बिछान्यावर अंग टाकले.

लवकरच त्या खोलीतून एका समाधानी पुरुषाच्या घोरण्याचा आवाज येऊ लागला.

त्यानंतर दोन दिवसांनी 'आनंदबझार पत्रिके'त खालील अर्थाची बातमी झळकली :

“ कलकत्तावासीयाने शोधलेला नवा धूमकेतू
(आमच्या खास प्रतिनिधीकडून)

कलकत्त्याच्या पश्चिम परिसरात राहणारे श्रीयुत मनोज दत्त यांनी एक नवीन धूमकेतू शोधल्याचा दावा केला आहे. हा धूमकेतू त्यांना काल रात्री दिसला असून त्याची दिशा त्यांनी कावालूर येथील वेधशाळेला कळवली आहे. त्या वेधशाळेने ह्या दाव्याला दुजोरा दिला तर दत्तबाबूंना आपली एक महत्त्वाकांक्षा सफल झाल्याचे समाधान मिळेल. दत्तबाबू एक हौशी खगोलशास्त्रज्ञ असून त्यांनी आकाशदर्शन घेण्यासाठी स्वखर्चाने एक आठ इंची दुर्बीण बसवून घेतली आहे. दत्तबाबूंच्या मते हा नवीन धूमकेतू काही महिन्यांनी सूर्याभोवती जाऊन परत येताना पृथ्वीच्या बऱ्याच जवळून जाईल.”

त्यानंतर एक आठवडाभरात ‘कॉमेट दत्त’ला मान्यता मिळाली. दत्तबाबूंचा शोध बरोबर आहे हे कावालूर येथील वेधशाळेने घोषित केले. इंटर नॅशनल अॅस्ट्रॉनॉमिकल युनियन (I.A.U.) ह्या संस्थेने जगातील वेधशाळांना आणि खगोलशास्त्रीय संस्थांना तारा पाठवून ‘कॉमेट दत्त’च्या अस्तित्वाची सूचना दिली.

नवीन शोध लावल्याबद्दल दत्तबाबूंचे कलकत्त्यात ठिकठिकाणी सत्कार झाले. ह्या मितभाषी आणि प्रसिद्धिपराङ्मुख सद्‍गृहस्थाला बळजबरीने पुढे पुढे करून अनेकांनी आपली प्रसिद्धीची आणि लांबलचक भाषणे देण्याची हौस भागवून घेतली. सरकारने हौशी खगोलसंशोधनाला प्रोत्साहन द्यावे, शाळा-कॉलेजांतून खगोलशास्त्राची विद्यार्थ्यांना दीक्षा देण्यात यावी, प्लॅनेटेरियम बांधले जावेत...इत्यादी अनेक आवाहने अनेकांनी वेगवेगळ्या संदर्भात केली.

अशाच एका कंटाळवाण्या समारंभातून परत येताना दत्तबाबू वैतागून उद्‍गारले, “मला हा धूमकेतू सापडला नसता तर बरं झालं असतं!”

“मलाही तेच वाटतं, पण वेगळ्या कारणामुळं.” इंद्राणीदेवी म्हणाल्या, “तुम्ही हा उद्‍गार काढलात कारण तुम्हाला ह्या सत्कारसमारंभांचा कंटाळा आलेला आहे. तुम्हाला नाइलाजानं ह्या समारंभांना जावं लागतं, हौस म्हणून नाही. खरं आहे ना?”

“बरोबर आहे. हे समारंभ माझ्याबद्दल इतरांना वाटणाऱ्या कौतुकाचे

द्योतक आहेत याची मला जाणीव आहे आणि त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे." दत्तबाबू म्हणाले, "पण मला अनेकदा वाटतं की आपण भारतीय आपल्यापैकी कुणीही थोडी महत्त्वाची कामगिरी केली की त्याचा भरमसाट उदो उदो करतो. कला, शिक्षण, खेळ—सर्व क्षेत्रांत हे दिसते. महत्त्वाच्या कामगिरीची योग्य प्रमाणात दखल घेण्याला जी परिपक्वता लागते ती अजून आपल्या समाजात दिसत नाही. हे माझे विचार फार थोड्या लोकांना पटतील ...पण तुझं कारण अजून सांगितलं नाहीस?"

"धूमकेतू हा अनिष्टकारक असतो. म्हणून त्याचा शोध तुमच्याकडून लागायला नको होता असं मला राहून राहून वाटतं." इंद्राणीदेवींचा स्वर गंभीर होता.

"वेडी कुठली! जगात, मानवी समाजावर किंवा कोणाच्याही जीवनात सुखदुःखाचे, उत्तम परिणाम घडवणारे आणि अनिष्टकारक प्रसंग नेहमीच येतात. त्याचा धूमकेतूंशी काहीएक संबंध नाही. खगोलशास्त्रज्ञांनी धूमकेतूंचा पुष्कळ अभ्यास केलेला आहे. आपल्याला माहीत असलेल्या रासायनिक मूलतत्त्वांतूनच त्यांची निर्मिती झालेली आहे. त्यांची शेपूट लांबपर्यंत का पसरलेली असते ह्या प्रश्नाचं आकलन झालेलं आहे. त्यांची सूर्यमालेतली कक्षा निश्चित ठरवता येते. त्या कक्षेबाहेर फिरण्याचंही त्यांच्यात स्वातंत्र्य नाही. मग त्यांच्यात दैवी किंवा अनिष्टकारक शक्ती असणं दूरच राहिलं. पाहाच आता तू! हा माझा धूमकेतू नियमित मार्गानं येऊन पृथ्वीला दुरून मुजरा करून परत संथपणे कसा पसार होतो ते." दत्तबाबू तावातावाने उद्गारले. पण...

आपले हे शेवटचे विधान चुकीचे ठरणार याची दत्तबाबूंना कुठून कल्पना असणार?

केंब्रिजच्या किंग्स कॉलेजचा डायनिंग हॉल नुकताच रिकामा झाला होता. आपले सेल्फ-सर्व्हिसचे साधे जेवण आटपून विद्यार्थी आपापल्या उद्योगात गुंतले होते. कॉलेजचे फेलो अनेक शतकांच्या परंपरेनुसार 'हाय टेबल'च्या स्वादिष्ट भोजनावर ताव मारून वाइनरूमकडे रवाना झाले. ह्या प्रशस्त खोलीत एका लांबलचक टेबलाभोवती बसून मदिरा, चीज आणि फळे यांचा आस्वाद घेत गप्पागोष्टी करायची प्रथा होती. अमुकतमुक वर्षातली फलाण्या फ्रेंच किंवा

जर्मन मळ्यातून उगम पावलेली मदिरा कशी होती याची ज्ञातास्वादपणे चर्चा करू शकणारे इथले जाणकार फेलो कधीकधी दारू न पिणाऱ्यांची कीव करीत : 'हाय कम्बख्त तूने पी ही नहीं'! पण ह्या चोखंदळांच्या पिण्यात समतोलता होती. केवळ तर्र होण्यासाठी बेसुमार मद्य झोकणाऱ्यांना ते अडाणी समजत. अशा ह्या मंडळीत जेम्स फोर्साइथ हा 'जूनियर फेलो' सर्वांत नवखा होता. नवखा म्हणून त्याची एक ड्यूटी होती; सभा बरखास्त झाली की वाइनरूम-मधले दिवे मालवणे. आणि त्याच ड्यूटीबरोबर अलिखित परंपरेने चालत आलेला त्याचा एक अधिकारही होता; वाइन फ्लास्कमध्ये उरलेली क्लॅरेट घरी नेण्याचा त्याचा हक्क होता.

पण आज तो हक्क गाजवणे त्याच्या नशिबी नव्हते. चांदीच्या सुबक वाइन-ट्रॉलीने टेबलावरचा प्रवास सुरू करतानाच बटलरने टेबलाच्या मुख्यस्थानी बसलेल्या प्रॉव्होस्टच्या कानात काहीतरी सांगितले आणि त्यांच्याकडे एक लखोटा दिला. प्रॉव्होस्टनी तात्काळ फोर्साइथला पाचारण केले आणि त्याच्या हातात लखोटा देत म्हटले, "जिम, आज तुझा क्लॅरेटचा योग नाही! अतिशय महत्त्वाच्या कामासाठी एक व्यक्ती तुला भेटायला आलेली आहे आणि तुझ्या खोलीत तुझी वाट पाहत आहे." लखोटा आणि त्यावरील सील हे सरकारी काम असल्याची जाणीव करून देत होते.

खोलीकडे जाताना जेम्सने लखोटा उघडला. त्यात लहानसे पत्र होते :

प्रिय डॉक्टर फोर्साइथ,

पत्र घेऊन येणाऱ्या माणसाबरोबर तुम्ही ताबडतोब लंडनला यावे. एक रात्र येथे राहावे लागेल, पण त्याची सोय केली आहे. अत्यंत महत्त्वाचे काम असल्यामुळेच तुम्हाला ही तसदी देत आहे. माफी असावी!

—जॉन मॅक्फर्सन

सहीखाली शिक्का होता : 'डिफेन्स सायन्स ॲडव्हायजर, मॅजेस्टीज गव्ह-र्नमेंट.' काय काम असेल याचा तर्क करत जेम्स आपल्या खोलीकडे आला. ओकचे भक्कम दार बाजूला सारून त्याने प्रवेश केला तेव्हा मॅंटलपीसजवळ उभ्या असलेल्या व्यक्तीने त्याच्याकडे वळून पाहिले. बोलर हॅट बाजूला करून

तिने स्वतःची ओळख करून दिली : "मी जॉन्सन, सिक्युरिटी ऑफिसर. माझ्या येण्याचं उद्दिष्ट तुम्हाला कळलं असेलच." जॉन्सनची दृष्टी जेम्सच्या हातातल्या उघड्या पाकिटावर होती.

"पण मला लंडनला का पाचारण करण्यात आलं ते तुम्हाला माहीत आहे का ?" प्रश्नाचे काय उत्तर मिळेल याची अपेक्षा असूनही जेम्सने विचारले.

"ते कारण टॉप सीक्रेट आहे आणि मलाही माहीत नाही." जॉन्सन उद्‌गारला. "माझ्या ऑर्डर्स फक्त तुम्हाला आत्ताच्या आत्ता लंडनला घेऊन जायच्या आणि उद्या परत आणायच्या आहेत. मी कार आणलेली आहे."

काही न बोलता जेम्सने एका बॅगेत रात्रीपुरते प्रवासी सामान कोंबले आणि जॉन्सनबरोबर तो निघाला.

कॉलेजच्या चॅपलच्या शेजारची भव्य हिरवळ ओलांडून जात असताना जवळच्या युनिवर्सिटी चर्चमधून नवाचे ठोके ऐकू आले.

रॉय्स्टन, बालडॉक, हॅटफील्ड वगैरे लहान गावे बाजूला टाकून राजमार्गाने वेगाने गाडी हाकीत जॉन्सनने साडेदहा वाजता लंडनच्या व्हाइट हॉलच्या परिसरात जेम्सला आणून सोडले. त्या भव्य इमारतीची मोठाली दालने ओलांडत सर जॉन मॅक्फर्सन यांच्या ऑफिसपर्यंत पोचायला आणखी दहा मिनिटे लागली. जेम्सला तेथपर्यंत पोचवून जॉन्सनने त्याचा निरोप घेतला.

"डॉ० फोर्साइथ! इतक्या गैरसोयी सोसून माझ्या विनंतीवरून तुम्ही आलात याबद्दल धन्यवाद. जास्त वेळ न दवडता मी सरळ मुद्द्याकडे येतो." असे म्हणून सर जॉननी त्यांच्या टेबलावरचे एक टंकलिखित जेम्सकडे दिले.

"अरे! हा माझाच 'नेचर'कडे पाठवलेला पेपर. तुमच्याकडे कसा आला?" जेम्सने आश्चर्याने विचारले. सरकार इतक्या लहानसहान गोष्टींवर पाळत ठेवते तर!

"हा काही 'बिग् ब्रदर इज वॉचिंग यू' अशातला प्रकार नाही." त्याची शंका अचूक हेरून सर जॉन खुलासा करत म्हणाले. "'नेचर' ह्या साप्ताहिकाचा संपादक माझ्या माहितीचा आहे. आम्ही एकाच क्लबमध्ये बऱ्याचदा भेटतो. हा तुमचा पेपर त्याला असाधारण वाटला म्हणून त्यानं त्याकडे माझं लक्ष वेधलं. ~~मला तुम्ही ह्या पेपरात~~ काढलेला निष्कर्ष फारच महत्त्वाचा वाटला

म्हणून मी तातडीनं तुम्हाला बोलावलं. खुद्द तुम्हीच हा पेपर शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध व्हावा असं 'नेचर'च्या संपादकाला लिहिलं होतं. त्या पेपर-मध्ये तुम्ही असा निष्कर्ष काढला आहे की कॉमेट मनोज दत्त हा सूर्याभोवती जाऊन आल्यावर पृथ्वीवर आपटण्याची शक्यता आहे. ह्या निष्कर्षामागचं तुमचं गणित कितपत बरोबर आहे?"

एखाद्या नोकरशहाने त्याच्या गणिताबद्दल शंका प्रदर्शित केली असती तर जेम्सचा पारा चढला असता. पण सर जॉन मॅक्फर्सन हे साधे फायली सरक-वणारे नोकरशहा नव्हते. सरकारी नोकरीत शिरण्यापूर्वी ते केंब्रिज विद्यापीठात अनेक वर्षे भौतिक शास्त्राचे प्राध्यापक होते. खगोलशास्त्रात त्यांचं संशोधन नसलं तरी रुची होती. जेम्सला त्यांच्याबद्दल नेहमीच आदर वाटे. हा त्यांचा प्रश्न त्यांनी कुठल्या उद्देशानं विचारला हे त्याला माहीत होतं. आपलं गणित बरोबर असलं तर त्या निष्कर्षाप्रमाणं पृथ्वीवर केवढी आपत्ती कोसळेल याची त्याला कल्पना होती. म्हणून हा निष्कर्ष किती काळजीपूर्वक काढण्यात आला आहे, याची चिकित्सा करणं आवश्यक होतं.

"कॉमेटबद्दल निश्चितपणं अजूनही विधान करता येत नाही. काही कारणामुळं कॉमेट दत्तची कक्षा जर बदलली नाही, किंवा तो जर सूर्याजवळ असताना मोडकळीला आला नाही तर माझ्या गणिताप्रमाणं त्याची पृथ्वीशी होणारी टक्कर बहुतेक अटळ आहे," त्याने शांतपणे उत्तर दिले.

"तुम्ही 'बहुतेक' हा शब्द वापरला. म्हणजे टक्कर टळायची शक्यता आहे का?" सर जॉननी विचारले.

"आपल्या सूर्यमालेत जुने-नवे अनेक धूमकेतू येत असतात. पण प्रत्यक्ष पृथ्वीशी एखाद्या कॉमेटची टक्कर होणं फार असंभाव्य समजलं जातं. तज्ज्ञांचा अंदाज आहे, की अशी टक्कर एक कोटी वर्षांतून फार तर एकदा घडेल—कारण एकाच वेळी एकाच ठिकाणी पृथ्वी आणि कॉमेट जवळ येतील ही फार क्वचित घडणारी गोष्ट आहे. माझ्या गणिताप्रमाणं कॉमेट दत्त आणि पृथ्वी यांच्या बाबतीत हे घडणार. बुध आणि शुक्र हे सूर्याजवळचे ग्रह कदाचित कॉमेट दत्तची कक्षा थोडी बदलतील. पण मला तसं वाटत नाही. कारण ह्या ग्रहांचं वस्तुमान आणि गुरुत्वाकर्षणशक्ती फार नाहीत. आपल्या मोठ्या वस्तुमानामुळे गुरू हा ग्रह ज्याप्रमाणं कॉमेटच्या कक्षा बदलू शकतो

त्याप्रमाणं हे ग्रह करू शकणार नाहीत. तरी ह्या प्रश्नाचं निश्चित उत्तर मला केंब्रिजमधल्या कॉम्प्यूटरकडून दोन दिवसांत मिळेल.

दुसरी अनिश्चितता सूर्याजवळ असताना सबंध कॉमेटचे तुकडे होण्याची शक्यता आणि बाष्पीभवन होण्याची शक्यता यांच्यावर अवलंबून आहे. ह्या दोन्हीपैकी कुठलाही प्रकार घडला तर पृथ्वीवर येणारं अरिष्ट टळेल." जेम्सने खुलासा केला.

"पण ह्या अनिश्चिततेबद्दल आपल्याला इतक्यात कळणार नाही. कॉमेट दत्त सूर्याभोवती जाऊन आल्यावर ते कळेल. पण मग बचावासाठी वेळ फार उरणार नाही." सर जॉन खोलीत येरझारा घालत म्हणाले. "जर पृथ्वीवर कॉमेट आदळलं तर न भूतो न भविष्यति असा प्रलय होणार. पृथ्वीच्या पृष्ठ-भागाची, त्यावरच्या मनुष्यवस्तीची नासधूस व हानी तर होईलच, शिवाय वायूंचे बाष्पीभवन होऊन वातावरणावरदेखील अनिष्ट परिणाम होतील. त्यामुळं प्रत्यक्ष टकरीपासून बचावलेल्या पृथ्वीच्या पृष्ठभागावर असलेल्या जीवसृष्टीचीदेखील शाश्वती नाही."

चंद्रावर काही वाकडेतिकडे चॅनल्स दिसतात. त्यावरून तेथे एके काळी पाणी असावे, आणि ते एखाद्या कॉमेटशी चंद्राच्या झालेल्या टकरीमुळे तात्पुरते तेथे आले असावे असे काही तज्ज्ञांचे विधान कुठेतरी वाचलेले जेम्सला आठवले. पृथ्वीवर कॉमेट आपटले तर त्याचे काय संभाव्य परिणाम असतील याचा तो विचार करू लागला...पण त्याचे लक्ष खेचत सर जॉन मूळ मुद्द्यावर आले.

"तुमच्या गणिताप्रमाणं जर ही टक्कर घडली तर ती आजपासून सुमारे दहा महिन्यांनी घडेल. ती नक्की घडेल हे आत्ता जरी सांगता आलं नाही तरी तिला तोंड देण्याची उपाययोजना आगाऊच आखली पाहिजे असं मला वाटतं."

उपाययोजना! जिथे शहरेच्या शहरे, देशच्या देश उद्ध्वस्त होणार तिथे बचावाचा मार्ग कसला असणार! इतक्या मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक आपत्ती मानवी संस्कृतीवर पूर्वी कधी आल्याचे इतिहास सांगत नव्हता. अशा प्रसंगा-पुढे मानवी तंत्रज्ञान कितपत प्रभावी ठरेल! जेम्सला फारशी आशा नव्हती. त्याने आपले मत सांगताच सर जॉन म्हणाले,

"मी आशावादी आहे! पण जरी तुमचं मत बरोबर ठरलं तरी आपण आपल्या परीनं प्रयत्न करायला काय हरकत आहे? नुसते हातपाय गाळून बसलो तर विनाश निश्चितच आहे. शिवाय आपण दोघेच या विषयावर खल करत बसण्यापेक्षा, मला वाटतं, की जागतिक पातळीवर शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ एकत्र बोलवून निर्णय घ्यावा. असा एक परिसंवाद तातडीनं घडवून आणण्याचा मी प्रयत्न करीन. मात्र गुप्तता आवश्यक आहे. नाहीतर उगीच सर्वसाधारण लोकांत घबराट निर्माण होईल."

त्यांनी जेम्सच्या पेपरकडे नजर टाकली. जेम्सने त्यांचा आशय ओळखला.

"माझा पेपर दाबून ठेवण्यात काही फायदा नाही! कारण कॉमेट दत्तची कक्षा माहीत असलेले अनेक लोक आहेत आणि मी केलेले गणित करण्यास समर्थ असेदेखील कितीतरी शास्त्रज्ञ आहेत."

"तुमचा पेपर तुम्ही अवश्य प्रसिद्ध करा. फक्त माझी एवढीच विनंती आहे की तुमच्या निष्कर्षात थोडा बदल करून 'कॉमेट दत्त हा पृथ्वीवर आपटेलच असा निष्कर्ष काढण्यापूर्वी इतर अनेक संभाव्य घटना घडू शकतील, त्यांची दखल घेणं आवश्यक आहे' असं लिहिलंत तर वाचकाला ही गोष्ट अशक्य कोटीतली वाटेल. 'नेचर' हे एक प्रतिष्ठित साप्ताहिक असल्यानं त्यातल्या लेखांना बरीच प्रसिद्धी मिळते. म्हणून ही तडजोड सुचवतो." सर जॉन म्हणाले. "मी माझं वजन खर्च करून इतर देशांतली प्रख्यात शास्त्रीय नियतकालिकंदेखील असाच संयम पाळतील अशी व्यवस्था करू शकेन. विलक्षण प्रसंगांसाठी विलक्षण उपाययोजना आवश्यक असते."

नंतर त्या दोघांत बरीच चर्चा होऊन शेवटी दोघांना पटेल असा बदल जेम्सच्या पेपरमध्ये करण्यात आला. जागतिक परिसंवादाबद्दल थोडे विचार पक्के करण्यात आले. शेवटी सर जॉन स्वतः आपल्या कारमधून त्याला त्याच्या होटेलमध्ये पोचवायला निघाले.

थिएटरला जाणाऱ्यांची गर्दी केव्हाच संपली होती आणि लंडनमधल्या मध्यवर्ती भागात शुकशुकाट होता. जेम्सचे हॉटेल पिकॅडिली रस्त्यावर होते. त्याला त्याच्या खोलीत व्यवस्थित स्थानापन्न करून निरोप घेताना सर जॉन म्हणाले, "लवकरच तुम्हाला परिसंवादाचं आमंत्रण येईल. अवश्य आलं पाहिजे. शिवाय तुमच्या कंप्युटरचे निष्कर्ष पण लगेच कळवा. गुड नाइट.

जॉन्सन उद्या सकाळी दहा वाजता तुम्हाला केंब्रिजला न्यायला येईल."

झोपण्यापूर्वी जेम्सने निरभ्र आकाशाकडे दृष्टी टाकली. सारे किती शांत होते! ह्या तारकांमधून अद्याप डोळ्यांना न दिसणारा धूमकेतू पृथ्वीच्या रोखाने येतोय अशी कल्पना कोणी तरी केली असती का? आपणही हे विधान कशाच्या जोरावर केले? क्षणभर—आणि क्षणभरच—त्याला आपले गणित बरोबर असेल का ही शंका आली.

सर जॉन मॅक्फर्सन यांची काम जल्द गतीने उरकणारा कारभारी म्हणून ख्याती होती. वरील संभाषणानंतर अवघ्या तीन आठवड्यांत लंडनमध्ये युनायटेड नेशन्सच्या तर्फे एक गुप्त परिसंवाद भरवण्यात आला. अनेक देशांतले एकंदर शंभर शास्त्रज्ञ, खगोलशास्त्रात व अंतराळशास्त्रात काम करणारे वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ त्यात भाग घेण्यासाठी आले होते. फक्त एक अपवाद म्हणजे श्रीयुत मनोज दत्त. हे कॉमेट दत्तचे संशोधक म्हणून खास आमंत्रणा-वरून आले होते.

हा परिसंवाद एक आठवडाभर चालला. पण तो चालू आहे, त्याला बाहेरून पाहुणे आलेत, ते कशाबद्दल चर्चा करताहेत याविषयी कसोशीने गुप्तता पाळण्यात आली होती. वृत्तपत्रांतून त्याबद्दल एक अक्षरही लिहून आले नव्हते. सकाळ ते संध्याकाळ दीर्घ चर्चा, आकडेमोड, सरकारी कंप्युटरचा उपयोग, इत्यादी करून शेवटी ह्या तज्ज्ञ मंडळींनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आणि कॉमेट दत्तच्या संभाव्य आक्रमणाला तोंड देण्याची उपाययोजना आखली.

हा धूमकेतू पृथ्वीवर आपटेल अशाच कक्षेतून येत आहे याबद्दल अनेक जणांनी जेम्स फोर्साइथसारखेच मत दिले. ही संभाव्य टक्कर न घडण्याला कुठली नैसर्गिक कारणे असू शकतील याची पण चर्चा करण्यात आली. सर जॉन मॅक्फर्सन आणि जेम्स फोर्साइथ यांच्या संभाषणात आलेल्या कारणा-शिवाय इतर अनेक कारणे देण्यात आली. कॉमेटचा गर्भभाग संकुचित न राहून नळीप्रमाणे पसरला तर टक्कर होण्याची संभाव्यता आणखी वाढते, पण प्रत्यक्ष टक्कर मात्र तेवढी विनाशकारी ठरू नये. पृथ्वीच्या वातावरणाशी ह्या नळीतल्या कणांचा संघर्ष होऊन त्यातून मोठ्या प्रमाणावर उल्कापात होईल.

तसे झाले तर प्राणावर बेतलेले शेपटावर निभावून जाईल असा अभिप्राय काही तज्ज्ञांनी व्यक्त केला.

पण हे असे घडेलच किंवा इतर कारणामुळे धूमकेतू कक्षा बदलून पृथ्वीचे दुरूनच दर्शन घेऊन जाईल अशी ग्वाही कोणालाच देता येत नव्हती. म्हणून काहीतरी उपाययोजना आवश्यक आहे असे सर्वांचे मत पडले.

पण ही उपाययोजना कोणत्या स्वरूपाची असावी ?

बचावाची उपाययोजना करता येणार नाही हे बहुतेक तंत्रज्ञांनी सांगितले. एक तर धूमकेतू पृथ्वीच्या कुठल्या भागावर आपटेल हे गणिताने सांगता येण्याइतकी माहिती अद्याप उपलब्ध नव्हती आणि अगदी शेवटपर्यंत ती मिळेल की नाही हे सांगता येत नव्हते. म्हणून कुठल्या भागातल्या लोकांचे स्थलांतर करायचे हे ठरवता येत नव्हते! शिवाय, पृथ्वीभोवतालच्या वातावरणातच महत्त्वाचे बदल घडून येऊ शकल्यास त्यांची भीती सर्वच पृथ्वीवासीयांना सारखीच! आणि कसलीही बचावाची उपाययोजना चालू करताना सर्वसामान्य लोक बिथरण्याची शक्यता पण होती.

म्हणून ही उपाययोजना बचावाच्या स्वरूपाची नसून आक्रमक स्वरूपाची पाहिजे असे सर्वांचे मत पडले आणि ती म्हणजे धूमकेतूचा मार्ग मानवी प्रयत्नाने बदलण्याची!* जे काम नैसर्गिक कारणांनी शक्य होणार नव्हते ते आता मानव करायला धजणार होता...अगदी शेवटचा उपाय म्हणून.

पृथ्वीवर उपलब्ध असलेला अणुशक्तीचा सर्व साठा वापरून एक प्रचंड अण्वस्त्र तयार करायचे आणि योग्य वेळी योग्य ठिकाणी त्याचा मारा धूमकेतूवर करायचा! ही प्रचंड शक्ती धूमकेतूची दिशा बदलण्यास समर्थ ठरेल असा तंत्रज्ञांचा अंदाज होता. प्रयोग सफल झाल्यास धूमकेतू पृथ्वीवर न आपटता तिच्या जवळून जाईल.

हा प्रयोग फार दिरंगाई केल्यास सफल होणार नाही याची तंत्रज्ञांना जाणीव होती...कारण धूमकेतू फार जवळ आल्यावर त्याची दिशा बदलणे खूप अवघड होते. उलट तो फार लांब असताना रिमोट कंट्रोलने मानवविरहित अंतराळयान पाठवून हा स्फोट अचूक घडवून आणणे हे मानवी तंत्रज्ञानाच्या आवाक्याबाहेरचे होते. शिवाय ह्या प्रयोगाची तयारी करायला वेळ लागणार होताच.

ह्या सर्व मर्यादा लक्षात घेऊन काही तारखा ठरवण्यात आल्या :

सप्टेंबर १० : अंतराळयान पाठवण्याची तारीख. ह्या तारखेपर्यंत जर धूमकेतूची दिशा नैसर्गिक कारणांनी बदलली नसली आणि तो पृथ्वीवर आपटणार हे निश्चित झाले तर अण्वस्त्र असलेले हे यान पाठवायचे.

ऑक्टोबर १ : ह्या दिवशी यान धूमकेतूजवळ पोचेल आणि रिमोट कंट्रोलने त्यावर अण्वस्त्रांचा मारा केला जाईल.

नोव्हेंबर २ : जर धूमकेतू पृथ्वीवर आपटणार असेल तर तो ह्या दिवशी आपटेल. मात्र १ ऑक्टोबरचा प्रयोग यशस्वी झाल्यास तो पृथ्वीजवळून जाईल.

प्रयोग यशस्वी होईल किंवा नाही ह्यामागे एक महत्त्वाचा न सुटलेला प्रश्न होता. तो म्हणजे कॉमेटचे वस्तुमान. ते जर एका ठराविक मर्यादेपेक्षा जास्त असेल तर त्याची दिशा बदलायला मानवनिर्मित अणुस्फोट अपुरा पडेल, असे शास्त्रज्ञांनी सांगितले.

काही झाले तरी हा सर्व प्रयोग 'टॉप सीक्रेट' ठेवायचा असे ठरले. तो यशस्वी झाला तरी त्याची वाच्यता करायची नाही. आणि जर तो अयशस्वी झाला तर...

"तुमचा काय अंदाज आहे? प्रयोग यशस्वी होईल का?" दत्तबाबूंनी परिसंवाद संपल्यावर सर जॉनना विचारले.

"यंदाची ख्रिसमस प्रेझेंट्स काही मी एक ऑक्टोबरपूर्वी विकत घ्यायच्या भानगडीत पडणार नाही!" सर जॉन उत्तरले.

परिसंवादानंतर दोन आठवडे इंग्लंडचा दौरा करून दत्तबाबू कलकत्त्याच्या डमडम हवाईतळावर आले तेव्हा त्यांच्या स्वागताला मित्रांची, नातलगांची आणि बघ्यांची अफाट गर्दी होती. दत्तबाबू परिसंवादाला गेलेत हे अर्थातच कोणाला माहीत नव्हते. ते फक्त इंग्लडला वेधशाळा, खगोलशास्त्रीय संस्था पाहायला आणि हौशी खगोलशास्त्रज्ञांना भेटायला जात आहेत एवढेच सर्वांना माहीत होते. गर्दीतून मार्ग काढीत, हारांचे ढीग गोळा करीत आणि वार्ताहरांना 'संदेश' द्यायचे टाळीत त्यांनी कसाबसा आपल्या मोटारीत प्रवेश मिळवला.

घरी आल्यावर त्यांनी पाहिले की घराशेजारच्या जमिनीवर मोठा मंडप घातलेला असून तेथे छोटासा यज्ञ चालू आहे. हा काय प्रकार आहे म्हणून त्यांनी विचारले तेव्हा इंद्राणीदेवी म्हणाल्या, "तुम्ही परदेशचा दौरा करून सुखरूप आलात म्हणून! तुम्हाला आशीर्वाद द्यायला ब्राम्हण बोलावले आहेत."

"इतके लोक परदेशाला जाऊन येतात—त्यात मी विशेष काय केलं? पण हा यज्ञ कशाला?"

इंद्राणीदेवींनी किंचित ओशाळून दत्तबाबूंच्या धाकट्या भावाकडे पाहिले. त्याने खुलासा केला :

"तुम्ही धूमकेतू शोधून काढला तेव्हापासून आम्हा सर्वांना फार अस्वस्थ वाटत होतं. गुरुजी म्हणाले की शांती करून घ्यावी. त्यांच्या सूचनेवरून तुम्ही आज यज्ञ करावा ही आमची विनंती आहे."

दत्तबाबूंनी शांतपणे विचारले, "हा यज्ञ मी केल्यानं काय विशेष फायदा होणार आहे?"

"धूमकेतूमुळं घडणारं अशुभ टळेल."

दत्तबाबूंचा पारा चढला.

"धूमकेतू अशुभ असतो हा निव्वळ अंधविश्वास आहे. जोपर्यंत आपल्याला धूमकेतूबद्दल माहिती नव्हती तोपर्यंत हा अंधविश्वास मी एक वेळ खपवून घेतला असता. पण आजच्या काळात नाही! ग्रह, चंद्र, मीटिओराइट, कॉमेट हे सर्व सूर्यमालेचे निर्जीव घटक आहेत. त्यांचं बरंच आकलन आता झालेलं आहे. मानवी जीवनावर परिणाम करू शकणारी कसलीच शुभाशुभ शक्ती त्यांच्यात नाही." दत्तबाबू तावातावाने बोलत होते, "आणि हे सर्व तुम्ही आधुनिक विज्ञानाची पुस्तकं वाचलीत तर तुम्हाला कळेल. पण हे माझं अरण्यरुदन आहे हे मला माहीत आहे."

"पण अशा तऱ्हेचे यज्ञ करावेत म्हणून आपल्या पूर्वजांनी धर्मशास्त्रात सांगितलं आहे." त्यांच्या भावाने हळूच म्हटले.

"एके काळी आपले पूर्वज खऱ्या अर्थाने सत्यशोधक होते. निसर्गाबद्दल प्रश्न विचारायचे, तर्क करायचे आणि आपापल्या परीने उपाययोजना करायची अशी सुसंबद्धता उपनिषदात, गीतेत आढळते. पण ही प्रवृत्ती पुढं लुप्त झाली.

हल्ली आपण ते ग्रंथ केव्हा लिहिले, ते कोणत्या दृष्टिकोनातून लिहिले, याची जाणीव नसताना त्यांतील मूळ उच्च विचारांकडे दुर्लक्ष करून त्यावर नंतरच्या लोकांनी चढवलेल्या कर्मकांडाच्या मुलाम्याला महत्त्व देत आलोय...जाऊ दे! मला वाद घालत बसायला वेळ नाही. पण मी मात्र तुमच्या ह्या धांगडधिंग्यात भाग घेणार नाही."

दत्तबाबू तरातरा आपल्या खोलीकडे निघून गेले.

इंग्लंडच्या दौऱ्यात दत्तबाबूंची सर जॉन ह्यांच्याशी बरीच दोस्ती झाली होती. दत्तबाबूंना सर जॉन यांची शिस्तबद्ध वागण्याची पद्धत, तडफदारपणा आणि कार्यक्षमता हे गुण आवडले तर सर जॉन यांना दत्तबाबूंची हाडाच्या शास्त्रज्ञात असणारी सत्यशोधक प्रवृत्ती कौतुकास्पद वाटत होती. भारतात परतल्यावर-देखील दोघांमध्ये पत्रव्यवहार चालू होता. आपल्या वरवर औपचारिक दिस-णाऱ्या पत्रातून सर जॉन मध्येच एखादे सूचक वाक्य घालून दत्तबाबूंना 'प्रॉजेक्ट लाइट ब्रिग्रेड 'च्या प्रगतीबद्दल माहिती पुरवत.

टेनिसनच्या सुप्रसिद्ध 'चार्ज ऑफ द लाइट ब्रिगेड ' ह्या कवितेवरून सर जॉन यांनीच धूमकेतूवर योजलेल्या ह्या आक्रमणाच्या प्रॉजेक्टचे नाव निश्चित केले होते. प्रकल्पाकरता लागणारे अंतराळयान अमेरिकेकडे उपलब्ध होते. इतका दूरचा प्रवास करायला लागणारी रॉकेट पॉवर रशियानं प्रामुख्याने दिली. त्याला आवश्यक असणारे इलेक्ट्रॉनिक्सचे तंत्रज्ञान, अणुस्फोटासाठी लागणारे इंधन आणि इतर सामग्रीही अनेक राष्ट्रांनी आपापल्या परीने दिली. प्रकल्पावर चार भारतीय शास्त्रज्ञ महत्त्वाची कामगिरी करत होते याचा दत्तबाबूंना मोठा अभिमान वाटत होता.

दत्त धूमकेतू ठराविक कक्षेतून जात होता. त्याची शेपूट तयार झाली. तो सूर्याला सुखरूप (निम्मा) वळसा घालून आला—त्याचे तुकडे झाले नाहीत. बुध आणि शुक्र यांचे गुरुत्वाकर्षण त्याची कक्षा बदलायला समर्थ ठरले नाही. त्याची कक्षा रोज कंप्युटरवर ठरवली जात होती आणि तो पृथ्वीवर आपट-णार ही शक्यता दिवसेदिवस वाढत होती.

पण ही वार्ता मोठ्या शिताफीने गुप्त ठेवण्यात आली. हा धूमकेतू पृथ्वीच्या जवळून जाईल पण तिला उपसर्ग न पोचवता, असा समज सामान्य

माणसाचा होताच. फार काय, अंदर की बात माहीत नसलेले शास्त्रज्ञदेखील त्याच भ्रमात होते. अनेक हौशी खगोलशास्त्रज्ञ धूमकेतूच्या दर्शनाची—जवळच्या दर्शनाची—वाट पाहत होते.

पण कुतूहलाबरोबर सर्वसामान्य माणसांत भीतीची भावना पण होती, आणि तिचा फायदा अनेक तत्त्वशून्य ज्योतिषांनी घेतला. भारतातच काय, पण अतिप्रगत अमेरिकेतसुद्धा ज्योतिर्विदांनी धूमकेतूचा मोठा बागुलबुवा उभा केला. दत्तबाबूंसारखे शास्त्रीय विचारसरणीचे लोक ह्या अंधविश्वासजन्य भीतीची लाट थोपवून धरायचा प्रयत्न करत होते, पण त्यांच्या पदरी निराशाच येत होती. ह्या भीतीचा भारताला एक फायदा झाला. बहुसंख्य जोडप्यांनी —शिकलेल्यांनी आणि पदवीधरांनीदेखील—ह्या काळात संतानप्राप्ती होऊ नये अशी दक्षता बाळगली आणि त्यामुळे जनसंख्येच्या वाढीला तात्पुरता आळा बसला!

दरम्यान शास्त्रज्ञांना एक आशेचा किरण दिसला. अनेक खगोलशास्त्रीय वेधांवरून कॉमेट दत्तचे वस्तुमान पुष्कळ कमी असावे असे निश्चित होऊ लागले. प्रॉजेक्ट लाइट ब्रिगेड सफल होण्याची शक्यता त्यामुळे वाढली. दत्तबाबू अधीरतेनं सप्टेंबर-ऑक्टोबरची वाट पाहत होते.

सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात सर जॉनचे पत्र आले. क्रिकेट मोसमाची चर्चा, इंग्लंडमधल्या 'लेट समर'चे वर्णन, एडिनबरा फेस्टिव्हलमधल्या काही सांस्कृतिक कार्यक्रमांचा आढावा ह्यातून वाट काढता काढता दत्तबाबूंना हवे असलेले वाक्य मिळाले :

'The charge of the Light Brigade has begun. Let us wish it success.' (लाइट ब्रिगेडचे आक्रमण सुरू झाले. आपण त्याला सुयश चिंतू या.)

दुर्गापूजेची सुट्टी सुरू झाली. बंगालमध्ये सणांचे, सुट्टीचे वातावरण आले. सांस्कृतिक कार्यक्रमांना ऊत आला. दत्तबाबूंचा आठ वर्षांचा नातू खोका त्यांच्याकडे राहायला आला. त्याच्याशी खेळण्यात त्यांचा वेळ जाई. पण "अलिकडे ह्यांचं कशातच लक्ष नसतं" ही इंद्राणीदेवींची तक्रार होती.

एक ऑक्टोबर आला आणि गेला. दत्तबाबूंनी ती रात्र टेलिस्कोपशेजारी जागून काढली. दोन तारखेला त्यांनी परत धूमकेतूचे दर्शन घेतले. त्याची

दिशा बदलली असे त्यांना वाटले. पण लगेच त्यांच्या लक्षात आले की हा मनोराज्याचा प्रकार आहे. कारण धूमकेतूत होणारा फरक इतका सूक्ष्म प्रकारचा असणार (तोही प्रकल्प सफल झाला तर!) की तो आपल्या दुर्बिणीला दिसणार नाही!

प्रयोग सफल झाला असेल का? अंतराळयान ठरल्याप्रमाणे धूमकेतूजवळ गेले असेल का? आणि ठरल्या वेळी तो प्रचंड स्फोट झाला असेल का? केव्हा मिळणार ह्या प्रश्नांची उत्तरे? तीन तारखेला ते अस्वस्थतेने कशाची तरी वाट पाहत होते.

दुपारी पाच वाचता कलकत्त्यातल्या डिफेन्स ऑफिसकडून एक खलिता घेऊन एक स्कूटरस्वार आला. इंग्लंडहून आलेला 'क्लासिफाइड टेलेक्स मेसेज' होता. दोन ऑक्टोबरला पाठवलेला.

इतका वेळ उत्तर मिळण्याची अधीरतेने वाट पाहणारे दत्तबाबू किती तरी वेळ तो बंद खलिता घेऊन बसले होते. अखेर मनाचा धीर करून त्यांनी तो उघडला. आत फक्त एकच ओळ होती :

"मी आज खिसमस प्रेझेंट्स आणायला जात आहे—जॉन मॅक्फर्सन".

नोव्हेंबरमध्ये कॉमेट दत्त पृथ्वीपासून ५०,००० मैलांवरून गेला. अनेकांनी त्याचे दर्शन घेतले. इतका प्रेक्षणीय धूमकेतू पूर्वी पाहण्यात आला नव्हता असे सर्वमान्य मत होते.

कॉमेट दृष्टीआड झाल्यावर कित्येक दिवसांनी दत्तबाबू इंद्राणीदेवींना म्हणाले, "बघ, धूमकेतू आला आणि गेला. काय विशेष अनिष्ट घडलं का कुठं? आता तरी माझं म्हणणं पटतं का?"

"विशेष अनिष्ट घडलं नाही हे कबूल! पण ते घडलं असतं. आणि ते का घडलं नाही हे तुम्हाला माहीत आहे का?" इंद्राणीदेवींनी अभिमानाने विचारले.

म्हणजे, प्रॉजेक्ट लाइट ब्रिगेडची माहिती हिला मिळाली की काय? दत्तबाबूंनी सावधगिरीपूर्वक विचारले, "तुला काय म्हणायचं आहे?"

"अहो, त्या दिवशी आपल्या घरी यज्ञ झाला म्हणून तर हा अनर्थ टळला."

"अग, पण मी यज्ञ केलाच नाही!" दत्तबाबू उद्गारले. बायकोला आपण आतातरी निरुत्तर केले हा त्यांचा अभिमान मात्र क्षणभंगुर ठरला.

"तुम्ही नाही केला, पण खोकानं केला. गुरुजी म्हणाले की यज्ञ तुम्ही नाही केलात तरी तुमच्या वंशजानं केलेला चालेल. खोका जवळच होता, म्हणून बसवला त्याला. गुरुजींच्या इतका शास्त्रपारंगत माणूस तुम्हाला सापडणार नाही. कुठल्याही प्रसंगातून ते मार्ग काढतात." इंद्राणीदेवी कौतुकाने म्हणाल्या.

दत्तबाबूंच्या पुढे त्या दिवशीचे घटनाचित्र उभे राहिले. त्यांनी कल्पनासृष्टीत पाहिले : खोका यज्ञ करत आहे, पळीने तूप ओततोय, गुरुजींनी सांगितलेले मंत्र त्यांचे अर्थ न समजताच म्हणतोय....

मग त्यांच्यापुढे दुसरे चित्र उभे राहिले—लंडनमधल्या परिसंवादाचे. धूमकेतू केव्हा येणार, त्यातून कुठल्या तऱ्हेचे अरिष्ट पृथ्वीवर येणार याची झालेली सखोल चर्चा त्यांना आठवली. येणाऱ्या अरिष्टाची जाणीव होताच केलेली विलक्षण उपाययोजना आणि कसलाही गाजावाजा न करता त्याची झालेली सफल पूर्ती त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली...

दोन्ही चित्रे एकाच मानवजातीची, एकाच काळातली...पण त्यांच्यात केवढी तफावत होती! दत्तबाबू मनाशी म्हणाले, "आपण माणसामाणसात राहणीमान, पैकाअडका, साधनसामग्री ह्या बाबतींतली तफावत लक्षात घेतो आणि ती दूर करायचा प्रयत्न करतो. पण अंधविश्वास आणि सयुक्तिक विचार करण्याची प्रवृत्ती यांच्यातली वैचारिक तफावत केवढी मोठी आहे! अगदी सुशिक्षित, समृद्ध माणसातही अंधविश्वास असतो. एकविसाव्या शतकातल्या वैज्ञानिक युगात पदार्पण करू पाहणाऱ्या मानवजातीला ही वैचारिक तफावत परवडेल का? ती केव्हा दूर होणार?"

दत्तबाबूंकडे ह्या प्रश्नांचे उत्तर नव्हते.

६ पुनरागमन

सूर्योदय होताच सुरू झालेल्या मंजुळ पार्श्वसंगीताने करटकला जागे केले. यंत्रसज्जित बाथरूममध्ये प्रातर्विधी आटपून तो न्याहारी करायला टेबलाशी आला. त्याबरोबर टेबलाच्या मध्यावरचा पृष्ठभाग दुभंगून त्यातून एक खाद्य-पदार्थांचा ट्रे बाहेर आला. त्यातला प्रत्येक पदार्थ योग्य तपमानात तयार ठेवला होता. करटकने ही यांत्रिक न्याहारी खायला सुरू करताच त्याच्या समोरचा टी० व्ही० सेट आपोआप चालू झाला. जागतिक बातम्यांचा कार्यक्रम होता.

ठराविक साच्याच्या बातम्या...आजकालच्या यांत्रिक जीवनात फरक असणारच कसा? जे काल घडले, तसेच आज घडणार आणि तसेच उद्या, परवा...पुढच्या वर्षीसुद्धा तेच! कशाला हवा हा बातम्यांचा कार्यक्रम? करटकच्या मनात विचार आला : पण हा कार्यक्रम तरी बंद कसा होणार? कारण तो बंद होणे म्हणजे टी० व्ही० कार्यक्रमातला एक महत्त्वाचा बदल नव्हे का? पण जेथे बदल होण्याला वावच नाही तेथे हे घडणार कसे?

त्याला आपला आजचा संबंध कार्यक्रम डोळ्यांसमोर दिसत होता. न्याहारी झाल्यावर तो कामाला जाणार म्हणजे एका खोलीतून दुसऱ्या खोलीत! तेथे त्याचा हस्तक (हस्तक की मालक?) त्याची वाट पाहत असणार. हा हस्तक म्हणजे एक लहानसा कंप्यूटर. करटक आत येताच तो आपल्या टी० व्ही० स्क्रीनवर त्याची स्वागतपर वाक्ये झळकवणार. यांत्रिक स्वागत! करटक खुर्चीवर बसताच स्क्रीनवर त्याच्या कामासंबंधी माहिती येणार. त्यावरून निर्णय घेण्याचे काम करटकने करायचे. पण त्याचे निर्णयस्वातंत्र्य मर्यादितच होते—कंप्यूटरने आधीच ठरवलेल्या वेगवेगळ्या पर्यायी उत्तरांतले

त्याने फक्त एक निवडायचे! त्या कक्षेपलीकडे गेल्यास ती सबंध यंत्रणाच कोसळून पडली असती.

करटकला ह्या आखलेल्या जीवनाचा विलक्षण कंटाळा आलेला होता. अर्थात कंटाळ्यावरही उपाय होतेच—ठराविक साच्याचे, ठराविक ठिकाणी, ठराविक खेळ खेळणे, ठराविक सहलीत भाग घेणे, ठराविक 'मनोरंजना'चे कार्यक्रम पाहणे, इत्यादी इत्यादी...त्याला आपल्या जंगली बांधवांचा हेवा वाटत होता.

शेकडो वर्षांपूर्वी आपले पूर्वजदेखील ह्यांच्यासारखेच जंगली होते. जंगल काय सगळीकडेच होते. पण आपल्या पूर्वजांनी 'प्रगती'चा मार्ग अवलंबिला आणि जंगलातून वाट काढली. वेगवेगळ्या टप्प्यांतून क्रमाक्रमाने आपण शेवटी येथवर पोचलो. प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्याबरोबर आपल्यातील आणि जंगलवासीयांतील अंतर वाढत गेले. आपले पूर्वज त्यांची कीव करीत : आपण येथवर पोचलो आणि ते बिचारे होते तिथेच राहिले.

पण आता कीव कोणाची करायची, त्यांची का आपली? अजून ते जंगलात पशूप्रमाणे राहतात. अंगावर कपडे नावालाच. भोजन म्हणजे जनावरे भाजून (किंवा कच्चीच) खाणे. थंडी किंवा उष्णता यांच्याशी मुकाबला करायचे एकमेव साधन म्हणजे गुहा! पण बिचारे अल्पायुषी असूनही स्वेच्छाचारी आणि मजेत असतात. आपल्या संस्कृतीचे त्यांना कधी आकर्षण वाटले नाही. आणि आपण? यंत्रांना जुंपून सुखसोयी निर्माण केल्या; निसर्गावर, हवामानावर नियंत्रण केले, आयुर्मर्यादा वाढवली. पण हे करताना त्या यंत्रांच्या आहारी जाऊन जीवनातली विविधता, मानवाची स्वच्छंदी वृत्ती, विचार करण्याची क्षमता हे सर्व गमावून बसलो. करटकला स्वतःचे आरामशीर पण कंटाळवाणे आणि लांबलचक आयुष्य पुढे वाढून ठेवलेले दिसत होते. त्यात काही विशेष घडणार नव्हते.

"पीऽऽऽप पिप... पीऽऽऽप पिप... पीऽऽऽप पिप..."

चमकून करटकने आपल्या मनगटी घड्याळाकडे पाहिले. त्यातून इमर्जन्सी संदेश येत होता आणि तबकडीवर त्याचे लक्ष वेधून घेण्यासाठी हिरवे आणि लाल प्रकाशाचे ठिपके क्रमाक्रमाने येत होते. काहीतरी धोक्याची परिस्थिती निर्माण झाल्यास जनतेपैकी निवडक स्वयंसेवकांना प्रथम सूचना देण्याची ही

पूर्वतयारी होती. हा बावटा मिळताच त्यांनी माहितीच्या केंद्रस्थानकाशी संपर्क साधायचा. मग पुढे त्यांना काय ते आदेश देण्यात येतील. केंद्राने ठरवेपर्यंत सर्व स्वयंसेवकांनी गुप्ततेचे नियम पाळायचे.

करटक असाच एक स्वयंसेवक होता. कित्येक वर्षे त्याने ह्या 'ड्रिल'मध्ये भाग घेतला होता. दुसरे स्वयंसेवक कोण हे त्याला माहीत नव्हते आणि त्याने कोणाला विचारलेही नव्हते. तो पण गुप्ततेचाच भाग होता. वेळोवेळी त्यांची परीक्षा घेण्यासाठीही ड्रिल्स होत असत. प्रथम-प्रथम जीवनातला एक-सूत्रीपणा मोडणारी म्हणून ही ड्रिल्स करटकला आवडत. पण पुढे पुढे त्यांच्यातही एकसूत्रीपणा आला. कारण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या वापराने सर्व अपेक्षित धोके टाळण्यात आले होते. आणि अनपेक्षित असे काही घडलेच नव्हते कधी.

करटकने कंप्यूटरद्वारे केंद्राशी संधान बांधले.

एक टुमदार आकाशयान सूर्यमालेबाहेरून आले आणि झपाट्याने सूर्याच्या दिशेने निघाले. प्लूटो, नेपच्यून, शनी आणि गुरू यांच्या कक्षा क्रमा-क्रमाने ओलांडल्यावर त्या यानाचा वेग मंदावला आणि शेवटी ते मंगळा-भोवती घिरट्या घालू लागले. साधारण पंचवीस-तीस माणसे त्यात मावू शकली असती. पण खरोखर आत कोणीच दिसत नव्हते. नाही म्हणायला निर्जीव यंत्रे मात्र भरपूर होती. पण तीसुद्धा बंद पडल्यासारखीच होती. यानाच्या मात्र एका पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे मंगळाभोवती घिरट्या चालू होत्या.

तीन एक वर्षांचा अवधी उलटल्यावर यानात एकदम हालचाल सुरू झाली. काही यंत्रे जागी होऊन त्यांतून वेगवेगळ्या रंगांचे प्रकाश बाहेर पडू लागले. ह्या सर्व हालचालींचे पर्यवसान झाले दोन पेट्या उघडण्यात.

पेट्यांची झाकणे आपोआप वर गेली आणि त्यांत दोन मानवी शरीरे दिसू लागली.

यंत्रांची हालचाल चालू होती आणि तिचे परिणाम त्या शरीरांवर व्हायला लागले. गोठून दगड झालेल्या परिस्थितीतून हळूहळू त्यांच्यात उष्णतेचा संचार सुरू झाला आणि शेवटी ती 'जागी' झाली.

ते दोघे पडल्यापडल्या इकडेतिकडे पाहू लागले, पण अजून त्यांच्या चेहऱ्या-

वर निर्बुद्धपणा होता. ती उणीव मात्र फार काळ टिकली नाही. प्रत्येकाच्या मेंदूला एक इलेक्ट्रोडसारखे यंत्र आपोआप येऊन चिकटले आणि एका कंप्यूटरमधून त्यांना माहिती पुरवण्यास सुरुवात झाली.

"तू करटक आहेस. दीर्घ निद्रेतून जागा झाला आहेस. तुझ्या मेंदूतली तुझी सर्व स्मरणशक्ती आता जागृत केली आहे. त्याप्रमाणं विचार करायला सुरुवात कर." पहिल्या व्यक्तीला संदेश पोचला आणि ती उठून बसली. तिच्या मेंदूला तरतरी आली होती, चेहऱ्यावर बुद्धिमत्ता दिसून येत होती. तिने शेजारच्या व्यक्तीकडे पाहिले. ती पण उठून आसपासचे निरीक्षण करत होती.

"कोण दमनक! तू इथं कसा?"

हे करटक विचारत असतानाच दमनकने त्याला तोच प्रश्न विचारला. त्यांनी एकमेकांना उत्तर देण्यापूर्वी कंप्यूटरमधून आवाज आला.

"करटक आणि दमनक! तुम्ही आपापल्या स्मरणशक्तीला चालना दिलीत तर तुम्हाला ह्या प्रश्नाचं उत्तर मिळेल. पण अजून कदाचित तुमची स्मरणशक्ती पुरती जागी झाली नसेल म्हणून मी थोडासा खुलासा करतो.

तुम्ही दोघे लहानपणापासूनचे मित्र. आपल्या वसाहतीत तुम्ही शेजारी-शेजारी वाढलात. बरोबर शिक्षण घेतलंत. पण तुमचे स्वभाव मात्र वेगळे आहेत. म्हणून तुमची ह्या 'इमर्जन्सी मिशन'वर जोडीनं नियुक्ती करण्यात आली."

इमर्जन्सी मिशन? करटकला अंधुकसे आठवू लागले. त्या दिवशी ड्रिल करताना आपल्याला पाचारण करण्यात आले. पण ती खरी इमर्जन्सी होती? कशासाठी? आणि दमनक कसा इथे? तो पण स्वयंसेवक होता तर!

"आठवा, आठवा." कंप्यूटर पुढे म्हणाला, "पृथ्वीवर मोठी आपत्ती येणार होती. आपल्या वसाहतीला धक्का बसणार होता. कुठली आपत्ती होती?"

"हिमयुग!" दमनक एकदम आठवण होऊन उद्गारला. करटकलाही आठवले.

"बरोबर!" कंप्यूटरमधून आवाज आला. "मोठं प्रचंड हिमयुग होतं ते. आपल्या तंत्रज्ञानाचा त्याच्यापुढं निभाव लागला नसता. पण ते येणार हे नक्की झाल्यावर आपल्याला पृथ्वी सोडणं भाग होतं."

करटकला आता सर्व आठवले: हिमयुग येणार हे भाकीत होते, पण ते अगदी जवळ येऊन ठेपल्यावरच पृथ्वी खाली करण्याचा ठराव झाला होता. वसाहतीतल्या सर्वांना गोठवून मोठमोठ्या आकाशयानांतून अंतराळात सोडण्यात आले. सूर्यमालेबाहेर प्लूटोपलीकडे पण सूर्याच्या गुरुत्वाकर्षणात त्यांना घिरट्या घालत ठेवले होते. हे सर्व काम उरकून स्वयंसेवकांनी छोट्याछोट्या यानांतून पृथ्वी सोडली. कारण त्यांना आणखी खास काम होते—सर्वांना सुखरूप पृथ्वीवर आणण्याचे. पण पृथ्वीबाहेर आपण होतो तरी किती वर्षे? त्याने कंप्यूटरला विचारले.

"पन्नास हजार वर्षे!" कंप्यूटर उत्तरला. "आपल्या शास्त्रज्ञांना हिमाच्छादित पृथ्वी परत राहण्याजोगी केव्हा होईल याचा फक्त ढोबळ अंदाज करता येत होता. त्यांनी पन्नास हजार वर्षांनी पृथ्वीचे जवळून अवलोकन करण्यासाठी एका स्वयंसेवकाच्या तुकडीत तुमची निवड केली."

"आणि त्या जंगली जमातीचं काय झालं?" करटकने मध्येच विचारले.

"त्यांचं रक्षण करायला आपल्याला वेळ नव्हता. शिवाय त्या सर्वांना नेण्यास आपल्याकडे पुरेशी यानं नव्हती."

"बरं झालं त्यांची ब्याद मिटली ते. आता सर्व पृथ्वी आपलीच!" दमनक आनंदाने उद्गारला. त्याच्या स्वरात त्या जमातीबद्दलची तुच्छता दिसून येत होती. करटकला मात्र वाईट वाटले. हिमयुगाच्या अनपेक्षित संकटाला त्या बिचाऱ्यांनी कसे तोंड दिले असेल?

"मग हे यान आता पृथ्वीवर उतरवू या." दमनक अधिरतेने पुढे म्हणाला.

"जरा दमाने घे दमनक!" कंप्यूटर संथपणे म्हणाला. "प्रथम तुम्ही दोघे पृथ्वी कशी आहे ते पाहून या. जर अनुकूल परिस्थिती असेल तरच यान उतरवलं जाईल."

"मग आमच्या कामाची रूपरेषा काय आहे?" करटकने विचारले.

कंप्यूटर म्हणाला,

"माझ्या मते प्रथम हे यान चंद्रापर्यंत न्यावं. तेथून मी तुम्हाला पृथ्वीतलावर पाठवीन. त्यासाठी विभक्तीकरणाची पद्धत वापरली जाईल. ह्या पद्धतीप्रमाणं मानवाचं त्याच्या अणुरूपी घटकांमध्ये विभक्तीकरण करून ते सर्व

अणू जवळजवळ प्रकाशाच्या वेगानं इच्छित स्थळी फेकण्यात येतात. तेथे पोचल्यावर त्यांचं पुन्हा पूर्वीप्रमाणं एकीकरण करण्यात येईल. परतीचा प्रवास त्याच पद्धतीनं केला जाईल. ह्या यानांवर उपलब्ध असलेल्या यंत्रांना पृथ्वी ते चंद्र इतकं अंतरच ह्या पद्धतीनं तोडणं शक्य आहे. त्या मर्यादेपलीकडे मानवाला पाठवण्याची आणि त्याला परत आणण्याची शक्ती त्यांच्यात नाही.

तुम्ही प्रदूषित वातावरणापासून रक्षण करणारी वर्दी चढवा. त्यावर तुम्हाला अदृश्य करणारं आवरण टाका. कारण पृथ्वीवरची परिस्थिती कशी आहे, सांगता येत नाही. आत्मसंरक्षणासाठी योग्य शस्त्रं बरोबर घ्या. माझ्याशी संपर्क साधायला स्कॅनर वापरा. शिवाय, माझ्याशी माहितीची देवाणघेवाण करणारी उपकरणं जवळ बाळगा.

पृथ्वीवर गेल्यावर तेथील परिस्थितीचं अवलोकन करा. आपली वसाहत परत होण्यास अनुकूल स्थिती असल्यास इतर स्वयंसेवकांना पाचारण करण्यात येईल. पृथ्वी सोडण्यापूर्वी आपण काही विशिष्ट ठिकाणी पुरून ठेवलेली उपकरणं वर काढावी लागतील. ती शोधून काढण्याची आणि जरूर पडल्यास त्यांची दुरुस्ती करण्याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. पण प्रथम तुम्ही पृथ्वीचा दौरा करून परत या. मग हे सर्व करण्यात येईल."

कंप्यूटरने त्यांना तयार होण्याचा आदेश दिला.

त्यांची तयारी चालू असताना यान मंगळ सोडून चंद्राकडे निघाले. लवकरच पृथ्वी आणि चंद्र दिसू लागले. बाहेरून येत असल्याने त्यांना दिसणारा पृथ्वीचा पृष्ठभाग सूर्यापासून उलटीकडे—अंधारात—होता.

करटक आणि दमनक, विभक्ती करणाऱ्या स्थानकावर विराजमान झाले. करटकाने सहज पृथ्वीतलाकडे नजर टाकली आणि तो आश्चर्याने उद्‌गारला,

"दमनक, इकडे बघ! पृथ्वीवर दिवे दिसत आहेत."

"कंप्यूटर! मी करटक बोलतोय. आम्ही दोघं सुखरूप पृथ्वीवर पोचलो."

"बोल करटक! पृथ्वीवर परत गेल्यावर तुझं प्रथमदर्शनीचं मत काय आहे?"

"तू आम्हाला पाठवलंस ते ठिकाण अत्यंत गर्दीचं आहे. सगळीकडे माणसंच माणसं आहेत. अनेक मोठाले रस्ते येथे मिळत असून, त्यांवर

गाड्यांची गर्दी आहे. रस्त्यांवर, इमारतींवर सगळीकडे भरपूर रोषणाई केलेली आहे. पण गाड्यांचे आवाज, त्यातून निघणारे गॅसेस, रोषणाईची पद्धत हे सर्व ह्या लोकांच्या अप्रगत स्थितीची जाणीव करून देत आहेत. मला वाटतं, प्रगतीच्या मार्गावर हे आपल्या काही शतकं मागं आहेत."

"आणि दमनक, तुला काय म्हणायचंय?"

"माझं पण तेच मत आहे. आपल्यापेक्षा हे लोक फारच मागासलेले दिसतात. रस्त्यांवर इतकी गर्दी करायचं कारण काय? आणि मोठमोठाली चित्रं, बदलणारी अक्षरं, रस्त्यावरून चालता-चालता काहीतरी खात जाणं हे सर्व मला पोरकटपणाचं वाटतं. शिवाय यांची भाषा काय आहे ते कळत नाही. ती माहीत असती तर बरं झालं असतं."

"मला त्या भागाचं सर्व दृश्य पाठव."

दमनकने आपल्या पोशाखाला जोडलेला स्कॅनर सर्व दिशांकडे फिरवून त्या गजबजलेल्या चौकाचे अनेक ठिकाणांहून कंप्यूटरला 'दर्शन' घडवले. स्कॅनर-मधून त्या दृश्यांचे लहरींत रूपांतर होऊन त्या लहरी कंप्यूटरच्या मेंदूत सर्व माहिती पोचवत होत्या.

दोन मिनिटांनी कंप्यूटरकडून प्रतिसाद आला, "एका भागात अक्षरांनी भरलेले अनेक पृष्ठभाग लावले आहेत. मला त्यांचं जवळून दर्शन घडव."

दमनकने एका बुकस्टॉलकडे मोर्चा वळवला. तेथील अनेक वाचनीय वस्तूंची स्कॅनरच्या मदतीने त्याने कंप्यूटरकडे माहिती पाठवली. एखाद्या पुस्तकाची पाने स्कॅनरपुढे भराभर चाळली तर त्यातली सर्व माहिती कंप्यूटरच्या 'डोक्यात' साठवली जाई. अशा शंभर एक पुस्तकांचे आकलन केल्यावर कंप्यूटर उद्गारला,

"मला ह्या लोकांच्या भाषेचं आकलन झालेलं आहे. आणि ती भाषा मी तुमच्या मेंदूत लवकरच भरेन. पण प्रथम मी तुम्हाला, आत्तापर्यंत मला कळलेल्या माहितीतला थोडा भाग सांगतो."

करटक आणि दमनक लक्ष देऊन ऐकू लागले.

"पृथ्वीवर मानवी वस्ती असून ते मानव निरनिराळ्या देशांत राहतात. देश हा प्रकार कालांतराने मानवांचे वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या समूहांत विभाजन झाल्यामुळे अस्तित्वात आला. एका देशातले लोक स्वतः तयार

केलेल्या नियमांप्रमाणे राहतात आणि हे नियम कसे करायचे आणि ते आचरणात कसे आणायचे ह्याबाबत स्वातंत्र्य असावं अशी दक्षता बाळगतात. देशादेशांत मित्रत्वाचे किंवा शत्रुत्वाचे व्यवहार असतात. जरी स्वार्थ हा त्यामागचा हेतू असला तरी बरेच वेळा हे व्यवहार तर्कशास्त्राला सोडून असतात. कितीतरी वेळा काही तर्कविसंगत कारणासाठी दोन देश भांडण उकरून स्वतःचंच नुकसान करून घेतात. कारण स्वसंरक्षणासाठी पुष्कळ शस्त्रास्त्रांचे साठे सर्व देशांकडे त्यांच्या ऐपतीप्रमाणे आहेत. एखाद्या लढाईत प्राणहानी आणि इतर विध्वंस ह्या अस्त्रांमुळं भरपूर होतो."

"काही शतकांपूर्वी आपले पूर्वज अशाच परिस्थितीतून गेले होते. पण हे लोक आले कुठून?" करटकने पृच्छा केली.

"आपण पृथ्वी सोडल्यावर आपले जंगली बांधव, जे काही हिमयुगातून वाचले, त्यांनी वंशवृद्धी केली असावी आणि ते प्रगतीच्या टप्प्यांतून जात असताना आपल्याला दिसत आहेत असा माझा अंदाज आहे." कंप्यूटर म्हणाला.

"आपल्या परिस्थितीला येण्यासाठी ह्यांना किती वर्षे लागतील?" करटकने विचारले.

"ते भाकीत मला सध्याच्या माहितीवरून निश्चितपणं करता येणार नाही. स्वतःच्या अस्त्रांनी स्वतःचाच नाश ह्यांनी करून घेतला नाही, तसंच तंत्रज्ञानाचा सुज्ञपणं वापर केला आणि आपली जनसंख्या मर्यादित ठेवली तरीसुद्धा ह्यांना आपल्याइतकी प्रगती करायला कमीत कमी दोन शतकं लागतील. परंतु प्रत्यक्षात हे लोक इतकी काळजी घेतीलच असं नाही. आता तुम्ही आहात तो देश सर्वांत प्रगत समजला जातो. त्याचं नाव अमेरिका. इथली भाषा 'इंग्लिश' म्हणून आहे आणि ती पृथ्वीवर बऱ्याच ठिकाणी बोलली जाते. हा गजबजलेला भाग 'टाइम्स स्क्वेअर' म्हणून ओळखला जातो. सर्व पृथ्वीवर आपण सर्वांत सुधारलेले, आपलं राहणीमान सर्वांत उत्तम, आपल्या देशात समृद्धी सर्वांत जास्त, असा ह्या देशातल्या लोकांना अभिमान आहे. अप्रगत, मागासलेले, पोरकट वगैरे तुमची विशेषणं ऐकून ह्या लोकांना मोठा धक्काच बसेल."

"मग आता आम्ही काय करावं अशी तुझी सूचना आहे?" दमनकने विचारले.

"प्रथम मी तुम्हाला ह्यांची भाषा शिकवतो. मग तुम्ही ठिकठिकाणी जाऊन पृथ्वीवरच्या मनुष्यवस्तीबद्दल शक्य तितकी माहिती गोळा करा. त्यावरून मग पुढे काय करायचं ते ठरवण्यात येईल. पृथ्वीवर मनुष्यवस्ती असेल ही परिस्थिती अनपेक्षित होती. आपल्या तज्ज्ञांनी भाकीत केलं होतं, की आपण पृथ्वी सोडल्यावर लवकरच हिमयुग सुरू होऊन पृथ्वी निर्मनुष्य होईल. तशा परिस्थितीत आपल्याला पृथ्वी सापडेल ही अपेक्षा काही खरी झाली नाही. आता इंग्लिश शिकायला तयार व्हा !" कंप्यूटरने सूचना केली.

करटक आणि दमनक यांनी इलेक्ट्रोडसारखी दिसणारी उपकरणे आपल्या डोक्यास लावली. टाईम्स स्क्वेअरजवळ ४१ व्या आणि ४२ व्या रस्त्यांना जोडणारी एक अंधारी गल्ली त्यांनी निवडली. काही समाजकंटक सोडल्यास सामान्य माणसांची येथे वर्दळ नव्हती. 'मगिंग'साठी हा भाग कुप्रसिद्ध होता. करटक आणि दमनक एका निर्मनुष्य भागात भिंतीला टेकून बसले. अर्थात ते पृथ्वीवरच्या मानवांना दिसत नव्हते.

अर्धा तास ते तंद्रीत होते. शुद्धीवर आल्यावर त्यांनी इलेक्ट्रोड काढले आणि एकमेकांकडे पाहिले.

"गुड ईव्हिनिंग करटक ! हाऊ आर यू ?" दमनकने विचारले. करटक हसून उत्तरला. "गुड ईव्हिनिंग ! आय ॲम फाइन, थँक यू !"

दोघांचे इंग्रजी किंचित यांत्रिक असले तरी शास्त्रशुद्ध होते. इंग्रजीच्या प्रोफेसरलादेखील त्यांच्या बोलण्यात उणीव वाटली नसती. त्यांनी कंप्यूटरशी परत संपर्क साधला.

"आम्ही आता कुठं जावं ते सांग." त्यांनी इंग्रजीत विचारले. कंप्यूटरने पण इंग्रजीत उत्तर दिले, "तुम्ही अमेरिकेत आहात म्हणून तिथली काही ठिकाणं सांगतो. तिथं जाऊन मला माहिती पाठवा. तिचं विश्लेषण करण्याचं काम माझं. तुम्ही प्रथम वॉशिंग्टन नावाच्या गावी जा. ते ह्या देशातलं प्रमुख शहर आहे. तिथे देशातली सर्व सत्ता केंद्रित झालेली आहे. करटक, तू लायब्ररी ऑफ कॉंग्रेसकडे जा. तिथं तुला पुस्तकांचा मोठा साठा सापडेल. स्कॅनरने मला त्यांची माहिती पाठव. दमनक, तू पेंटेगन आणि सी० आय० ए० ह्या संस्थांकडे जा. ह्या देशानं आणि इतर देशांनी सुरक्षेकरता केलेल्या तयारीची गोळा केलेली बरीच माहिती तुला सापडेल. अदृश्यतेच्या आवरणा-

खाली कुठंही शिरकाव करून घ्यायला तुम्हा दोघांना अवघड जाणार नाही. ही कामं झाल्यावर तुम्हाला दुसरीकडे पाठवीन."

कंप्यूटरचा निरोप घेऊन दोघेजण आपापल्या मार्गाला लागले.

वीक-एंडला ब्रिटन, आठवड्याभरात युरोप आणि महिन्याभरात जगाचा प्रवास करणाऱ्या अमेरिकन टूरिस्टांना लाजवील अशा वेगाने करटक आणि दमनक यांनी पृथ्वीवर अनेक ठिकाणी भराऱ्या मारल्या. मानवी व्यवहारांचे सूक्ष्म अवलोकन केले. काही निवडक व्यक्तींची दिनचर्या जवळून पाहिली. आफ्रिकेतल्या जंगलापासून कॅलिफोर्नियातल्या तथाकथित अतिप्रगत वसाहतीपर्यंत पृथ्वीचे वेगवेगळे पैलू पाहिले. आणि मग हा दौरा आटपून ते चंद्राजवळील आपल्या अंतराळयानात परत आले.

"तुमचं स्वागत असो! आणि आपलं काम चोखपणं बजावल्याबद्दल अभिनंदन!" कंप्यूटर म्हणाला. "तुम्ही पाठवलेल्या सर्व माहितीचं मी विश्लेषण केलं आहे. बरीचशी माहिती निरुपयोगी किंवा त्याच त्याच स्वरूपाची असल्यानं मी सध्या आवश्यक असलेल्या माहितीचा सारांश तयार केला आहे. मी प्रथम तो तुमच्या डोक्यात भरतो. तो विचारात घेऊन आणि तुम्ही प्रत्यक्ष काय पाहिलं त्यावरून मला तुमची मतं हवीत. प्रत्येकानं दिवसभर एकांतात विचार करून स्वतःचं मत बनवून त्यांची नोंद करावी. परस्परांशी विचारविनिमय करू नका. तुमची नोंद केलेली मतं ऐकल्यावर मग आपण चर्चा करू."

ठरल्याप्रमाणे एक दिवसानंतर दोघेजण कंप्यूटरसमोर येऊन बसले.

"दमनक, प्रथम तुझं मत ऐकव." कंप्यूटरने आज्ञा केली. दमनकने भिंतीवरचे एक बटन दाबताच त्याचा आवाज ऐकू येऊ लागला.

"आपण पृथ्वी सोडली तेव्हा सध्याच्या पृथ्वीवरच्या मानवांचे पूर्वज संख्येनं थोडे होते आणि जंगलात राहत होते. ते आपल्या वाटेला जात नव्हते आणि आपण त्यांच्याशी संबंध ठेवत नव्हतो. नाही म्हणायला, आपल्या पूर्वजांनी त्यांना सुधारणेची दिशा दाखवण्याचे प्रयत्न केले होते. पण त्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून आपण आपला वेगळेपणा कायम ठेवला.

परंतु आता परिस्थिती निराळी आहे. आपल्या अनुपस्थितीत हिमयुगातून पार पडलेल्या त्यांच्या जंगली जमातीची वंशवृद्धी झाली आहे आणि आता तर त्यांनी जवळजवळ सर्व पृथ्वी व्यापून टाकली आहे. शिवाय, अजून ते आपल्याइतके प्रगत झालेले नसले तरी पूर्वीप्रमाणं जंगली नक्कीच नाहीत. त्यामुळं आपण आता पृथ्वीवर परत आलो की, त्यांच्यामुळं आपल्यापुढं अनेक समस्या निर्माण होणार आहेत.

एक म्हणजे आपल्याला त्यांच्यापासून दूर आणि अलिप्त असं राहता येणार नाही आणि त्यांच्याशी संपर्क आला तर काय होईल? ते किती जरी सुधारले असले तरी अजून आपलं ज्ञान आत्मसात करायची त्यांची पात्रता नाही. आपले व्यवहार त्यांना वेगळे वाटणार, आपली समृद्धी त्यांच्या डोळ्यांत खुपणार. शिवाय, आपण त्यांच्यासारखेच मानव असल्यामुळं हा त्यांच्यातला आणि आपल्यातला फरक त्यांना जास्तच जाणवणार आणि खटकणार.

दुसरी समस्या ह्या लोकांनीच निर्माण केली आहे. त्यांचे पूर्वज जंगली होते तरी निरुपद्रवी होते. पण प्रगतीच्या नावाखाली त्यांच्या ह्या मूर्ख वंशजांनी कितीतरी धोके निर्माण केले आहेत. अणुशक्तीचे साधन सापडल्यापासून हे लोक स्वतःचा आणि पृथ्वीचा केव्हा नाश करतील, आणि तेही क्षुल्लक बाबी-वरून, हे सांगता येत नाही. त्याचप्रमाणं एके काळी शुद्ध असलेल्या निसर्गाचं ह्यांनी केवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रदूषण चालवलं आहे!

म्हणून, आपल्याला जर पृथ्वीवर परत जायचं असेल तर प्रथम तिथं असलेली मानवजात नाहीशी केली पाहिजे. आपल्याला उपलब्ध असलेल्या शस्त्रसामग्रीला ते सहज शक्य आहे. एका दिवसात आपण पृथ्वी निर्मनुष्य करू शकू. तसं केल्याशिवाय आपला तरणोपाय नाही हेच माझं मत आहे."

दमनकच्या बोलण्याची रेकॉर्ड संपल्यावर निर्माण झालेली शांतता भंग करत कंप्यूटर म्हणाला, "मी तुझ्या मताची दखल घेतली आहे आणि आपण त्यावर चर्चा करू. पण आता करटकचं मत ऐकू या."

लवकरच करटकचा सौम्य आवाज ऐकू येऊ लागला.

"पृथ्वीवरची मनुष्यवस्ती पाहून माझ्या मनात प्रथम एक विचार येतो. आपण हिमयुगाच्या भीतीनं पृथ्वी सोडली. आत्मरक्षणाकरता आपापल्या परीनं प्रत्येक जण प्रयत्न करतो आणि ह्या नैसर्गिक नियमाप्रमाणंच आपण

वागलो—त्यात वावगं काही नव्हतं. पण आपण स्वतःला अतिप्रगत म्हणवून-सुद्धा शेवटी नैसर्गिक आपत्तीपुढं पळच काढला! आणि तेसुद्धा आपल्या जंगली बांधवांची पर्वा न करता. ह्यात मला आपल्या वागण्यातला भ्याडपणा आणि स्वार्थ दिसतो.

हिमयुगात आपले जंगली बांधव बहुसंख्येनं खलास झाले असणार. पण जे जगले त्यांनी, कुठल्या का प्रकारानं होईना, पण निसर्गाशी झुंज दिली आणि हयात राहून त्यावर विजय मिळवला. ही झुंज देताना त्यांनी प्रगतीच्या पायऱ्या चढायला सुरुवात केली आणि आज त्यांच्या वंशजांनी स्वतःच्या हिंमतीवर इतकी प्रगती केली आहे. ही शिकवण त्यांना आपल्याकडून मिळाली नाही. आपण देऊनही त्यांच्या पूर्वजांनी कधी घेतली नाही. अशा परिस्थितीत त्यांना पृथ्वीवर राहण्याचा आणि तिच्या नैसर्गिक देणग्यांचा उपभोग घेण्याचा आपल्याइतकाच, किंबहुना जास्तच, अधिकार आहे. आपल्याला अन्यत्र जाण्याचं ठिकाण माहीत असतं तर आपण पृथ्वीवर परत जाऊ नये असं मी म्हटलं असतं. पण आपल्यालादेखील पृथ्वीवरच आसरा घेणं भाग आहे. आपल्या संस्कृतीला लागणारी साधनसामग्री तिथंच आहे.

पण आपण आताच परतलो तर आपलं तिथं स्वागत होणार नाही. आपल्याकडे भीती, संशय, हेवा आणि द्वेष ह्या चार दृष्टींनी पाहिलं जाईल. ह्या लोकांचा संहार करून पृथ्वीवर ताबा मिळवणं आपल्याला सहज शक्य आहे. पण मी आत्ताच सांगितलेल्या कारणांमुळंच मला तसा सल्ला देववत नाही. आपलं जीवन कितीही यांत्रिक असलं तरी अजून आपण यंत्रासारखे भावनाशून्य झालेलो नाही.

म्हणून मी असा तोडगा सुचवतो. आपण आपलं परत येणं थोडं लांबणी-वर टाकू या. दर शंभर वर्षांनी आपण पृथ्वीचं दर्शन घेण्यासाठी आतासारखीच स्वयंसेवकांची जोडी पाठवू. माझी खात्री आहे, की आणखी काही शतकांनी इथली मानवजात आपल्याइतकीच प्रगत होईल. अशा वेळी त्यांच्यातले आणि आपल्यातले फरक नाहीसे होऊन आपलं पुनरागमन सुखाचं होईल!"

करटकचे बोलणे संपल्यावर कंप्यूटर म्हणाला, "तुम्ही सुचवलेले उपाय तुम्हा दोघांच्या स्वभावांना अनुरूप आहेत. आता आपण त्यावर चर्चा करू. दमनक, तुला काय म्हणायचं आहे?"

दमनक म्हणाला, "करटकच्या विधानांना आणि त्यानं सुचवलेल्या तोडग्याला माझे काही आक्षेप आहेत. ते मी क्रमाक्रमानं सांगतो. पहिला आक्षेप असा. करटकनं स्वतःच कबूल केल्याप्रमाणं आत्मरक्षणाची प्रवृत्ती ही नैसर्गिक आहे. त्यामुळं आपण पृथ्वी सोडून आलो त्यात भ्याडपणा नाही. उलट, शौर्याच्या वेडगळ कल्पना डोक्यात ठेवून आपण पृथ्वीवर राहिलो असतो तर बहुतेक कोणीच वाचलो नसतो. माझ्या उपायाचा अवलंब करण्यात दुष्टपणाचा भाग नव्हे. 'जो सर्व तऱ्हेनं योग्य असतो, तोच वाचतो' हा पण निसर्गाचाच नियम नाही का?

"मान्य आहे." करटक म्हणाला, "पण जर आपल्यापैकी थोडेजण मागं राहिले असते आणि त्यांनी आपल्या तंत्रज्ञानाच्या जोरावर हिमयुगाशी मुकाबला केला असता तर ती एक गौरवाची गोष्ट झाली असती. मी स्वतः मागं राहायची तयारी दर्शविली होती, पण मला कोणाचाच पाठिंबा लाभला नाही. सर्वांचा दृष्टिकोन तुझ्यासारखाच होता. आता परत जाण्याबाबत मला एवढंच म्हणायचं आहे, की आपल्या संस्कृतीत उगीच जीवहत्या केली जात नाही. जे काम जीवहत्येशिवाय होऊ शकतं तिथं थोडे जास्त कष्ट पडले तरी चालतील, पण तो पर्यायी मार्ग अवलंबायचा, हे आपलं नेहमीचं धोरण आहे. त्यालाच अनुसरून मी हा तोडगा सुचवला आहे."

"पण दर शंभर वर्षांनी पृथ्वीचं निरीक्षण करायचं ह्यात उगीच वेळ जाईल. आपल्याला पाहिजे तशी परिस्थिती पृथ्वीवर यायला कित्येक शतकं लागतील! आणि समजा, पृथ्वीवरच्या लोकांनी स्वतःच्याच अस्त्रांनी सगळा संहार केला तर?" दमनक.

"जिथं आपण पन्नास हजार वर्षे थांबलो तिथं काही शतकं आणखी थांबायला काय हरकत आहे? आणि जर पृथ्वीवरच्या मानवांनी स्वतःचाच संहार केला तर तुझं उद्दिष्ट आपोआप साध्य होईल. जरी त्यांनी पृथ्वीची नासधूस केली तरी तिला पुन्हा राहण्याजोगी करण्याचं सामर्थ्य आपल्या तंत्रशास्त्रात आहे." करटक उत्तरला.

"तू नेहमीच आशावादी असतोस!" हसून दमनक म्हणाला. "आणि हे तरी तू कशावरून म्हणतोस की पृथ्वीवरचा मानव आपल्याइतका प्रगत झाला तर आपलं स्वागत करील?"

“कारण त्या परिस्थितीला पोचल्यावर त्याच्यामध्ये एक तऱ्हेचा आत्मविश्वास निर्माण होईल. त्याचा दृष्टिकोन आपल्यासारखा व्यापक आणि परिपक्व झालेला असेल. आपण त्याचेच बांधव असून मित्रबुद्धीनं आलो आहोत हे त्याला पटवणं सहज शक्य होईल.”

त्यांची चर्चा बराच वेळ चालू होती. शेवटी कंप्यूटर समारोप करताना म्हणाला, “मी तुमच्या मतांची आणि मतभेदांची नोंद घेतली आहे. निर्णय घेण्याचं काम माझं नव्हे. मी सर्व माहिती आपल्या प्रमुख कंप्यूटरकडे पाठवणार. तो दूरवरच्या एका आकाशयानात आहे. त्याच्या निर्णयाप्रमाणं आपल्याला वागावं लागेल. हा निर्णय यायला सात दिवस लागतील.”

ते सात दिवस करटक आणि दमनक यांना सात वर्षांप्रमाणे वाटले. त्यांचे अंतराळयानातले नेहमीचे व्यवहार चालू होते तरी प्रमुख कंप्यूटरच्या निर्णयाकडे त्यांचे डोळे लागले होते. करटक बराच विचारमग्न होता. दमनकने दोनतीन वेळा पृच्छा केली पण त्यानं “विशेष काही नाही” म्हणून वेळ मारून नेली.

अखेर त्यांना कंप्यूटरकडून बोलावणे आले. मुख्य कंप्यूटरचा निर्णय आला होता. करटक आणि दमनक अधीरतेने ऐकू लागले. कंप्यूटर म्हणाला, “करटकचं मत मान्य केलं गेलं आहे. दर शंभर वर्षांनी वेगळी स्वयंसेवकाची तुकडी पाठवली जाईल. तिचं काम झालं, की ती पहिल्याप्रमाणं गोठवण्यात येईल. योग्य वेळ येईपर्यंत पृथ्वीवर परतण्याचा निर्णय घेण्यात येणार नाही.”

“अभिनंदन! करटक, तुझ्या मताप्रमाणं झालं. चल, आता गोठवून घ्यायला.” दमनक म्हणाला.

पण करटक जागचा हालला नाही.

“थांबा.” कंप्यूटरकडून आवाज आला. “मुख्य कंप्यूटरनं तुमच्या कामगिरीबद्दल प्रसन्नता व्यक्त केली आहे आणि तुमची एक एक इच्छा माझ्या मर्जीप्रमाणं पूर्ण करायची सूचना दिली आहे. दमनक, तुझी काय इच्छा आहे?”

“सध्या मला काही नको. पण पृथ्वीवर परतल्यावर मी ह्या वराचा वापर केला तर चालेल का?” दमनकनं विचारले.

“चालेल! मी तशी नोंद करतो. करटक, तुला काय पाहिजे?”

"माझी एक विनंती आहे." कंप्यूटरला उद्देशून करटक म्हणाला. "मला आत्ताच पृथ्वीवर पाठव."

"अरे वेड्या, तूच इतका वेळ दमानं घ्यायची भाषा बोलत होतास!" कंप्यूटरकडून उत्तर येण्यापूर्वीच दमनक आश्चर्यानं ओरडला.

कंप्यूटरनं मात्र सावकाश विचार करून म्हटले, "होय, दमनक म्हणतोय ते बरोबर आहे. तुझ्याकडून खुलासा पाहिजे."

"मी आत्ता केलेली विनंती फक्त माझ्या स्वतःकरता होती. आपल्या सर्व बांधवांनी मी पूर्वी सांगितल्याप्रमाणंच काही शतकांनी यावं. मी आताच जाण्याची इच्छा दर्शवली, कारण मला पृथ्वीवरच्या सध्याच्या मानववस्तीत जाऊन राहायचं आहे."

"पण ती तर आपल्यापेक्षा कितीतरी मागासलेली आहे." दमनक म्हणाला.

"कबूल. वैज्ञानिक पातळीवर पाहिलं तर आपण त्यांच्या कितीतरी पुढं आहोत, त्यांच्यासमोर असणाऱ्या अनेक समस्या आपण सोडवल्या आहेत, त्यांना भेडसावणारी संकटं आपण आपल्या आयुष्यातून केव्हाच हाकलली‌त, हे सर्व मला मान्य आहे. तरीसुद्धा मला त्यांच्या जीवनपद्धतीबद्दल आकर्षण का वाटावं?"

"कारण तुझी विचार करण्याची शक्ती संपुष्टात आली असावी." दमनक उद्गारला.

"नाही." कंप्यूटर त्याला थांबवून म्हणाला, "मला खात्री आहे, काहीतरी विशेष कारण तुझ्या ह्या विनंतीमागं आहे."

"होय, पण ते तुम्हाला पटेल की नाही याची मला शंका आहे. तरी मी प्रयत्न करून पाहतो." करटक म्हणाला. "प्रथम एक उदाहरण देतो. विश्वातील निर्जीव वस्तूंच्या व्यवहाराबाबत एक नियम दिसून येतो. त्या वस्तूंच्या एकमेकांशी होणाऱ्या प्रक्रिया, त्यांच्या रचनेत होणारे फरक हे एका ठराविक दिशेनं घडत असतात. प्रथम प्रथम त्यात विविधता असते, रचनेची वेगवेगळी रूपं असतात—पण ती हळूहळू कमी होत जातात आणि शेवटी समतोलतेच्या एका परमोच्च बिंदूच्या जवळ त्या वस्तू येऊन ठेपतात. अशा परिस्थितीत त्यांचे व्यवहार थंडावतात, त्यांच्यात घडणारे बदल बंद होतात, त्यातलं नावीन्य नाहीसं होतं—"

"पृथ्वीवरचा मानव त्याला 'थर्मोडायनॅमिक इक्विलिब्रियम' म्हणतो, अजून ह्या विषयाचं त्याचं ज्ञान फारच तोकडं आहे." दमनक म्हणाला. "ते लोक ह्या शेवटच्या परिस्थितीला 'हीट डेथ' असं पण म्हणतात."

"बरोबर! 'हीट डेथ'मधल्या 'डेथ' म्हणजे मृत्यू ह्या शब्दात मी जे सांगणार आहे त्याचं सार भरलं आहे." करटक पुढे म्हणाला, "मी आपल्या इतिहासाचं आणि पृथ्वीवरच्या मानवांच्या इतिहासाचं जे अध्ययन केलं त्यावरून मला असं दिसतं, की मानवी जीवनपद्धतीसुद्धा अशाच एका मार्गानं जात आहे. अप्रगत असताना मानव निसर्गाच्या जवळ असतो. प्रगतीच्या टप्प्यांवर जाताना तो निसर्गापासून दूर जातो. त्याच्या जीवनातली विविधता जाऊन तेथे यांत्रिकता येऊ लागते.

सध्या पृथ्वीवर वापरण्यात येत असलेल्या कालमानाप्रमाणं तिथं विसावं शतक चालू आहे. गेल्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची वेगानं प्रगती झाली व पृथ्वीच्या वेगवेगळ्या भागांत सहज संपर्क स्थापन होऊ लागला आहे. वेगवेगळ्या ठिकाणच्या मानवांना एकमेकांच्या परिस्थितीतले फरक दिसून येत आहेत. सधन-निर्धन, शिक्षित-अशिक्षित असे भेदभाव आहेत आणि त्यांच्या जाणिवेमुळं संघर्ष निर्माण होत आहेत. पण शेवटी त्यांचं पर्यवसान सर्वत्र समानता स्थापन होण्यात होणार ह्यात शंका नाही.

आपण ह्याच मार्गानं गेलो. विज्ञानाच्या साहाय्यानं आपण ही समानता स्थापित केली. अनेक सुखसोयी आणल्या. रोगराई दूर केली. आयुर्मर्यादा वाढवली. पण ह्या सर्व उत्तम वाटणाऱ्या गोष्टी करताना आपण एक महत्त्वाची ठेव गमावून बसलो. ती म्हणजे आपला निसर्गाशी असलेला संबंध. तो तोडून आपण यंत्रांच्या सर्वस्वी आहारी गेलो. आणि यंत्रांच्या बरोबर यांत्रिक जीवन आलं. पूर्वीसारखी विविधता गेली. तोचतोचपणा आला. निर्जीव वस्तूंप्रमाणं आपणसुद्धा समतोलतेच्या परमोच्च बिंदूकडे झपाट्यानं चाललो आहो. 'हीट डेथ'सारख्या परिस्थितीपासून लांब नाही."

"आणि ह्याची जाणीव तुला केव्हा झाली?" कंप्यूटरने विचारले.

"ही जाणीव मला पूर्वीच—लहानपणापासूनच—होती. जीवनातला तोचतोचपणा मला सारखा जाणवायचा. पण मला ह्याची प्रकर्षानं जाणीव झाली ती परत पृथ्वीवर गेल्यावर. पृथ्वीवरचा सध्याचा रहिवासी मानव हा

अजून प्रगतीच्या परमोच्च बिंदूपासून पुष्कळ लांब आहे. एखाद्या तळयात दगड टाकला की त्यात लहरी निर्माण होतात. हळूहळू त्यांचे अस्तित्व कमी होत शेवटी पाण्याचा पृष्ठभाग स्थिर होतो. हा झाला प्रगतीचा परमोच्च बिंदू! ह्या बिंदूजवळ पोचलेले आपण अतिशय मंदावलेल्या लहरीप्रमाणं जीवन जगत आहोत. सध्याच्या पृथ्वीवरच्या मानवी जीवनात अधिक उच्चनीच लहरी आहेत." करटक म्हणाला.

"तू कवीसारखा बोलतोस!" दमनक हसून म्हणाला, "ह्या लहरींचा उच्च-नीचपणाच दूर करायला सध्याचा मानव झटतो आहे!"

"माझ्या गेल्या सफरीतला एक अनुभव सांगतो." करटक पुढे म्हणाला, "मी काही देशांत गेलो. तिथे दिवसा सतत ऊन पडतं. पावसाचे काही दिवस वगळल्यास उन्हानं भाजून निघालेला मानव आतुरतेनं पावसाची वाट पाहत होता. त्याउलट, दुसऱ्या काही देशांत नेहमी अभ्राच्छादित आकाश असतं. अशा ठिकाणी कधी कधी सूर्य डोकावला की त्याचं केवढं स्वागत झालेलं मी पाहिलं! दुःखांचे, कष्टांचे अनुभव घेतल्याशिवाय सुखाचं, आरामाचं महत्त्व कळत नाही. आपल्या शास्त्रज्ञांनी यंत्रांच्या मदतीनं ऊन आणि पाऊस यांच्यावर नियंत्रण केलं. ठराविक वेळी ऊन, ठराविक वेळी पाऊस—तेही योग्य प्रमाणात—आपल्या वसाहतीत पडत असे. पण ह्या यांत्रिक नियंत्रणामुळं आपण कधी ह्या नैसर्गिक देणग्यांकडे कौतुकानं पाहिलंच नाही.

मला पृथ्वीवर जाऊन जीवनाच्या विविधतेचा अनुभव घ्यायचा आहे. मला कित्येकदा वाटे, की आपला जन्म पाचसहा शतकं आधी झाला असता तर किती बरं झालं असतं. आता अनायासं मला ती संधी प्राप्त झाली आहे. तिचा फायदा करून घ्यायची मला परवानगी द्यावी."

करटकचे बोलणे संपल्यावर किंचित काळ स्तब्धता होती. तिचा भंग करत कंप्यूटर म्हणाला, "तुम्हा दोघांची जबाबदारी माझ्यावर आहे. तुला पृथ्वीवर परत जाऊ देण्यास माझी हरकत नाही, पण काही परिणामांची तुला जाणीव करून देणं हे माझं कर्तव्य आहे.

प्रथम म्हणजे तुला पृथ्वीवर अतिप्रगत मानव म्हणून राहता येणार नाही. तुझं ज्ञानभांडार व विचारक्षमता पृथ्वीवरच्या मानवांपेक्षा फार उच्च दर्जाची आहेत. ती मला कमी करावी लागतील, नाहीतर ते लोक तुला वेड्यात

काढतील. त्यांच्यात शोभशील असा एक हुषार शास्त्रज्ञ म्हणून मी तुला पृथ्वीवर पाठवीन. पण ह्यासाठी तुला आपल्या मेंदूतल्या बऱ्याच ज्ञानसामग्रीवर पाणी सोडावं लागेल. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिथल्या रोगराईला तोंड देण्याइतकं तुझं शरीर बळकट नाही. ते मी औषधांनी तसं करून देईन. पण तुझं आयुष्य मर्यादित होणार. मी तुला तिशीतला तरुण म्हणून पाठवीन. मात्र लक्षात ठेव, त्यानंतर शंभर वर्षे आमच्यापैकी कोणी तिकडे फिरकणार नाही आणि शंभर वर्षांनंतर तू काही हयात असणार नाहीस. तेव्हा तुला मतपरिवर्तन करायचा मौका मिळणार नाही."

"मी ह्या सर्व गोष्टींचा आधीच विचार केला आहे. माझं मत निश्चित झालं आहे. माझ्यावर करायचे औषधांचे प्रयोग ताबडतोब करावेत." करटक म्हणाला. "दमनक, तूच एक माझा मित्र आणि तुझा वियोग होणार हाच एक विचार मला टोचतोय. पण माझा निश्चय कायम आहे."

मेडिकल रूमवरचा लाल दिवा उघडझाप करू लागला. आपल्याला शारीरिक आणि मेंदूवरील उपचार करून घ्यायला तिकडे जायची सूचना आहे, हे करटकने ओळखले. त्याने हात पुढे केला.

"गुड बाय दमनक! सुखाने राहा."

दमनकने कष्टाने हस्तांदोलन केले. करटक लगेच वळून झपाझप पावले टाकत मेडिकल रूममध्ये गेला. त्याची पाठमोरी आकृती दारामागे गेली. दार बंद झाले. कितीतरी वेळ दमनक तिकडे बघत उभा होता.

७ / दृष्टीआड सृष्टी

"छोटू! तुला किती वेळा बजावलं की त्या बाजूला जायचं नाही म्हणून?"

"पण बाबा का जातात रोज तिकडे?"

"अरे, बाबांचं तिकडे काम असतं म्हणून जातात."

हा संवाद छोटू आणि छोटूच्या आई यांच्यात जवळजवळ रोज होत असे. 'तिकडे' म्हणजे एका भुयारवजा मार्गाकडे. छोटूचे बाबा रोज त्या मार्गाने कामाला जात—आणि त्या मार्गाने परत येत. पण हा मार्ग सामान्य माणसांना निषिद्ध होता. काही निवडक लोक सोडल्यास इतरांना 'तिकडे' जाण्याची बंदी होती. छोटूचे बाबा त्या निवडक लोकांत होते...

पण आज जरा वेगळा प्रकार होता. आज छोटूचे बाबा सुट्टी असल्याने घरीच आराम करत होते. आईचे लक्ष नाही असे पाहून छोटूने त्यांचा 'सिक्युरिटी पास' खिशातून पळवला आणि त्या भुयारी मार्गाची वाट धरली.

तसे म्हटले तर त्यांची सर्वच वसाहत जमिनीखाली होती. पण हा भुयारी मार्ग म्हणजे बोगद्याप्रमाणे होता. आत दिवे होते आणि लगेचच एक बंद दार पुढचा मार्ग रोखून उभे होते. छोटूने आपल्या वडिलांना इकडून आत जाताना पाहिले होते. त्याने खिशातले कार्ड योग्य खाचेत घातले. दार उघडले गेले, तो पलिकडे गेल्यावर दुसऱ्या खाचेतून ते कार्ड बाहेर आले, आणि दार बंद झाले. छोटूने कार्ड घेतले आणि सर्वत्र नजर फिरवली. भुयारी मार्ग हळूहळू वर जात होता...त्याला जमिनीवर जाण्याची संधी मिळणार होती.

पण नाही! आज तो योग नव्हता. त्या मार्गावर असलेल्या वेगवेगळ्या निरीक्षकयंत्रांची त्याला कल्पना नव्हती. पहिल्याच यंत्राने संशयात्मक परि-

स्थितीची नोंद केली. इतकी बुटकी व्यक्ती ह्या मार्गाने आली कशी? दुसऱ्या यंत्राने त्याचा फोटो घेऊन पाठवला. कुठेतरी केंद्रीय कचेरीत तिसऱ्या यंत्राने तो पडताळून पाहिला...आणि धोक्याची सूचना दिली.

ह्या सर्व प्रकाराची छोटूला कल्पना नव्हती. तो आपल्या चालीने पुढे पुढे जात होता. इतक्यात, कुठून तरी एकदम दहा गणवेशधारी त्याच्यासमोर उपस्थित झाले. त्यांनी त्याला परतवून घरी आणून सोडले. आई त्याची वाटच पाहत होती. आणि नेहमीच्या संवादाला, जरा कडक स्वरूपात, सुरुवात झाली. पण आज छोटूचे बाबाच त्याच्या मदतीला आले.

"अग, मीच त्याला समजावून सांगतो म्हणजे तो पुन्हा ह्या भानगडीत पडणार नाही." आणि छोटूकडे वळून ते म्हणाले, "हे बघ छोटू! मी कामावर जातो तो भाग जमिनीवर आहे. तिकडे सामान्य माणसाला जायची परवानगी नाही, कारण तिथल्या परिस्थितीत तो जगू शकणार नाही."

"मग तुम्ही कसे जाता?" हा छोटूचा प्रश्न अपेक्षितच होता.

"मी जातो तो एक खास तऱ्हेचा स्पेस-सूट घालून! त्यातून मला श्वास घेण्यासाठी प्राणवायू मिळतो, त्या सुटानं माझं बाहेरच्या विलक्षण थंडीपासून रक्षण होतं, त्याच्या खास बुटामुळं मला वर चालणं शक्य होतं. वरती कसं वावरायचं याचं मला खास शिक्षण देण्यात आलं आहे."

छोटू ऐकत होता. त्याचे बाबा पुढे म्हणाले,

"एक काळ होता जेव्हा इथली सर्वच वसाहत जमिनीवर होती. तेव्हा यंत्रांच्या मदतीशिवाय, विशेष तऱ्हेचा सूट वापरल्याशिवाय आपले पूर्वज वर राहू शकत होते. पण हळूहळू वरच्या वातावरणात फरक होत गेला. अनेक प्रकारची जीवसृष्टी हळूहळू नष्ट होत गेली. ह्याचं मुख्य कारण म्हणजे सूर्यात झालेला फरक. आपला ग्रह ज्या सूर्याभोवती फिरतो त्यातून आपल्याला प्रकाश, उष्णता वगैरे मिळते. त्यानं आपल्या जीवसृष्टीचं पोषण होतं. त्या सूर्यात अगदी थोडा बदल झाला तरी इथलं नैसर्गिक संतुलन ढासळतं. तसा प्रकार घडला. बदललेल्या निसर्गाला तोंड द्यायला इथली वनस्पती आणि इथले बहुतेक जीव असमर्थ ठरले...समर्थ ठरलो फक्त आपण.

"आपल्या तंत्रज्ञानाच्या मदतीनं आपण इथं, जमिनीखाली, कृत्रिम परिस्थितीत राहत आहोत. वरती यंत्रांच्या मदतीनं सूर्यप्रकाशाचा उपयोग करून

आपलं जीवन इथं सुरळीत चाललं आहे. ती यंत्रं व्यवस्थित ठेवणं किती महत्त्वाचं आहे याची तुला आता कल्पना आली असेल. माझ्यासारखे काही निवडक लोक रात्रंदिवस त्यांच्यावर निरीक्षण ठेवत असतात."

"मला मोठं झाल्यावर हे काम मिळेल का?" छोटूने विचारले.

"होय! पण त्यासाठी नेटानं अभ्यास केला पाहिजे आणि आई-बाबांचं ऐकलं पाहिजे." हे वाक्य बाबांचे नसून आईचे होते.

दुसऱ्या दिवशी छोटूचे बाबा कामावर गेले तेव्हा त्यांच्या 'कंट्रोल रूम'मध्ये विलक्षणच वातावरण होते. कामाची शिफ्ट संपवून जाणाऱ्या पथकाच्या मुख्याने टी० व्ही० स्क्रीनकडे बोट दाखवले. त्यावर एक ठिपका होता. त्याने थोडा खुलासा केला,

"हा आकाशातला तारा नव्हे याची मला खात्री आहे. कारण गेल्या काही तासांत याची जागा बदलल्याचं आपला कंप्यूटर सांगतो. कंप्यूटरच्या मते हा आपल्या ग्रहाच्या दिशेनं येत आहे."

"हे आकाशयान तर नसेल एखादं?" छोटूच्या बाबांनी विचारले.

"आम्हाला तसा दाट संशय येतोय—तुम्ही पण त्यावर पाळत ठेवा." पथकाच्या मुख्याने जाता जाता बजावले. छोटूचे बाबा विचारात गुंतले.

आकाशयान? कुठून आले असणार? सूर्यमालेत जीवसृष्टी आपल्या-व्यतिरिक्त कुठे असणार? शक्यच नाही. निदान आकाशयान पाठवण्याइतकी सुधारलेली तर नक्कीच नाही....आपले पूर्वज पण आकाशयान, उपग्रह वगैरे वापरायचे. पण आता ते आपल्याला शक्य नाही. पुरेशी ऊर्जाच नाही तर हे प्रकार परवडणार कसे? नाहीतर ह्या आगंतुकाचे जवळून निरीक्षण करता आले असते. कदाचित ते इकडेच येत असले तर आपल्याला ते अशक्य नाही.

त्यांनी निरीक्षण चालू ठेवले.

वसाहतीतल्या व्यवस्थापक समितीची बैठक भरली होती. अध्यक्ष भाषण करीत होते: "नुकत्याच मिळालेल्या माहितीवरून दोन यानं आपल्या ग्रहाजवळ येत आहेत. एक यान तर आपल्या भोवती घिरट्या घालीत आहे.

दुसरं अजून लांब आहे, पण इकडेच येत आहे. ही यानं शेजारच्या ग्रहा-कडून येत असावीत असं कंप्यूटरला वाटतंय. आपण काय करायचं ते ठरवलं पाहिजे. नंबर एक, तुझं काय मत आहे ?"

नंबर एककडे त्या वसाहतीच्या संरक्षणाची जबाबदारी होती. त्याने काही कागद गोळा करत बोलायला सुरवात केली. "ही दोन्ही यानं भस्मसात करायची आपली तयारी आहे. पण त्यानं आपल्या माहितीत भर पडणार नाही. ती बेकाम करून खाली उतरवण्याची यंत्रं आपल्याकडे नाहीत. जर ती आपण होऊन खाली उतरली तर ती निकामी करण्याचं सामर्थ्य आपल्यात आहे. माझ्या माहितीप्रमाणं त्यात फक्त यंत्रंच आहेत, जीव नाहीत."

"मला नंबर एकचं म्हणणं पटतं," नंबर दोन—एक शास्त्रज्ञ—उद्गारला, "पण यंत्रं निकामी करण्यात एक धोका आहे. ती निकामी झाल्यास आपलं अस्तित्व परकीयांना कळेल. मला वाटतं, आपण त्या यानांत ढवळाढवळ करू नये—फक्त निरीक्षण करावं."

"येथे एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. आपलं अस्तित्व शक्य तो गुप्त राखलं पाहिजे. ज्यांनी ही यानं पाठवली ते लोक याहून मोठी यानं पाठवण्याची शक्यता आहे—जर त्यांना येथे काही महत्त्वाचं सापडलं तर. मला वाटतं, आपण त्यांना—म्हणजे त्यांच्या यंत्रांना—शक्य तो असं भासवू या की या ग्रहावर काहीच महत्त्वाचं नाही. आपल्या जमिनीवरच्या यंत्रणा शक्य तो शांत ठेवण्याची मी अध्यक्षांना विनंती करीन." नंबर तीनकडे सामाजिक व्यवस्थेचे काम होते.

अध्यक्ष काही बोलणार इतक्यात त्यांच्या जवळचा फोन वाजला. त्यांनी रिसीव्हर कानाला लावला. आणि एका मिनिटाने त्यांनी घोषणा केली : "लोक हो! नंबर एकचं यान आपल्या जमिनीवर उतरलं आहे!"

छोटूच्या आयुष्यातला एक महत्त्वाचा दिवस उगवला. कारण आज त्याला त्याच्या बाबांनी जमिनीखालच्या कंट्रोल रूममध्ये नेलं होतं. येथून यान नंबर एक स्पष्ट दिसत होते.

"किती विचित्र दिसतंय! त्यात काय असेल ?" छोटूने विचारले.

"ते इतक्यात सांगता येणार नाही. आम्ही लांबून त्याचं निरीक्षण करतो

आहोत. पण त्याच्या एकूण एक भागावर आमचं नियंत्रण आहे. अर्थात, आणीबाणीची परिस्थिती असल्याशिवाय आम्ही त्याचा वापर करणार नाही." छोटूचे बाबा म्हणाले. त्यांनी एका कॉन्सोलकडे बोट दाखवले. त्यावर वेगवेगळी बटने होती.

यानातून एक यांत्रिक हात बाहेर येत होता. त्याची लांबी वाढत होती. बहुतेक, जमिनीवरची माती उकरून काढायचा त्याचा बेत असावा.

कंट्रोल रूममध्ये सर्व लोक स्क्रीनवर त्या यानाकडे पाहत होते. सर्व नाही —एक सोडून सर्व !

छोटूचे डोळे कॉन्सोल पॅनलकडे होते. त्यातले एक बटन दाबायची त्याला अनिवार इच्छा झाली. लाल बटन त्याला आकर्षित करत होते.

धोक्याची घंटा झाली. सर्वांचे डोळे कॉन्सोलकडे वळले. बाबांनी छोटूला चपराक मारून बाजूला केले आणि त्याने दाबलेला स्विच पहिल्याप्रमाणे केला.

पण यानाच्या यांत्रिक हाताची हालचाल थांबली होती. त्याच्यात काही-तरी बिघाड झाला होता.

नॅशनल एरोनॉटिक्स अॅण्ड स्पेस अॅड्मिनिस्ट्रेशन (नासा) तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या वक्तव्याकडे सर्वांचे लक्ष वेधले :

'मंगळावर नुकतेच उतरलेले व्हायकिंग-१ हे अंतराळयान त्यामधील प्रयोग ठरल्याप्रमाणे करत आहे. परंतु काही अज्ञात कारणामुळे यानाच्या यांत्रिक हातात बिघाड झाला आहे. नासाचे तंत्रज्ञ पृथ्वीवरून त्या बिघाडाचा अभ्यास करीत आहेत आणि तो दुरुस्त करण्याच्या प्रयत्नात आहेत...'

त्यानंतर लवकरच सर्व मोठ्या वर्तमानपत्रांत बातमी झळकली :

'नासाच्या तंत्रज्ञांनी रिमोट कंट्रोलने व्हायकिंग-१ मध्ये झालेला बिघाड दुरुस्त केला आहे. आता त्यातला यांत्रिक हात पूर्ववत काम करायला लागून मंगळाच्या पृष्ठभागावरचे मातीचे नमुने गोळा करू लागला आहे...'

ह्या मातीच्या नमुन्यावर शास्त्रज्ञांचे उत्सुकतेने लक्ष होते. मंगळावर जीव-

सृष्टी असेल का, ह्या प्रश्नाचे निश्चित उत्तर मिळण्याची शक्यता त्या नमुन्यांचा अभ्यास केल्यावर समजेल ही त्यांना आशा होती.

सूर्यमालेत असलेले सर्व ग्रह वेगळ्या प्रकारचे आहेत. पण पृथ्वी आणि मंगळ हे त्यांतल्या त्यांत समान परिस्थितीतले म्हणायचे. पृथ्वीसारखी जीव-सृष्टी सूर्यमालेत जर इतर कुठे असेल तर ती मंगळावर असण्याची शक्यता त्यांतल्या त्यांत जास्त !

पण व्हायकिंग मिशनने ह्या बाबतीत नकारार्थी उत्तर दिले. मंगळावर जीवसृष्टी असल्याचा कोणताही पुरावा पृथ्वीवरील शास्त्रज्ञांना मिळाला नाही.

८ ∫ धोंडू

"मास्तर! मास्तर! दार उघडा! आकाशातून तारं पडलुया!" दार ठोठावत सुभान्या ओरडत होता.

डोळे चोळत मास्तर बाहेर आले. "काय रे? काय बडबडतो आहेस?"

न पिण्याबद्दल सुभान्याची ख्याती नसती तर त्यांना वेगळीच शंका आली असती!

"म्या हरी परबासंगं पाटलाच्या मळ्यावर गप्पा मारीत बसलो व्हतो. परवा तुमी दाखवलेले तारे आकाशात शोधत होतो. पन सगले आमाला ·वसत नवते. इतक्यात एका ताऱ्यानं उडीच मारली जणू—थेट पाटलाच्या मळ्यात. परब न् मी झाडाआड लपलो नसतो तर आमच्या डोसक्यावरच पडता! परब गेलाय पाटलाला आनायला अन् मी आलो तुमच्याकडे!"

रात्रीचा अडीचचा सुमार होता. मास्तर म्हणाले, "चल तू पुढं हो. मी कंदील पेटवून येतोच!"

पण सुभान्या तिथेच थांबला. त्याला एकटे मळ्यावर जायची भीती वाटत होती.

ते दोघे मळ्यावर पोचले तेव्हा लक्ष्मणराव पाटील, त्यांचा मुलगा शंकर आणि परब हे एका कोपऱ्यात उभे दिसले.

"या मास्तर!" पाटलांनी त्यांचे स्वागत केले. "पाहा माझ्या पहारेकऱ्यांनी काय पकडून आणलंय ते!" त्यांनी थोड्या अंतरावर पडलेल्या एका वस्तूकडे बोट दाखविले.

"पडताना लई चकाकत होतं ताऱ्यावाणी, पर आता काळंठिक्कूर झालं की!"

हरी परबने सुभान्याच्या वाक्याला दुजोरा दिला. मास्तर हळूहळू तिकडे गेले.

साधारण एक फूट व्यासाच्या चेंडूइतकी मोठी ती वस्तू होती. बाहेरून पूर्ण होरपळून गेली होती. ती आपटली तेथील जमीन पण काळवंडली होती.

"अरे, हा काही तारा नाही!" मास्तरांनी खुलासा केला. "असे हे दगड ग्रहांप्रमाणंच आकाशात फिरत असतात. कधीकधी पृथ्वीवर आदळतात. त्यांना मीटिओराइट म्हणतात. हा आपल्या खेड्यात आदळला म्हणून त्याला 'विसापूर मीटिओराइट' हे नाव मिळेल!"

"पन् हा आधी चकाकत होता—साधा दगड नाय तो! जादू आसंल त्यात!" परब म्हणाला.

"छे! छे! जादूबिदू काही नाही! खाली पडताना हवेत तो घासला जातो आणि त्यामुळं गरम होऊन चकाकतो. दगडावर दगड घासून आग निघते किनई?" मास्तरांनी शक्य तितक्या सोप्या शब्दांत खुलासा केला.

"मग त्या धोंड्याचा काय निकाल लावायचा?" पाटलांनी विचारले. त्याला हात लावून पाहायची कोणाचीच छाती नव्हती.

"तालुक्याच्या गावी निरोप पाठवून द्या! तिथले एक्सपर्ट पाहतील काय करायचं ते." मास्तरांचा सल्ला सर्वांना पटला.

धोंड्यावर चादर टाकून त्यावर परब आणि सुभान्या लक्ष ठेवीत बसले.

न्यूयॉर्कच्या केनेडी एअरपोर्टकडे टॅक्सी झपाट्याने चालली होती. पण त्यातल्या पॅसेंजरच्या मनातल्या विचारांची दौड त्याहून अधिक वेगाने चालू होती.

डॉ० डेव्हिड रॅट्क्लिफ काही तासांपूर्वीच्या घटना आठवत होता... नेहमीप्रमाणे सकाळी साडेआठला तो आपल्या 'इन्स्टिटयूट फॉर स्पेस स्टडीज'मधल्या ऑफिसमध्ये दाखल झाला होता. अमेरिकन फिजिकल सोसायटीच्या मीटिंगमध्ये वाचण्यासाठी प्रबंध तयार करण्याचे काम त्याने हाती घेतले, इतक्यात फोन वाजला. "तुम्हांला भारतातून—दिल्लीहून—इंटरनॅशनल ट्रंककॉल आला आहे!" ऑपरेटरने सांगितले.

भारतात त्याच्या माहितीचे बरेच शास्त्रज्ञ होते. काहींशी नियमित पत्र-व्यवहार, प्रबंधांची देवाणघेवाण वगैरे असूनसुद्धा फोनवर बोलण्यापर्यंत अद्याप मजल गेली नव्हती. कोण असेल बरे...

त्याला फार वेळ वाट पाहावी लागली नाही. फोनवरून स्पष्ट आवाज एकू आला, "डॉ० रॅट्क्लिफ ! मी डॉ० राव बोलतोय—पी० ए० टी० राव!"

"मॉर्निंग पॅट!" डेव्हिड रॅट्क्लिफ आणि पी० ए० टी० (पॅट) राव काही वर्षे एकत्र पीएच० डी०चे संशोधन करीत होते.

"गुड ईव्हिनिंग, डेव्हिड! येथे संध्याकाळ व्हायला लागली आहे. मी फोन केला ते तुला तातडीने इकडे बोलावण्यासाठी. तू आज रात्रीच्या एअर-इंडियाच्या फ्लाइटने इकडे येऊ शकशील का?"

"आज रात्री? पण कशाला? म्हणजे मी येऊ शकेन...पण कशासाठी ते समजलं तर बरं होईल!" डेव्हिड.

"विसापूर मीटिओराइटबद्दल मला एक मीटिंग भरवायची आहे, शक्य तो परवा सकाळपासून. मी आणखी दोघातिघांना बोलवीत आहे. कॉर्नेलचे क्लॉड पेकेअर पण त्याच फ्लाइटवर असतील! लंडनला जॉन फ्लेमिंग चढेल!...तुझं तिकीट केनेडी एअरपोर्टवर एअरइंडियाच्या फर्स्टक्लासच्या चेक-इन काउंटरवर दिलं जाईल. व्हिसा लागेल; पण तो दिल्ली एअरपोर्टवर देण्याची सोय केली आहे...मग तू येत आहेस हे मी गृहीत धरतो!"

आणि नंतर एअरइंडियाकडून फोन आला होता आणि झटपट डेव्हिडची भारतयात्रेच्या दिशेने पावले पडली होती.

विसापूर मीटिओराइटबद्दल त्याने नुकतेच पेपरमध्ये वाचले होते. पण रावच्या बोलण्यावरून काही उलगडा होत नव्हता. क्लॉड पेकेअर हे 'प्रीबायॉटिक केमिस्ट' होते—म्हणजे अंतराळातल्या जीवसृष्टीच्या शक्यतेचा ते अभ्यास करत होते. आणि जॉन फ्लेमिंग होता मायक्रोबायालॉजिस्ट. खुद्द डेव्हिड आणि पॅट राव हे मीटिओराइटचे तज्ज्ञ होते. ह्या सर्वांची तातडीने मीटिंग बोलावण्याचे कारण काय असेल?

डेव्हिडच्या मनात फक्त एकच कारण दिसत होते. पण ते इतके विलक्षण होते की, ते शक्यतेच्या कक्षेत बसवायला तो धजत नव्हता!

टॅक्सी व्हॅनवाइक एक्स्प्रेसवेवरून एअरपोर्टकडे वळली आणि एअर इंडियाच्या डिपार्चर बिल्डिंगकडे आली. बोईंग ७४७ च्या गर्दीला सुरुवात झाली होती, पण फर्स्टक्लास काउंटरशी फार गर्दी नव्हती. एक व्यक्ती हातवारे

करीत काउंटरमागच्या बाईला काही तरी सांगत होती. लांबून वाटले असते की काही तरी भांडण चालू आहे!

डेव्हिडच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. हातवारे करणारी व्यक्ती डोक्यावरच्या टकलावरून त्याने लांबूनच ओळखली होती.

अगदी साध्या संभाषणातसुद्धा हातवारे करायची क्लॉड पेकेअरची ढब ही त्याच्या मित्रांच्या थट्टेचा विषय होती.

"हॅलो क्लॉड! काय सांगतो आहेस तिला?" त्याच्या पाठीवर थाप मारून डेव्हिडने विचारले.

"मला प्रवासात व्हेजिटेरियन जेवण पाहिजे हे मला सांगायचं आहे." मोडक्या इंग्रजीत पेकेअर म्हणाला.

पेकेअरची समस्या सोडवून आणि सामान चेक-इन करून डेव्हिडने एक-दोन टेलिफोन केले.

क्लॉड पेकेअरलासुद्धा त्याच्यापेक्षा जास्त माहिती नव्हती आणि त्याच्यासारखेच कुतूहल होते. विमानामध्ये दोघेजण शेजारी शेजारी बसले.

विमान सुरू होण्यापूर्वी हवाई सुंदरीने त्यांना भारतीय वृत्तपत्रांच्या प्रती दिल्या. 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये डेव्हिडला एक बातमी दिसली :

रशियन चेस-ग्रँडमास्टरची भारतास भेट

भारतात बुद्धिबळाचा अधिक प्रचार व्हावा ह्या हेतूने इंडियन चेस फेडरेशनने रशियातील ग्रँडमास्टर अलेक्सेई नोव्हिकॉव्ह यांची भारत-यात्रा आखली आहे. श्री० नोव्हिकॉव्ह हे जगातले तिसऱ्या क्रमांकाचे बुद्धिबळपटू समजले जातात. पण काही जणांच्या मते त्यांची योग्यता याहून वरची आहे. ते भारतात अनेक ठिकाणी खेळतील. पण त्यांना साजेसा प्रतिस्पर्धी भारतात नसल्याने त्यांच्या खेळातल्या खुब्या कितपत दिसून येतील ही शंकाच आहे.

डेव्हिड हा हौशी बुद्धिबळपटू होता. अनेक खेळाडूंच्या शैलींचा त्याने अभ्यास केला होता. 'आपल्या भारतयात्रेत नोव्हिकॉव्हचा खेळ पाहायला मिळेल का?' हा विचार त्याच्या मनात येऊन गेला.

पॅट रावच्या ऑफिससमोर असलेल्या कॉन्फरन्स रूममध्ये दहा जणांची सभा भरली होती. अध्यक्षस्थानी होते खुद्द रावसाहेब. प्रसिद्ध शास्त्रज्ञ असूनही त्यांच्या वागण्यात एक प्रकारचा मनमिळाऊपणा होता. त्यामुळे अगदी नवख्या विद्यार्थ्यालादेखील त्यांच्याशी चर्चा किंवा वादविवाद करायला भीती वाटत नसे. पूर्वी रावसाहेबांना चेन स्मोकिंगची सवय होती. वैद्यकीय सल्ल्याने त्यांनी स्मोकिंग थांबवले; पण त्यामुळे गहन विचारात मग्न असताना काही चाळा म्हणून त्यांना शेंगदाणे खायची सवय लागली होती. सिगरेट पाकिटाऐवजी शेंगदाण्यांचा साठा त्यांच्या खिशात असे.

त्यांच्या शेजारी प्रयोगशाळेचे अॅड्मिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर डॉक्टर भडकमकर बसले होते. हे एके काळी शास्त्रज्ञ होते; पण संशोधनात आपली फार गती नाही हे ओळखून त्यांनी अॅड्मिनिस्ट्रेशनकडे धाव घेतली होती आणि एखाद्या निष्णात आय० सी० एस० किंवा आय० ए० एस० पेक्षा ह्या तंत्रात प्रावीण्य संपादन केले होते.

क्लॉड पेकेअर आणि डेव्हिड रॅट्क्लिफखेरीज परदेशी शास्त्रज्ञ म्हणजे जॉन फ्लेमिंग, मायक्रोबायालॉजिस्ट, हे पण त्या सभेस हजर होते. त्यांनी जीवरचनेला मूलभूत आवश्यक रेणूंचा अभ्यास केला होता. शिवाय दोन भारतीय कंप्यूटर एक्स्पर्ट—डॉ० गुप्ता सॉफ्टवेअरचे आणि डॉ० रामनाथन हार्डवेअरचे—हे पण हजर होते. डॉ० राव यांच्या विभागातले त्यांचे दोन सहकारी चर्चेत भाग घ्यायला आणि त्याची नोंद करायला नोटबुक्स घेऊन आले होते.

दहावी व्यक्ती सर्वांत शेवटी आली आणि तिने बरोबर काळ्या कापडाने झाकलेली एक वस्तू आणली व शेजारच्या टेबलावर ठेवली. डॉ० राव यांनी ओळख करून दिली:

"हे मेंदूचे प्रख्यात तज्ज्ञ डॉ० मथरानी. त्यांनी आणलेली वस्तू म्हणजेच विसापूरचा मीटिओराइट—ज्याकरता आपण इथं जमलो आहोत."

"ही मीटिंग बोलावण्याचं कारण ऐकण्यासाठी आम्ही सर्व फार उत्सुक आहोत." हातवारे करत डॉ० पेकेअर म्हणाले.

डॉ० राव घसा खाकरून बोलू लागले, "विसापूर मीटिओराइट एक आठवड्यापूर्वी महाराष्ट्रात एका खेड्यात सापडला. दोघा पहारेकऱ्यांनी ते

लक्ष ठेवत असलेल्या मळ्यात तो पडताना पाहिला. पडताना तो चकाकत होता असं त्यांचं वर्णन आहे. तो खाली पडला तेव्हा करपून गेल्यासारखा होता. खेड्यातल्या मास्तरांनी आणि इतर प्रतिष्ठित मंडळींनी तो त्या अवस्थेत पाहिला.

दुसऱ्या दिवशी तो जवळच्या मोठ्या शहरात नेण्यात आला आणि तिथल्या एका कॉलेजच्या शास्त्राच्या प्राध्यापकांनी त्याची वरवर पाहणी करून तो आमच्याकडे रवाना केला. पण त्यांना एक विसंगती आढळली. विसापूरकर म्हणतात की, त्यांनी पाहिले तेव्हा मीटिओराइटचा पृष्ठभाग काळाकुट्ट होता. प्राध्यापकमजकुरांना त्याचा रंग फिक्का ग्रे आढळला."

"इंटरेस्टिंग!" डॉ० फ्लेमिंग उद्गारले.

"पण अजून पुढं ऐका." राव म्हणाले. "हा मीटिओराइट आमच्यापर्यंत यायला आणखी दोन दिवस लागले. पण आम्ही पाहिला तेव्हा त्याचा रंग ग्रे नसून पांढराशुभ्र होता आणि त्या स्थितीत तो अजून आहे. पृथ्वीच्या वातावरणातून येताना घर्षणामुळं होणाऱ्या उष्णतेचे काहीही परिणाम आता त्याच्यावर नाहीत!"

"आम्ही पाहू का तो कसा दिसतो ते?" डेव्हिडने उत्सुकतेने विचारले.

"थांबा! तुमची उत्सुकता थोडा वेळ अजून नियंत्रणात ठेवा." डॉ० राव हसत म्हणाले, "मी तुम्हांला बोलावलं त्याची आणखी कारणं आहेत. आम्ही त्याचा एक लहानसा तुकडा घेऊन त्याचं विश्लेषण केलं. तर त्यात आम्हांला काही असे रेणू (मॉलेक्यूल) आढळले की, ज्यांचा जीवनाचे मूलघटक म्हणून उल्लेख केला जातो. ह्या रेणूंत आणि ॲमिनो ॲसिड्समध्ये बरंच साम्य आहे. पण त्यांच्या रचनेची सुसंबद्धता मला फार महत्त्वाची वाटली. पृथ्वीबाहेर ॲमिनो ॲसिड्स अस्तित्वात असल्याचे काही पुरावे मिळाले आहेत. पण माझ्या मते हा पुरावा सर्वांत भक्कम आहे आणि म्हणून मी तुम्हांला पाचारण केलं.

पण त्यादरम्यान आणखी एक घटना घडली, ज्यामुळं ह्या सभेला आणखी एक महत्त्व प्राप्त झालं आहे. आम्ही ह्याच विश्लेषण करत असताना प्रयोगशाळेत एक विद्युत्लहरींचा रिसीव्हर एकदम काही लहरींचे अस्तित्व दाखवू लागला. त्या लहरी ह्या मीटिओराइटपासून उगम पावतात असं आम्हांला

दिसून आलं आहे. मानवी मेंदूतून ज्या प्रकारच्या लहरी निघतात त्यांसारख्या मला त्या वाटल्या. मी लगेच डॉ० मथरानींना बोलावलं. त्यांनी पण प्रयोग करून ह्या तर्काला दुजोरा दिला. ते आज आपल्याला आणखी माहिती सांगतील.

तेव्हा माझा असा दृढ समज आहे की, हा आजवर मिळालेल्या मीटि-ओराइटपेक्षा वेगळा असून त्यात कुठे तरी जीवसृष्टीचा उगम होत असावा. तो समज खरा आहे का, असल्यास ही जीवसृष्टी कुठल्या प्रकारची आहे, कुठे केंद्रित आहे, हे सर्व आपल्याला शोधून काढायचं आहे. मी मात्र ह्याला जीव समजून त्याचं आगाऊच नामकरण केलं आहे : 'धोंडू'—ह्याला शोधणाऱ्या पहारेकऱ्यांनी त्याचा असा उल्लेख केला म्हणून. या, मी तुमची धोंडूशी ओळख करून देतो."

रावसाहेबांनी धोंडूवरचे आवरण उचलले.

सर्व शास्त्रज्ञांनी धोंडूच्या टेबलाभोवती गर्दी केली; पण त्यांच्या अपेक्षे-प्रमाणे त्यांना त्यात काही विशेष दिसले नाही. दगड-धोंड्याचाच प्रकार होता तो—मात्र त्याचा पृष्ठभाग शुभ्र आणि चकचकीत होता. पण त्याला पाहून त्यात जीवसृष्टी असेल असे कोणालाही वाटले नसते.

"ह्याचा पृष्ठभाग खरोखरच करपलेला होता?" अविश्वासाने जॉन फ्लेमिंगनी विचारले.

"अगदी विश्वसनीय साक्षीदारांनी तशी ग्वाही दिलेली आहे. मात्र आम्ही प्रत्यक्ष तसं पाहिलं नव्हतं." पॅट राव.

जॉन फ्लेमिंगने पेकेअरकडे पाहिले. त्या दोघांच्याही मनांत बहुतेक एकच विचार आला असावा. कारण दोघे एकदमच म्हणाले :

"ह्याच्या काही भागावर आम्हांला प्रयोग करून पाहायचे आहेत."

इतक्यात मथरानी काही उपकरणे घेऊन आले. इलेक्ट्रोडसारखे काही बार त्यांनी धोंडूच्या पृष्ठभागावर लावले. त्यापासून निघणाऱ्या तारा एका बॉक्सला जोडल्या. बॉक्सचे झाकण उघडून त्यातली काही बटने त्यांनी दाबली. त्याबरो-बर त्यातली घड्याळाची डायलवजा उपकरणे त्यातील काटे (पॉइंटर्स) भराभरा फिरलेली दाखवू लागली.

"धोंडूच्या मेंदूतून निघणाऱ्या लहरी कमीजास्त होत आहेत." मथरानी म्हणाले. "कमीजास्त होण्याचं प्रमाण याची उत्तेजना दाखवते." त्यांनी एका कागदावर नोंद होत असलेल्या आलेखाकडे सर्वांचे लक्ष वेधले.

लहरीप्रमाणे उंचनीच होणारी रेखाकृती कागदाच्या रोलवर उठत होती. मथरानींनी दुसरा एक रोल काढून उलगडला. त्यावर पण तसाच आलेख होता.

"ह्या कालच्या आलेखाच्या मानानं आजचा जास्त वेगानं आणि जास्त प्रमाणावर वरखाली होत आहे. मला वाटतं, धोंडूला आपल्या सर्वांच्या उपस्थितीची चाहूल लागली आहे. काल मी एकटाच होतो."

डेव्हिड रॅटक्लिफच्या अंगावरून शहारा येऊन गेला. त्याने दोन्ही आलेख पाहिले.

हा कालचा आलेख. तर आत्ताचा आलेख असा होता :



म्हणजे धोंडूचा 'मेंदू' जागृत होता, इतकेच नव्हे तर मानवी मेंदूप्रमाणे प्रसंगानुरूप काम करताना बदलतसुद्धा होता.

"तुमच्याकडे चांगला कंप्यूटर आहे का?" त्याने पॅट रावला विचारले.

"होय."

त्या प्रयोगशाळेतल्या इलेक्ट्रॉनिक कंप्यूटरची तांत्रिक माहिती डॉ० रामनाथननी दिली. डेव्हिड पुढे म्हणाला,

"डॉ० गुप्ता आणि रामनाथन यांची मदत मिळाली आणि कंप्यूटर वापरा-

यला मिळाला तर ह्या मेंदूची शक्ती अजमावून पाहता येईल. मात्र सबंध कंप्यूटर २४ तास वापरायला मिळेल का?"

डॉ० गुप्तांची काही हरकत दिसली नाही. रामनाथननी पण ह्या प्रयोगात भाग घ्यायची तयारी दाखविली.

पण इतका वेळ शांत असलेले भडकमकर म्हणाले, "दिवसातले काही तास कंप्यूटर इंडस्ट्रीला कमिट केलेला आहे. तो कसा देता येईल?"

राव म्हणाले, "समजा, कंप्यूटर ब्रेकडाउन झाला असता तर इंडस्ट्रीनं काय केलं असतं? आपण सांगू की इमर्जन्सी आल्यामुळं कंप्यूटर त्यांना काही काळ नाइलाजानं मिळू शकत नाही!"

"ही जोखीम मी स्वतःच्या शिरावर घेऊ इच्छीत नाही!" भडकमकरांनी आपले दोन्ही हात वर करून सांगितले. हा त्यांचा बचावाचा पवित्रा आता पाहुणे मंडळींनाही परिचित होणार होता.

"बरं, समजा, मी तुम्हांला तशी नोट लिहून दिली तर?" रामनाथननी विचारले.

"नोट?" हा जादूचा, शब्द कानी पडताच भडकमकरसाहेब खुलले! "हो, मग चालेल. मात्र दोन कॉपीज पाठवा! एक माझ्या फायलीत राहील आणि दुसरी मी सायक्लोस्टाइल करायला पाठवीन!" ठराविक कक्षेच्या बाहेर जायला भरपूर लेखी पुरावा आहे आणि स्वतःची जबाबदारी नाही हे प्रथम निश्चित झाले पाहिजे, ही त्यांना मिळालेली शिकवण ते कटाक्षाने पाळीत आले होते.

मीटिंग संपल्यावर शास्त्रज्ञांचे दोन गट झाले. फ्लेमिंग आणि पेकेअर यांनी धोंडूचा आगाऊच कापलेला भाग काही प्रयोगाकरिता घेतला. उरलेला सबंध धोंडू डेव्हिडने कंप्यूटरच्या खोलीत नेला. पॅट राव, गुप्ता आणि रामनाथन यांनी मथरानींच्या मदतीने धोंडूला 'ट्रेन' करायचे ठरविले.

प्रथम रामनाथननी धोंडूच्या मेंदूचा कंप्यूटरच्या 'मेमरी'शी संपर्क जोडून दिला आणि प्रयोगांना सुरुवात झाली. प्रयोगाचा मुख्य उद्देश होता, धोंडूमध्ये विचार करण्याची शक्ती आहे का? असल्यास कुठवर गेली आहे? त्यात स्मरणशक्तीचा साठा असेल का? वगैरे प्रश्नांची उत्तरे शोधणे.

"सुरुवात कशी करायची?" मथरानींनी विचारले.

“मला वाटतं ‘बायनरी ॲरिथमेटिक’चं ज्ञान त्याला करवून द्यावं.” गुप्ता म्हणाले. डेव्हिडने अनुमोदन दिले.

बायनरी ॲरिथमेटिक म्हणजे ० आणि १ ह्या दोनच आकड्यांनी लिहिलेले अंकगणित. ० ते ९ ह्या दहा अंकांचा वापर व्यवहारात होतो. ९ नंतरचा आकडा १० असा लिहिण्यात येतो. ‘दहा’साठी नवीन अंक वापरला जात नाही. तोच नियम बायनरी ॲरिथमेटिकचा. ० आणि १ नंतरचा आकडा ‘दोन’ लिहायला नवीन अंक न वापरता १० असे लिहायचे. ह्याच नियमाप्रमाणे तीन म्हणजे ११, चार म्हणजे १००...

पण शून्य आणि एक ह्या अंकांची कल्पना धोंडूला कशी द्यायची?

दीर्घ मुदतीचा आणि कमी मुदतीचा असे इलेक्ट्रॉनिक सिग्नल देऊन :



१ ० १ ० १ ०

हा ‘मोर्सकोड’चाच प्रकार म्हणायचा!

अनेक वेळा प्रयोग केल्यावर धोंडूने प्रतिसाद द्यायला सुरुवात केली. दीर्घ मुदतीचा सिग्नल (———) दिला की त्यातून



असा प्रतिसाद येई. ऱ्हस्व मुदतीचा सिग्नल (—) दिला की त्यातून वेगळा पण ठराविक साच्याचा प्रतिसाद मिळे.



“धोंडूला अंकांची ओळख तर झाली!” निःश्वास टाकत गुप्ता म्हणाले.

“आता तर सर्व काम सोपं आहे.” डेव्हिड म्हणाला, “आता त्याला बेरीज-वजाबाकी शिकवायची—म्हणजे तो ‘सुशिक्षित’ होईल!”

आणि त्याच्या अपेक्षेप्रमाणे पुढले काम सोपे होते. धोंडूला अंकगणिताचे नियम आत्मसात करायला वेळ लागला नाही. त्याने दिलेली उत्तरे लहरींच्या रूपात असली तरी त्यांचे रूपांतर आकड्यांत करून कंप्यूटरमधून छापून येऊ लागले.

"माझ्या अंदाजाप्रमाणं त्याचा मेंदू फारच सुपीक असून स्मरणशक्ती अचाट आहे. तो एकदा शिकलेलं विसरत नाही—आपण शिकवावं तितकं थोडंच!" मथरानी म्हणाले.

डेव्हिडच्या चेहऱ्यावर मात्र चिंतेचा भाव दिसत होता. पण चिंतेचे कारण नक्की त्यालाही सांगता आले नसते. बेरीज-वजाबाकी शिकता शिकता धोंडूने गुणाकार-भागाकार स्वतःच शोधून काढले होते आणि हीच पद्धत त्याच्या इतर 'शिक्षणा'त दिसून आली. गणितातली मूलतत्त्वे आणि प्रश्न सोडविण्याची रीत कळली की कुठलीही गणिते तो चुटकीसरशी सोडवू लागला. युक्लिडच्या भूमितीचे नियम सांगताच पायथॅगोरसचे प्रमेय तो सोडवू शकला.

"काय विलक्षण विचारशक्ती आहे!" गुप्ता कौतुकाने म्हणाले. "आइन्स्टाइनसारखा मेंदू असेल बेट्याचा! 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' म्हटले पाहिजे."

"शिष्याकडून पराजय झालेला गुरूला हवाच असतो!" डेव्हिडला आपल्या चिंतेचे कारण गवसले. गुप्तांनी आइन्स्टाइनचे नाव घेतले. पण डेव्हिडच्या मते धोंडूची प्रगती कुठल्याही मानवी मेंदूच्या आवाक्याबाहेरची होती.

आइन्स्टाइन...म्हणजे जर्मनमधून भाषांतर केल्यास एक दगड—धोंडूच नव्हे का?

पण हा दगड एकदा सुरुवात केल्यावर बकाबका ज्ञान गिळीत होता आणि ज्ञानामागे असते शक्ती...डेव्हिडला ह्या अमानवी मेंदूची शक्ती मर्यादित ठेवायची होती. ह्या शिष्याकडून पराजय नको होता!

गुप्ता मात्र त्याला शिकवीतच होते. बरेचसे गणित त्याच्या मेंदूत कोंबल्यावर ते म्हणाले, "आता त्याला विज्ञानाची दीक्षा देऊ या!"

"थांबा!" डेव्हिड एकदम ओरडला. "अमूर्त गणित शिकविणं एक वेळ

चालेल, पण विज्ञान? मानवी संस्कृतीची सर्व शक्ती ज्याच्यात साठली आहे त्या विद्येची गुरुकिल्ली आपण होऊन ह्या 'परक्या'ला द्यायची का?"

बाकीचे लोक डेव्हिडकडे चकित होऊन पाहू लागले. त्याच्या लक्षात आले की आपले विचार ह्यांना पटायला वेळ लागेल—शिवाय ते पटतीलच असे नाही. पण त्यांना जर वेगळ्या दिशेला वळविले तर? एक कल्पना त्याच्या डोक्यात आली. तो उद्गारला,

"विज्ञान शिकविण्यापूर्वी मला एक प्रयोग करून पाहायचा आहे. आपण त्याला बुद्धिबळ शिकवू या. पाहू या तो किती निष्णात होतो ते!"

"उत्तम कल्पना!" गुप्ता म्हणाले, "आणि जर हा पठ्या शिकून तयार झाला तर नोव्हिकॉव्हशी ह्याची मॅच लावू!"

नोव्हिकॉव्ह! डेव्हिडला विमानात वाचलेली बातमी आठवली. "नोव्हि-कॉव्ह इकडे केव्हा येणार आहे?" त्याने विचारले.

"परवा दिवसभर तो ह्या शहरात असेल."

म्हणजे धोंडूला बुद्धिबळ आत्मसात करायला एक दिवसाचा अवधी होता.

P–K 4

नोव्हिकॉव्हने राजापुढचे प्यादे दोन घरे पुढे सरकवून खेळाला सुरुवात केली. नाणेफेक जिंकून त्याने 'पांढरी' बाजू घेतली होती.

समोर 'काळी' बाजू सांभाळीत डेव्हिड बसला होता, पण खरोखर खेळ-ण्याचे काम धोंडू करणार होता. हा खेळ घडवून आणायला त्या सर्वांनाच कोण यातायात पडली होती! प्रथम भडकमकरांनी हरकत घेतली होती—नोव्हिकॉव्ह शास्त्रज्ञ नसल्याने त्याच्या भेटीचा खर्च अंदाजपत्रकातील कोणत्या तरतुदीनुसार करायचा हा त्यांना पेच पडला होता! अखेर इंडियन चेस फेडरेशनने लेखी 'आम्ही खर्च देऊ' असे कळविल्यावर त्यांनी आपले हात खाली केले. नोव्हिकॉव्ह स्वतः एका 'दगडा'शी खेळायला नाकबूल होता; पण त्यामागे मोठा मेंदू आहे अशी त्याला खात्री पटविण्यात आली तेव्हा तो खेळायला तयार झाला. पण सामना 'वेळेची मर्यादा' ठेवून खेळायची अट त्याने घातली. हीच अट पुढे आपल्याला भोवणार ह्याची त्याला काय कल्पना असणार!

डेव्हिडच्या शेजारी कंप्यूटर टर्मिनल होता. त्यावरून नोव्हिकॉव्हची खेळी कंप्यूटरला कळविण्यात येई. कंप्यूटरशी धोंडूचा मेंदू जोडला होता. धोंडूचे प्रत्युत्तर कंप्यूटर-टर्मिनल ह्या मार्गाने टर्मिनलच्या टी० व्ही० सेटवर येई. पहिल्यांदा धोंडूने थोडा विचार करायला वेळ घेतला. डेव्हिडने त्याला नोव्हि-कॉव्हच्या पूर्वीच्या काही प्रख्यात खेळांची माहिती पुरविली होती. तिचा विचार करून त्याने उत्तर दिले :

-----PQB 4

सिसीलियन डिफेन्स! डेव्हिडला आश्चर्य वाटले. कारण हा बचावात्मक पवित्रा नोव्हिकॉव्हविरुद्ध फारसा उपयोगी पडलेला नव्हता. त्याने वजिरा-शेजारच्या उंटापुढचे प्यादे दोन घरे पुढे सारले.

नोव्हिकॉव्हच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित झळकून गेले.

त्याने राजाच्या बाजूचा घोडा उंटासमोर आणला.

Kt-KB3

त्याची अपेक्षा होती की, धोंडू वजिरापुढचे प्यादे एक घर पुढे सरकवील. डेव्हिडची पण तीच अपेक्षा होती; पण धोंडूने राजापुढचे प्यादे एक घर पुढे सरकविले.

---P-K 3

पण ही तर फक्त सुरुवातच होती! नोव्हिकॉव्हला वाटले त्याप्रमाणे न खेळता धोंडू काही तरी वेगळीच पद्धत मनात ठेवून खेळत होता. नोव्हिकॉव्हने नवव्या खेळीत किल्ला केला, धोंडूने अकराव्या खेळीत. लवकरच नोव्हि-कॉव्हला दिसून आले की, त्याच्या सुरुवातीच्या आक्रमक खेळाला बचावाचे रूप धारण करावे लागणार. त्याला विचाराकरिता जास्त वेळ लागू लागला. धोंडू मात्र त्याची वेळ आली की, पटकन निर्णय घेऊन खेळे.

तिसावी खेळी येऊन ठेपली तेव्हा नोव्हिकॉव्हकडे उंट आणि चार प्यादी तर धोंडूकडे हत्ती आणि तीन प्यादी असे जवळजवळ तुल्यबळ होते. पण नोव्हिकॉव्हकडे वेळ फार थोडा शिल्लक राहिला होता आणि त्याच्याकडून चूक झाली!

वजीर करण्याच्या हेतूने त्याने आपले घोड्यासमोरचे प्यादे एकदम दोन घरे पुढे दामटले. धोंडूने त्याच्या मार्गावर स्वतःचे उंटासमोरचे प्यादे घातले.

पांढऱ्या प्याद्याने त्या काळ्या प्याद्याची कत्तल करून उंटासमोरच्या आळीत प्रवेश केला.

आणि त्या बाजूच्या हत्तीच्या आळीतल्या काळ्या प्याद्याचा मार्ग मोकळा झाला...वजीर होण्यासाठी!

जाणकार प्रेक्षकांनी तोंडात बोटे घातली! साधा पण प्रभावी असा हा हल्ल्याचा प्रकार—पण त्यांच्या कोणाच्याच डोक्यात आला नव्हता!

त्यानंतर अकरा खेळींनंतर नोव्हिकॉव्हने आपली हार मान्य केली. कारण पांढऱ्या राजाची मात अटळ होती!

"कॉँग्रॅचुलेशन्स डेव्हिड! धोंडूने नोव्हिकॉव्हची चांगलीच जिरवली!"

"नाही तर काय! एकापाठोपाठ एक अशा पाच गेम्स हरण्याचा प्रसंग नोव्हिकॉव्हवर कधीच आला नसेल!"

"आणि बुद्धिबळाचे हे नवीन, आक्रमक खेळींचे प्रकार मी तर कधीच पाहिले नव्हते! तू कोणता कानमंत्र धोंडूला दिलास?"

त्या दहा शास्त्रज्ञांची मीटिंग भरली होती आणि प्रत्येकजण डेव्हिडची पाठ थोपटीत होता. पण डेव्हिडची चर्या गंभीर होती.

"मित्र हो! मी धोंडूला कसलाही कानमंत्र दिला नाही. त्याला फक्त बुद्धिबळाचे नियम सांगितले, जिंकण्याकरिता काय आवश्यक असतं ह्याची कल्पना दिली आणि त्यासाठी प्रख्यात बुद्धिबळपटूंनी कोणती धोरणं वापरली होती ही माहिती काही प्रसिद्ध डावांच्या आधारे दिली. त्यानंतर त्याने सर्व निर्णय स्वतः घेतले!"

"उत्तम शिष्य तयार केलास की!" पॅट राव उद्गारले.

"तीच तर मला काळजी वाटते. धोंडू इतक्या लवकर कोणतीही गोष्ट आत्मसात करतोय की, मला आता त्याची भीतीच वाटतेय. माझा तुम्हांला प्रांजळ सल्ला आहे—धोंडूचा नाश करून टाका!"

खोलीत स्तब्धता होती. डेव्हिड पुढे म्हणाला,

"सृष्टीची ही रीतच आहे की, अधिक बुद्धिवान प्राणी कमी बुद्धीच्या प्राण्यावर प्रभुत्व गाजवतो! आजवर मानवानं आपल्या बुद्धीच्या जोरावर पृथ्वीवरील प्राण्यांवर, पक्ष्यांवर राज्य केलं. खुद्द मानवसंस्कृतीत अनेक वेळा

विज्ञान-तंत्र-शास्त्र यांच्या जोरावर अल्पसंख्याकांनी बहुसंख्य जमातींवर राज्य केलं आहे.

हा धोंड्या आपल्यापेक्षा इतका अधिक बुद्धिवान आहे की, एकदा आपल्यावर मात करायचं त्यानं 'डोक्या'त घेतलं तर ते तो शक्य तितक्या डायरेक्ट मार्गानं घडवून आणील ! हा बुद्धिबळाचा खेळ खेळण्यापूर्वीच त्याचा संहार करा !"

"पण आपल्याला त्याच्या डोकेबाजपणाचा उपयोग नाही का करून घेता येणार ? कंप्यूटरचा मानवानं किती फायदा करून घेतला आहे!" पॅट राव.

"पॅट! एक महत्त्वाची गोष्ट तू विसरतोस. धोंडू म्हणजे कंप्यूटर नव्हे! कंप्यूटर स्वतः विचार करीत नाही. आपण सर्व काम निश्चित आखून दिलं की, सांगकाम्याप्रमाणं तो ते करून टाकतो. त्याउलट हा धोंडू स्वतः विचार करतो. नेहमीच तो आपल्या भल्याचं करील असं नक्कीच नाही. तेव्हा त्या भानगडीत पडू नका—त्याचा नाश करा!"

"पण तेच तर शक्य दिसत नाही!" शांत स्वरात जॉन फ्लेमिंगनी उत्तर दिले. "गेले दोन-तीन दिवस पेकेअर आणि मी ह्याच्यावर—अर्थात ह्याच्या छोट्या भागावर—अनेक प्रयोग करून पाहत आलोय. त्याला भट्टीमध्ये टाकलं, त्यातून एक लक्ष व्होल्टचा विद्युत्प्रवाह सोडला, त्याला दाबाखाली ठेवलं, पोकळीमध्ये ठेवलं—किती तऱ्हेचे प्रकार केले! प्रथम तो नष्ट झाल्यासारखा वाटतो—म्हणजे करपलेला किंवा चूर्ण झालेला किंवा मेल्याप्रमाणं शांत दिसतो; पण लवकरच त्याचं पुनरुज्जीवन होतं!"

"आणि त्याचे तुकडे केले तरी प्रत्येक भागात जीवशक्ती आढळते!" पेकेअर म्हणाले. "आम्ही हा तुकडा तपासायला नेला. त्याचे छोटे छोटे भाग केले तरी प्रत्येक भागात मेंदूची क्रियाशीलता होती. तसंच एखादा भाग जाळला किंवा इलेक्ट्रोक्यूट केला तरी त्याचं नूतनीकरण होत राहतं. पृथ्वीवरच्या जीवसृष्टीला जे अजून साध्य झालं नाही ते ह्या जीवनसृष्टीच्या नमुन्यात दिसतं!"

एकंदर बरीच चर्चा झाली. ही नवीन प्रकारची जीवनसृष्टी तपासून पाहावी आणि त्यातून आपल्याला उपयोगी काही सापडते का ते पाहावे, असा फ्लेमिंगचा विचार होता. परंतु डेव्हिडने त्याला कसून विरोध केला.

"नुसता बॅक्टिरिया किंवा एखाद्या निकृष्ट जीवसृष्टीचा हा नमुना असता तर मी नको म्हटलं नसतं; पण इथे प्रकार वेगळा आहे. हा एक विचारक्षम प्राणी आहे. आपल्यापेक्षा किती तरी पटींनी सर्व बाबतींत पुढे गेलेला. बुद्धिबळात त्यानं ज्या शीघ्रगतीनं नैपुण्य हशील केलं त्यावरून हा शिकून लवकर शहाणा होतो हे सिद्ध झालं आहे. अजून इतक्या मोठ्या बुद्धिमत्तेचं स्वागत करायला आपण—म्हणजे आपली मानवजात—योग्य झालेली नाही!"

"एखाद्या जंगली जमातीनं नवागत सुसंस्कृताबद्दल दाखवावी तशी संशयी वृत्ती तू दाखवतो आहेस!"—फ्लेमिंग.

"उपमा अगदी बरोबर आहे!" डेव्हिड म्हणाला, "नवीन आलेल्या गोऱ्या कातडीवाल्यांनी रेड इंडियन्सकडून अमेरिका हस्तगत केली ती कशाच्या जोरावर? त्यांच्याकडे तंत्रज्ञानाचं श्रेष्ठत्व होतं आणि त्याचा वापर आपल्या साम्राज्यवादी धोरणाप्रमाणं करायची पात्रता होती. धोंडूकडे अजून तरी 'हेतू' असा काही नसेल—पण तो त्याच्या मनात येण्यापूर्वी त्याचं उच्चाटन केलेलं बरं!"

"उच्चाटन?" पॅट रावने विचारले.

"नाही तर काय? आपण ह्याचा नाश करू शकत नाही. तो आपल्या-मध्ये राहणं योग्य नाही. तेव्हा त्याला आल्या वाटेनं परत पाठवावं—काही गाजावाजा न करता!"—डेव्हिड.

दीर्घ चर्चेनंतर इतर शास्त्रज्ञांना डेव्हिडचे म्हणणे पटले. रावच्या मनात मात्र काही अज्ञात कारणाने ह्या निर्णयाबद्दल शंका होती. पण त्याने धोंडूच्या उच्चाटनाला संमती दिली. शेवटी चर्चेचा समारोप भडकमकरांनी केला.

"एखादा मीटिओराइट देशाबाहेर पाठवायला बऱ्याच परवानग्या काढाव्या लागतात—आणि आपण तर धोंडूला पृथ्वीबाहेर पाठविणार आहोत. ह्या बाबतीत काही उच्च सूत्रं मला हलवावी लागतील. पण तुमच्या कमिटीनं तसा निर्णय घेतला असल्यास तो 'मिनिट' करून माझ्याकडे पाठवा! मी मग बाकी सर्व ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह भाग निश्चित करतो. पण धोंडूला पृथ्वीबाहेर पाठवायचं कसं? त्याला किती वेळ लागेल?"

"मी 'इस्रो'शी (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशनशी) संपर्क साधतो.

मला वाटतं, रॉकेटची जरूर लागेल; पण पेलोड फार नसल्यानं दोन महिन्यांत काम होईल." शेंगदाणे तोंडात टाकत राव म्हणाले.

परदेशी शास्त्रज्ञ आपापल्या गावी परतले. भडकमकर 'हाय लेव्हल'वरच्या लोकांना गाठून परवानग्या मिळविण्याच्या कामाला लागले. धोंडू मात्र होता तिथेच राहिला कडक बंदोबस्तात.

राव मधूनमधून येऊन धोंडूकडे पाहत—त्यात काही बदल होतो का ते नोंद करण्यास. पण त्याच्यात काही फरक दिसून आला नाही. त्यावर एक काळे आवरण असे आणि तो एका काचेच्या पेटीत बंद असे.

आज मात्र रावना काही तरी फरक जाणवला. नेहमीप्रमाणे ते खोलीत आले तेव्हा धोंडूवरचे आवरण घसरून पडले होते आणि एका बंद खिड-कीच्या फटीतून सूर्यकिरण त्याच्यावर पडत होते. पण त्यामुळे धोंडूत एक प्रकारचा तजेला आलेला दिसत होता.

रावनी आवरण बाजूला केले. मनात काही तरी विचार येऊन त्यांनी खिडकी उघडली. प्रखर सूर्यप्रकाशाने धोंडू न्हाऊन निघाला.

रावना आठवले : धोंडूची कार्यक्षमता प्रकाशाने वाढते. तो रात्री आला तेव्हा करपलेला होता. विसापूरपासून त्यांच्याकडे येईपर्यंत तो बहुतेक झाकलेला होता. पण खुद्द विसापूरलाच तो दुसरे दिवशी उघडा होता आणि तेवढ्या काळात त्याचे नूतनीकरण झाले होते.

"बेट्याला सूर्यप्रकाश मानवतोय!" राव पुटपुटले. त्यांना परत कुठला तरी विचार अस्वस्थ करीत होता. ते धोंडूकडे पाहत राहिले.

धोंडूचा पृष्ठभाग विलक्षण चकाकत होता. त्याचा पृष्ठभाग किंचित वरखाली होतोय असे त्यांना वाटले.

त्यांचे डोके दुखू लागले. धोंडू आपल्याकडे टक लावून बघतोय असे त्यांना वाटले.

"छे छे! काय हा वेडेपणा! धोंडूला डोळे कुठं आहेत?" त्यांनी स्वतःला बजावले. पण हिप्नोटाइझ झाल्यासारखे त्यांना वाटायला लागले.

ते कसेबसे खिडकीजवळ गेले आणि त्यांनी खिडकी लावली. धोंडूवर आवरण टाकायला त्याच्याकडे वळले आणि त्यांच्या मनातला तो अस्वस्थ

करणारा विचार एकदम स्पष्ट झाला. आवरण घालून एकदम ते फोनकडे वळले—भडकमकरांचा नंबर फिरविण्यासाठी. पण त्याआधीच त्यांना घेरी आली.

दोन आठवडे राव बेशुद्ध होते. ते काही काळ झोपेत बडबडल्यासारखे काही तरी बरळत, पण त्यातून कोणाला बोध झाला नाही. अखेर शुद्धीवर आल्यावर त्यांना डॉक्टरांनी काही प्रश्न विचारले. मथरानीसुद्धा शेजारीच होते. पण रावना काहीच आठवत नव्हते.

आणखी दोन आठवड्यांनी मात्र त्यांची स्मरणशक्ती जागृत व्हायला लागली. त्यांना धोंडू आठवला; पण आपण का बेशुद्ध झालो ते आठवत नव्हते. आपण बेशुद्ध स्थितीत सापडलो तेव्हा तेथे काही विशेष आढळले का म्हणून ते विचारीत. पण त्या प्रश्नाचे काही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. मात्र त्यांच्या आजाराचा धोंडूशी संबंध असावा असा भडकमकरांचा अंदाज होता, म्हणून त्यांनी धोंडूला त्यांच्यापासून लांब एका सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्येच बंद केले होते. त्याच्या उड्डाणाची तारीख जवळ आली होती.

राव एक लेक्चर ऐकत बसले होते. सेमिनाररूममध्ये गडद अंधार होता. कारण वक्ता काही स्लाइड्स दाखवीत होता. इतक्यात एक उशिरा येणारा श्रोता दार उघडून आत आला. त्याने दहा सेकंदच दार उघडले असेल; पण तेवढ्यात बाहेरचा प्रकाश आत पडद्यावर पडला. सर्वांनाच तो व्यत्यय जाणवला—पण रावसाहेब डोके गच्च धरून उभे राहिले.

त्यांच्या डोक्यात प्रकाश पडला होता!

ते धावत धावत लेक्चररूमपासून भडकमकरांच्याकडे गेले. भडकमकर कोणाशी तरी फोनवर बोलत होते. खुणेनेच त्यांनी रावना बसायला सांगितले!

"थँक यू व्हेरी मच फॉर युवर कोऑपरेशन! आय विल मेन्शन इट टु द चेअरमन. अँड विश युवर फ्लाइट एव्हरी सक्सेस!"

फोन खाली ठेवून त्यांनी रावकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते; पण राव साहेबांची चर्या पाहून त्यांनी काळजीच्या स्वरात विचारले, "व्हॉट इज द मॅटर, पॅट?"

"धोंडू...तो कुठे आहे? त्याला पाठवू नका पृथ्वीबाहेर!" राव उत्तेजित स्वरात म्हणाले,

"का?" भडकमकरांनी शांतपणे विचारले.

"मला आता आठवलं मी का बेशुद्ध पडलो ते. धोंडूच्या अंगावर सूर्यप्रकाश पडताना मी पाहिला. त्यातला जीव सूर्यप्रकाशावर जगतो—त्याला तेथून ऊर्जा मिळते. त्याला पृथ्वीबाहेर पाठवणं म्हणजे निव्वळ मूर्खपणाचं होईल. पृथ्वीच्या वातावरणाबाहेरील निर्मल सूर्यप्रकाशात तो फारच शक्तिवान होईल...

बेशुद्ध होण्यापूर्वी माझ्या मनात विचार आला की हा एखादा हेर तर नसेल? दुरून कुठून हा आला. आपल्या पृथ्वीवर अवतरला. आपली कुवत त्याने हेरली. आता ही माहिती तो जिथून आला तिथे पुरवणार नाही कशावरून? कदाचित तो पृथ्वीच्या पृष्ठभागावरून हे सिग्नल पाठवू शकला नसता. कारण त्याच्यातून मायक्रोवेव्ह लहरी निघतात आणि त्या वातावरणातून बाहेर जाऊ शकत नाहीत. जर आपणच त्याला वर पाठवलं तर त्याचं सर्वच काम झालं! त्यापेक्षा त्याला पृथ्वीतच पुरून टाकलेलं बरं!

पण हा विचार मनात येताच मला घेरी येऊ लागली. मला वाटतं, धोंडूनंच माझे विचार ओळखून मला घेरी आणली असावी! चला, लवकर इस्रोला फोन करून फ्लाइट कॅन्सल करा!"

राव भराभर आपले विचार बोलून दाखवीत होते; पण भडकमकर मात्र शांत होते.

"मला वाटतं तुम्ही बऱ्याच विज्ञानकथा वाचल्या असाव्यात! अहो, बोलूनचालून धोंड्याचा तुकडा तो! किती त्याला घाबरता! पण फ्लाइट कॅन्सलेशन करून काही फायदा नाही! कारण ती केव्हाच कॅन्सल झाली!"

"मग धोंडू कुठे आहे?"

भडकमकरांनी आपल्या डेस्कवरचा एक टेलेक्स मेसेज हातात दिला :

धोंडू टु बि कॅरीड इन स्पेस-लॅब-७ टु डे.

टेलेक्स इस्रोकडून होता, तारीख कालची होती. राव यांच्या डोक्यात काहीच बोध होईना. भडकमकरांनी खुलासा केला.

"तुमच्या प्लॅनप्रमाणे स्पेशल रॉकेटनं धोंडूला पाठवणं खर्चाचं झालं असतं. आपल्या लॅबला त्याचा बराचसा खर्च सोसावा लागला असता. काल एक स्पेसलॅबमिशन आयतं जाणार होतं आणि त्यात पेलोडला वाव

होता. मी लगेच फायनलाइझ केलं—धोंडूला त्यातून पाठवायचं. मिशन-मधले ॲस्ट्रोनॉट त्याला बाहेर सोडतील!"

आपण किती 'सेव्हिंग' केले याचे समाधान मडकमकरांच्या चेहऱ्यावर झळकत होते. पण राव यांचे तिकडे लक्षच नव्हते. त्यांनी विचारले, "पाहा फोन करून फ्लाइट गेली का—अजून वेळ गेली नसेल!"

"मला नुकताच इस्रोकडून फोन आला. ॲस्ट्रोनॉट्सनी आपलं काम केलं तुम्ही माझ्या ऑफिसमध्ये आलात तेव्हा मी त्यांच्याशीच बोलत होतो!"

रावनी कपाळावर हात मारून घेतला.

स्पेसलॅब–७ मधून इस्रोकडे संदेश येत होता :

"मी ॲस्ट्रोनॉट–१ बोलतोय. नंबर–२ ने नुकताच त्या धोंड्याला बाहेर सोडला...

आता त्याच्यात विलक्षण बदल होत आहेत—सूर्यकिरण पडल्यानं तो फारच चकाकतोय. इतका की आम्ही त्याच्याकडे पाह्यचं टाळतोय...

अरे! आमची अनेक मायक्रोवेव्ह डिटेक्शनची यंत्रं फारच सक्रिय झालेली दिसतात. त्या धोंड्यातूनच ही किरणं निघत आहेत. किरणं अर्सा मेजर (Ursa Major) नक्षत्राच्या दिशेने सोडलेली दिसतात. आम्ही त्या दिशेला गेलो तर आमची डिटेक्टर यंत्रं बंदच पडतील म्हणून आम्ही ती दिशा टाळून स्पेसशिप चालवतो...."

९ पुत्रवती भव

"मौसीजींनी तुम्हांला आत बोलावलंय." सरिताने सांगितल्यावर शरद उठला आणि तिच्याबरोबर आत जायला निघाला.

घरात—आत आणि बाहेर—उत्सवाचे वातावरण होते. अनेक वर्षांनी चार मुलींच्या पाठीवर दीपक पांडेला पुत्रलाभ झाला होता. आज नवजात बालकाचे बारसे व्हायचे होते. घरात बायकांची गडबड चालू होती तर बाहेर दीपक आपल्या मित्रांकडून, परिचितांकडून 'बधाई' घेत होता. शरद हा त्याचा बालमित्र, पण आज त्याची येथे उपस्थिती अनपेक्षित होती. सरकारी कामासाठी—इंटरव्ह्यूचा एक्स्पर्ट म्हणून—तो दोन दिवस अजमेरमध्ये होता. दीपकच्या मुलाच्या बारशाला म्हणून त्याने मुक्काम एक दिवस लांबवला होता. किती आनंद झाला दीपकला त्याच्या भेटीने! शाळेच्या आठवणी, लहानपणच्या मित्रांच्या आणि शत्रूंच्या हकिगती...कितीतरी विषय गप्पा मारायला होते—वेळच पुरेसा नव्हता. त्यांची बडबड चालू असतानाच मौसीजींचे—दीपकच्या आईचे—बोलावणे आले.

"मौसीजींना तुम्हांला काही विशेष सांगायचं आहे. पण उगीच तुम्ही त्यांच्याशी वाद घालू नका." सरिताने हळूच बजावले.

शरदने तिच्याकडे पाहिले. तिचा चेहरा गोरामोरा झालेला दिसत होता. मौसीजी काय सांगणार ह्याची तिला कल्पना असावी. आणि ते आपल्याला अप्रिय वाटणारे असले पाहिजे. मौसीजी कशाबद्दल बोलणार याची त्याला पण थोडी कल्पना आली. त्याच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

घरातील गोंगाटापासून सुरक्षित असलेल्या एकमेव लहानशा खोलीत

मौसीजी बसल्या होत्या. शरदने वाकून नमस्कार केला.

"आओ बेटे! बैठो मेरे पास. कितने दिन के बाद मिल रहे हो!" मौसीजींनी प्रेमाने त्याला आपल्याजवळ गादीवर बसवले. सरिता बाहेर जायला लागली, पण मौसीजींनी तिला पण बसवले. "मला जे काही सांगायचंय ते तुम्हा दोघांच्या हिताचं आहे." त्या हिंदीत म्हणाल्या.

"तुम्ही माझ्या लहानपणापासून माझ्या कल्याणाच्या गोष्टी सांगत व करत आला आहात." शरद त्यांच्या शुभ्र केसांखालच्या भारदस्त चेहऱ्याकडे पाहत म्हणाला.

"हो, पण तू आता लहान नाहीस! मोठा शास्त्रज्ञ झाला आहेस. कशाला ऐकशील ह्या भोळसट म्हातारीचं बोलणं?"

"तुम्ही बेलाशक सांगा. ऐकायला माझी काही हरकत नाही. पण मला पटलं मात्र पाहिजे—"

"अगदी लहानपणीसुद्धा असाच वाद घालायचास तू!" मौसीजी कौतुकाने म्हणाल्या. "मला वाटतं, हाडाच्या शास्त्रज्ञात चिकित्सक वृत्ती जन्मजात असावी."

सरिताने नवऱ्याकडे पाहिले. तिच्या नजरेतली वॉर्निंग शरदने ओळखली. वाद घालायचा नाही...मौसीजी बोलू लागल्या.

"तुला तीन मुली आहेत असं समजलं. सरितानं त्यांचे फोटो दाखवले. सुंदर आणि चुणचुणीत आहेत. मोठी तुझ्यासारखी हुशार आहे असं कळलं. फार आनंद झाला. धाकट्या दोघी जुळ्या आहेत काय? त्या पण बघ नक्कीच मोठ्या झाल्यावर हुशारी दाखवतील. त्यांना का नाही आणलंस?"

"इतक्या लांब तीनचार दिवसांकरता आणणं सोयीचं नव्हतं. त्या मजेत असतील आजोळी." शरदने खुलासा केला. मौसीजींचा रोख कोणीकडे आहे हे त्याने ओळखले. त्या केव्हा मुद्द्यावर येतील याची तो वाट पाहू लागला.

पण त्याला फार थांबावे लागले नाही. मौसीजी लगेच पुढे म्हणाल्या, "आता ह्या सोन्यासारख्या मुलींच्या पाठचा भाऊ नको का?"

शरदकडे उत्तर तयार होते.

"तीन मुलं म्हणजे पुष्कळ झाली. संतति-नियमनाची देशाला—देशालाच

काय, जगाला—अत्यंत आवश्यकता असताना माझ्यासारख्या सुशिक्षित शास्त्रज्ञानं तरी संयम दाखवायला नको का?"

"तुझ्या जुळ्या मुली म्हणजे आपण एकच समजू." मौसीजी पण वाद घालण्यात पटाईत होत्या. "पण ह्या तुझ्या मुली मोठ्या झाल्या की दुसऱ्याच्या घरी जाणार. तुझ्या घराण्याचं नाव पुढं कसं चालणार?"

"आम्ही साने मंडळी म्हणजे कुठल्या सिंहासनावर बसलेलो नाही, की आमचा वंश पुढं चाललाच पाहिजे." शरद शांत स्वरात म्हणाला.

"अरे, पण तुझ्यासारखा जागतिक कीर्तीचा शास्त्रज्ञ—त्याच्या बुद्धीचा वारसा तरी पुढं जायला नको का?"

"मौसीजी, बुद्धीचा वारसा आईवडलांकडून मुलांच्याकडे जातो का, आणि जात असला तर किती प्रमाणात, हे अजून नक्की माहीत नाही. समजा, जात असला तर तो माझ्या मुलींच्याकडे जाईलच. त्यासाठी मुलगा कशाला पाहिजे?"

"तू काही म्हण, पण सध्याची सामाजिक परिस्थितीच अशी आहे की बापाचं नाव मुलगाच चालवतो, मुली नाही." मौसीजी उत्तरल्या.

"नाव चालवण्याला मी महत्त्व देत नाही. माझं नाव जर पुढं टिकून राहायचं असेल तर ते माझ्या कार्यामुळं, संशोधनामुळं राहील. न्यूटन, मॅक्स्वेल, फॅरडे, आइन्स्टाइन, डार्विन...किती तरी शास्त्रज्ञांची नावं अनेक वर्षांनंतर, शतकांनंतर टिकून आहेत ती काही त्यांच्या मुलांमुळं नव्हेत. माझं संशोधन त्यांच्या तोडीचं नसलं तरी माझ्या पश्चात माझं नाव काही वर्षे तरी टिकवू शकेल." शरदच्या स्वरात आत्मविश्वास होता.

"बरं, म्हातारपणची काठी म्हणून तरी मुलाला महत्त्व देशील की नाही?" मौसीजींनी एकदम पवित्रा बदलला.

ह्या प्रश्नाचे उत्तर पण शरदजवळ होते.

"तो जमाना आता जात चाललाय. पाश्चात्त्य देशातलं वारं आता इकडे जास्तच जास्त वाहू लागलं आहे. मला वाटत नाही आणखी तीस वर्षांनी ह्या तुमच्या मुद्द्याला फार महत्त्व राहील. बरं पण मौसीजी, जरी मी तुमचे सर्व मुद्दे मान्य केले तरी तुम्ही ह्याची खात्री देऊ शकाल काय की सरितानं आणि मी परत प्रयत्न केला तर आम्हांला मुलगाच होईल? जर आम्हांला

परत कन्यारत्नच झालं तरी तुम्ही बायकाच परत सरिताकडे पाहून नाक मुरडाल!" जुळ्या मुली झाल्या तेव्हा सरिताला मावश्या-काक्यांनी केलेले 'उपदेश' त्याच्या कानी आले होते. ते आठवले की नेहमी त्याच्या मनाचा जळफळाट होई.

"अरे, त्याचकरता तर मी तुला इकडे बोलावलं." मौसीजी म्हणाल्या, "दीपकला ज्या उपायाचा फायदा झाला तोच तुला पण वापरून पाहायला काय हरकत आहे?"

"दीपकनं कशाचा फायदा घेतला?"

"तो कृष्णानंद स्वामीजींकडे गेला. त्यांनी दिलेल्या प्रसादानं नक्की मुलगा होतो अशी ख्याती आहे. पाहा आज त्यांच्याच प्रसादानं दीपकला पुत्ररत्न लाभलं."

मौसीजींना अगाऊ कल्पना असती तर त्यांनी शरदजवळ हा विषय काढला नसता. अंधश्रद्धा, फलज्योतिष इत्यादींबद्दल त्याच्या मनात विलक्षण चीड होती. वैज्ञानिक दृष्टिकोण प्रत्यक्ष आचरणात आणायचा त्याचा प्रयत्न असे. कुठलीही गोष्ट व्यवस्थित तपासल्याशिवाय मान्य करायची नाही हा त्याचा बाणा होता. मौसीजींच्या सूचनेमुळे त्याच्या मनात किती क्षोभ निर्माण झाला असेल ह्याची सरिताला कल्पना होती. तिने हळूच त्याचा हात दाबला. शरदने स्वतःला आवरले आणि कसेबसे उद्गारला,

"बरं मौसीजी! मी दीपककडून स्वामीजींची माहिती काढीन. आता मला गेलं पाहिजे." त्याने निरोप घेतला. सरिताने वाकून नमस्कार केला तेव्हा मौसीजींनी आशीर्वाद दिला, "पुत्रवती भव!"

शरद आणि सरिता सर्किट हाउसवर पोचले तेव्हा सूर्यास्त होण्याची वेळ झाली होती, पण अजून जेवायला अवकाश होता. जवळच्या अनासागर तलावाशेजारी बांधलेल्या मोगलकालीन बारादरीवर ते फिरायला निघाले. दोघांची मुद्रा गंभीर होती.

"माझ्या आधी तुला मौसीजींनी लेक्चर दिलं असणार!" चेहऱ्यावर उसने हास्य आणत शरद म्हणाला.

"त्यात काही नवीन नाही. मला आता त्याची सवय झाली आहे. मला

वाईट वाटतं की माझ्यामुळं तुला पण हे ऐकावं लागलं." इतर कोणी जवळ नसले की सरिता त्याला एकवचनाने संबोधत असे.

"त्यात तुझा काय दोष? मुलगा होणार की मुलगी हे आई किंवा बाप कोणीच ठरवू शकत नाहीत. आणि त्यातूनही मुलगी होणं म्हणजे दोष आणि मुलगा होणं म्हणजे गुण हे मानायला मी तयार नाही."

"पण समाजाची दृष्टी वेगळी असते. तुझे विचार सयुक्तिक, तर्कसंगत वगैरे वगैरे असले तरी ते सामान्य माणसाला पटतीलच असं नाही. मूल हे आईच्या पोटातून बाहेर येतं—तेव्हा ते कुठल्या प्रकारचं आहे याची जबाबदारी आईवरच टाकण्यात येते. आपल्या रूढींनी ठरवलंय की मुलगा म्हणजे कुलदीपक—महत्त्वाचा—आणि मुलगी म्हणजे 'अर्थो हि कन्या परकीय एव'!" सरिता म्हणाली.

"ज्या देशातील पुराणात गार्गी, सीता, पार्वती अशा स्त्रियांच्या गोष्टी आहेत, जिथल्या इतिहासात जिजाबाई आणि झाशीची राणी ह्यांना गौरवाचं स्थान आहे—जिथे अलीकडे एक स्त्री प्रधानमंत्रीपद मिळवू शकते, तिथे समाजाची दृष्टी ही अशी का असावी?...जाऊ दे! आकाशाचे रंग पाहा किती सुंदर दिसत आहेत." शरदने विषय बदलला.

दोघांच्या येरझाऱ्या चालू होत्या. मनात विचारांचे काहूर माजले असल्याने बोलणे खुंटले होते. अखेर सरिताने मौनभंग केला.

"एक प्रश्न विचारू?"

"विचार."

"विज्ञानाने ह्या शतकात इतकी झपाट्यानं प्रगती केली. खुद्द तुझ्या जीवशास्त्राच्या विषयात महत्त्वाचे शोध लागले. पण आईबापांना आगाऊच होणाऱ्या बालकाचं लिंग ठरवता येईल अशी शक्यता अजून विज्ञानाला निर्माण करता आली नाही का?"

शरद स्तब्ध झाला. सरिताच्या प्रश्नाने त्याच्यापुढे मोठे संकट निर्माण झाले होते.

"चल आपण एका बाकावर बसू." दोघे शेजारच्या पार्ककडे वळले. बाकावर स्थानापन्न झाल्यावर शरदने विचारले, "तू हा प्रश्न का विचारलास? आजच्या अनुभवामुळं?"

"ते कारण असेल. पण नाहीतरी मी तुला हा प्रश्न आज ना उद्या विचारणारच होते. गेले काही दिवस तू झोपेत बडबडत असतोस. मला त्यातलं काही कळत नाही; पण जे काही कानावरून गेलं त्यामुळं मला वाटतं, तुझं अलिकडचं संशोधन ह्या विषयावर चालू आहे. तुला माहीत नसेल, पण मी जवळून पाहतेय—तू गेले कित्येक दिवस तंद्रीत असल्यासारखा वागतोस." सरिता म्हणाली.

"तुला सांगावं की नाही ह्या विचारात अलीकडे मी आहे—पण आता तूच आपण होऊन विषय काढलास म्हणून सांगतो. मात्र मी जे काही सांगेन ते गुप्त राहिलं पाहिजे." शरद म्हणाला.

"बायका गोष्टी गुप्त राखू शकत नाहीत अशा कल्पनेनं तू मला सांगणार नव्हतास का?" हसून सरिताने विचारले.

"नाही! त्या बाबतीत मला तुझी खात्री आहे. माझ्या शंकेचं कारण तुला कळेलच." शरदने आपल्या संशोधनाबद्दल सांगायला सुरुवात केली. "वैज्ञानिक शोध म्हणजे निसर्ग आणि मानव यांच्यात चालू असलेल्या झगड्यातले महत्त्वाचे टप्पे असतात. सृष्टीचे नियम काय आहेत ते शोधून काढायला शास्त्रज्ञ झटत असतात. काही कोडी उकलायला अविरत परिश्रम लागतात तर काही कोडी अचानक उकलतात—तिथे शास्त्रज्ञ अमुक एक गोष्ट शोधतोय अशी परिस्थिती नसते. खगोलशास्त्रज्ञांना 'पल्सार'चा शोध असा अनपेक्षितपणं लागला."

"होय, पण असे शोध लागण्यामागंसुद्धा शास्त्रज्ञाची जागरूकता असते. जॉसलिन बेलनं अंतराळातून येणाऱ्या रेडिओ-लहरींमधली नियमितता जर पाहिली नसती तर पल्सारचा शोध लागला नसता." सरिता वैज्ञानिक नसली तरी तिला आधुनिक वैज्ञानिक प्रगतीची बरीच कल्पना होती.

"मी शास्त्रज्ञाचं श्रेय हिरावून घेत नाही! उलट, अचानक लागणाऱ्या शोधांमागं निसर्गानं किंचित उघडं केलेलं रहस्य—जे इतरांना दिसलं नाही ते—पाहून त्याचा पूर्ण उलगडा करणं ह्यामागंसुद्धा कर्तबगारी असते. मला म्हणायचं होतं की ह्या प्रकारचे शोध बरेच वेळा 'बाय चान्स' लागतात. निसर्गाने शास्त्रज्ञाला दिलेला तो एक बोनस असतो. मला अशा तऱ्हेचा एक बोनस अलीकडे मिळाला."

सरिता स्तब्धपणे ऐकत होती. शरदला काहीतरी महत्त्वाचे सांगायचेय याची तिला जाणीव झाली.

"ह्या विश्वात जीवसृष्टी निर्माण होते हा एक मोठा चमत्कार आहे. सजीव आणि निर्जीव यांच्यातला भेद, वेगवेगळ्या जीवांच्यामध्ये समानतेनं आढळणाऱ्या मूळ गोष्टी, एका पिढीतून दुसऱ्या पिढीत उतरणारे गुणदोष ह्यांबद्दल महत्त्वाचे शोध लागत आहेत. पण अजून अनेक प्रश्न सुटायचे आहेत. तू उपस्थित केलेला प्रश्न हा अशापैकीच समजला जातो.

तुला 'जीन' आणि 'क्रोमोसोम' यांच्याबद्दल माहिती आहेच. X आणि Y तऱ्हेचे क्रोमोसोम लिंग ठरवतात. नर XY चा तर मादी XX ची. नर आणि मादी यांचा संयोग होऊन नवीन जीव निर्माण झाला की तो नरापासून एक X किंवा Y आणि मादीपासून एक X क्रोमोसोम घेतो, आणि त्यानुसार त्याचे लिंग ठरते. प्रत्यक्ष जीवसृष्टीच्या क्षणी हा निर्णय घेतला जातो आणि त्याप्रमाणं आईच्या पोटात वाढणाऱ्या गर्भाचं लिंग ठरलं जातं.

विश्वात स्त्री-पुरुषांची संख्या समान असावी ह्या हेतूनं निसर्गानं हा नियम बनवला असावा. कारण XX किंवा XY ह्या दोन्हीपैकी नवीन अपत्यात कुठला संयोग व्हावा ह्याचा कंट्रोल अद्यापि शक्य झालेला नाही. नाणेफेक केल्यावर छापा किंवा काटा वर असेल त्याचप्रमाणं 'बाय चान्स' XX किंवा XY हा निर्णय घेतला जातो.

ही झाली सृष्टीनं आखून दिलेली परंपरा. तीत ढवळाढवळ करणं अद्याप मानवाला शक्य झालं नव्हतं. समजा, स्त्री-पुरुषांचा संयोग होण्यापूर्वी काही उपायानं पुरुषातल्या X ला स्त्रीतल्या X शी जोडी करू दिली नाही तर नवीन होणारा जीव नक्की XY वाला म्हणजे नर असेल. त्याचप्रमाणे Y आणि X ची जोडी टाळता आली तर XX म्हणजे मुलगी होणार हे नक्की.

हे सैद्धांतिक दृष्ट्या सोपं वाटलं तरी प्रत्यक्षात अतिशय अवघड आहे. कारण आपल्या नियमात ढवळाढवळ होऊ नये म्हणून सृष्टीनं अनेक अडथळे निर्माण केले आहेत. पण दैवयोगानं हे अडथळे पार करून जाण्याची एक गुरुकिल्ली अचानकपणं माझ्या हाती आली.

काही वेगळे प्रयोग करताना मला हा शोध लागला. प्रथम ती एक

अंधुकशी शक्यता वाटली. पण मी हात धुऊन तिच्या मागं लागलो आणि दोन वर्षांच्या प्रयत्नानंतर मला आता यश मिळालंय असं वाटतं. थोडक्यात सांगायचं म्हणजे मी एक असं द्रव्य तयार केलंय की जर योग्य वेळी ते मादीच्या शरीरात घातलं तर त्यामुळं नराकडून येणाऱ्या X चा अवरोध होऊन नवीन जीव XY चा म्हणजे नर असेल. त्याचप्रमाणे हटकून XX म्हणजे मादी निर्माण होईल असं द्रव्य पण तयार करायच्या प्रयत्नात मी आहे, मात्र अजून त्याला काही महिने लागतील."

"पण ह्या द्रव्याचा प्रयोग तू करून पाहिलास?" सरिताने विचारले.

"प्राण्यांच्यावर केला. तो यशस्वी झाला—१०० टक्के! मात्र अजून माणसांवर केला नाही. कसा करायचा हा प्रश्नच आहे. मला स्वतःला जरी त्याबद्दल खात्री असली तरी 'गिनीपिग' व्हायला आपण होऊन कोणतं जोडपं तयार होईल? आपण सृष्टीच्या आखून दिलेल्या कार्यक्रमात ढवळाढवळ करत आहोत याची जाणीव होताच कोणीही असा प्रयोग स्वतःवर करून घेण्याची धास्ती घेईल." शरद म्हणाला.

"तुझी खात्री असल्यास मी हा प्रयोग करून घ्यायला तयार आहे." सरिता शांतपणे म्हणाली, "मला मुलगा हवा म्हणून नाही, तर त्यामुळं संशोधनाला चालना मिळेल म्हणून."

"आता तुझ्या लक्षात आलं असेल मी तुला सांगायला का धजत नव्हतो ते." शरद म्हणाला. "हा प्रयोग एकट्या माझ्यावर करायचा असता तर मी बेलाशक केला असता. पण इथे दोघांचा प्रश्न आहे आणि त्यातूनही हे नवं द्रव्य स्वतःच्या शरीरात घेण्याचं काम मला करायचं नाही. आपण हा प्रयोग केला तर जास्त जबाबदारी तुझ्यावर पडते."

"माझा तुझ्या कर्तबगारीवर पूर्ण विश्वास आहे." त्याच्या बोटांत बोटे अडकवीत सरिता म्हणाली. शरदने कृतज्ञतेने तिचा हात दाबला.

"जर हा प्रयोग आपल्या बाबतीत सफल झाला तर मला तो इतरांच्यावर करायला हरकत वाटणार नाही. कारण शास्त्रीय दृष्टिकोणातून पाहिलं तर एका जोडप्यावरून आपल्याला निष्कर्ष काढता येणार नाही. निदान शंभरपैकी शंभर उत्तरं बरोबर आली पाहिजेत."

"नाव काय ठेवलंयस तुझ्या ह्या शोधाचं?"

"सध्या ते एका बाटलीत असून त्यावर 'फाइव्ह स्टार पॉइजन' असं लिहिलं आहे!" हसून शरद म्हणाला. "उगीच कोणी हात लावायला नको! मासिकपाळी येण्याच्या १६ दिवस आधी ते तुला घ्यावं लागेल. डोस अगदी लहान : एक मिलीलिटरचं इंजेक्शन. औषध दिसायला पाण्यासारखं आहे."

"चला, जेवायची वेळ झाली." सरिता घड्याळाकडे पाहत म्हणाली. ती दोघे बाकावरून उठली. आता अंधार पडला होता आणि पार्कमधले मंद दिवे लागले होते. वर्दळ कमी व्हायला लागली होती.

"अरे ब्रजेश! इकडे कोणीकडे?" शरद एकदम उद्गारला. मंद प्रकाशात त्यांच्या जवळ एक उंच आकृती उभी राहिली होती.

"कंटाळलो घरात बसून. सारखं गाणंबजावणं आणि बायकांचा कलकलाट. नाहीतरी बारशाच्या वेळी काकाला काही महत्त्व नसतंच!" ब्रजेश हा दीपकचा भाऊ होता.

"ये केव्हातरी मुंबईला आमच्याकडे." शरदने आमंत्रण दिले.

"हो, येईनच वर्षभरात केव्हातरी! ह्या अजमेरसारख्या छोट्या गावात माझ्या टॅलेंटला काही स्कोप नाही. माझा मुंबईतला मामा बोलावतोय अनेक दिवसांपासून."

ब्रजेशची टॅलेंट कशामध्ये आहे हे शरदला माहीत नव्हते. फार काय, ब्रजेशच्या कुटुंबीयांना पण हा प्रश्नच होता.

प्रिय शरद,

पुत्रजन्माबद्दल अभिनंदन! मला आमंत्रण पाठवल्याबद्दल धन्यवाद. पण इथल्या परीक्षेच्या भानगडीमुळे मला येता येणार नाही. मात्र ब्रजेश बरेच दिवसांपासून मुंबईला जायचे म्हणतो. त्याच्याबरोबर तुझ्या युवराजासाठी लहानशी भेट पाठवत आहे.

तुझा मित्र
दीपक

ता० क० : तुझ्या मौसीजी फार खूष आहेत. तू कृष्णानंदस्वामींना भेटलास का, म्हणून त्यांनी विचारले आहे! — दी०

शरदने पत्र वाचून सरिताकडे दिले. ताजा कलम पाहून सरिता हसून म्हणाली, "कृष्णानंद नाही तरी शरदस्वामींचा प्रसाद गुणकारी ठरला म्हणायचा! शरद, तुझं अभिनंदन!"

"नाही सरिता, याचं सर्व श्रेय तुलाच दिलं पाहिजे. माझ्यावर विश्वास टाकून तू स्वतःवर प्रयोग करून घेतलास! ही केवढी जोखीम होती याची मला आत्ता कुठे जाणीव होते! काही झालं तरी नैसर्गिक नियमांशी हा नवा खेळ होता. समजा, त्याचे भलते परिणाम झाले असते तर? पण आता मला हा प्रयोग दुसऱ्यांवर करायला भीती वाटणार नाही."

"आणि तुझं दुसरं 'फाइव्ह स्टार पॉइजन' तयार झालं का?" कन्याप्राप्ती करून देणाऱ्या औषधाकडे सरिताच्या प्रश्नाचा रोख होता.

"होय, नुकतंच तयार झालंय; मात्र त्याला मी 'सिक्स स्टार पॉइजन' असं नाव दिलंय. दोन्ही बाटल्या शेजारी शेजारी आहेत." शरद म्हणाला.

इतक्यात फोनची घंटा वाजली.

"कोण, ब्रजेश? पोचलास का इतक्यात मामाकडे?" शरदने फोन घेऊन विचारले.

"होय! उद्या तुझ्या पार्टीला येणारच आहे. पण तेव्हा गडबड असेल. मला निवांतपणं तुझी प्रयोगशाळा दाखवशील का? अर्थात मला काही त्यातलं कळणार नाही! पण उत्सुकता आहे—"

"जरूर, परवा सकाळी ये. शनिवार असल्यानं सुट्टी आहे. मी तुला शांतपणे सर्व दाखवीन." शरदने आश्वासन दिले.

त्यानंतर सोमवारी शरद प्रयोगशाळेत गेला तो एका नव्या उत्साहाने. आज आपल्या शोधाचे प्रयोग इतर जोडप्यांवर करून पाहायचे त्याने ठरवले. अजूनपर्यंत त्याने ह्या शोधाबद्दल आपल्या सहकाऱ्यांना सांगितले नव्हते. पण आज त्याने निवडक लोकांना विश्वासात घेतले. अजून शोधाची वाच्यता करण्यात अर्थ नाही हे त्याचे विधान त्यांना पटले. कारण कुठलाही प्रयोग व्यवस्थित पडताळून पाहिल्याशिवाय त्याचे निकाल ग्राह्य समजायचे नाहीत हे हाडाच्या शास्त्रज्ञांना वेगळे सांगावे लागत नाही.

प्रयोग करून घेण्यास उपयुक्त जोडपी मिळायला त्यांना त्रास पडला नाही. मात्र त्यांनी जमवलेल्या वीसही जोडप्यांना मुलगाच पाहिजे होता.

"तुझ्या 'सिक्स स्टार'ला कोणी गिऱ्हाईक दिसत नाही!" त्याचा एक सहकारी गमतीने म्हणाला.

"मला ती कल्पना होती. पण काही हरकत नाही. निदान फाइव्ह स्टारची चाचणी तर होईल." शरद उद्गारला.

वीसही बायकांना योग्य वेळी फाइव्ह स्टारचे इंजेक्शन देण्यात आले. त्यांना दिवस गेले. शरदचा प्रयोग सुरू झाला. पुढच्या नऊदहा महिन्यांत निकाल लागायचे होते.

"विसांपैकी सोळा तरी मुलगे पाहिजेत—" त्याचे सहकारी म्हणत.

"विसांपैकी वीस मिळाल्याशिवाय मला समाधान वाटणार नाही—इतकी मला खात्री आहे." शरद आपल्या सहकाऱ्यांना ठासून सांगे.

दरम्यान त्याला दीपककडून पत्र आले. ब्रजेश मुंबईहून परत अजमेरला आला नव्हता. सर्व जण काळजीत होते. शरदने ब्रजेशच्या मामाला फोन केला. मामाने सांगितले, "मला पण काल पत्र आलं दीपककडून. त्या दिवशी —शनिवारी, मला वाटतं—तो तुमची प्रयोगशाळा बघून आला. त्याच रात्री तो गुजरात मेलमध्ये बसला. मी त्याला पोचवायला गेलो होते. पण लगेच तो अजमेरला जाणार नव्हता. त्याला गुजरात आणि राजस्थानमध्ये भटकायचं होतं. म्हणून मी फार काळजी करत नाही—आहेच तो भटक्या!"

आपल्या संशोधनात व्यग्र असल्यामुळे शरदने पण फार चौकशी केली नाही.

जसजसे निकालाचे दिवस जवळ यायला लागले तसतसा त्याचा आत्मविश्वास ढासळू लागला. मात्र स्वतःच्या शंका तो फक्त सरिताजवळ बोलून दाखवे.

"मला तुझ्यापेक्षा जास्त खात्री आहे तुझ्या सामर्थ्याबद्दल. हा पाहा माझ्याकडे पुरावा आहे!" सरिताने रांगणाऱ्या प्रकाशकडे बोट दाखवले.

"तो पुरावा शास्त्रीय नाही. 'बाय चान्स'सुद्धा तसं घडलं असेल." शरदने तिला संख्याशास्त्राबद्दल समजावून सांगितले. विसांपैकी दहा मुलगे आणि दहा मुली नैसर्गिक नियमांत काही ढवळाढवळ न करता—बाय चान्स—अपेक्षित आहेत. विसांपैकी अकरा मुलगे, नऊ मुली किंवा बारा मुलगे, आठ मुलीसुद्धा असणे फार असंभाव्य नाही.

“मग विसापैकी किती मुलगे झाले की संख्याशास्त्रज्ञ कबूल करील की इथे नैसर्गिक नियमांपलिकडे काहीतरी घडत आहे?” सरिताने विचारले.

“सोळा किंवा जास्त मुलगे असणे नैसर्गिक दृष्ट्या शक्य असले तरी त्याची संभाव्यता फार कमी म्हणजे एक टक्क्याहून कमी असते. म्हणून संख्याशास्त्रज्ञ म्हणेल की माझ्या प्रयोगातून विसापैकी सोळा तरी मुलगे झाले पाहिजेत.”

हळूहळू निकाल कळू लागले—आणि शरदला आश्चर्याचा धक्काच बसला. कसाबसा त्याने विसावी ‘केस’ सुटेपर्यंत दम धरला.

विसापैकी दहा मुलगे आणि दहा मुली झाल्या होत्या! शरदचा प्रयोग पूर्णपणे फसला होता.

आपल्या सहकाऱ्यांत त्याला तोंड दाखवायला जागा राहिली नव्हती. त्याला नर्व्हस ब्रेकडाउन झाला. डॉक्टरांनी हवापालट करायला सांगितले.

शरद आणि सरिता महाबळेश्वरला एका हॉटेलात आठवडाभर होते. पण शरदला मानसिक विसावा काही मिळत नव्हता. सारखा तो आपले नोटबुक काढून त्यातील फॉर्म्युले तपासून पाही. पण कुठेही चूक दिसत नव्हती.

पण प्रत्यक्षात चूक घडली होती. कुठे?

आणि सरितावर केलेला प्रयोग तरी सफल झाला कशावरून? नैसर्गिक नियमानुसार मुलगा होण्याची संभाव्यता निम्मी असते. त्यामुळेच कशावरून मुलगा झाला नसेल?

त्याचा आत्मविश्वास कुठच्या कुठे उडून गेला होता.

विज्ञानाचे क्षेत्र सोडून दुसरे काहीतरी करावे असे त्याला वाटू लागले. पण आपल्यासारख्या ‘फेल्युअर’ला दुसरे तरी काय जमणार?

सरिता त्याच्या मूड्सना कशीबशी तोंड देत होती. पण तिच्याकडे तरी कुठे उपाय होता?

सहाव्या दिवशी शरदला मुंबईहून ट्रंककॉल आला. त्याचा जवळचा सहकारी नरेश पांडे बोलत होता. फोनवर रिसेप्शन खराब होते, पण नरेश काही कारणाने उत्तेजित झालेला आहे हे शरदला कळले.

“अरे नीट सांग—मला काही कळत नाही.”

"तू आमच्यावर मोठी प्रॅक्टिकल जोक केलीस असं मी म्हटलं असतं—पण तुला स्वतःलाच ती भोवलेली दिसते, तेव्हा तसं नसावं!"—नरेश.

"स्पष्ट बोल—मला कोडी उलगडायला मानसिक शक्ती नाही." शरदने आवर्जले.

"मी काल तुझी फाइव्ह स्टार पॉइजनची बाटली घेऊन नीट तपासली. आतलं लिक्विड ॲनॅलाइझ केलं. हे पूर्वीच करायला हवं होतं—पण तू आम्हांला कोणाला त्याला हात लावू दिला नाहीस. आधी तुला १०० टक्के खात्री स्वतःबद्दल आणि नंतर पार ढेपाळलास! आम्हांला जरा विश्वासात घेतलं असतंस तर..."

"नरेश, तू जवळ असतास तर तुझा खून केला असता मी आत्ता! तुझ्या ॲनालिसिसचा काय निष्कर्ष आला?"

"हे तुझं फाइव्ह स्टार पॉइझन म्हणजे...हा हा हा...म्हणजे, कसं सांगू तुला...शुद्ध पाणी होतं! एच टू ओ."

नरेशचा फोन आल्यावर शरदमध्ये कायापालट झाला. मानसिक दुबळेपणा जाऊन तेथे वेगळीच प्रेरणा निर्माण झाली. त्याने झटपट सरिताला तयार व्हायला सांगितले.

तिला आश्चर्य वाटले, पण नवऱ्यातला बदल पाहून तिला बरे वाटले. पॅकिंग पुरे करून ती तयार झाली.

महाबळेश्वर ते मुंबई कारच्या प्रवासात शरदने तिला नरेशची बातमी सांगितली. म्हणजे प्रयोग फसल्याचे कारण उमगले. पण दुसरे कोडे सुटायचे होते :

त्याने केलेल्या औषधाचे शुद्ध पाण्यात रूपांतर कसे झाले?

केव्हा एकदा प्रयोगशाळेत जातो आणि सर्व तपासणी करतो असे त्याला झाले होते. महाबळेश्वरला जाताना बहुतेक ड्रायव्हिंग सरिताने केले होते. आता परतताना शरद करत होता—अंगात वारे संचारल्यासारखा.

सरिताला घरी पोचवून शरदने प्रयोगशाळेचा रस्ता धरला. नरेशला केव्हा भेटतो असे त्याला झाले होते.

नरेश त्याची वाटच पाहत होता. त्याने नरेशने केलेली पृथक्करणे पाहिली. मग स्वतः तपासणी केली.

फाइव्ह स्टार आणि सिक्स स्टार दोन्हींत शुद्ध पाण्याच्या व्यतिरिक्त काहीही नव्हते.

"नरेश! माझ्या नकळत कोणीतरी हा फरक केला आहे. आता आपल्यापुढे दोन कामं आहेत. एक म्हणजे ही ढवळाढवळ कोणी केली ती शोधून काढणं. दुसरं म्हणजे खरी औषधं पुन्हा तयार करणं."

"तुला पुन्हा तयार करता येतील ?"

"होय! सुदैवाने माझ्या सर्व नोट्स माझ्याकडे आहेत. आठवडाभरात आपण परत औषधं तयार करू शकू. माझ्या मते ते जास्त महत्त्वाचं आहे. पहिल्या कामात किती यश मिळेल शंकाच आहे."—शरद.

शरदचा कयास खरा ठरला. औषधांचे पाण्यात रूपांतर कोणी केले ते कळू शकले नाही. वॉचमन, लॅब-असिस्टंट, सायंटिस्ट—सर्वांना विचारले, पण पत्ता लागला नाही. 'विष आहे—हात लावू नका' म्हटल्यावर कोणी त्या औषधांच्या वाटेला जाणार नाही असे सर्वांचे मत पडले. नैसर्गिक रीत्या ते रूपांतर झाले असावे ही शंका पण शरदने खोडून काढली. त्यातली रसायने त्या प्रकारची नव्हती.

इकडे शरदने पुन्हा ती औषधे बनवून नवीन जोडप्यांवर प्रयोग सुरू केला. पुन्हा वीस जोडपी निवडण्यात आली. मात्र ह्या वेळी शरदमध्ये पूर्वीसारखा वाजवीपेक्षा जास्त आत्मविश्वास नव्हता.

प्रयोग सुरू होऊन नऊ महिने झाले.

"शरद! पाहा तुला प्रतिस्पर्धी निर्माण झालाय." त्याच्यापुढे वर्तमानपत्र सारत सरिता म्हणाली. शरदने ब्रेकफस्ट खाता खाता बातम्यांवर नजर टाकली. सरिताने हसत त्याचे लक्ष एक मथळ्याकडे वेधले : 'मौनीबाबांचा चमत्कार'.

बातमी उत्तरप्रदेशमधील मेरठजवळच्या एका खेड्यातली होती. गेले वर्षभर तेथे मौनी मुनिराज नावाचे एक साधू राहत असून त्यांना एक सिद्धी प्राप्त असल्याची ख्याती होती. त्यांच्या कृपाप्रसादाने भाविकांना इच्छेप्रमाणे पुत्रलाभ किंवा कन्यालाभ होतो असे बातमीदाराने म्हटले होते.

"आपले लोक कशावर श्रद्धा ठेवतील सांगता येत नाही—कसला कृपा-प्रसाद आणि कसली सिद्धी!" शरद स्वतःशी पुटपुटला. पण पुढील भागातील मजकूर वाचून तो स्तब्ध झाला. बातमीदाराने पुढे म्हटले होते :

"इतर चमत्कार करून दाखवणारे बाबालोक आणि साधूलोक शास्त्रज्ञांना आपल्या चमत्कारापासून लांब ठेवतात. मौनीबाबांचे तसे नाही. आपल्या प्रत्येक 'केस'ची हिस्टरी त्यांनी व्यवस्थित लिहून ठेवली असून तिची तपासणी करायचे आव्हान त्यांनी डॉक्टर लोकांना दिले. 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस'ने एक तपासणीपथक पाठवल्याचे कळते. ह्या पथकाने १०१५ केसेस पहिल्या, संबंधित जोडप्यांच्या मुलाखती घेतल्या आणि आपला अहवाल तयार केला आहे. हा अहवाल अद्यापि गुप्त आहे, पण बाबाजींनी १०० टक्के बरोबर यश मिळवले असे त्यात सिद्ध झाल्याचे अनधिकृत रीत्या कळते..."

ब्रेकफस्ट भराभर संपवून शरदने प्रयोगशाळेकडे धाव घेतली. तिथे गेल्यावर ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसला त्याने फोन लावला. त्याच्या चांगल्या माहितीचे डॉ० खन्ना यांच्याशी संपर्क साधला आणि मौनीबाबांच्या सिद्धीबद्दल माहिती विचारली.

"पेपरमध्ये आलेली माहिती बरोबर आहे." डॉ० खन्ना म्हणाले. "मी त्या एन्क्वायरी कमिशनवर होतो. आम्ही सर्व केसेस पाहिल्या—प्रत्येक बाबतीत मौनीबाबा यशस्वी झाले."

"पण त्यांच्या अयशस्वी केसेस त्यांनी लपवल्या असल्या तर?"

"ती शक्यता आम्ही विचारात घेतली. गुप्त पोलिसांची मदत घेऊन आम्ही कसून चौकशी केली. सर्व यशस्वी केसेस बाबाजींच्या खेड्याच्या मझोली गावाच्या आसमंतातल्या आहेत. एखादी जरी केस अयशस्वी असती तरी गावकऱ्यांकडून समजली असती. आम्ही त्या गावच्या जवळचा आणि ५० मैलांच्या अंतरापर्यंतच्या सर्व गावांचा भाग तपासून पाहिला. पण एकही अयशस्वी केस आमच्या आढळात आली नाही." डॉ० खन्ना म्हणाले.

"पण बाबाजींची सिद्धी म्हणजे प्रकार काय आहे?"

"त्यांच्याजवळ एक औषध आहे. त्याचं इंजेक्शन—एक मिलीलिटरचं—बाईची मासिकपाळी येण्याच्या सोळा दिवस आधी तिला दिलं की त्यानंतर अंडं फर्टिलाइझ झाल्यास..."

"पण ते औषध तुम्ही पाहिलंय का ?" शरदची उत्सुकता अनावर झाली.

"ते मात्र बाबाजी दाखवायला तयार नाहीत. आम्ही ते तपासून पाहायला मागितलं आहे. ती तपासणी होईपर्यंत आमचा अहवाल आम्ही प्रसिद्ध करणार नाही."

शरदने फोन खाली ठेवला. आपण तयार केलेले औषध बाबाजींपर्यंत पोचले आणि त्याचा वापर ते करत आहेत याची त्याला खात्री पटली. पण ते त्यांच्यापर्यंत गेले कसे ? आणि ते योग्य प्रकारे वापरायची पद्धत त्यांना समजली कशी ? त्याने तर फक्त सरिताला त्याची माहिती सांगितली होती. तिने कोणाला सांगितले असेल का ? आणि तिचा मौनीबाबांशी संबंध काय ? शरदचे डोके चालेना.

"सरिता ! मी आजच मेरठकडे जाणार आहे—मौनीबाबांना भेटायला." तिच्या चेहऱ्याकडे बारकाईने पाहत शरद म्हणाला.

"मौनीबाबा ?" सरिताने आश्चर्याने विचारले. क्षणभर तिच्या लक्षात आले नाही मौनीबाबा कोण ते. मग तिला आठवले. "आज सकाळी ज्यांची बातमी आली ते ?"

"होय ! मला दाट शंका येते—नाही, माझी खात्री आहे—त्यांनी माझं औषध पळवलं. पण कसं ते मला माहीत नाही."

"पण त्यांना त्याची माहिती कशी मिळाली ?" सरिताने विचारले.

"तेच तर मला कळत नाही. तुझ्याव्यतिरिक्त मी कोणालाही सांगितलं नव्हतं." किंचित थांबून शरदने हळूच विचारले, "सरिता ! चुकून का होईना, पण तू कोणाजवळ त्याबद्दल बोलली होतीस का ? नीट विचार करून उत्तर दे—फार महत्त्वाची गोष्ट आहे ही."

सरिता आत्मविश्वासाने आणि शांतपणे म्हणाली, "मी कोणाजवळही त्याबद्दल बोलले नव्हते...तुझ्याशपथ—देवाशपथ सांगते."

"शपथ घ्यायची जरूर नाही—माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. मात्र ह्या प्रकाराचा छडा लावायला मला मेरठला गेलंच पाहिजे."

शरदने प्रवासाची तयारी केली.

दोन दिवसांनी तो मझोलीला बाबाजींच्या आश्रमाजवळ पोचला. बाहेर तोबा गर्दी होती.

"गर्दी बरेच दिवसांपासून आहे, पण पेपरमध्ये बातमी आल्यापासून लांबून लोक यायला लागलेत." एका मझोलीकराने त्याला सांगितले. "बाबाजी दिवसा मौन पाळतात—फक्त सूर्यास्त झाल्यावर बोलतात. हे लोक फक्त दर्शनाला आलेले आहेत. रात्री तर याहून जास्त गर्दी होणार!"

ह्या गर्दीतून बाबाजींची भेट होणार कशी? त्याच्या माहितीचे तिथे कोणीच नव्हते. वशिला लावायचा तर कोणाचा?

इतक्यात त्याला एक कल्पना सुचली. जर त्याचा तर्क खरा असेल तर ती नक्की यशस्वी होईल.

त्याने एका कागदावर काहीतरी लिहून लिफाफ्यात घालून तिथल्या आश्रमाच्या व्यवस्थापकाला दिले. "अतिशय महत्त्वाची आणि गुप्त गोष्ट आहे! तुम्ही शीघ्र बाबाजींकडे द्या. दुसऱ्या कोणाकडे देऊ नका." त्याने आवर्जून सांगितले.

व्यवस्थापकाने कुरकुरत तो लिफाफा घेतला. त्याच्याखाली ५० रुपयांची नोट होती. तिचा स्पर्श झाल्यावर त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. तो आत गेला आणि थोड्या वेळाने बाहेर आला.

"बाबाजी तुला आज मध्यरात्री भेटतील. मागल्या दाराशी ये. दार बंद असतं, पण तीन वेळा धक्के मारलेस की उघडलं जाईल."

रात्री बरोबर बाराला शरदने मागल्या दारावर तीन धक्के मारले. एका संन्याशाने दार उघडले. 'काही बोलू नको' असे खुणेने सांगून त्याने त्याला एका लहानशा खोलीकडे नेले. आश्रमाच्या मुख्य दाराजवळ गर्दी-गोंधळ चालू होता, पण इकडे सर्व शांत होते.

"आइये! मैं आपका ही इंतजार कर रहा था."

शरदने पाहिले—खोलीच्या एका कोपऱ्यात मृगाजिनावर एक दाढी-मिश्यावाली लांब केसांची व्यक्ती बसली होती. अंगावर भगवी वस्त्रे आणि चेहरा रुबाबदार. शरदने वाकून नमस्कार केला. बाबाजींनी बसायला खूण केली. खोलीचे दार बंद करून त्यांचा हस्तक निघून गेला.

"तुम्ही केव्हातरी येणार हे मला माहीत होतं! पेपर वाचून आलात

ना ?" बाबाजींनी हिंदीत विचारले.

शरदला आश्चर्य वाटले. त्याने पाठवलेला निरोप म्हणजे अंधारात सोडलेला एक बाण होता. तो लक्ष्यावर जाऊन आपटला नक्की! पण लक्ष्य काय आहे हे अजून त्याला कळत नव्हते. मौनीबाबा म्हणजे कोण ?

बाबाजींनी उठून दाराला आतून कडी लावली. खिडकी बंद असल्याची खात्री केली. खोलीत फक्त एका मेणबत्तीचा प्रकाश होता.

"पहचाना मुझे ? " बाबाजींनी हसून विचारले. शरदला काहीतरी ओळखीचे वाटत होते, पण नक्की ध्यानात येत नव्हते.

बाबाजींनी शांतपणे स्वतःच्या पांढऱ्या जटा, दाढीमिश्या बाजूला केल्या.

"ब्रजेश!" शरद आश्चर्याने उद्गारला.

"नकली केस वापरणारा काही मी पहिलाच बाबा नव्हे!" ब्रजेश हसत म्हणाला. "ही बुवाबाजी माझ्या टॅलेंटला योग्य आहे."

शरदच्या डोक्यात प्रकाश पडायला लागला. आपण ब्रजेशला प्रयोगशाळा दाखवली तेव्हा तर त्याने ही अदलाबदल केली नसेल? त्या दिवशी काय काय घडले याचा तो विचार करू लागला...

"मीच मदत करतो तुला आठवायला." त्याच्या मनातले भाव ओळखून ब्रजेश म्हणाला. "तू मला प्रयोगशाळा दाखवलीस आणि आपण बाहेर यायला निघालो. दाराजवळ आल्यावर मी म्हटलं की मी बरोबर आणलेलं एक पुस्तक आत विसरलो...

तू बरोबर यायला निघालास, पण मी नको म्हटलं. तू वॉचमनशी बोलत उभा होतास तोपर्यंत मी जाऊन पुस्तक घेऊन आलो. पण त्याच वेळी बरोबर आणलेल्या दोन बाटल्यांत तुझी औषधं घातली आणि तुझ्या बाटल्या डिस्टिल्ड वॉटरने भरून ठेवल्या. थोडा वेळ लागला हे करायला—पण बाथरूमला जाऊन आल्याची सबब मी सांगितली होती."

शरदला सगळे आठवले. पण अजून प्रश्न सुटला नव्हता.

"कबूल! पण तुला ह्या औषधांबद्दल सांगितलं कुणी? मी तर फक्त सरिताला सांगितलं होतं!"

"सरिताभाभी निर्दोष आहेत. मी सर्व ऐकलं ते तुझ्याकडून!" ब्रजेश म्हणाला.

"माझ्याकडून? केव्हा? कसं?" शरदला फारच आश्चर्य वाटले.

"तुझ्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरं म्हणजे, अनासागरजवळ झाडाआडून! तू सरिताभाभींना सांगत असताना मी जवळ होतो. आधी माझा ऐकायचा विचार नव्हता. पण तू सांगत असलेली माहिती मला फायद्याची होईल असं वाटलं. म्हणून मी तुमच्या बाकामागच्या झाडापलिकडेच उभा होतो." ब्रजेशने कबुली दिली.

शरदच्या डोळ्यांपुढे त्या दिवशीचे दृश्य आले—बारादरी पार्क, बाकावरचे संभाषण आणि नंतर ब्रजेशची अचानक पडलेली गाठ...

"आणि तू माझ्या शोधाचा अशा तऱ्हेने फायदा करून घेतलास!" रुक्षपणे शरद उद्गारला. त्याला आपण केलेल्या प्रयोगाची आठवण झाली, त्यानंतरचा नर्व्हस ब्रेकडाऊन डोळ्यापुढे आला. त्याने थोडक्यात ब्रजेशला हे सर्व सांगितले.

"शरदभाई! मला क्षमा कर. माझ्या कृत्यामुळं तुला विलक्षण त्रास सोसावा लागला." ब्रजेशच्या स्वरात कळकळ होती.

"बरं, झालं गेलं विसरून जा!" शरद उद्गारला. "मला हे सांग की तुझं औषध संपल्यावर तू काय करणार? का पुन्हा माझ्या प्रयोगशाळेत चक्कर टाकणार?"

"त्याची मला काळजी नाही." जटा, दाढीमिश्या परत लावत ब्रजेश म्हणाला. "फाइव्ह स्टार पॉइजन तर नुकतंच संपलं. पण त्याची बाटली पाहा!" ब्रजेशने वस्त्रातून बाटली काढून दाखवली.

बाटली भरलेली होती!

शरदच्या विस्मित चेहऱ्याकडे पाहत ब्रजेश म्हणाला, "तुम्ही शास्त्रज्ञ म्हणजे साधेभोळे असता! अरे ह्या बाटलीत आता फक्त पाणी आहे, पाणी!"

"पण त्यानं तुझा काय फायदा होणार?" शरदला स्वतःच्या अयशस्वी प्रयोगांची आठवण झाली.

"फायदा?" मोठ्याने हसत ब्रजेश उद्गारला, "जोपर्यंत बाहेर भाविक लोकांची गर्दी आहे तोपर्यंत माझा फायदाच फायदा आहे! ऐक. मी माझ्याकडे येणाऱ्या जोडप्याला औषध देतो तेव्हा एक रामनामाचा जप पण देतो. जर तुम्ही सच्च्या दिलानं जप केला तर माझं औषध लागू होईल असं मी त्यांना सांगतो. श्रेय मी घेत नाही. कर्ताकरविता परमेश्वर आहे! अर्थात आत्ता-

पर्यंत तुझ्या औषधानं मिळालेल्या यशामुळं श्रेय मला मिळतंच. यापुढे माझं यश शंभर टक्क्यांवरून पन्नास टक्क्यांवर येणार! हरकत नाही. भाविक जोडप्यांना वाटेल—जर त्यांना यश आलं नाही तर दोष त्यांचा, माझा नव्हे. आपण जप करण्यात हयगय केली असं म्हणून ती जोडपी गप्प बसतील! आणि ज्या पन्नास टक्के जोडप्यांना यश मिळेल ते माझंच गुणगान करणार. तेव्हा तुझ्या औषधाची मला आता जरुरी नाही."

"तुझी टॅलेंट जोरात चालायला लागली आहे!" शरद म्हणाला. जोपर्यंत सामान्य माणसात चिकित्सक बुद्धी नाही, जोपर्यंत तो चमत्कारावर विश्वास ठेवू इच्छितो, तोपर्यंत ही बुवाबाजी चालणारच. दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये!

"एक प्रश्न विचारू?" शरदने एकदम विचारले.

"विचार! पण मला आता भजन करायला गेलं पाहिजे." ब्रजेश उठत म्हणाला.

"तुझ्याकडचं फाइव्ह स्टार पॉइजन संपलं म्हणालास! 'सिक्स स्टार'चं काय झालं?"

"ते कशासाठी आहे हे मला माहीत नव्हतं. पण मी अंदाज केला की ते बहुतेक मुलगी होण्यासाठी वापरायचं असेल. पण ते वापरायचा मला कधी प्रसंगच आला नाही."

"काय म्हणतोस! ह्या एक हजार जोडप्यांपैकी एकालाही मुलगी नको होती?" शरदने आश्चर्याने विचारले.

"एकालाही कन्यारत्न नको होतं! ही तुझी सिक्स स्टारची बाटली परत घेऊन जा." ब्रजेशने त्याच्या हातात ती बाटली दिली आणि तो दार उघडून बाहेर निघून गेला.

शरद सुन्न मनाने कितीतरी वेळ बाटली हातात घेऊन उभा होता.

मुंबईला परतल्यावर महिनाभर शरद प्रयोगशाळेकडे फिरकला नाही. त्याने मोठी सुट्टी घेऊन भारतदर्शन करायची टूम काढली—मुलाबाळांसकट. शाळांना सुट्टी असल्याने त्याच्या प्लॅनमध्ये अडथळा आला नाही. सरिता, मुली, बाळ सर्वांना घेऊन तो ट्रिपला निघाला.

सरिताला त्याच्या वागण्याचे आश्चर्य वाटत होते. अर्थात मौनीबाबांचे रहस्य तिला त्याने आल्यावर सांगितले होते. पण त्याच्या चालू असलेल्या प्रयोगांबद्दल तो इतका उदासीन कसा? आणि तो अधूनमधून असा विचार-मग्न कसा? कोणती नवीन कल्पना त्याच्या डोक्यात घर करत आहे? तिने बरेच वेळा त्याला छेडून पाहिले, पण त्याने दाद लागू दिली नाही. टूर संपवून परत मुंबईला आल्यावर त्याच्या वागण्यात फरक झाला. कुठलातरी गहन प्रश्न सोडवल्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर होते.

दुसऱ्या दिवशी नरेशचा फोन आला: "कॉंग्रेचुलेशन्स! तुझा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला—अगदी विसापैकी वीस मार्क मिळाले. कालच शेवटची केस डिलिव्हर झाली. आता पार्टी केव्हा देणार?"

"पार्टी? जरूर. तुम्हीच ठरवा केव्हा ते." शरदच्या आवाजात काही फारसा उत्साह नव्हता.

"आणि हे सर्व जाहीर केव्हा करायचं? अजून आम्हांला पण तू तुझी ट्रिक सांगितली नाहीस! प्रथम आमच्यापुढे एक सेमिनार दे." 'आम्ही' म्हणजे नरेश आणि त्याचे प्रयोगातले इतर सहकारी.

"विचार करून ठरवू काय करायचं ते. तू मात्र अजून सर्व गुप्त ठेव." शरदने त्याला कटवले.

"नरेशचा फोन होता. प्रयोग शंभर टक्के यशस्वी झाला. पण अजून तूदेखील कोणाला सांगू नकोस." शरदने जवळच उभ्या असलेल्या सरिताला सांगितले.

"पण तू काही आनंदात दिसत नाहीस! ही तुझी डिस्कवरी तू केव्हा प्रसिद्ध करणार?" सरिताने विचारले.

"नाही सरिता! मी आनंदात नाही. प्रयोग सफल झाल्याचं मला समाधान आहे, पण हा शोध मी लावला याचा आनंद नाही. फार काय, हा शोध लागला याचंच मला वाईट वाटतं...आणि मी हा दाबून टाकणार!"

"म्हणजे? मला काही कळतच नाही तुझं काय लॉजिक आहे ते—" सरिता तक्रारीच्या स्वरात म्हणाली.

"लॉजिक स्पष्ट आहे—पण ते खुद्द मलाच दिसायला वेळ लागला. तेव्हा तुला न पटणं साहजिक आहे. जो प्रयोग यशस्वी करण्यासाठी मी गेली काही

वर्षे सतत झटलो तो आता मीच होता की नव्हता करणार! कारण?—अजून हा प्रयोग जाहीर करण्यासारखी परिस्थिती नाही.

मी ब्रजेशला भेटून आलो तेव्हा माझे डोळे उघडले. जाता जाता मी त्याला सहज विचारलं की, त्याच्याकडे आलेल्या किती जोडप्यांनी कन्यारत्नाची मागणी केली? त्यानं उत्तर दिलं—एकानंही नाही!

कल्पना कर! जर सध्याच्या परिस्थितीत हा शोध जाहीर झाला तर त्याचे काय परिणाम होतील? नर आणि नारी यांच्यात समतोल ठेवण्याची निसर्गाची प्रवृत्ती कुठच्या कुठे जाईल. मुलग्यांचं प्रमाण भरमसाट वाढेल आणि त्यातून अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतील. मुलींचं प्रमाण कमी झालं की मानवजातीची पुढची वाढच खुंटेल...कुठलाही सामान्य माणूस स्वतःपुरताच विचार करतो. पण सर्व जनसमुदाय त्याच विचाराचा असला तर असं संकट निर्माण होऊ शकतं. ब्रजेशला त्याच्या खेड्यात हा अनुभव आला."

"पण योग्य नियंत्रणाखाली ह्या शोधाचा उपयोग होणार नाही का?" सरिताने विचारले.

"नियंत्रण! कोण घालणार नियंत्रण? ॲटम बॉंबचा शोध लागला तेव्हा ही नवी भयंकर शक्ती नियंत्रणाखाली राहील असं वाटलं होतं. पण तिचा किती प्रसार झाला ते आपण पाहतोच. शास्त्रज्ञ बरेच वेळा निसर्गानं दडवून ठेवलेली गुपितं शोधण्याच्या मागे असताना, ती गुपितं मानवजातीला पेलतील की नाही याचा विचार करत नाही. 'विद्ययाऽमृतमश्नुते' ह्या सूक्ताचा अर्थ मला आता कुठे कळायला लागला आहे. निसर्गाकडे मानवजातीच्या कल्याणाकरता अनेक गोष्टी आहेत. पण त्या गोष्टी पचायला मानवजातीत मानसिक परिपक्वता पाहिजे. ती नसली तर त्या शोधांनी कल्याणाऐवजी अकल्याणच होईल.

मला लागलेला शोध अचानक लागला. तो ओघाओघाने लागता तर कदाचित पुढल्या शतकात लागला असता. तोपर्यंत मानवजात बौद्धिक दृष्ट्या जास्त परिपक्व झालेली असेल. सध्या ती परिस्थिती नाही."

"मग तू काय करायचं ठरवलं आहेस?" सरिताला शरदचा मुद्दा पटलेला दिसत होता.

"ठरवलं? नाही, करूनच टाकलंय. काल रात्रीच परत आल्यावर मी

प्रयोगशाळेत गेलो आणि माझ्या सर्व नोट्स जाळून टाकल्या. आता माझ्या डोक्याशिवाय त्या शोधाचं सध्या तरी ह्या जगात अस्तित्व नाही!" शरद उद्गारला.

"आणि औषधाच्या बाटल्या?" सरिताने विचारले—पण शरद काय सांगणार याची तिला आगाऊच कल्पना होती.

"त्या उद्या नरेशला ॲनलाइझ करायला देईन. त्याला त्यात सापडेल फक्त शुद्ध पाणी—एच टू ओ!" शरद हसत म्हणाला.

१० / ट्रॉयचा घोडा

जॅक्सनच्या कंट्रोल पॅनलवर लाल दिवा लागला. त्याचबरोबर बीऽऽपबीप-बीऽऽपबीप असा आवाज पण त्याच्या कानात दुमदुमू लागला. कंट्रोलरचे लक्ष वेधून घेण्यासाठी ही 'डबल प्रिकॉशन' होती.

जॅक्सन आपल्या तीन सहकाऱ्यांबरोबर स्पेससेंसर नंबर ६ (SS–6)मधून पृथ्वीभोवती घिरट्या घालत होता. त्यांचे काम होते अंतराळावर पाळत ठेवण्याचे. प्रत्येकाची ड्यूटी होती साडेसहा तासांची. त्यातली पहिली आणि शेवटची तीस मिनिटे दोघेजण असायचे—नवीन ड्यूटीवर आलेला आणि ड्यूटी संपत आलेला. फक्त अनपेक्षित परिस्थितीतच ह्या कार्यक्रमात बदल करायची त्यांना परवानगी होती.

ही परिस्थिती अनपेक्षित होती काय? लाल दिवा आणि तो आवाजाचा सिग्नल याचा अर्थ पृथ्वीच्या आसमंतात एखादी अपरिचित वस्तू आली असणार.

२०५० साली पृथ्वीभोवताली पुष्कळच अंतराळयाने फिरत होती. त्यांपैकी बहुतेकांची नोंद SS अंतराळयानांतील कंप्यूटर-गणकयंत्रांत होती. त्या नोंदी-पलिकडे एखादे यान गवसल्यास तो लाल दिवा लागे आणि तो आवाज सुरू होई. हे सहसा घडत नसले तरी अनपेक्षित नव्हते. कारण वेगवेगळ्या राष्ट्रांची 'गुप्त' याने पण अंतराळात घिरट्या घालत. त्यांची नोंद SS–यानांकडे नव्हती. पण ह्या सर्वांची नोंद पृथ्वीवरील युनायटेड स्पेस फेडरेशन(USF)च्या विशाल गणकयंत्रात केली जाई. ही नोंद गुप्त असून तिची गुप्तता राखण्यासाठी प्रत्येक राष्ट्राने स्वतःचा परवलीचा शब्द (किंवा संख्या) ठरवली होती. त्यामुळे

एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राच्या गुप्त यानांची माहिती मिळत नसे. मात्र ही नोंद गणकयंत्रात केल्याशिवाय कुठल्याही राष्ट्राला आपले गुप्त यान अंतराळात सोडता येत नव्हते—कारण नोंद नसलेले यान जाळून टाकायची USFला परवानगी होती.

जॅक्सनने पृथ्वीवरील गणकयंत्राकडे ह्या अपरिचित यानाची माहिती पाठवली. गणकयंत्राने ताबडतोब तपासणी करून निरोप पाठवला : "ह्या यानाची नोंद आमच्याकडे नाही."

अनपेक्षिताला येथून सुरवात झाली.

जॅक्सनने आपल्या दोघा जागृत सहकाऱ्यांना बोलावले. गुप्ता आणि टाकेनो. SS–6 मधला चौथा प्रवासी नागोव्हिच घोरत पडला होता.

जॅक्सनने त्यांना परिस्थिती समजावून सांगितली. "USFच्या लोकांनी सर्व राष्ट्रांना तातडीचा निरोप पाठवला आहे. हे नोंद नसलेलं यान त्यांचं कोणाचं असल्यास अजूनही त्या राष्ट्राने आपण होऊन कबूल करावं. तसं न झाल्यास पुढची कार्यवाही केली जाईल." जॅक्सनने सांगितले.

"असं अद्याप पूर्वी कधीच झालं नाही. बघू या आपल्याला काय सूचना मिळताहेत—" गुप्ता म्हणाला. जॅक्सननंतर त्याचीच ड्यूटी होती.

सर्वजण उत्सुकतेने वाट पाहत होते.

जिनीव्हामधल्या USFच्या हेडक्वार्टर्समध्ये बाहेरून सर्व कारभार सुरळीत चाललेला दिसत होता, पण आत काय खळबळ उडाली होती याची फक्त निवडक लोकांनाच कल्पना होती. सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींची तातडीने सभा घेण्यात आली.

"मित्र हो! पृथ्वीजवळ एक नोंद नसलेलं यान आलं आहे. त्याची जबाबदारी कुठल्याही राष्ट्राने घेतलेली नाही." अध्यक्ष बोलू लागले. प्रतिनिधींमधली चुळबूळ व पुटपुटणे थांबवून ते पुढे म्हणाले, "नोंदीची पद्धत सुरू केल्यापासून आता तीस वर्षे झाली. सुरवातीला काही राष्ट्रांनी पूर्ण सहकार्य दिलं नाही, पण त्यांना त्याचे दुष्परिणाम भोगावे लागले. त्यांची नोंद नसलेली यानं नष्ट करण्यात आली. तेव्हापासून USFला पूर्ण सहकार्य

मिळालं आहे. गेल्या वीस वर्षांत आजच्यासारखी परिस्थिती उद्‌भवली नाही. तेव्हा ह्या नवीन यानाबाबतीत काय निर्णय घेणं आवश्यक आहे ते आपल्याला ठरवायचं आहे. वेळ मोलाचा आहे."

"हे यान कुठल्या मार्गाने येत आहे आणि कोठवर आलं आहे?" एका प्रतिनिधीने विचारले.

"SS–6च्या माहितीप्रमाणे ते मंगळ आणि पृथ्वी यांच्या कक्षांच्या दरम्यान असून पृथ्वीकडे येत आहे. तुमच्या डेस्कवरच्या टी० व्ही० स्क्रीनवर यानाची कक्षा मी दाखवतो." अध्यक्षांनी ती माहिती पुरवली.

"माझ्या माहितीप्रमाणे आणि अंदाजाप्रमाणे हे यान उद्या चंद्राच्या कक्षेच्या आत येईल आणि दोन दिवसांनी आपल्या SS–यानांच्या कक्षेपर्यंत येईल." एक शास्त्रज्ञ म्हणाला.

"तुमचा अंदाज बरोबर आहे, डॉ० फ्लेमिंग." USFचा सेक्रेटरी कौतुकाने म्हणाला. छोट्या कंप्यूटर्सच्या जमान्यात स्वतःच्या डोक्यात गणित करणारी माणसे अभावाने उठून दिसत. पण डॉ० फ्लेमिंग शंभर वर्षांपूर्वीसुद्धा त्या बाबतीत चमकले असते. सेक्रेटरीने गणकयंत्रावर मिळालेली त्या यानाच्या पुढच्या दोनतीन दिवसांच्या कक्षेची माहिती पुरवली. प्रतिनिधींमध्ये खलबत, वादविवाद सुरू झाले, पण कोणालाच स्पष्ट सूचना करता येत नव्हती. शेवटी डॉ० फ्लेमिंग घसा खाकरून बोलू लागले.

"आपल्यापुढे दोन पर्याय आहेत. नंबर एक म्हणजे एखाद्या अस्त्राने त्या यानाचा नाश करायचा. हा सर्वांत सोपा आणि कमी धोक्याचा आहे. पण माझ्या शास्त्रज्ञवृत्तीला हा तितकासा पसंत नाही. हे यान कुठून आलं, त्यात काय आहे वगैरे माहिती न मिळवता त्याचा नाश करायचा म्हणजे आलेली संधी फुकट घालवण्यासारखे आहे. माझा असा अंदाज आहे की हे यान पृथ्वीबाहेरचं आहे. आपण याचं जरा जवळून अवलोकन करू आणि ते धोक्याचं वाटल्यास ते नष्ट करू. नष्ट करायचा पर्याय सर्वांत शेवटी वापरावा."

"पण अवलोकन करतानाच धोका निर्माण झाला तर?" अध्यक्षांनी बहुतेकांच्या मनातल्या शंकेचा उच्चार केला.

"तो धोका पत्करला पाहिजे." डॉ० फ्लेमिंग म्हणाले. "वेळोवेळी धोके पत्करूनच मानवाने येथपर्यंत मजल मारली आहे. अर्थात जो धोका पत्करायचा

तो डोकं वापरून आणि सावधगिरीनेच. उदाहरणार्थ, ह्या यानाचं रिमोट सेंसिंगने चित्रीकरण करण्यास काय हरकत आहे?"

स्पेस सेंसर खात्याच्या प्रमुखांनी ह्या सूचनेला दुजोरा दिला. सर्वच SS-यानातले लोक धाडसी होते. आपल्याला धाडसाची गोष्ट करून दाखवता येत नाही याचीच त्यांना खंत होती.

भवती न भवती होऊन डॉ० फ्लेमिंग यांची सूचना मान्य झाली.

"भाग्यवान आहेस तू, गुप्ता!" जॅक्सन म्हणाला. "आम्ही आपले बसून घिरट्या घालणार आणि तू मात्र एक्सचे फोटो घेणार!" यानाला एक्स हे नाव देण्यात आले होते.

"अरे हा नशिबाचा खेळ आहे." गुप्ता शांतपणे उद्‌गारला, "एक्सचं चित्रीकरण करायचं ठरलं तेव्हा माझी ड्यूटी होती एवढंच!" त्याने प्रवासाला जायची तयारी केली.

एका स्पेस कॅप्सूलमध्ये त्याने चित्रीकरणाला आवश्यक ते सामान भरले. दोन दिवसांची खाण्यापिण्याची सामग्री भरली. आत्मसंरक्षणाकरता काही शस्त्रे बरोबर घेतली. टाकेनोकडे चार्ज दिला आणि निघाला.

स्पेस कॅप्सूल म्हणजे एक लहानसे हलकेफुलके यान. त्याला फार कमी रॉकेट पॉवर लागायची. एक आठवडाभर प्रवास करण्याइतके इंधन त्यात असे. लहानसहान ट्रिप्सकरता ते वापरण्यात येई. गुप्ताने त्याच्या कंट्रोल-कंप्यूटर-मध्ये एक्सच्या भ्रमणकक्षेची माहिती भरली आणि कॅप्सूल सुरू केले. त्याच्या गणिताप्रमाणे आणखी अठरा तासांनी एक्सशी गाठ पडणार होती. आठ तासांचा गजर लावून मध्ये एक झोप काढण्याची त्याने तरतूद केली...

ठरल्याप्रमाणे एक्स त्याच्या टी० व्ही० स्क्रीनवर दिसू लागले. त्यापासून एक किलोमीटर अंतरावर त्याने कॅप्सूलची दिशा बदलली आणि तेवढे अंतर ठेवून त्याभोवती घिरट्या घालण्याची सोय केली. यान लहानच होते आणि तसले यान पूर्वी कुठेतरी पाहिल्याचे त्याला अंधुकसे आठवले—पण ह्यापुढे स्मरणशक्तीने दगा दिला!

त्याने चित्रीकरणाची सामग्री काढली.

"काय विलक्षण योगायोग!" गुप्ताने पाठवलेली 'चित्रे' पाहत डॉ० फ्लेमिंग उद्गारले. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांकडे वळून पाहिले. "तुम्हांला ओळखता येतं का हे यान?" सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावरील कुतूहल पाहून ते पुढे म्हणाले, "अरे, तुम्ही आजकालची तरुण माणसं—पूर्वीचं साहित्य कधीतरी वाचता का? तसं असतं तर तुम्हांला हा पेच पडलाच नसता! मित्रहो, हे पृथ्वीचंच यान आहे : पायोनियर–१०. १९७२ साली ते पृथ्वीवरून पाठवण्यात आलं.[1] आपलं ग्रहमंडळ ओलांडून ते आकाशगंगेतील इतर ताऱ्यांच्या भागांत गेलं होतं ते आज परत आलं."

"कशाकरता पाठवलं होतं हे यान?" एका सहकाऱ्याने विचारले.

"बुडणाऱ्या जहाजातला एखादा माणूस बाटलीमध्ये कागदावर स्वतःची माहिती व ठावठिकाणा लिहून ती बाटली विशाल सागरात भिरकावून देतो. का? तर दुसऱ्या कोणी ती बाटली पाहून आपला शोध करीत यावं. तसलाच हा प्रकार!" फ्लेमिंगनी लायब्ररीतून पायोनियर–१० च्या माहितीचे कागद काढले आणि ते पुढे म्हणाले, "पाहा हे बाहेरून घेतलेले फोटो मूळ यानाशी किती तंतोतंत जुळताहेत ते. नंतर हे क्ष आणि गॅमा किरणांनी घेतलेले विमानाच्या आतल्या भागाचे फोटो. सर्व सामग्री पायोनियर–१० चीच आहे."

"हा चित्र असलेला फलक कशासाठी?" एकाने विचारले. फ्लेमिंगना वाटत असलेली थरारी आता सर्वांना वाटू लागली.

"बाटलीतल्या माहितीप्रमाणे ह्या फलकावर आपल्या पृथ्वीसंबंधी माहिती 'बायनरी कोड' (म्हणजे १ आणि ० वर आधारलेला गुप्त संदेश) मध्ये दिली आहे. हे पाहा यान निघालं तो आपला ग्रह सूर्यापासून तिसरा. सूर्य कुठे आहे ते पल्सार्सच्या दिशांवरून दाखवण्यात आलंय. पृथ्वीवरचे स्त्री-पुरुष कसे असतात ते दाखवलं आहे." यानावील फोटोमध्ये बरोबर तसाच फलक होता.

"पण हे यान मोठी चक्कर मारून परत येईल अशी सोय करण्यात आली होती का?"

१. पायोनियर–१० हे यान ३ मार्च १९७२ ह्या दिवशी केप केनेडीहून पाठवण्यात आले. ३ डिसेंबर १९७३ च्या सुमारास ते गुरूजवळ होते. आपले ग्रहमंडळ ओलांडून ते दूरवर जावे अशी योजना करण्यात आली आहे.

'मुळीच नाही! म्हणूनच मी प्रथम उद्गार काढले 'योगायोग' म्हणून. पण ती माझी चूक होती! यान परत आलं यात योगायोग नाही." फ्लेमिंग विचार करत म्हणाले.

"म्हणजे?"

"अरे, इतक्या विशाल अंतराळात भिरकावलेलं यान नेमकं परत इकडेच कसं आलं? नक्की ते पाठवण्यात आलं. कुठल्यातरी प्रगत संस्कृतीला ते सापडलं. त्यांनी 'कोड' सोडवून आपला पत्ता लावला आणि आपल्याकडे ते पाठवलंय. जी संस्कृती इतकं करू शकते ती नक्कीच आपल्या किती तरी पुढे असणार. हे यान जसंच्या तसं पाठवण्यात त्यांनी आपल्या मित्रत्वाचा हवाला दिलाय असं मला वाटतं. आपण घेतलेल्या फोटोंच्या नजरेतून यानाच्या अंतरंगाचा कणन् कण दिसत आहे—त्यात कुठलंही शस्त्रास्त्र किंवा धोक्याची वस्तू दिसत नाही. माझी खात्री आहे, पायोनियर–१० जसंच्या तसं परत पाठवण्यात आलंय. तरी तुम्ही यांत्रिक उपकरणांनी हे फोटो पडताळून पाहा. मी एक चार तास झोप काढून येतो." फ्लेमिंगनी गेले चोवीस तास झोप घेतली नव्हती.

चार तासांनी डॉ० फ्लेमिंग डोळे चोळत उठले. त्यांची इच्छाशयनी प्रवृत्ती त्यांना अशा प्रसंगी उपयोगी पडत असे. ऑफिसला जाण्यापूर्वी त्यांनी तोंड धुवून एक कप कॉफी घेतली. ते निघणार इतक्यात त्यांचा दहा वर्षांचा मुलगा टॉम धावत आला.

"डॅडी! 'ट्रोजन हॉर्स' म्हणजे काय? मी एका गोष्टीत ते शब्द वाचले, पण अर्थ कळत नाही."

"त्यामागे मोठी गोष्ट आहे. ती तुला सावकाश नंतर सांगेन. थोडक्यात सांगायचं म्हणजे ट्रॉय शहरावर ग्रीक लोकांनी हल्ला केला होता. अनेक दिवसांच्या वेढ्याला ट्रॉयने तोंड दिलं. शेवटी एक नकली घोडा आक्रमकांनी आत पाठवला. त्याच्या आतून काही शूर लोक गेले. आणि त्यांनी ह्या कपटमार्गाने ट्रॉयमध्ये प्रवेश मिळवला. आणि ट्रॉय पडलं."

"म्हणजे कपटमार्गाने निर्धास्त शत्रूच्या गोटात प्रवेश मिळवण्याच्या साधनाला 'ट्रोजन हॉर्स' म्हणतात ना?" टॉमने विचारले. त्याचे तात्पुरते तरी समाधान झालेले दिसले. "पण सगळी गोष्ट सांगितली पाहिजे बरं का."

"जरूर! उद्याच सांगेन." डॉ० फ्लेमिंग यांचे मन अकारण उद्विग्न झाले होते आणि निराळ्याच मार्गाने धावू लागले होते. ते भरभर ऑफिसकडे गेले.

USF च्या मुख्य 'कॉन्फरन्स रूम'मध्ये प्रतिनिधींची सभा भरली होती. अध्यक्ष बोलत होते. इतक्यात डॉ० फ्लेमिंग तरातरा आत शिरले.

"या डॉ० फ्लेमिंग. अभिनंदन! तुमच्या तोडग्यामुळे आपल्याला पायोनियर–१० परत मिळाला. नाहीतर आपण बिचाऱ्याला बाहेरच जाळून टाकला असता." अध्यक्ष उद्गारले. "आता आम्ही त्याला सन्मानाने परत पृथ्वीवर आणणार आहोत."

"थांबा. तुम्ही माझं ऐकलंत त्याबद्दल आभारी आहे; पण आणखी थोडं ऐकाल तर जास्त आभारी होईन. हे यान पृथ्वीवर आणण्यापूर्वी त्याची संपूर्ण चाचणी घेणं आवश्यक आहे. ज्यांनी हे पाठवलं ते आपले मित्र असतीलच असं नाही."—डॉ० फ्लेमिंग.

"पण तुम्ही स्वतः आणि तुमच्या सहकाऱ्यांनी यांत्रिक उपाय वापरून गुप्तांनी पाठवलेल्या सर्व फोटोंची चाचणी घेतली. त्यांत काहीही वेगळं आढळलं नाही." अध्यक्ष म्हणाले. "तरी पण तुम्हांला आणखी फोटो पाहिजे असल्यास सांगा. गुप्ता अजून यानाभोवती घिरट्या घालतोय."

"नाही, वेगळी चाचणी आवश्यक आहे आणि मी तुमची परवानगी घेण्यापूर्वीच त्याची व्यवस्था केलीय. कारण वेळ मोलाचा आहे. पायोनियर–१० जवळ येत आहे." अध्यक्षांकडे पाहत फ्लेमिंग पुढे म्हणाले, "नुकतीच तयार झालेली इलेक्ट्रॉन बीम फोटोग्राफीची उपकरणं घेऊन मी टाकेनोला तिकडे पाठवलं आहे SS–६ वरून."

"पण त्यातून वेगळं काय दिसणार? फोटो घेण्यासाठी प्रकाशाऐवजी इलेक्ट्रॉन्स वापरायचे इतकंच." एक प्रतिनिधी म्हणाले.

"तसं झालं तर मी पायोनियर–१० हा खराखुरा समजेन. नाहीतर..."

"नाही तर काय?"

"तो ट्रोजन हॉर्स आहे याबद्दल माझी खात्री होईल." डॉ० फ्लेमिंग मिस्किलपणे म्हणाले. ग्रीक पुराणकथा त्यांच्या श्रोत्यांना अवगत नसल्याने त्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल होते.

इतक्यात अध्यक्षांसमोरचा फोन वाजला. त्यांनी रिसीव्हर कानाला लावून काही ऐकले आणि फोन जागेवर ठेवला. ते शांतपणे उद्गारले,

"मित्रहो, टाकेनोचा संदेश आला. त्याने इलेक्ट्रॉन बीम फोटोग्राफीने पुष्कळ फोटो घेतले, पण ते सर्व फोटो ब्लँक आले!"

सर्वांचे डोळे फ्लेमिंगकडे वळले.

"माझा अंदाज खरा ठरला म्हणायचा! ते यान आपण पाठवलेलं नव्हे. ती एक प्रतिकृती आहे, पण अँटी मॅटरची[1]! त्याभोवती कसलंतरी आवरण असावं, त्यामुळे त्याचा आसपासच्या मॅटरशी संबंध येत नाही. हे आवरण कसं केलं असेल ते आपल्या तंत्रज्ञानाला अजून माहीत नाही. पण तसं आवरण तयार करून त्यात मूळ यानाची प्रतिकृती करून पाठवणं हे ज्यांना शक्य आहे ते तंत्रशास्त्रात आपल्या किती पुढे गेलेले आहेत याची कल्पना करावी. प्रकाशाला मॅटर आणि अँटीमॅटर समान तऱ्हेने वागवतात, म्हणून आपल्याला यानाचे आत-बाहेरचे फोटो व्यवस्थित घेता आले. पण इलेक्ट्रॉन बीमला ह्या आवरणातून प्रवेश मिळाला नाही. म्हणून त्याने घेतलेले फोटो ब्लँक आले. इलेक्ट्रॉन मॅटरचे असतात...

मित्र हो, हे यान मित्रत्वाच्या भावनेने खचित आलेलं नाही. तुम्ही त्याचं पृथ्वीवर स्वागत करताना स्वतःचा नाश केला असतात. ते यान उघडलं की मॅटर आणि अँटीमॅटरचा संसर्ग घडून प्रचंड ऊर्जा निर्माण झाली असती— जिच्यापुढे आपली अण्वस्त्रांची ऊर्जा अगदीच तुटपुंजी पडली असती." डॉ० फ्लेमिंग म्हणाले.

"मग ह्या यानाचा नाश कसा करायचा?"

१. मॅटर आणि अँटीमॅटर हे विश्वाचे दोन परस्परविरोधी घटक असतात असे आधुनिक विज्ञान सांगते. प्रकाशाशी दोन्हींची प्रक्रिया सारखीच असते. मॅटरची बनलेली वस्तू आणि अँटीमॅटरची बनलेली वस्तू या दिसायला सारख्याच असतात—त्यांचे भौतिक गुण समान वाटतात. मात्र मॅटर आणि अँटीमॅटर शेजारी आणल्यास एकमेकांचा नाश करून ऊर्जा निर्माण करतात. आपली पृथ्वी किंवा ग्रहमंडळ मॅटरचे आहे. तेथे अँटीमॅटर फार काळ टिकाव धरू शकत नाही.

"ते अवघड नाही. आपण अंतराळातच रिमोट कंट्रोलने हे यान उघडू आणि त्यावर मॅटरचा वर्षाव करू. मात्र हे फार विलंब न करता केलं पाहिजे."

ठरल्याप्रमाणे सर्व घडले. तोतया-यानाचा नाश होताना झालेला प्रचंड स्फोट पृथ्वीवरून भरदिवसा दिसला. सुदैवाने त्याचे दुष्परिणाम जाणवले नाहीत.

"सुटलो बुवा! पृथ्वीला वाचवल्याबद्दल धन्यवाद, डॉ० फ्लेमिंग!" USF चे अध्यक्ष उद्गारले.

पण डॉ० फ्लेमिंग यांची मुद्रा सचिंत होती. अनर्थ टळला खरा, पण ही मिळालेली उसंत तात्पुरती आहे याची जाणीव त्यांना अस्वस्थ करीत होती.

११ नौलखा हाराचे प्रकरण*

शेरलॉक होम्सशी माझी ओळख झाली तेव्हापासून मी त्याच्या कर्तबगारीच्या अनेक गोष्टींची नोंद ठेवली आहे. त्यांतले काही अद्भुत आणि चमत्कारिक किस्से मी वेळोवेळी प्रसिद्ध केले आहेत. त्यांपैकी बहुतेक किश्शांमध्ये होम्सला त्याच्या चातुर्यामुळे यश मिळाले असे दिसून येते. अर्थात गुन्हे सोडवण्यात होम्सचा हात धरणारा कोणी नाही हे जरी मान्य केले तरी त्याला नेहमीच यश मिळाले अशी वस्तुस्थिती नाही. त्याच्या नियंत्रणाबाहेरच्या कारणांमुळे किंवा क्वचित्प्रसंगी त्याच्याच हातून घडलेल्या चुकांमुळे काही केसेसमध्ये त्याला अपयश आले—आणि अशा केसेसच्या नोंदी माझ्याजवळ आहेत. पण न सुटलेल्या गुन्ह्यांच्या गोष्टी सर्वसाधारण वाचकांना आकर्षक वाटत नाहीत आणि म्हणून मी त्या प्रसिद्ध करायच्या भानगडीत पडलो नाही! माझ्या आणि होम्सच्या मृत्यूनंतर मी केलेल्या नोंदी जिज्ञासू अभ्यासकांना पाहायला मिळतीलच.

'अपयश' असा शेरा मारलेली एक फाइल 'नौलखा हाराची केस' ह्या नावावर सापडेल. हा हार कोणी चोरला हे कोडे होम्सला सोडवता आले नाही असे ह्या फाइलवरून वाचकाला वाटेल. पण वस्तुस्थिती तशी नाही! अंदर की बात काय होती हे सांगण्याची मला परवानगी नव्हती, कारण होम्सने आपल्या अशिलाला तसे वचनच दिले होते. बरीच रदबदली केल्यावर घडलेल्या घटनेनंतर नव्वद वर्षांनी म्हणजे १९७८ नंतर ही हकिगत प्रसिद्ध करायला मला परवानगी मिळाली.

* 'The Case of Emerald Nacklace' ह्या गोष्टीचा स्वैर अनुवाद.

खरी हकिगत प्रसिद्ध करायला वेळेचे असे बंधन असणे विलक्षण नसले तरी त्यामागचे कारण मात्र विलक्षण आहे. वास्तविक ही एकंदर हकिगतच इतकी विलक्षण आहे की माझा अजूनही त्यावर विश्वास बसत नाही. पण नव्वद वर्षांनंतर का होईना तिचे प्रकाशन आवश्यक आहे. नाहीतर होम्सने गाठलेल्या कर्तबगारीच्या अत्युच्च बिंदूचे एक उदाहरण पाहायला वाचक मुकतील आणि होम्सच्या कीर्तीला लागलेला अपयशाचा डाग पुसला जाणार नाही.

म्हणून खालील हकिगत १९७८ मध्ये वाचकांच्या हाती पडेल याची मी व्यवस्था करून ठेवत आहे.

जॉन एच० वॉटसन, एम० डी०

१५ मे १८८८

सकाळची वेळ होती, पण सूर्याचा पत्ता नव्हता. रस्त्यावर दाट धुके पसरले होते. वर्दळ कमी होती. मधूनमधून एखाद्या घोडागाडीचा आवाज येत होता. एप्रिलमध्ये इतके दाट धुके लंडनमध्ये पाहिल्याचे मला तरी आठवत नव्हते.

मी ब्रेकफस्ट घेत 'टाइम्स'चा अंक चाळत होतो. बातम्या नेहमीसारख्याच होत्या. बर्मिंघममध्ये झालेले ग्लॅडस्टोनचे भाषण, ब्रिटिश एंपायरच्या काना-कोपऱ्यात घडणाऱ्या घटना, ऑक्सफर्ड-केंब्रिज बोट रेसवरील टीकाटिप्पणी... इतक्यात दोन बातम्यांनी माझे लक्ष आकृष्ट केले. बातम्या एकाच पानावर पण वेगवेगळ्या कॉलममध्ये होत्या. पहिल्या कॉलममधली बातमी होती :

वेस्ट एंडमधल्या हॉटेलात चोरी

(आमच्या खास प्रतिनिधीकडून)

लंडनच्या पिकॅडिली हॉटेलमध्ये एक विलक्षण चोरी झाली. पाचव्या मजल्यावर टोकाच्या खोल्यांत राहणारे भारतातील महाराज रहिमतसिंह यांचा अतिशय किंमती हार चोरीला गेला. हा हार महाराजांच्या खास तिजोरीतून पळवण्यात आला असून हे काम इतके बेमालूम रीतीने करण्यात आले की पोलीस बुचकळ्यात पडले आहेत. चोर बेडरूमच्या खिडकीतून आत आला असावा आणि त्याच मार्गाने परत गेला असावा असा तर्क करण्यात येत आहे, कारण खिडकीची कडी उघडी होती

आणि खोल्यांच्या बाहेरील प्रवेशद्वारावर महाराजांचा खास चौकीदार सतत लक्ष ठेवत होता. हा चौकीदार महाराजांच्या विश्वासातला असून त्याचा ह्या कामात हात असणे शक्य वाटत नाही. हाराची किंमत नऊ लाख पाउंड असावी. तो ज्या तिजोरीत असे तिच्या कुलुपाचे कॉंबिनेशन फक्त महाराजांनाच माहीत होते. महाराज रहिमतसिंह प्रकृती सुधारण्या-करता लंडनला आले होते, पण ह्या चोरीमुळे त्यांची प्रकृती पार ढासळली आहे. मेट्रोपॉलिटन पोलिसांनी मदतीसाठी स्कॉटलंड यार्डला पाचारण केले आहे. तेथील डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर ग्रेग्सन यांनी लवकरच हा गुन्हा सुटेल असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे...

मी मान हालवली. ग्रेग्सनच्या कर्तबगारीबद्दल मला फारशी खात्री नव्हती. त्याचा आत्मविश्वास वाजवीपेक्षा जास्त आहे याचा मला पूर्वी अनुभव होता.

"बरोबर आहे वॉटसन! ग्रेग्सनकडून हा गुन्हा सुटेल असे मला पण वाटत नाही." खोलीच्या दुसऱ्या टोकाकडून आवाज आला.

"होय! तो बढाया पण खूप मारतो." मी उत्तरलो आणि लगेच मला आश्चर्याचा धक्का बसला, "होम्स, तुला कसे कळले मी कसला विचार करत होतो ते?"

"वॉटसन, तुझा चेहरा मला इथून दिसतोय—आणि तो उघड्या पुस्तका-प्रमाणे आहे!" हसून होम्स म्हणाला, "तू उठायच्या आधीच मी पेपर वाचला होता. तुझी नजर कुठे वळते त्यावरून तू कुठली बातमी वाचलीस ते मला कळत होते. बहुतेक जागतिक आणि देशी बातम्या तू वरवर वाचल्यास. माझ्या सहवासामुळे तुला गुन्हेगारीच्या बातम्या वाचायची हौस आहे. तू ती पहिल्या कॉलममधली बातमी बारकाईने वाचून नकारार्थी मान हलवलीस. तेव्हा तुझ्या मनात काय विचार घोळताहेत याचा मला अंदाज करता आला. आहे की नाही सोपी माझी तर्कप्रणाली?"

जादूगाराने आपल्या जादूचे रहस्य सांगितले की ती सोपी वाटते. शेर्लॉक होम्सने मला चकित करण्याचा हा काही पहिलाच प्रसंग नव्हता.

"आता ती आठव्या कॉलममधली बातमी वाच आणि तुझे मत सांग." होम्स पुढे म्हणाला. मी ती बातमी वाचून काढली:

प्रख्यात शास्त्रज्ञ बेपत्ता

४ एप्रिल. लंडनमधले प्रख्यात शास्त्रज्ञ सर जेम्स ब्रॉडस्टेअर्स हे काल रात्री आपल्या प्रयोगशाळेकडे गेले ते तेव्हापासून अद्याप कोणाला दिसले नाहीत. काल रात्री दहा वाजता काही जरुरीच्या कामासाठी म्हणून ते घरातून प्रयोगशाळेकडे जाताना दिसले. आपल्या प्रयोगशाळेत रात्रीअपरात्री जाण्याची त्यांना सवय असल्याने त्यांच्या मुलीने त्यांच्या जाण्याकडे फारसे लक्ष दिले नाही. पण आज सकाळी त्यांचा सकाळचा चहा घेऊन जाणाऱ्या नोकराला ते त्यांच्या खोलीत आढळले नाहीत. फार काय, त्यांच्या बिछान्यात रात्री झोपल्याची खूण नव्हती. प्रयोग-शाळेतही ते आढळले नाहीत. त्यांचा तपास करण्याचे काम पोलिसांवर सोपवण्यात आले आहे. आणि त्यांच्या जीविताबद्दल काळजी व्यक्त करण्यात येत आहे. सर जेम्स हे रॉयल सोसायटीचे फेलो असून ते अलिकडे एका महत्त्वाच्या पण गुप्त शोधावर काम करत असल्याचे समजते...

"तुला काय वाटतं, ह्या दोन बातम्यांचा काही संबंध असेल?" मी होम्सला विचारले. त्याने होकारार्थी मान डोलवली.

"जेव्हा एकाच दिवशी एकाच शहरात दोन विलक्षण घटना घडतात तेव्हा त्यांचा परस्परसंबंध असणं अशक्यप्राय गोष्ट नाही. मी पैज मारून सांगतो की ग्रेगसन ह्याच निर्णयावर पोचेल—पण त्याने लावलेला संबंध चुकीचा असेल."

"मला तर एकच निष्कर्ष काढता येईल आणि तो म्हणजे, ब्रॉडस्टेअर्सनी हिऱ्यांची चोरी केली आणि नाहीसे झाले. पण हे काही खरं वाटत नाही." मी म्हणालो.

"बरोब्बर! पण तुला खरं वाटत नाही ते ग्रेग्सनला खरं वाटेल. सर जेम्स हे प्रख्यात शास्त्रज्ञ असले तरी त्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम नव्हती. त्यांच्या प्रयोगाकरता त्यांनी बरंच कर्ज काढलं होतं. त्यांच्या क्लबातल्या एका मित्राकडून मला हे कळलं होतं. तेव्हा ते आर्थिक संकटात होते यात शंका नाही! ग्रेग्सनला ही माहिती मिळेलच. पण खऱ्या माहितीतून चुकीचा निष्कर्ष काढण्यात ग्रेग्सन पटाईत आहे."

खरा निष्कर्ष काय हे मी विचारण्यापूर्वीच खोलीचे दार वाजले आणि लँडलेडीने एक व्हिजिटिंग कार्ड आणून होम्सकडे दिले.

"तिला आत यायला सांगा." होम्सने सांगितले आणि लँडलेडी बाहेर गेल्यावर ते कार्ड मला दाखवले. त्यावर लिहिले होते : मिस् अमेलिया ब्रॉडस्टेअर्स.

आत येणारी स्त्री वयाने पस्तिशीची असावी. दिसायला नीटनेटकी पण साधेपणाने राहणारी. तिने आम्हा दोघांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहिले. होम्सने स्वतःची आणि माझी ओळख करून दिली.

"वॉटसनची मला नेहमी पुष्कळ मदत होते, तेव्हा तो इथे थांबला तरी हरकत नाही." होम्स म्हणाला. "तुम्ही तुमच्या वडिलांबद्दल मला भेटायला आलात काय? सर जेम्सची मुलगी ना तुम्ही?"

"होय. पण तुम्ही कसं ओळखलं ते मला कळत नाही." अमेलिया म्हणाली. मला मात्र कल्पना होती. पेपरमधली बातमी वाचून होम्सने 'हू ज हू'मधून सर जेम्सची माहिती मिळवली असणार. त्यात त्याच्या अपत्यांची नावे असणार. अमेलिया पुढे म्हणाली, "पण जाऊ दे! आज सकाळीच स्कॉटलंड यार्डचे इन्स्पेक्टर ग्रेग्रसन येऊन गेले. त्यांनी माझ्या वडिलांच्याबद्दल खूप खोदून प्रश्न विचारले—जणू काय ते एक फरारी गुन्हेगार असावेत. अखेर मी त्यांना रागावून विचारलं की 'त्यांचा शोध लावायला मदत करण्याऐवजी तुम्ही त्यांच्यावर कसली तोहमत घेताय का?' तेव्हा ते म्हणाले की महाराजा रहिमतसिंह यांच्या हिऱ्याच्या हाराच्या चोरीशी वडिलांचा संबंध आहे."

होम्सने माझ्याकडे पाहिले. त्याच्या डोळ्यांत गमतीची झाक येऊन गेली असे मला वाटले. पण गंभीर चेहरा ठेवून त्याने विचारले,

"काय म्हणून त्याने हा आरोप केला?"

"कारण त्याला माझ्या वडिलांच्या प्रयोगशाळेत रहिमतसिंहांच्या राजमुद्रेचा एक लिफाफा सापडला. त्यावर माझ्या वडिलांचं नाव होतं."

"असं? मग हे प्रकरण बरंच गुंतागुंतीचं आहे असं दिसतंय." आपल्या बोटांची टोके एकत्र आणत शेरलॉक होम्स उद्गारला.

"मिस्टर होम्स! मी तुमची मदत मागायला आलेय. कृपा करून माझ्या वडिलांचा शोध लावा. निदान त्यांच्यावर हे भलतंच बालंट येत आहे ते तरी

दूर करा! माझी खात्री आहे की ते सुखरूप आहेत आणि निर्दोष आहेत."

"मिस ब्रॉडस्टेअर्स, मी आपल्या परीने सर्व प्रयत्न करीन. पण मला तुमच्या वडिलांबद्दल माहिती पाहिजे. त्यांची प्रयोगशाळा मला पाहिली पाहिजे." होम्स उद्गारला. अमेलियाने आपल्या वडिलांबद्दल थोडक्यात माहिती सांगितली ती तिच्याच शब्दांत देतो.

माझे वडील केंब्रिजमध्ये शिकले. तिथल्या प्रयोगशाळेत त्यांनी भौतिकशास्त्राची दीक्षा घेतली. जेम्स क्लार्क मॅक्स्वेल यांच्या वैज्ञानिक प्रयोगांची जगाला माहिती आहे. माझे वडील मॅक्स्वेलना आदर्श मानीत—त्यांच्यापेक्षा ते काही वर्षांनी लहान होते. पण त्यांची वैज्ञानिक विचारसरणी एका वेगळ्याच दिशेने त्यांना खेचू लागली. मॅक्स्वेलच्या विद्युच्चुंबकीय शास्त्रातून त्यांना अवकाश आणि काळ याबद्दल काही तरी नवीनच सापडले. मला स्वतःचे विचार समजावून सांगायचा त्यांनी तीनचार वेळा प्रयत्न केला, पण माझ्या बुद्धीला त्यामागचे गणित झेपले नाही! फार काय, त्यांच्या शास्त्रज्ञ मित्रांनीही त्यांच्या विचारांची कदर केली नाही. अखेर त्यांनी लंडनला येऊन स्वतःची प्रयोगशाळा थाटली. तिथे त्यांचे स्वतःच्या आवडीच्या विषयावर संशोधन सुरू झाले.

माझ्या वडिलांचा मेंदू एका बाबतीत विलक्षण आहे. एकाच वेळी दोनतीन महत्त्वाच्या विषयांवर संशोधन करणे त्यांना जमते. बाह्य जगात कीर्ती मिळवण्याजोगे त्यांनी संशोधन केले. रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळवली. इतर सन्मान त्यांना मिळाले. पण त्याचबरोबर जगाला माहीत नसलेले त्यांना प्रिय असलेल्या विषयावरचे त्यांचे संशोधन पण चालू होते...

अनेक वर्षांनी नुकतीच त्यांना ह्या संशोधनात सफलता मिळू लागली होती असे त्यांच्या वागण्यावरून मला वाटते. अर्थात मी त्यांना प्रत्यक्ष काही विचारले नाही! पण माझी आई गेल्यापासून मीच त्यांच्या दिनचर्येकडे अनेक वर्षे लक्ष देत आले आहे आणि मला त्यांची मनःस्थिती बरीचशी कळते. गेले कित्येक दिवस ते फार खुशीत आणि उत्तेजित मनःस्थितीत होते. पण मला त्याबद्दल स्वतः ते काहीच बोलले नाहीत.

गेल्या जुलायमध्ये एक विचित्र घटना घडली. ते प्रयोगशाळेत काम करत असताना एक टेलिग्राम आला. मी प्रयोगशाळेच्या दारावर ठोक ठोक केली

पण कोणीच बोलले नाही. टेलिग्राम महत्त्वाचा होता. फार काय, हा टेलिग्राम येईल अशी त्यांची अपेक्षा होती आणि तो आल्यावर तावडतोब त्यांच्याकडे द्यायला मला त्यांनी सांगितले होते. परंतु प्रयोगशाळेत पाय ठेवायला मला मनाई होती. कोणीच तिकडे जायचे नाही असा त्यांचा सक्त नियम होता. आता पंचाईत आली! शेवटी मी मनाचा धडा करून दार उघडले. तो काय आश्चर्य! प्रयोगशाळेत कोणीच नव्हते.

मी त्यांना बाहेर जाताना पाहिले नव्हते—मग ते आहेत कुठे? मी प्रयोगशाळेचे दार बंद करून घरात सर्वत्र शोधले, बागेत पाहून आले; पण ते कुठेच नव्हते. अखेर मी परत घरी येऊन प्रयोगशाळेचे दार ठोठावले... आणि माझ्या वडिलांनी दार उघडले. मला फार आश्चर्य वाटले!

"पंधरा मिनिटांपूर्वी तुम्ही कुठे होता?" मी विचारले.

"इथेच होतो की! तू दार ठोठावलंस का?"

"होय..." मी म्हटले, पण आत डोकावल्याची कबुली देण्याची मला भीती वाटली. ते शीघ्रकोपी होते.

"मी फार कामात गुंतलो होतो, यामुळे मला ऐकू आलं नाही." ते उत्तरले. पण माझे मन मला सांगत होते की ते खोटे बोलत आहेत. मी काही न बोलता त्यांच्याकडे टेलिग्राम दिला.

कॅलिफोर्नियाहून आलेली ती केबल होती. पण ती पाहून त्यांना फारच आनंद झालेला दिसला. मला मात्र त्यातल्या बातमीचा अर्थ लागला नाही. त्यात लिहिले होते:

'ईथरमध्ये पृथ्वीचा वेग माइकेलसन-मोर्ले प्रयोगात मोजता आला नाही.'

सही त्यांच्या एका शास्त्रज्ञ मित्राची होती.

"आता तरी हे ईथरचं वेड सोडून द्या म्हणावं! मी केव्हापासून सांगतोय, पण ऐकून कोण घेतो?"

"कसलं ईथर?" मी विचारले. पण ते आता विचाराच्या तंद्रीत गेले होते.

पुढे ह्याबद्दल ते काही बोलले नाहीत. एकदाच फक्त त्यांनी विचित्र विधान केले, "माझे प्रयोग समजायला शास्त्रज्ञांना दोनशे वर्षे लागतील!"

यंदा मार्चअखेरीस रहिमतसिंह आमच्याकडे आले होते. त्यांची आणि माझ्या वडिलांची पूर्वी केंब्रिजमध्ये ओळख होती. मला वाटते, माझे वडील

विद्यार्थी असताना रहिमतसिंहदेखील त्यांच्या कॉलेजात होते. पण आताची त्यांची भेट ही औपचारिक स्वरूपाची नसून त्यामागे आणखी काहीतरी गूढ असावे. कारण चहापान झाल्यावर दोघेजण बराच वेळ माझ्या वडिलांच्या अभ्यासिकेत दार बंद करून खलबत करत होते.

बेपत्ता होण्याच्या आदल्या दिवशी रात्री माझे वडील फारच विचारमग्न होते. शेवटी झोपायला जाण्यापूर्वी त्यांनी मला बोलावले आणि म्हटले,

"अमेलिया, पुढले काही दिवस चमत्कारिक घटना घडतील, पण तू भांबावून जाऊ नकोस. मात्र जर तुला फारच अस्वस्थता वाटली तर मि० शेरलॉक होम्स यांच्याकडे जा. जे काय घडलं असेल ते त्यांना सांग आणि त्यांची मदत घे. माझा पोलिसांवर विश्वास नाही. माझ्या भवितव्याबद्दल मात्र तू चिंता करू नकोस."

मी त्यांना अधिक खुलासा करायची विनंती केली, पण ते इतकेच म्हणाले, "तुला जितकं कमी माहीत असेल तितकं बरं!"

"आता, मि० होम्स, मी तुमची मदत मागायला आलेय!"

मी होम्सकडे पाहिले. त्याचा चेहरा गंभीर होता, पण डोळ्यांतून एक विशेष चमक दिसून येत होती. त्याच्याकडे पुष्कळ केसेस येत—त्यांपैकी फारच थोड्या, त्याच्या तर्कबुद्धीला चालना देतील अशाच, तो घेत असे. ही केस तो नक्की घेणार असे मला वाटले.

"मिस ब्रॉडस्टेअर्स!" होम्स म्हणाला, "ग्रेग्सनने तुमच्या वडिलांची प्रयोगशाळा पाहिली का?"

"होय! पण त्यांना त्यातून काही उमगलं नाही."

"मी आणि वॉटसन आताच तुमच्याबरोबर येऊन ती प्रयोगशाळा पाहतो. प्रत्येक क्षण मोलाचा आहे." होम्स उद्गारला.

एका घोडागाडीतून आम्ही सर जेम्स यांच्या घरी गेलो. घराभोवती प्रशस्त बाग होती आणि घराच्या वायव्य भागातील कोपऱ्यात प्रयोगशाळा होती. आम्ही तिथे सरळ प्रयोगशाळेकडेच गेलो—मात्र तिकडे जाण्याचा मार्ग घरातूनच होता. प्रयोगशाळेला बाहेरून दार नव्हते. फार काय, खिडक्या पण नव्हत्या. हवा जाण्यास दोन समोरासमोरील भिंतींत वर व्हेंटिलेटर्स होती.

खुद्द प्रयोगशाळेत कागदपत्रे, नाना तऱ्हेची यंत्रे आणि उपकरणे, चार्ट इत्यादी होते. मला त्यातले काही कळत नव्हते. होम्सचेही त्या विषयातले ज्ञान यथातथाच असणार. पण तो सर जेम्स यांनी केलेली टिपणे वाचून पाहत होता.

"मिस ब्रॉडस्टेअर्स, तुमच्या वडिलांचे एकूण एक प्रयोग फक्त याच ठिकाणी चालत असत?"

होम्सच्या प्रश्नाचे अमेलियाला आश्चर्य वाटलेले दिसले.

"अर्थातच! केंब्रिज सोडून इकडे आल्यावर त्यांनी स्वतःच्या नजरेखाली ह्या घराला जोडून ही प्रयोगशाळा बांधली. त्यांचे सर्व प्रयोग इकडेच चालत."

तिचे उत्तर ऐकून होम्सने मान हलवली. पूर्ण समाधान न झाल्याचे त्याच्या डोळ्यांतून व्यक्त होत होते. त्याने परत प्रयोगशाळेची बारकाईने तपासणी केली आणि तो विचारात गुंतला.

काही मिनिटे स्तब्धता होती. आणि एकाएकी होम्सच्या चेहऱ्यावर स्मित झळकू लागले. आम्हांला तिथेच थांबायला सांगून तो बाहेर पडला आणि काही मिनिटांनी परत आला.

"छे छे वॉटसन! इतका कसा मी बुद्दू? तू आणि मिस ब्रॉडस्टेअर्स ड्रॉइंगरूममध्ये बोलत बसा. मी काही वेळाने येऊन तुम्हांला बोलवीन."

"माझी तुला मदत नको का?" मी विचारले.

"होय वॉटसन, तुझी मदतच मी मागतोय!" होम्स म्हणाला, "पण त्यासाठी तू काही वेळ इथे नसणं हेच योग्य आहे."

नाइलाजाने मी बाहेर गेलो. ड्रॉइंगरूममध्ये आमच्या गप्पा चालू असतानाच होम्स तिथे आला. तो फार खुशीत होता.

"वॉटसन आणि मिस ब्रॉडस्टेअर्स! आपण जुलायमध्ये घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती करू या. मी प्रयोगशाळेचं दार आतून लावतो. तुम्ही ते बाहेरून ठोठावा. जर मी उत्तर दिलं नाही तर आत प्रवेश करा."

होम्सने प्रयोगशाळेचे दार आतून बंद केले. त्याने सांगितल्याप्रमाणे आम्ही त्यावर ठोकठोक केली. आतून उत्तर आले नाही. अखेर आम्ही दार उघडून आत शिरलो.

प्रयोगशाळेत होम्सचा पत्ता नव्हता!

आम्ही दोघांनी पुष्कळ शोधले, पण तिथे माणूस लपण्याजोगी जागाच नव्हती. मी होम्सला हाका मारल्या. पण काही उत्तर आले नाही.

"होम्सला जादू येते हे मला माहीत नव्हतं—" मिस ब्रॉडस्टेअर्सकडे हताशपणे पाहत मी उद्‌गारलो. आम्ही दोघे प्रयोगशाळेच्या दाराकडे पाहायला लागलो—आम्ही आत शिरलो तेव्हा तर तो निसटला नाही? पण ते कसे शक्य आहे?

"इथे जादूटोणा काही नाही!" एकाएकी मागून आवाज आला. होम्स भिंतीशी टेकून उभा होता! त्याच्या चेहऱ्यावर मिस्किलपणाची झाक होती.

"अरे, तू एकदम कुठून आलास?" मी विचारले.

होम्सने काही न बोलता हाताने भिंतीवर एके ठिकाणी दाबले. त्याबरोबर भिंत सरकून एक लहानशी खोली दिसली.

"प्रयोगशाळेची लांबीरुंदी आतून आणि बाहेरून सारखी नव्हती हे जेव्हा माझ्या लक्षात आलं तेव्हाच मी ओळखलं की एखादी गुप्त खोली येथे असणार."

आम्ही त्या गुप्त खोलीत शिरलो. एक लहानसा जिना तळघराकडे जात होता. तळघर बरेच प्रशस्त होते. तेथेदेखील यंत्रे आणि उपकरणे होती.

"सर जेम्स यांचं गुप्त संशोधन इथेच चालत असणार. वरच्या प्रयोगशाळेत मला त्याबद्दल काहीच दिसलं नाही तेव्हा मला शंका आली. मिस ब्रॉडस्टेअर्सना मी विचारलं तेव्हा त्यांना पण ह्या प्रयोगशाळेशिवाय दुसऱ्या कुठल्या ठिकाणी सर जेम्स यांचं संशोधन चालू असेल याची कल्पना नाही असं कळलं." होम्स म्हणाला.

"मग मी दार ठोठावलं ते त्यांना खाली असल्यामुळे ऐकू आलं नसावं. मी दारातून डोकावले तेव्हा ते वर नव्हते."

अमेलियाचा तर्क मलाही पटला. पण होम्सची चर्या गंभीर होती.

"तो तर्क बरोबर असता तर बरीच समस्या सुटली असती. पण वस्तुस्थिती तशी नाही. मी खाली असतानासुद्धा तुम्ही ठोठावल्याचा आवाज मला स्पष्ट ऐकू आला. सर जेम्सनी मुद्दाम तशी सोय केली आहे. तेव्हा मला असं वाटतं की तुम्ही त्या दिवशी दार ठोठावलंत तेव्हा ते वरच्या प्रयोगशाळेत नव्हते तसे खाली पण नव्हते."

"मग ते होते तरी कुठे?" मी विचारले.

"तेच तर आपल्याला शोधायचे आहे." होम्स म्हणाला. "मिस ब्रॉडस्टेअर्स, मी आता तुमचा निरोप घेतो. वॉटसन, आता आपल्याला पिकॅडिली हॉटेलकडे चक्कर टाकली पाहिजे."

पिकॅडिली हॉटेलमध्ये आम्ही महाराज रहिमतसिंहांच्या स्वीटमध्ये गेलो. पण दाराशीच आम्हांला अडवण्यात आले. "महाराज फार आजारी असून ते कोणाला भेटणार नाहीत." त्यांचा सेक्रेटरी म्हणाला.

होम्सने स्वतःचे कार्ड काढून त्याच्या उलट्या बाजूस काहीतरी लिहून ते एका लिफाफ्यात बंद करून सेक्रेटरीला दिले.

"कृपा करून हे पत्र महाराजांना द्या. ते फार महत्त्वाचं असून फक्त त्यांच्याच नजरेला पडावं."

कुरकुरत सेक्रेटरी ते पत्र घेऊन आत गेला. काही मिनिटांनी बाहेर आला तेव्हा त्याच्या वागणुकीत विलक्षण फरक पडलेला होता.

"मि० होम्स! महाराजांनी तुम्हांला ताबडतोब भेटायला बोलावलंय." तो अत्यंत आदबीने उद्गारला.

अर्थात होम्सबरोबर मला पण प्रवेश मिळाला. महाराज एका तक्याला टेकून बसले होते. जवळ हुक्का होता, पण वापरण्याच्या स्थितीत नव्हता.

"मि० होम्स, मी तुमचं नाव बरेच वर्षांपासून ऐकतोय. माझे मित्र विशालपूरचे महाराज तुमची फार आठवण काढतात."

"त्यांचं एक लहानसं काम मी करून दिलं होतं." होम्स उद्गारला.

"'लहानसं' असं म्हणण्यात तुमचा निगर्वीपणा दिसून येतो. पण महाराज राममोहनसिंह यांच्यावरचं मोठं संकट त्यामुळे टळलं. असो. तुम्ही माझ्याकरता काय बातमी आणली आहे सर जेम्सकडून?"

"सर जेम्स तुमचं काम पुरं करायला गेले आहेत. काळजी करू नका— हा त्यांचा तुम्हांला निरोप आहे."

मी होम्सकडे आश्चर्याने पाहिले. सर जेम्स ह्याला भेटले केव्हा आणि हा निरोप त्यांनी दिला केव्हा? पण होम्सच्या चेहऱ्यावर गांभीर्य होते. हा थाप काही मारत नसावा.

महाराजांच्यावर त्या निरोपाने मात्र विलक्षण परिणाम झालेला दिसला. ते उद्गारले "सर जेम्सवर माझा पूर्ण विश्वास आहे. ते नक्की आपलं काम पुरं करतील. मि० होम्स, हा निरोप आणल्याबद्दल मी फार आभारी आहे. मी तुम्हांला काही मदत करू शकतो का?"

"मला नाही तरी माझ्या अशिलाला तुमची मदत होईल. सर जेम्सची मुलगी माझी मदत मागायला आली. तिच्या वडिलांनी तुमचे दागिने पळवले असा पोलिसांना संशय आहे. फक्त तुमच्या खुलाशाने तो संशय दूर होईल. माझ्या तर्काप्रमाणे तुम्ही तो हार आपण होऊन सर जेम्सना दिलात आणि चोरी झाल्याचं आणि स्वतः आजारी पडल्याचं नाटक करत आहात." होम्स शांतपणे म्हणाला.

महाराजांच्या चेहऱ्यावर एक रागाची छटा येऊन गेली. त्यांना आपण खोटे बोलतो हा आरोप आवडला नाही. पण त्यांनी स्वतःला सावरले आणि सौम्य स्वरात ते उद्गारले, "मी० होम्स, माझ्या राज्यात माझ्यावर असा आरोप केलेला मला खपला नसता...पण तुम्हांला थोडा तरी खुलासा करणं आवश्यक आहे" असे म्हणून महाराज पुढे म्हणाले, "होय, एका अर्थी तुम्ही म्हणता ते खरं आहे. पण मी करतोय ते नाटक सर जेम्सच्या संमतीनेच करतोय. ह्यामागची भूमिका अशी : माझ्या दोन राण्या आहेत. मोठ्या राणीचा मुलगा माझ्या मागे माझ्या इस्टेटीचा मालक होणार. परंतु त्याच्या अंगचे दुर्गुण पाहून मला माझ्या राज्याची फारशी शाश्वती दिसत नाही. तो उधळेपणा करून सर्व पैसा खर्च करून कर्जबाजारी होणार हे मला डोळ्यांपुढे दिसतेय. पण माझा इलाज नाही. त्याला मी वारस-हक्कापासून दूर करू शकत नाही. ब्रिटिश पोलिटिकल एजंटाबरोबर त्याचं संगनमत आहे. त्याउलट माझ्या धाकट्या राणीचा मुलगा सुशील असून कर्तबगार आहे. राजाश्रयावर अवलंबून न राहता तो स्वतःच्या पायावर उभा राहू शकेल याची मला खात्री आहे. पण माझ्यातर्फे त्याला काहीतरी मदत व्हावी असं मला वाटतं—त्याला नाहीतर त्याच्या वंशजांना. पण ते वाटतं तितकं सोपं नाही...

मी जर माझ्या मृत्युपत्रात त्याला काही ठेवलं तर त्याबद्दल कोर्टात विरोध करायला माझा मोठा मुलगा कमी करणार नाही. माझे वकील—

फॉस्टर-फॉस्टर-फॉस्टर-बटरवर्थ अँड फॉस्टर—यांनी ह्या बाबतीत उद्‌भवणारे अनेक धोके माझ्या निदर्शनास आणले. मी जिवंत असताना याला मोठी संपत्ती दिली तरी मोठ्या मुलाच्या कारस्थानांमुळे ती धाकट्याकडे टिकून राहील असं वाटत नाही. मी महाराजा असलो तरी नावाचाच! माझी सत्ता घरातही चालत नाही!

मी माझा हा प्रश्न सर जेम्सपुढे उपस्थित केला. आम्ही दोघं कॉलेजात एकत्र होतो तेव्हा जिवश्चकंठश्च मित्र होतो. तसंच सर जेम्सच्या उमद्या स्वभावाबद्दल आणि खरेपणाबद्दल मला आदर वाटतो. माझ्या मोठ्या मुलाच्या नकळत आणि सार्वभौम ब्रिटिश सरकारपासून गुप्त ठेवून मला काय करता येणं शक्य होतं?

बराच वेळ विचार करून सर जेम्सनी पृच्छा केली: माझ्याकडे देण्या-जोगी लहान आकाराची पण किंमती वस्तू कोणती आहे? माझ्या डोळ्यांपुढे माझ्याकडे असलेला एक अतिशय किंमती हार आला. 'हा हार नव्वद वर्षांनी तुमच्या छोट्या मुलाच्या वंशजांकडे पोचवायची मी हमी देऊ शकतो—अर्थात ते वंशज हयात असले तर.' सर जेम्स उद्‌गारले. पण इतकी वर्षे त्या हाराच्या सुरक्षिततेबद्दल काय व्यवस्था करता येईल हा प्रश्न मी करताच सर जेम्स म्हणाले की तो प्रश्नच उद्‌भवणार नाही!"

"याचा अर्थ काय?" होम्सने प्रथमच प्रश्न केला.

"ते मला माहीत नाही. आणि सर जेम्सनी त्याचा खुलासा केला नाही. मी तो हार सर जेम्सकडे द्यायचा, नंतर तो चोरीला गेल्याचं नाटक करायचं आणि तो हार सुरक्षित स्थळी पोचल्याचा निरोप आल्यावर पुढची कामगिरी करायची हे आमचं ठरलं आहे. ही पुढची कामगिरी काय याची मला तूर्त वाच्यता करता येणार नाही." महाराज म्हणाले. "पण त्यामुळे सर जेम्सवर आळ घ्यायचं कारण राहणार नाही याची मी खात्री देतो."

"इन्स्पेक्टर ग्रेगसन आपल्याकडे आलेले दिसतात." घर जवळ येताच होम्स उद्‌गारला. "बराच वेळ वाट पाहत असणार!"

"तू कसं ओळखलंस?" मी होम्सला विचारले.

"तुला माझी पद्धत माहीत आहे—ती वापर." होम्स उद्‌गारला. पण

मला काही ते जमेना. अखेर तो म्हणाला, "घरापुढे रस्त्यात घोडागाडी बराच वेळ उभी असल्याची चिन्हं आहेत—चाकांचे छाप आणि घोड्यांच्या टापा पाहा. शिवाय फूटपाथवर पोलिसी छापाच्या बुटांच्या खुणा आहेत. कोणी तरी पोलिस कॉन्स्टेबल इथे बराच वेळ उभा होता. शेजारून आपल्या घरात शिरलेल्या पावलांचे ठसे आहेत. ती पावलं परत बाहेर येऊन आत गेली. म्हणजे आतल्या माणसाने कॉन्स्टेबल आणि गाडी परत पाठवली; त्या अर्थी तो बराच वेळ वाट पाहून दमला असेल. कॉन्स्टेबलवर इन्स्पेक्टर असू शकेल. सध्या आपण पाहत असलेली केस इन्स्पेक्टर ग्रेग्सनकडे आहे. शिवाय हे पावलाचे ठसे माझ्या माहितीप्रमाणे ग्रेग्सन घालतो त्या बुटांचे आहेत... काय, आहे की नाही माझा निष्कर्ष बरोबर?"

"होय, तुझी तर्कप्रणाली आता सोपी वाटते." मी नेहमीप्रमाणे उद्गारलो.

आत ग्रेग्सन वाट पाहत होता. आम्हांला पाहताच तो उठून उभा राहिला. त्याला बसवत होम्स म्हणाला, "काय, सर जेम्सचा पत्ता लागला का?"

"छे! मी सर्व किनाऱ्यांवर पाळत ठेवली आहे. कुठल्याही बोटीने तो देश सोडून जाणं शक्य नाही!" ग्रेग्सन उद्गारला, "पण प्रकरण जास्त गहन वाटतंय."

"का बाबा? मला वाटलं तू आता ते सोडवत आणलं असशील."

होम्सच्या बोलण्यातला उपरोध ग्रेग्सनच्या लक्षात आला नाही. तो म्हणाला, "मी महाराज रहिमतसिंहांच्या सर्व नोकरांची कसून उलटतपासणी घेतली. विशेषकरून त्यांच्या सामानावर लक्ष ठेवणाऱ्या मॅनेजरला बरेच प्रश्न विचारलं. त्याच्या आठवणीप्रमाणे तो हार ह्या देशात आलाच नाही."

"म्हणजे हार चोरीला गेला की नाही हीच तुला शंका वाटते?"

"होय! फक्त महाराज म्हणाले म्हणून आम्ही तसं गृहीत धरलं. मी भारतात चौकशी करायला धागेदोरे हलवत आहे. तो बोटीवर वाटेत हरवला असण्याची पण शक्यता विचारात घ्यायला पाहिजे."—ग्रेगसन.

"तसं असलं तर सर जेम्स यांचा ह्याच्याशी काहीच संबंध लागत नाही." होम्स म्हणाला.

"होय, म्हणूनच मी बुचकळ्यात पडलोय—" ग्रेग्सनला होम्सची मदत तर पाहिजे होती, पण तसे म्हणवत नव्हते.

शेवटी होम्सच म्हणाला, "मला अजून ह्या प्रकरणावर विचार करायला वेळ मिळाला नाही. काही सुचल्यास मी तुला अवश्य कळवीन. पण तू महाराजांच्या खाजगी डॉक्टरांना भेटलास का?"

"ते कशाला?"

"म्हणजे महाराज किती आजारी आहेत ते कळेल. आणि ग्रेग्सन! उगीच समुद्रकिनाऱ्यावर फार वेळ खर्च करू नकोस! मला खात्री आहे, सर जेम्स ह्या देशातून बाहेर गेलेले नाहीत."

ग्रेग्सन गेल्यावर होम्स बराच वेळ विचारात मग्न होता. मी माझ्या काही कामांसाठी बाहेर गेलो. तीनचार तासांनी परत आलो तरी होम्स तसाच विचार करत बसला होता. माझ्या येण्याने त्याची तंद्री मोडली.

"इतका वेळ तू तसाच विचारात मग्न आहेस! किती वेळ गेला याची कल्पना आहे का?" मी विचारले.

"किती वेळ गेला? मला वाटलं, तू काही मिनिटांपूर्वीच बाहेर पडलास..." होम्सने तंद्रीतून हळूहळू बाहेर येत विचारले.

"साडेतीन तास! कधी कधी मला वाटतं, वेळ कसा गेला ते तुला समजतच नाही."

एकाएकी होम्सच्या चेहऱ्यावर तजेला आला, "वॉटसन! तू हे रहस्य सोडवलंस! कॉंग्रॅचुलेशन्स!"

मी बुचकळ्यात पडलो. "ते कसं काय? मी काय केलं?"

"ह्या प्रश्नाचं उत्तर मी सर जेम्सच्या प्रयोगशाळेत देईन. चल आपण तिकडे परत भेट देऊ."

पण वाटेत त्याने दोन केबल्स पाठवल्या.

सर जेम्स यांच्या गुप्त प्रयोगशाळेत अमेलिया आणि मी होम्स काय करतो ते पाहत होतो. तो काही तरी शोधत असावा. प्रथम त्याने एका कोनाड्यात चोरकप्प्यात पाहिले. कप्पा रिकामा होता.

"इथेच मला सर जेम्स यांच्याकडून एक निरोप मिळाला होता." त्याने खिशातून एक कागद काढून दाखवला. महाराजांना सांगितलेला हा निरोप होता!

"अरे! हे माझ्या वडिलांचंच हस्ताक्षर आहे!" अमेलिया म्हणाली, "हा निरोप तुम्हांला केव्हा सापडला?"

"आज प्रथम मी इथे आलो तेव्हा. आता सर जेम्स यांच्याकडून केव्हा तरी दुसऱ्या निरोपाची अपेक्षा आहे. मिस ब्रॉडस्टेअर्स! तुमची हरकत नसेल तर मी इथे वाट पाहत बसतो. किती वेळ लागेल सांगता येत नाही! माझ्या नावे तारा येण्याची शक्यता आहे."

"आणि मी पण थांबतो—" मलाही उत्सुकता होतीच.

आम्ही दोघे किती तरी तास लक्ष ठेवत होतो. मध्ये आमच्या जेवणाची तेथेच सोय करण्यात आली. संध्याकाळी होम्सच्या अपेक्षेप्रमाणे त्याच्या नावे दोन तारा आल्या. त्यातील मजकूर त्याने स्वतःशीच ठेवला, पण कसले तरी कोडे सुटल्याचे समाधान त्याच्या मुद्रेवर होते.

"वॉटसन! आपण एकोणिसाव्या शतकात स्वतःला विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीबद्दल श्रेय देतो. पण अजून निसर्गाने कितीतरी कोडी आपल्यापासून लपवली आहेत. ही कोडी हळूहळू एका विशेष क्रमाने सुटावीत असा निसर्गाचा बेत असावा. पण हा बेत सर जेम्स यांच्यासारखे शास्त्रज्ञ कधीकधी हाणून पाडतात..."

"तुझं बोलणं म्हणजेच मला कोडयासारखं वाटतं! जरा खुलासा करशील का?"

"मला शक्य असतं तर अवश्य केला असता, वॉटसन! अवश्य केला असता. पण माझी तर्कशृंखला अद्याप पूर्ण झाली नाही. मी पाठवलेल्या तारांची उत्तरं वाचून माझा तर्क बरोबर दिशेने जात आहे याची खात्री वाटते." होम्स निःश्वास टाकून म्हणाला, "पण ती दिशाच इतकी विलक्षण आहे की मला वेगळ्या प्रमाणाची आवश्यकता आहे. सर जेम्स यांच्या संशोधनाबद्दल काही प्रश्न मी अमेरिकेतल्या दोघा शास्त्रज्ञांना विचारले. त्यांच्या तारा वाचून आता मला ही पुष्टी सर जेम्स यांच्याकडूनच अपेक्षित आहे!"

"ती कशी आणि केव्हा मिळणार?" मी आश्चर्याने विचारले.

"त्याकरिताच मी इथे थांबलो आहे. खुद्द त्यांचं आगमन तरी होईल किंवा त्यांच्याकडून काहीतरी निरोप तरी येईल." होम्स गंभीरपणे उद्गारला.

"आणि तसं झालं नाही तर?"

"तर, वॉटसन, 'न सुटलेली कोडी' ह्या सदरात तुला हे प्रकरण टाकावं लागेल!" होम्सच्या चेहऱ्यावर स्मित झळकले.

रात्रीचा एक वाजला. घरातले बाकीचे लोक झोपी गेले होते. मला डुलकी घ्यावीशी वाटत होती. होम्स मात्र सावध होता.

"ते बघ वॉटसन—" होम्सचा आवाज ऐकून मी खडबडून जागा झालो. प्रयोगशाळेच्या एका कोपऱ्यात एक अद्‌भुत दृश्य दिसत होते. चक्री वादळामध्ये धुळीचे कण गोल गोल फिरतात तसे काही पांढरे कण गोल गोल फिरत होते. पण हळूहळू ते एकत्र येऊन त्यांतून एक कागदासारखी वस्तू निर्माण झाली. आठ इंच बाय दहा इंच आकाराचा लिफाफा होता तो.

सर्व शांत झाल्यावर होम्सने हळूच तो उचलला. त्यावर त्याचेच नाव होते. पण तो लिफाफाच होम्सचे लक्ष आकृष्ट करत होता.

"वॉटसन, असा लिफाफा तू पाहिला होतास कधी? हा वेगळाच कागद आहे. मला कागदांच्या १५७ तऱ्हा माहीत आहेत, पण हा त्यांतला नाही! वर अक्षर मात्र सर जेम्स यांचं दिसतंय."

मी लिफाफ्यापेक्षा आत काय आहे ते पाहण्यास उत्सुक होतो. होम्सने अत्यंत सावधगिरीने तो उघडला. आत एक पत्र होते आणि सीलबंद लहान लिफाफा होता. त्यावर महाराजांचे नाव होते. पण लिफाफ्यावर छाप होता :

फॉस्टर बटरवर्थ अँड कँपबेल

१७८०—१९८०

दोनशे वर्षांहून जास्त अनुभव असलेली फर्म

"वॉटसन, हा लिफाफा, हे सील—हे सर्व पुढल्या शतकातलं आहे! तरीच मला ते अनोळखी वाटलं. आणि हे नाव अगदी छापल्यासारखं लिहिलं आहे. अशी मशीन्स अजून निघाली नाहीत." होम्स खूप उत्तेजित झाला होता.

"कदाचित त्या पत्रात खुलासा असेल—" माझी माती कुंठित झाली होती. पत्र होम्सला लिहिले होते. ते जसेच्या तसे पुढे देतो.

प्रिय मि० होम्स,

तुम्ही आतापर्यंत अनेक रहस्ये उकललीत—पुढेही तुम्हांला असेच यश मिळो! पण तुम्हांला कबूल करावे लागेल की तुम्ही आत्ता पाहिलेली गोष्ट सर्वात रहस्यमय आहे. दुर्दैवाने हे रहस्य समजावून सांगायला मला प्रत्यक्ष तेथे येता येणार नाही. म्हणून पत्ररूपाने शक्य तितका खुलासा करतो.

मी एक शास्त्रज्ञ आहे. मॅक्सवेलने जेव्हा विद्युच्चुंबकीय शास्त्राचा सिद्धांत मांडला तेव्हा त्यातून अवकाश आणि काळ यांचा समन्वय होतो हे माझ्या लक्षात आले. खुद्द मॅक्सवेल आणि इतर शास्त्रज्ञ यांना हा महत्त्वाचा निष्कर्ष सापडला नाही. मी गंमत म्हणून हा निष्कर्ष काढला तेव्हा आम्ही सर्व प्रयोगशाळेत चहा पीत होतो. कोणालाच हा निष्कर्ष पटला नाही. दोन माणसे प्रकाशाचा वेग मोजत आहेत. एक प्रकाशाच्या स्रोताकडे वेगाने जात आहे तर दुसरा स्थिर आहे. माझा निष्कर्ष असा की दोघांनाही प्रकाशाचा वेग सारखाच वाटेल!

हे कसे शक्य आहे?—माझे सहाध्यायी उद्गारले. त्यांनी उदाहरण दिले. एक स्थिर माणूस आणि एक आगगाडीमधून जाणारा माणूस. दोघे समोरून येणारी आगगाडी पाहतात. त्यांना त्या गाडीचा वेग सारखाच कसा वाटेल? मी प्रत्युत्तर दिले : मॅक्सवेलच्या सिद्धांताप्रमाणे प्रकाशाला एक खास स्थान प्राप्त होते. पण ते कोणाला पटले नाही. १९०५ मध्ये आइन्स्टाइन ह्या शास्त्रज्ञाने हाच निष्कर्ष काढला. तेव्हाही प्रथम त्याची अवहेलना झाली. विसाव्या शतकातले शास्त्रज्ञ त्याला सापेक्षतावाद म्हणतात आणि त्यातून अवकाश आणि काल यांचा समन्वय होतो.

मी मात्र सापेक्षतावादाच्या पुष्कळ पुढे गेलो. आइनस्टाइनने काढलेले निष्कर्ष मी त्यापूर्वीच काढले होते. काही शास्त्रज्ञ पृथ्वीभोवतालच्या ईथर नामक द्रव्यातील प्रकाशाचा वेग मोजत होते. १८८७ च्या जुलायमध्ये मायकेलसन आणि मोर्ले यांनी केलेल्या प्रयोगाचा निष्कर्ष माझ्या सिद्धांताशी बरोबर जुळत होता. मला त्या अर्थाची तार अमेलियाने दिली तेव्हा फार समाधान वाटले.

पण मी तोपर्यंत पुष्कळ पुढे मजल मारली होती. काळ हा सर्व लोकांसाठी सारख्या वेगाने जात नाही. दोन जुळी भावंडे : एक पृथ्वीवर स्थिर आणि

दुसरा जवळ जवळ प्रकाशाच्या वेगाने लांब जाऊन परत आला. दोघांपैकी दुसरा वयाने कमी वाढलेला असेल! पटायला अवघड आहे, पण ते सत्य आहे!

ह्यापुढची पायरी म्हणजे, आपल्याला भूतकालातून भविष्यामध्ये जायला ह्याचा उपयोग करून जाता येईल. आपण वेगाने लांबचा प्रवास करून आलो की जगाचे वय आपल्या वयापेक्षा वाढलेले असेल. पण भविष्यातून भूतकाला-कडे जाता येईल का?

ही गोष्ट अवघड आहे, पण अशक्य नाही! गुरुत्वाकर्षणाचा उपयोग करून हे करता येईल. १९४९ मध्ये गोडेल नावाच्या शास्त्रज्ञाने हे सिद्ध केले. पण हा निष्कर्ष मी आधीच काढला होता. फार काय, त्याचा उपयोग करून असे भूत आणि भविष्य या दोन्ही काळांकडे घेऊन जाणारे यंत्र बनवण्यात मला यश आले. माझ्या गणिताप्रमाणे नव्वद वर्षांपर्यंतची उडी मला मारता येईल असे वाटले.

टेलिग्राम घेऊन अमेलिया मला शोधत आली तेव्हा मी भविष्यकाळात एक दिवस पुढे गेलो होतो! त्यामुळे त्याच खोलीत असूनही त्या 'क्षणा'ला मी तिथे नव्हतो.

रहिमतसिंह स्वतःचा प्रश्न घेऊन आले तेव्हा माझ्या डोक्यात एक विलक्षण कल्पना आली. जर त्यांचा हार आपण नव्वद वर्षे पुढे व्यवस्थित नेऊन ठेवला तर? त्यांच्याकडून मी एक पत्र त्यांच्या वकिलांच्या नावे घेतले. त्यात आपण हा हार आपल्या धाकट्या मुलाच्या वंशजांना देत असल्याचे लिहून घेतले. हे पत्र आणि हार मी व्यवस्थित देऊन पावती घेऊन मी परत येणार—अर्थात परतीचा प्रवास भूतकाळात असल्याने मी परत नव्वद वर्षे मागे येणार!

मी ठरल्याप्रमाणे हार आणि पत्र घेऊन माझ्या यंत्राच्या साहाय्याने १८८८ मधून १९७८ मध्ये उडी मारली. वकिलांची फर्म काही नवे पार्टनर घेऊन चालू होती. मी त्यांच्याकडे पत्र देऊन पावती घेतली. महाराजांच्या धाकट्या मुलाचे वंशज असतील तेथे त्यांना तो हार पोचता करायचे लिहून घेतले. त्यांचे पत्र सीलबंद करून मी परत यायला निघालो—आणि येथे मोठे विघ्न आले.

आजवर मी नव्वद वर्षे लांबीची उडी मारली नव्हती. फार तर काही

दिवस भविष्यात किंवा भूतकालात जात असे. ही नव्वद वर्षांची उडी माझ्या यंत्राला झेपली नाही. मला परत १८८८ मध्ये जाता येईना!

शेवटी मी हा निर्णय घेतला. फक्त ही पत्रेच भूतकाळात पाठवायची. स्वतः इथेच राहायचे! त्याप्रमाणे हे पॅकेट पाठवीत आहे. त्यातील महाराजांचे पत्र त्यांना पोचते करावे. त्यांचे माझे असे ठरले की हे काम सुखरूप झाले की त्यांनी असे पोलिसांना सांगायचे की त्यांचा हार इथे चोरीस न जाता बोटीवरच हरवला असावा—म्हणजे पोलिसांचा शोध बंद पडेल. आधीच होटेलमध्ये चोरी झाल्याची प्रत्यक्ष काही लक्षणे नव्हती, तेव्हा पोलिसांना ते पटेल.

मला परत येता येत नाही याचे वाईट वाटते. विशेषकरून अमेलिया परत भेटणार नाही याची खंत वाटते. पण मी परत येण्याचा प्रयत्न करत आहे. विसाव्या शतकात झालेली तंत्रज्ञानाची प्रगती विलक्षण आहे. मि० होम्स! तुम्ही आता न्यू स्कॉटलंड यार्ड पाहिलेत तर तुम्हांला फार अचंबा वाटेल. गुन्हे शोधण्याच्या बाबतीत यंत्रांचा किती तरी उपयोग होतोय—पण मला कधी कधी वाटते की तुम्ही सोडवलेले गुन्हे ह्या यंत्रांना सोडवता आले नसते! मानवी मेंदू हा केव्हाही यंत्राच्या पुढे आहे. कदाचित हे मत एकोणिसाव्या शतकाच्या माणसाचे विसाव्या शतकाबद्दल असून पूर्वग्रहदूषित असेल!

तुम्हांला एक विनंती आहे. मी केलेला प्रयोग गुप्त ठेवा. निदान नव्वद वर्षे तरी! कारण...कारण विचित्रच आहे, पण मी समजावून सांगतो.

माणसाचा भूतकाळ एकदा ठरला की त्यात ढवळाढवळ करता येत नाही असे म्हणतात. स्वतःचे भवितव्य बरेचसे आपल्या हातात असते. आज आपण एखादी क्रिया केली की तिचे परिणाम भविष्यकाळात दिसून येतील; भूतकाळात नाही. मी ह्या नैसर्गिक नियमाचे उल्लंघन केले. १८८८ मध्ये मी तुम्हांला १९७८ मधल्या काही 'घडलेल्या' घटना आत्ताच कळवल्या! त्या घटना तशा घडू नयेत म्हणून तुम्हांला 'क्रिया' करता येईल. उदाहरणार्थ, समजा, तुम्ही फॉस्टर बटरवर्थ आणि कॅंपबेल ही वकिलांची फर्मच नष्ट केलीत तर मला ती १९७८ मध्ये दिसली कशी असा प्रश्न उद्भवेल! तसेच १९७८-मध्ये मला रहिमतसिंहांच्या धाकट्या मुलाचे वंशज हयात आहेत हे कळले. पण ती वंशावळ नष्ट करणेही तुम्हांला शक्य आहे. अशा परिस्थितीत खरे काय घडले हा प्रश्न उद्भवतो. तसे प्रश्न निर्माण होऊ नयेत म्हणून सृष्टीत

घडणाऱ्या सर्व घटनांत सुसंगती असणे आवश्यक आहे असे दिसते. म्हणून फक्त भूतकालातून भविष्यकाळाकडेच माहिती पुरवली जावी हा सृष्टीचा नियम दिसतो. मी केलेल्या शोधाने ह्या नैसर्गिक व्यवहारांमध्ये खंड पडेल अशी भीती वाटते...मला अजून ह्यावर उत्तर सापडलेले नाही!

म्हणून माझी वरील विनंती आहे. हे पत्र अमेलियाला वाचून दाखवावे आणि मुख्य मुद्दे रहिमतसिंहांना कळवावे.

तुमचा विश्वासू
जेम्स ब्रॉडस्टेअर्स

ता० क० : रहिमतसिंहांना सांगा की भारतात आता राजेमहाराजे राहिलेले नाहीत.—जे० बी०

"होम्स, तुला खऱ्या प्रकाराची कल्पना केव्हा आली?" बेकर स्ट्रीटमध्ये परत आल्यावर मी होम्सला विचारले.

"खरं सांगायचं म्हणजे पूर्ण खुलासा सर जेम्सच्या पत्रानेच केला. मला फक्त ते वर्तमानात नाहीत याची खात्री होती." होम्स ड्रेसिंग गाउन चढवत आपल्या खुर्चीवर स्थानापन्न होत म्हणाला.

"पण ही खात्री तरी तुला कशी झाली?"

"वॉटसन, माझी एक निष्कर्षपद्धती तुला ठाऊक आहे. सर्व शक्यता पडताळून पाहायच्या आणि त्या सर्वच लागू पडत नाहीत असं दिसलं की उरलेला पर्याय. तो कितीही असंभाव्य वाटला तरी तो सत्य असला पाहिजे. सर जेम्स नाहीसे झाले म्हणजे काय? ते काही घरात लपून बसले नव्हते. त्यांच्या पूर्वेतिहासावरून ते सर्वसामान्य गुन्हेगाराप्रमाणे वागणार नाहीत याची मला खात्री होती. म्हणून मी लंडन शोधण्याच्या किंवा इंग्लंडचे किनारे पाळतीखाली ठेवण्याच्या भानगडीत ग्रेग्सनप्रमाणे पडलो नाही. त्यांचा खून झाल्याचं पण निदर्शनास आलं नाही. मग ते गेले कुठे? त्याचबरोबर त्यांच्या गुप्त संशोधनाच्या कागदपत्रांवरून मला ते कालमर्यादा ओलांडून जाण्याच्या प्रयत्नात आहेत हे कळत होतं—जरी त्यांचं गणित माझ्या डोक्यापलिकडलं होतं. पण मी तारा पाठवून प्रा० मायकेलसन आणि प्रा० लॉरेंझ यांना विचारलं. त्यांची उत्तरं काही तासांपूर्वी आली. त्यांनी ह्या संशोधनाच्या

उद्दिष्टाला पाठिंबा दिला पण त्याच्या सफलतेबद्दल अविश्वास व्यक्त केला. परंतु मी ह्या असंभाव्य वाटणाऱ्या घटनेवर विश्वास ठेवला आणि सर जेम्स वर्तमानकाळात नाहीत असा निष्कर्ष काढला. महाराज रहिमतसिंहांनी त्यांच्याशी केलेल्या कराराने पण ह्याला पुष्टी मिळाली." होम्स म्हणाला.

"होम्स, आज तू आपल्या कल्पनाशक्तीचे आणि तर्कशक्तीचे शिखर गाठलंस!" मी कौतुकाने उद्गारलो. "मी हे सर्व टिपून ठेवणार."

"पण तुला ते प्रसिद्ध करता येणार नाही. मला ही केस सोडवता आली नाही असंच जगाला वाटेल." जांभई देत होम्स उद्गारला.

"निदान १९७८ मध्ये तरी खरी गोष्ट प्रसिद्ध करायची मी अमेलियाची परवानगी घेतलीय. मी झोप घेतल्यावर सर्व लिहून काढणार आहे!" मी बेडरूमकडे निघालो.

झोपताना मला होम्सच्या व्हायोलिनचे सुरेल सूर ऐकू येत होते.

१२ अखेरचा पर्याय

"कसली भाषा वापरतात पत्रात!" मेजर दलजितसिंह सौंधने पत्र आपल्या मित्राकडे फेकत म्हटले. मित्राने उघडून पाहिले. सरकारी अशोकस्तंभाची वर मधोमध निशाणी होती. पत्र संरक्षणखात्याकडून आलेले होते. त्यातील इंग्रजी मजकूर छोटाच होता, खालील आशयाचा :

२१ एप्रिलला सकाळी अकरा वाजता ह्या ऑफिसमध्ये हजर राहण्याची तुम्हांला विनंती करण्याचा मला आदेश देण्यात आला आहे. तुमचा प्रवास-खर्च आणि दैनिक भत्ता ह्या डिपार्टमेंटच्या नियमाप्रमाणे देण्यात येईल...

"सरळ सरळ 'तुम्ही अमुक अमुक वेळी इकडे या. आम्ही तुमचा भाडेभत्ता देऊ' असे म्हणायला काय जाते?" तावातावाने दलजित उद्गारला.

"अरे, कुठल्याही कामाची जबाबदारी स्वतःवर घ्यायची नाही, वरिष्ठाकडे बोट दाखवायचे हा आपल्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिसचा बाणाच आहे. समजा, त्याने तू सांगितल्याप्रमाणे आमंत्रण पाठवले आणि तू गेलास आणि प्रवासखर्च मागितलास, तर पुढे सरकारी ऑडिटरच म्हणेल की तुला असे निमंत्रण पाठवायचा त्या अधिकाऱ्याला अधिकारच नव्हता!" त्याचा मित्र म्हणाला.

"सरकारी अधिकारीच काय, कॉलेज किंवा युनिव्हर्सिटीतले अधिकारीसुद्धा असेच पत्र लिहितात."

"ही ब्रिटिश पद्धत आहे म्हणतात."

"पण आपल्याला स्वातंत्र्य मिळून तीन दशके झाली तरी ह्या पद्धतीत बदल करायला नको का ?" दलजित म्हणाला.

"पण तू दिल्लीला जाणार की नाही ?" मित्राने विचारले.

"ही विनंती म्हणजे आदेश आहे बाबा." दलजितने रिझर्वेशनसाठी स्टेशनचा रस्ता धरला.

ऑनरेबल विलियम मॉन्क्रीफ आपल्या ब्रॅचेलरफ्लॅटमध्ये ब्रेकफस्ट खात 'टाइम्स' वाचत होता. ईटन-केंब्रिजचे शिक्षण घेऊन त्याने रॉयल एअर फोर्समध्ये काही वर्षे काम केले होते. धाडसाच्या कामगिरीबद्दल मेडल पण मिळवले होते. पण लढाईत भाग घ्यायची संधीच येत नसल्यामुळे त्याने एअर फोर्समधून सुटका करून घेतली होती. तो सध्या 'बेकार' होता. त्याला हवे तसे धाडसाचे काम मिळत नव्हते. आपण राणी एलिझाबेथच्या इंग्लंड-ऐवजी व्हिक्टोरियाच्या इंग्लंडमध्ये जन्माला यायला पाहिजे होते असे त्याला नेहमी वाटे.

पण रोज सकाळी टाइम्सचा पर्सनल कॉलम तो वाचून काढी—कदाचित त्यातून आपल्याला काहीतरी 'अॅडव्हेंचर' सापडेल, असे त्याला वाटे.

आज त्याला काहीतरी मनाजोगे सापडले. खालील अर्थाची एक जाहिरात होती :

'नेहमीच्या शांत सुरळीत जीवनाला कंटाळलात ? काही कर्तृत्व दाखवायची इच्छा असल्यास लिहा : बॉक्स ३४५७.'

असेल कोणी तरी चक्रम जाहिरातदार...पण लिहायला काय जातेय ? पोस्टाचा स्टॅंप फार तर फुकट जाईल. परवडेल आपल्याला...

ऑनरेबल विलियम मॉन्क्रीफने स्वतःचा किंमती नोटपेपर काढून लिहायला सुरुवात केली.

डॉ० कार्टर पॅटरसनने आपल्या अपार्टमेंट ब्लॉकच्या कार पार्कमध्ये कार घुसवली, इंजिन बंद केले आणि कारचे दार स्लॅम करून लिफ्टकडे धूम ठोकली. लिफ्ट वर जात असताना त्याने परत घड्याळाकडे नजर टाकली—५–५० झाले होते. घरात शिरल्यावर त्याने टी० व्ही० सुरू केला.

बातम्यांवर टिप्पणी करणारा एरिक सेव्हराय आपले आख्यान संपवत होता. कार्टरच्या कानांवर त्याचे शेवटचे वाक्य आले, "...शास्त्रज्ञ आपल्या हस्तिदंती मनोऱ्यातून मधूनमधून खाली उतरून सामान्य माणसाशी जरा संपर्क ठेवायला लागले तर असा प्रसंग येणार नाही."

म्हणजे काय? आज सिनेटने काय निकाल दिला? त्याच्या गटाचे आणि इतरत्र चालणारे जीवशास्त्राचे मूलभूत प्रयोग चालू ठेवायला परवानगी मिळाली की नाही? कार्टरला हीच बातमी पाहिजे होती. कार रेडिओ नादुरुस्त झाल्याने त्याने टी० व्ही०कडे धाव घेतली होती, पण बहुतेक ती बातमी तो येण्याआधीच सांगून झाली होती. कदाचित शेवटी परत सांगतील. त्याने टी० व्ही०कडे लक्ष लावले. काही जाहिराती झाल्यावर बातम्या सांगणारा वॉल्टर क्रॉन्काइट परत पडद्यावर आला.

"डाउजोन्स इंडस्ट्रियल ॲव्हरेज ५.५ पॉइंटनी घसरले. न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजवर एकवीस मिलियन शेअर्सची उलाढाल झाली. न्यूयॉर्क एक्स्चेंजवर शेअरची सरासरी किंमत १५ सेंटने खाली आली आणि अमेरिकन एक्स्चेंज-वर तीन सेंटने...

अशी ही एकंदर परिस्थिती आहे. मी वॉल्टर क्रॉन्काइट सी० बी० एस० न्यूजवरून बोलतोय. गुड नाइट."

कार्टरने टी० व्ही० बंद केला आणि आपल्या एका सहकाऱ्याच्या फोन-नंबरची बटने दाबली.

"जॉन, मी कार्टर बोलतोय. सिनेटने काय निकाल दिला?"

"कार्टर, तुला ठाऊक नाही? सिनेटने ७० विरुद्ध ३० मतांनी प्रयोग थांबवण्याचा निर्णय घेतला. पाच वर्षांनी परत परिस्थितीचा आढावा घेतला जाईल. आपण सर्व बेकार झालो."

"तू काय करायचे ठरवले आहेस?" कार्टरने विचारले. त्याला ह्या निर्णयाची अपेक्षा होती, पण ते कटू सत्य ऐकल्यावर फार उदास वाटू लागले.

"मी बहुतेक हॅंबर्गर विकायचे दुकान काढीन!" शुष्क हास्य करत जॉन म्हणाला. "नाही तरी शास्त्रज्ञ जनतेशी जवळीक ठेवत नाहीत असे काही सिनेटर्स म्हणालेच. ते तरी खूष होतील."

कार्टरने फोन खाली ठेवला. त्याला एरिक सेव्हरायचे शब्द आठवले.

पुढे काय करायचे हा त्याच्यापुढेही प्रश्न होता. ज्या संशोधनाला त्याने वाहून घेतले होते तेच अचानक बंद झाल्याने त्याला काहीच सुचत नव्हते. अमेरिकन नीग्रो कुटुंबातून तो हलाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढत उच्च पदाला पोचला होता. अडथळ्यांतून मार्ग काढायची त्याला सवय होती. पण ह्या परिस्थितीने त्याला अगदी किंकर्तव्यविमूढ करून टाकले.

इतक्यात त्याचा फोन वाजला. त्याने आपले नांव सांगितले, पण फोन करणाऱ्या व्यक्तीचे नाव ऐकून त्याचा प्रथम विश्वासच बसला नाही.

ब्रसेल्समधल्या रशियन वकिलातीत काम करणारा कॅप्टन इल्या मोरोव्हिच हा खरोखर एक के० जी० बी० या रशियन हेर संस्थेचा एजंट होता. अर्थात त्याचे मनमोकळेपणाचे बोलणे आणि दिलखुलास वागणे ह्यावरून कोणाला हे खरे वाटले नसते. एके काळी रेड आर्मीमध्ये काम केलेला आणि आता फॉरेन सर्व्हिसमध्ये ट्रान्स्फर झालेला असे त्याचे रेकॉर्ड होते. त्याला मदिरेची आणि मदिराक्षींची जशी आवड होती तशीच बुद्धिबळाचीसुद्धा. ह्या खेळात त्याचे नैपुण्य आंतरराष्ट्रीय दर्जाचे होते.

पण त्याचे इलेक्ट्रॉनिक्सचे नैपुण्य फार थोड्या लोकांना माहीत होते. ब्रसेल्समध्ये तर कोणालाच माहीत नव्हते—रशियन राजदूतालादेखील याची गंधवार्ता नव्हती.

आज त्याला राजदूताने बोलावले. तो ऑफिसमध्ये शिरल्यावर राजदूताने त्याला एक निरोप सांगितला :

"तुला मास्कोहून बोलावणे आलेय."

ह्याचा अर्थ चांगलाही असेल, वाईटही असेल. इल्याने चेहऱ्यावर कसलाही भाव दाखवला नाही.

"मी केव्हा निघायचेय ?" त्याने विचारले.

"आत्ताच्या आत्ता." राजदूताने डेस्कच्या खाली कुठले तरी बटन दाबले असावे; कारण दोन साध्या गणवेशातले कर्मचारी तेथे आले.

"हे दोघे तुला एअरपोर्टवर घेऊन जातील. तेथे एक इल्युशिन तुला घेऊन जायला आलेले आहे. माझ्या तुला सदिच्छा आहेत." राजदूताने निरोप दिला.

अचानक जाण्यामुळे आपल्या फ्लॅटचे, सामानसुमानाचे काय? आपल्या मित्रमंडळींना काय सांगण्यात येईल? हे प्रश्न इल्याने विचारले नाहीत.

त्याला माहीत होते की त्या बाबतीत सर्व व्यवस्था झाली असणार.

चांग तेंग हा चीनच्या 'ॲटॉमिक एनर्जी प्रोग्रॅम'मधल्या उच्च दर्जातल्या शास्त्रज्ञांपैकीच होता. वयाने तिशीतलाच असून त्याने आपले कर्तृत्व लहानपणापासूनच दाखवले होते. न्यूक्लियर बॉंब बनवण्यात चीनने जी झपाट्याने प्रगती केली तिच्यामागे चांगचा मोठा हात होता. आणि त्या देशातल्या राजकीय नेत्यांनी त्याची किंमत ओळखून त्याला देशाबाहेर जाण्याची बंदी केली होती.

म्हणून आज त्याला पीकिंगहून आलेला आदेश पाहून आश्चर्यच वाटले. कारण त्याला चीनबाहेर एका ठिकाणी पाठवण्यात येणार होते. हा निर्णय म्हणे चेअरमन माओंनी मरणापूर्वीच घेतला होता, पण लाल फितीच्या दिरंगाईमुळे त्याच्यापर्यंत यायला वेळ लागला होता. त्याच्या वरिष्ठांनी हा खुलासा केला!

चांग तेंग परदेशयात्रेच्या तयारीला लागला.

एका गोलाकार खोलीत मधोमध पंचकोनी टेबल होते. त्याभोवती पाच खुर्च्यांवर पाच लोक बसले होते. टेबलाशी प्रमुख अशी जागा कुठलीच नव्हती—पाचांपैकी कोणीही आपण मुख्य जागी आहोत अशी कल्पना करावी.

पाचही जण काहीतरी पुस्तिका वाचत होते. खोलीत शांतता होती. वाचायची रेस सरदारजींनी जिंकली.

"काय गमतीदार कल्पना आहे!" दलजितसिंह उद्गारला. थोड्याच वेळात कार्टर पॅटरसन आणि विलियम मॉन्क्रीफ यांचे वाचन पुरे झाले.

"जस्ट माय कप ऑफ टी!" विलियम उद्गारला.

"सायन्स फिक्शन प्रत्यक्षात आणायचा विचार दिसतोय! काय इल्या, तुला काय वाटते?" नुकतेच वाचन पूर्ण केलेल्या रशियनकडे पाहत कार्टरने विचारले.

इल्या मोरोव्हिचने हसून अनुमोदन केले. चांग तेंगकडे सर्वांनी पाहिले. सावकाश, काळजीपूर्वक पुस्तिका वाचून त्याने टेबलावर ठेवली.

त्याच्या पौर्वात्य चेहऱ्यावर कसलेच विकार नव्हते.

"एकंदरीत तुम्हा सर्वांना प्लॅन पसंत पडलेला दिसतो." इंग्रजीतून एकदम आवाज आला. पण बोलणारा अदृश्य होता. ध्वनिक्षेपणाची किमया अशी की प्रत्येकाला तो आवाज आपल्या समोरून आला असे वाटले. "तुम्हांला काही प्रश्न विचारायचे असल्यास विचारा. माझी भाषा तुम्हांला नीट समजली नाही तर तसे स्पष्ट सांगा—तुमच्या भाषेतून उत्तर देण्यात येईल."

"ह्या प्रयोगात भाग घ्यायचा की नाही हा पर्याय आमच्यापुढे आहे का?" इल्याने विचारले.

"नाही!" तो आवाज उत्तरला. "ह्या प्रयोगासाठी आम्ही शंभर लोकांना बोलावले होते. प्रत्येक परीक्षेत काही लोक गळले. शेवटच्या स्टेज-पर्यंत हा पर्याय तुम्हांला देण्यात आला होता आणि मिशनची अंधुकशी कल्पना दिली गेली होती."

"शंभर वर्षे अशा गोठवलेल्या स्थितीत राहून आम्ही जगू का?" दलजितने विचारले.

"तो धोका तुम्ही पत्करायला पाहिजे. आमचे शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ त्यांनी केलेल्या प्रयोगावरून याची ग्वाही देत आहेत. पण त्यांचे प्रयोग जनावरांवर —कमी काळापर्यंत—झालेले आहेत. माणसावर अशा तऱ्हेने ते प्रथमच होत आहेत."

"पण आम्हांला अंतराळात काय म्हणून सोडता? इथे पृथ्वीवरच का ठेवत नाही?" तेंगने विचारले.

"पृथ्वीवरची कोणती जागा पुढची शंभर वर्षे सुरक्षित राहील? त्यापेक्षा तुम्ही शनीभोवती स्वस्थपणे घिरट्या घाला. तिकडे फारशी मानवी याने पण यायची नाहीत. आणि तुम्हांला फार वेळ घिरट्या घालाव्या लागणार नाहीत. आम्ही तुमच्या अंतराळयानाची कक्षा अशा तऱ्हेने ठरवली आहे की शनी-पर्यंत जाऊन आणि शंभर घिरट्या घालून तुम्ही बरोबर शंभर वर्षांनी परत याल." आवाज म्हणाला.

"आमच्यापैकी कोणी अंतराळयान चालवण्यात तरबेज नाही. फक्त मला विमाने चालवता येतात. मग आमचे यान पृथ्वीवर परत कसे उतरणार?" विलियमने विचारले.

"तोही धोका तुम्ही पत्करायला पाहिजे. शंभर वर्षांनी पृथ्वीभोवती पुष्कळ अंतराळ-वाहतूक असेल. कोणी तरी तुम्हांला मदत करीलच. पृथ्वीला तुमचे यान घिरट्या घालायला लागण्यापूर्वी तुम्ही गोठवलेल्या आवरणातून जागे व्हायची व्यवस्था करण्यात आली आहे. यानासंबंधीची सर्व माहिती तुम्हांला यानातच सापडेल. तुम्ही हुशार आहात, शूर आहात, काय करायचे ते तुम्हांला कळेलच."

"पृथ्वीवर परत आल्यावर आमच्याकडून काय अपेक्षा आहे?" कार्टरने विचारले.

"तुम्ही विसाव्या शतकातले प्रतिनिधी म्हणून एकविसाव्या शतकात जात आहा. जग पुष्कळ बदललेले असेल, सुधारलेले असेल, प्रगत झालेले असेल. कदाचित त्या काळातल्या लोकांना तुमच्या शहाणपणाचा काहीतरी फायदा होईल. कोणी सांगावे?"

किंवा आपले हसे होईल!—दलजित मनाशी म्हणाला. तो कल्पना करायला लागला : बहादुरशाह ज़फर, ड्यूक ऑफ वेलिंगटन, थॉमस एडीसन, चार्ल्स डार्विन, डिकन्स, आगरकर, वासुदेव बळवंत...यांना आजचे जग कसे वाटले असते? आणि आजच्या जगाने त्यांच्याकडे कुठल्या दृष्टीने पाहिले असते? त्याला एक समाधान वाटले—आपल्या पाचही जणांपैकी कोणीही असामान्य जागतिक कीर्तीची व्यक्ती नाही!...आपण सामान्य नागरिक आहोत.

स्पेस-स्टेशन क्र० ५ च्या 'रिमोट सेंसर'मध्ये लाल दिवा लागला. आणि धोक्याचा सिग्नल—पी ऽऽप पिप पी ऽऽप पिप असा आवाज—सगळीकडे येऊ लागला. मुख्य ऑपरेटरने एक बटन दाबले. आवाज थांबला, पण त्याच्या समोरच्या पाच मीटर स्क्रीनवर एकदम प्रकाश आला. मग दुसऱ्या क्षणाला प्रकाश जाऊन तेथे एक चित्र आले. अंतराळातल्या एका भागाचे.

ऑपरेटरने दुसरे बटन दाबले. पडद्यावर एक हिरवा ठिपका आला. थोडा वेळ इकडेतिकडे फिरून तो स्थिर झाला आणि ऑपरेटरच्या शेजारच्या कंप्यूटरमधून एक कार्ड आले. त्यावर लिहिले होते : यू एफ ओ आणि काही आकडे.

यू एफ ओ म्हणजे 'अन्आयडेंटिफाइड फ्लाइंग ऑब्जेक्ट'. अंतराळा-

तली सर्व याने कंप्यूटरमध्ये रजिस्टर्ड होती—अगदी मिलिटरीची गुप्त याने-देखील. त्यांचा पत्ता अर्थात मिलिटरीकोडशिवाय कंप्यूटरने दिला नसता. पण यू एफ ओ म्हणजे कंप्यूटरला माहीत नसलेले उडणारे यान!

विसाव्या शतकात उडत्या तबकड्या इत्यादी पाहिल्याचे सांगणारे बरेच होते. बहुतेकांची जबानी खोटी तरी ठरली किंवा त्यांनी पाहिलेल्या गोष्टी म्हणजे पृथ्वीवरचीच विमाने अगर अंतराळयाने असायची! मात्र, काहींचा तपास न लागल्याने त्यांना नाव देण्यात आले ते यू एफ ओ—ओळख न पटलेल्या उडणाऱ्या गोष्टी.

पण २०७७ मध्ये तसे नव्हते. पृथ्वीच्या आसमंतातल्या प्रत्येक यानाची संपूर्ण माहिती कंप्यूटर्समध्ये होती. कोणी उडती तबकडी पाहिल्याचे विधान केले की तो खोटे बोलतो हे लगेच कळायचे किंवा ती तबकडी म्हणजे पृथ्वीवरचीच हे कंप्यूटरकडून कळायचे.

आज प्रथमच कंप्यूटर सांगत होता की त्याला माहीत नसलेले यान आसमंतात आहे!

विलियमला प्रथम जाग आली.

पण अजून शरीरातल्या कुठल्याच अवयवावर त्याच्या मेंदूचा ताबा नव्हता. फक्त विचार करण्याची शक्ती आली होती. आपण कोण आहोत, कुठे आहोत, कुठल्या परिस्थितीत आहोत ह्या प्रश्नांची उत्तरे त्याला हळूहळू मिळायला लागली. म्हणजे गोठवलेल्या स्थितीमुळे त्याच्या मेंदूतला स्मरणशक्तीचा साठा पूर्वीप्रमाणे होता.

पूर्वीप्रमाणे? किती काळापूर्वीप्रमाणे?...शंभर वर्षे?

त्याचा विश्वास बसत नव्हता, कारण इतका काळ गेल्याचे दाखवणारे कुठलेच अनुभव त्याच्या मेंदूत नव्हते. आपण एका अंतराळयानात असलो पाहिजे. हालचाल करता आली की यानातला कंप्यूटर वेळ सांगेलच—सेकंद, मिनिट, तास, दिवस, महिना, वर्ष...शतकदेखील.

त्याला दिलेल्या सूचना आठवू लागल्या. "प्रथम तुझा मेंदू काम करायला लागेल. मग डोळे, नाक, कान आणि जीभ...मग जबडा, मान...मग हात...कंबर...आणि शेवटी पाय."

त्याने डोळे उघडण्याचा प्रयत्न केला. कष्टाने का होईना, पण पापण्या वर झाल्या—आणि लगेच बंद झाल्या. यानातला अतिसौम्य प्रकाशदेखील डोळ्यांना पेलला नाही. "जरा दमाने घे"—त्याने स्वतःला बजावले.

काही तासांनी—आणि ते तास त्याला युगाप्रमाणे वाटले—तो उभा राहून पूर्वीप्रमाणे हालचाल करायला लागला. त्याचे बाकीचे सहप्रवासी अजून गाढ निद्रेत होते.

विलियमने विमानाची तपासणी करायला सुरुवात केली. गोठवलेल्या अवस्थेत त्याला तेथे आणले असल्यामुळे त्याने ते पूर्वी पाहिले नव्हते. आणि ते त्या पाचही जणांना आधी दाखवण्यात आले नव्हते. पण 'फ्लाइट सिम्युलेशन'साठी वापरलेले 'डमी' यान त्याने पाहिले होते.

तो वैमानिक असल्याने सर्व कंट्रोल त्याच्याच जास्त परिचयाचे होते. शिवाय प्रत्येक ठिकाणी माहितीची 'मॅन्युअल्स' होती. बहुतेक...त्यांची परत पूर्ण माहिती करून घ्यावी म्हणून आपल्याला प्रथम जागे करण्यात आले असावे ...त्याने अभ्यासाला सुरुवात केली. आणि चार तासांत त्याच्या डोक्यात परत यानाची, त्यांच्या प्रॉजेक्टची आणि धोक्याच्या वेळी काय करायचे याची सर्व माहिती आली.

यान मंगळापासून पृथ्वीकडे जाणाऱ्या मार्गावर शेवटच्या टप्प्यात होते. आणखी दहा दिवसांनी ते पृथ्वीभोवती घिरट्या घालील. त्याने कंप्यूटरवरचे घड्याळ पाहिले. ते तारीख दाखवत होते ५ जून २०७७! त्याचे सहप्रवासी क्रमाक्रमाने ह्या दहा दिवसांत जागे होणार होते.

त्याला प्रथमच भुकेची जाणीव झाली. यानाच्या स्वयंपाकघरात गोठवलेले अन्न होते. त्यातले एक पॅकेट काढून त्याने 'मायक्रोवेव्ह ओव्हन'मध्ये गरम केले.

पुढले दोन दिवस ठरल्याप्रमाणे गेले. आणि मग अनपेक्षित गोष्टींना सुरुवात झाली.

यानातल्या रेडिओ-इंटरकॉम सिस्टिममध्ये धोक्याचा लाल दिवा लागला. विलियमने एक विशिष्ट बटन दाबले. रेडिओतून आवाज येऊ लागला.

पीऽऽऽप पिप पीऽऽऽप पिप...

त्याने वेव्हलेंग्थ बदलून पाहिली. पाचसहा ठराविक वेव्हलेंग्थवर हा सिग्नल येत होता. त्याने रेडारस्क्रीनवर पाहिले—तेथे काही नव्हते.

त्याने एक वेव्हलेंग्थ निवडून त्यावरून तसलाच सिग्नल पाठवायला सुरुवात केली. लगेच त्याचा परिणाम झाला. त्याला इंग्रजीतून निरोप ऐकू यायला लागला :

"स्वतःची ओळख करून दे. तुझे यान आमच्या स्क्रीनवर आहे."

विलियमने यानाचा नंबर सांगितला आणि आपण पृथ्वीवरचेच आहोत असे सांगितले.

"तुझे रेकॉर्ड आमच्याकडे नाही, पण तू इंग्रजी बोलतोस त्यावरून पृथ्वीवरचाच असावास. तुझे यान केव्हा सोडण्यात आले?"

विलियमने माहिती सांगितली. शंभर वर्षांपूर्वीची माहिती सध्या उपलब्ध असेल का? त्याला फार वेळ थांबावें लागले नाही.

"तुमचे रेकॉर्ड आम्हांला सापडले आमच्या मेमरीमधून." परत आवाज आला. 'मेमरी' म्हणजे काय प्रकार आहे? विलियमच्या मनात विचार आला. इतक्या लवकर रेकॉर्ड सापडले याचे त्याला आश्चर्य वाटले. पण तो पुढे ऐकू लागला, "तुमचे स्वागत असो! तुम्ही पाच जण आहात ना? त्यांपैकी चौघे अजून झोपेत असतील. आम्ही तुमची वाट पाहत आहोत. आमच्यापर्यंत यायला तुम्हांला अजून चार दिवस लागतील. पण तुम्हांला मदतीची जरूर असल्यास कळव. आम्ही चार तासांत तुमच्यापर्यंत येऊ शकू."

"सध्या सर्व ठीक आहे—काही अडचण आल्यास ह्याच वेव्हलेंग्थवर संपर्क साधीन." विलियम उत्तरला. आपले हे यान म्हणजे एकविसाव्या शतकात एक बैलगाडी ठरणार याची त्याला जाणीव झाली. त्याने निरोप देऊन रेडिओ बंद केला.

त्याला जांभई दिल्याचा आवाज ऐकू आला. सरदारजी जागे झाले होते.

स्पेस स्टेशन क्र० ५ कडे विलियमच्या यानाची सर्व माहिती होती. ते यान पृथ्वीवरून सोडले तेव्हा त्याची सर्व माहिती नोंदवून ठेवण्यात आली होती आणि ती सुदैवाने 'स्पेस आर्काइव्हज'मध्ये उपलब्ध होती. त्यामुळे ते यान जवळ येताच त्याच्यातल्या इलेक्ट्रॉनिक्सचा ताबा स्पेस स्टेशन ५ने सहज मिळवला आणि ते यान स्टेशनवर आणले. तोपर्यंत पाचही यात्रेकरू जागे झाले होते.

"विसाव्या शतकातल्या दूतांनो, तुमचे स्वागत असो!" स्पेस स्टेशनच्या डायरेक्टरने त्यांचे स्वागत केले. "तुम्हांला ज्या संस्थेने पाठवले ती संस्था आता अस्तित्वात नाही. जग तुम्हांला फार बदललेले दिसेल. माणसे बदललीत, देश बदललेत—पण पृथ्वी तीच आहे. गेल्या शतकातले शहाणपण घेऊन तुम्ही आलात—आम्हांला त्याचा फायदा करून घ्यायचा आहे."

"युनायटेड नेशन्सचे काय झाले?" कार्टर पॅटरसनने विचारले. डायरेक्टरच्या ओझरत्या उल्लेखाने त्याची चिकित्सक वृत्ती जागृत झाली होती.

"त्या संस्थेचा अंत ह्या शतकाच्या सुरुवातीलाच झाला. त्याला युद्ध कारणीभूत नव्हते. सर्व सभासद-राष्ट्रांमधील आपापसातली भांडणे वाढत गेली आणि शेवटी त्या संस्थेकडून काहीच नियंत्रण शक्य न झाल्याने प्रबल देशांनी आपले सदस्यत्व सोडले. मग आर्थिक परिस्थिती विकोपाला गेल्यामुळे लवकरच ती संस्था बंद पडली." डायरेक्टरने खुलासा केला.

"मग सध्या त्या तऱ्हेची जागतिक संस्था आहे का?" कार्टरने विचारले.

"नाही. कारण तसल्या समस्याच आता आमच्यापुढे नाहीत. पण वेगळ्या संस्था आहेत—त्यांची माहिती तुम्हांला मिळेलच. आता तुम्हांला पृथ्वीवर पोचवण्यात येईल. अमेरिका खंडाचे प्रमुख तुमच्या स्वागताला हजर आहेत."

"अमेरिका खंड म्हणजे काय?"—कार्टर.

"तुमच्या पृथ्वीपर्यंतच्या प्रवासात हे वाचा म्हणजे तुमच्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळतील." डायरेक्टरने खूण केल्यावर त्याचे सहकारी पाच टेपरेकॉर्डर-सारखी यंत्रे घेऊन आले. "ही वाचण्याची आधुनिक पद्धत तुम्हांला परिचयाची नसेल." हसून डायरेक्टरने सांगितले, "सर्व माहिती कॅसेटच्या रूपात आहे—इंग्रजीत. इंग्रजी भाषा आता जगभर वापरण्यात येते. माहिती भरलेली ही कॅसेट मेंदूशी टर्मिनल लावून जोडण्यात येईल. तुम्ही टेपरेकॉर्डरच्या द्वारे जसे एका टेपवरून दुसऱ्या टेपवर रेकॉर्डिंग करता तसे ही सर्व माहिती झटकन तुमच्या मेंदूत भरली जाईल."

"मग हल्ली पुस्तके नसतातच?" चांग तेंगने विचारले.

"डोळ्यांनी वाचून माहिती गोळा करण्याचा प्रकार फारच क्रूड आणि इनेफिशियंट होता. वाचलेली माहिती डोक्यात शिरेल असे खात्रीने सांगता यायचे नाही. ही इलेक्ट्रॉनिक पद्धत शंभर टक्के यशस्वी ठरली आहे. लहान

मुले भराभर शिकतात, मोठी माणसे हवे ते ज्ञान चटकन मिळवू शकतात. मग पुस्तके पाहिजेत कशाला? काही जुन्या संस्था थोड्या प्रमाणात पुस्तके अजून तयार करतात. पण त्यांना फार मागणी नसते."

"मग पूर्वीच्या मोठ्या पुस्तकालयांचे काय झाले? ब्रिटिश म्यूजियमचे पुस्तकालय, ऑक्सफर्डचे बॉडलेयन, लायब्ररी ऑफ कॉंग्रेस, मॉस्कोतले मोठे पुस्तकालय..."

चांग तेंगची यादी पुरी व्हायच्या आतच डायरेक्टर म्हणाले,

"ती पुराणवस्तुसंग्रहालये झाली आहेत. जुनी पुस्तके तेथे मिळतात."

स्पेस-शटल झपाट्याने पृथ्वीकडे चालले होते, पण आतील प्रवाशांना त्या वेगाची जाणीव होत नव्हती. शटलला पायलट नव्हता—ते स्वयंचालित होते. शिवाय ते निघाले तेथून आणि पोचणार तेथून त्याच्या मार्गावर पूर्ण नियंत्रण होते. पाचही प्रवासी आपापल्या विचारात गुंतले होते.

ह्या यानामागे शक्ती कोणती आहे? चांग तेंग विचार करत होता. त्याने पाहिलेल्या विसाव्या शतकातल्या यानांतली रॉकेट्स ज्या इंधनावर चालायची ते इथे खचित नव्हते. स्पेस स्टेशन क्र० ५ वरून सुटलेली याने मागे गलिच्छ वायू सोडत नव्हती. "अरे! पण आपण हा विचार कशाला करत आहोत? उत्तर आपल्याकडेच आहे." तो स्मित करत स्वतःशी पुटपुटला. उत्तर त्याच्या डोक्यात केव्हाच भरले होते टेपरेकॉर्डरने! त्याने एका विषयावर मन केंद्रित केले : ऊर्जेचे व्यवहारातले रूप...आणि त्याच्या मेंदूत भरलेली माहिती त्याच्या डोळ्यांपुढे उभी राहिली.

ऊर्जेचे मूळ स्रोत होते सूर्यात. थर्मोडायनॅमिक्सचा सिद्धांत त्याला आठवला—एकोणिसाव्या शतकातला. हीट इंजिन्स—उष्णतेवर चालणारी इंजिने—उष्णतेचा उपयोग कामाकरता करतात. केल्व्हिन, कार्नो यांनी हे सिद्धांत मांडले. उच्च तपमानाच्या उष्णतेच्या स्रोतापासून उष्णता काढून घेऊन थंड जागी पोचवताना त्या ऊर्जेपासून उपयुक्त कामे करता येतात. पण, ही कामे करणारी इंजिने जास्त कार्यक्षम करायची असली तर स्रोताचे तपमान थंड जागेच्या तपमानाच्या अनेक पटीने जास्त—शक्य तितके जास्त—ठेवले पाहिजे.

एकविसाव्या शतकातल्या मानवाने ह्यात पुष्कळ यश मिळवलेले दिसत होते. उष्णतेचा स्रोत सूर्य. पृष्ठभागाचे तपमान जवळजवळ ५५०० सेल्सियस! जी कल्पना विसाव्या शतकाअखेर मूर्त स्वरूपात यायला अंधुकशी सुरुवात झाली होती ती आता समूर्त स्वरूपात आली होती. हे कसे झाले? तेंगला आणखी माहिती मिळाली, पण त्याच्या शास्त्रज्ञाच्या डोक्यालाही ती जड जाऊ लागली. त्याचे डोके दुखायला लागले. त्याच्या मनात विचार आला, 'एको-णिसाव्या शतकातल्या शास्त्रज्ञाला ॲटॉमिक रिॲक्टर कसा चालतो हे समजून घ्यायला किती त्रास पडला असता? आपल्याला परत विज्ञानाचे धडे घेतले पाहिजेत...सावकाश...'

दलजितसिंह विचार करत होता : सध्याचे देश कुठली शस्त्रे वापर-तात? त्याला उत्तर सापडले : अण्वस्त्रे ही केव्हाच जुनाट झाली. त्याहून भयंकर अस्त्रे आता अस्तित्वात आहेत. एखाद्या वस्तूतल्या सर्व अणूंमध्ये तिचे विश्लेषण करणारी...जी वस्तू मूर्त स्वरूपात डोळ्यासमोर आहे ती आपल्या अणूंमध्ये विभागून जाते आणि ते अणू इतस्ततः पसरतात...पण पूर्वी अणुशक्तीवर जितके नियंत्रण होते त्याहून जास्त नियंत्रण ह्या अस्त्रांवर आहे. ती चालू करायला ऊर्जेचा मोठा स्रोत लागतो. प्रत्येक खंडाजवळ एकच तसा स्रोत आहे आणि तो चालू करण्याची शक्ती किंवा जबाबदारी एका माणसाची नाही...चुकून किंवा रागाच्या, वेडाच्या झटक्यात तिचा वापर केला जाणार नाही...

इल्या मोरोव्हिचला जगाच्या राजनैतिक परिस्थितीची माहिती पाहिजे होती. आपण सर्व अमेरिका खंडाकडे चाललो आहो म्हणजे कुठे? त्याने ह्या प्रश्नावर मन केंद्रित केले आणि त्याला हवी ती माहिती मिळाली. त्याच्या मनश्चक्षूंपुढे जगाचा नकाशा उभा राहिला. त्यावर फक्त चार वेगळे खंड होते. नंबर एक—उत्तर आणि दक्षिण अमेरिका. नंबर दोन—यूरोप : रशिया आणि सायबेरियासकट. नंबर तीन—चीन, जपान, भारत, आग्नेय आशिया आणि ऑस्ट्रेलिया. नंबर चार—मध्यपूर्व आशिया आणि आफ्रिका.

हे खंड धर्म किंवा वंशभेद यांवर आधारलेले नसून त्यांची घटना अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून झाली होती. प्रत्येक खंडात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक गोष्टींवर त्यांचा व्यापार, तंत्रशास्त्र आणि राहणीमान अवलंबून होते. प्रगतीच्या दृष्टीने

त्या खंडांचे क्रमांक लावले होते. खंड १ आणि २ हे संपूर्णतया सौर ऊर्जेवर अवलंबून होते. खंड ३ आणि ४ ह्यांनी थोड्या प्रमाणात ह्या ऊर्जेचा वापर सुरू केला होता, पण अजून कोळसा, पेट्रोल आणि अणुशक्ती यांवर हे देश अवलंबून होते. त्यांचे राहणीमान खंड १ आणि २ पेक्षा मागासलेले असले तरी विसाव्या शतकातल्या कुठल्याही देशातल्या राहणीमानापेक्षा सुधारलेले होते.

विल्यम मॉन्कॉफ यानाच्या आखलेल्या मार्गाचा नकाशा पाहत होता. काही भाग काळ्या ठिपक्यांनी भरलेले होते आणि तिथे 'प्रवेशबंदी' म्हटले होते. यानांनी अंतराळातल्या ह्या भागांत का जाऊ नये?

कारण तेथे सौरशक्तीची केंद्रे होती. लेन्सने सूर्यप्रकाश केंद्रित केला तर त्याने कागद जाळता येतो हा प्रयोग त्याने लहानपणी केला होता. त्याच सिद्धांतावर अंतराळात अनेक ठिकाणी विशाल 'रिफ्लेक्टर' ठेवण्यात आले होते. त्यांनी केंद्रित केलेल्या सूर्यप्रकाशात असलेल्या शक्तीचा वापर करण्यात येत होता.

विल्यमला आठवले. विसाव्या शतकात शास्त्रज्ञांनी सौरशक्तीच्या केंद्रांचा हा प्रकार विचारात घेतला होता. पण अंतराळात विशाल रिफ्लेक्टर रचण्याइतके प्रगत मानवी तंत्रज्ञान नव्हते. ते आता मूर्त स्वरूपात आले होते.

"अंतराळ आता पूर्वीसारखे स्वच्छ राहिले नाही..." विल्यम स्वतःशी पुटपुटला.

कार्टर पॅटरसनला मूलभूत वैज्ञानिक प्रगतीबद्दल जिज्ञासा होती. जीवशास्त्रावरचे त्याचे प्रयोग थांबवण्यात आले होते. आता मानवाने कुठपर्यंत आघाडी मारली होती? जीवनाचे गुपित त्याला सापडले होते का?

नाही! पण त्याने विलक्षण प्रगती मात्र केली होती. अजून अनैसर्गिक उपायांनी जीवसृष्टी निर्माण करणे त्याला साध्य झाले नव्हते, पण तो ह्या टप्प्याच्या पुष्कळ जवळ पोचला होता. दहा वर्षांत ही समस्या सुटेल असा अंदाज होता. मात्र रोगराईवर जवळजवळ पूर्णपणे विजय मिळविण्यात आला होता. कॅन्सरसारखा रोग दूर करण्यात मानवाला यश मिळाले होते.

पण त्याच्यापुढे नवीनच प्रश्न उभे राहिले होते. रोगराईवर विजय मिळवल्याने माणसाचे आयुष्य वाढायला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे घडत नव्हते. खंड १ आणि खंड २ यांमध्ये मानवाचे आयुर्मान ५९ वर्षांपर्यंत घसरले होते.

खंड ३ आणि ४ मध्ये ते ६५ पर्यंत होते. आणि दरवर्षी ते कमी होत चालले होते! असे का व्हावे? उत्तर अजून सापडले नव्हते. एखादे मशीन एकदम बंद पडावे त्याप्रमाणे अचानक माणसाचे जीवन संपुष्टात येई. आणि दुसरा गंभीर प्रश्न होता मानवजात वाढवण्याचा. गेल्या पन्नास वर्षांत मानवांची प्रजोत्पादनक्षमता कमी होत गेली होती. ह्याचा एक फायदा झाला होता: लोकसंख्येला आळा बसला होता. जगाच्या लोकसंख्यावाढीबद्दलची भीतिदायक भाकिते कार्टरला आठवली...ती खोटी ठरली होती. २०७७ मध्ये जगाची लोकसंख्या ६ अब्ज इतकीच होती. आणि ती दरवर्षी कमी कमी होत चालली होती. जीवशास्त्रज्ञांना अजून ह्याचे कारण सापडत नव्हते. ह्याच प्रकारे लोकसंख्या कमी होत गेली तर दोन शतकांनी पृथ्वीवर मनुष्यजात शिल्लकच राहणार नाही...कार्टरच्या अंगावर शहारे आले.

पाचही प्रवासी आपापल्या प्रश्नांची उत्तरे शोधत होते. काही उत्तरे सुखदायक, आशादायक होती तर काही भीतिदायक आणि निराशाजनक होती.

"पृथ्वीवर तुमचे स्वागत असो! बाहेर अमेरिका खंडाचे प्रमुख तुमची वाट पाहत आहेत."

प्रवासी विचारतंद्रीतून जागे झाले. त्यांचा शंभर वर्षांचा प्रवास संपला होता.

"छे बाबा! मला तर शंभर वर्षांपूर्वीचेच जीवन आवडले असते!" दलजित उद्गारला. पृथ्वीवर परतल्यावर त्यांचे सर्वत्र भरघोस स्वागत झाले होते. तीन महिने वेगवेगळ्या मार्गांनी त्यांनी चारही खंड पालथे घातले होते. काही दिवसांनी चंद्रावरची वसाहत पाहायला त्यांना पाठवण्यात येणार होते.

ते शंभर वर्षांच्या प्रवासाला निघाले तेव्हा त्यांचे कोणी जवळचे नातलग नव्हते. एकलकोंडे आयुष्य जगण्याची त्यांना सवय होती आणि म्हणूनच ते ह्या प्रवासाला यायला तयार झाले होते. त्यांच्या दूरच्या नातलगांचे वंशज आता हयात होते, पण आता त्यांच्याशी संबंध जोडण्यात फारसे स्वारस्य नव्हते. नाहीतरी एकविसाव्या शतकात जीवनसरणी बरीचशी यांत्रिक झाली

होती आणि कौटुंबिक जीवन, परस्पर-जिव्हाळ्याचे संबंध, दीर्घकाळ टिकणारी मैत्री वगैरे प्रकार जवळ जवळ लुप्त झाले होते. दलजितसिंहासारख्या शिपाईगड्याला हे काही पटत नव्हते.

"प्रत्येक माणूस ज्या वातावरणात वाढला त्याच्याशी बदलत्या परिस्थितीची तुलना करतो आणि बहुतेक जुने ते सोने ह्या निष्कर्षावर पोचतो." कार्टर म्हणाला.

"गेल्या शतकात गरिबी, गुन्हेगारी, वेगवेगळ्या कारणांमुळे परस्परांचा द्वेष करणे हे दोष मानवजातीला सतावत होते. आता ती कारणे नाहीत; पण माणूस सुखी दिसत नाही." विलियम म्हणाला.

"मला पण हेच दिसले." इल्याने अनुमोदन दिले. "मी पाहतोय, करमणुकीची बरीच साधने आहेत, प्रवासाच्या सुखसोयी आहेत, अंगमेहनत करावी लागत नाही, पण तरी माणूस अस्वस्थ आहे."

"त्यात खरे म्हणजे आश्चर्य नाही. नैसर्गिक आपत्तींशी झगडण्यात आणि त्यांवर विजय मिळवण्यात आजपर्यंत मनुष्याला झटावे लागले. त्यातूनच जगण्यात स्वारस्य निर्माण झाले. आता त्या आपत्ती नाहीत आणि तो उत्साहही नाही." तेंग म्हणाला.

"तेंग म्हणतो ते मला पण पटते." कार्टर म्हणाला, "मानवजात हळूहळू कमी व्हायला लागली आहे. शास्त्रज्ञांना कारण सापडत नाही. मला वाटते, 'सर्व्हायव्हल इन्स्टिक्ट'च नाहीशी होत चालली आहे. जगण्याबद्दलची अहमहमिका आणि उत्साह नसणे हेच लोकसंख्या कमी होण्याच्या मुळाशी कारण आहे. सध्याचे जीवशास्त्रज्ञ कारणे शोधतायत, पण ह्या मूळ कारणाकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. कुठल्याही प्रकारच्या जीवाच्या अस्तित्वामागे आणि टिकाऊपणामागे ज्या नैसर्गिक शक्ती काम करतात त्यांच्यातला समतोल बिघडला आहे, ह्या यांत्रिकीकरणामुळे..."

"पण मला एक नवीनच धोका दिसतोय—आणि काळजी बाळगली नाही तर त्याचा परिणाम लवकरच होईल." विलियम म्हणाला. बाकीच्यांच्या प्रश्नार्थक चेहऱ्यांकडे पाहून तो पुढे म्हणाला, "खंड १ आणि २ संपूर्णपणे सौरशक्तीवर अवलंबून आहेत. इतकेच नव्हे तर त्यांची सर्व शक्तिकेंद्रे अंतराळात असून त्यांवर त्यांचे सर्व जीवन अवलंबून आहे. समजा,

ती बंद पडली तर? आपल्याला माहीतच आहे की गेल्या शतकात सर्व सुखसोयींनी युक्त उंच अशा इमारतीत आलीशान फ्लॅटमध्ये राहणारा माणूस विजेवर व गॅसवर किती अवलंबून होता. वीज बंद पडली की लिफ्ट बंद, अंधारच अंधार, फ्रिज, डीप फ्रीज लागले वितळायला...वीज परत येईपर्यंत त्यांचे हाल होत. सध्या ती परिस्थिती जवळ जवळ जगभर झाली आहे आणि माझ्या मते जास्त बिकट आहे."

"ती काय म्हणून?" दलजितने विचारले.

"समजा, सर्व सौरशक्ति-केंद्रे बंद पडली! त्यांच्यावर सर्व व्यवहार अवलंबून असल्याने जगातले जीवन बंद पडल्यासारखे होईल. आणि हे तात्पुरते नसून कायमचे! कारण बिघडलेली केंद्रे दुरुस्त करायला यंत्रे लागतात. ती कुठल्या शक्तीवर चालणार?"

"पण ही केंद्रे बिघडतील कशामुळे? आणि सर्व एकदम बिघडण्याची शक्यता पण कमी आहे." तेंग म्हणाला.

"कबूल. पण एका परिस्थितीत ती शक्यता नाकारता येणार नाही." विलियम म्हणाला, "ती परिस्थिती म्हणजे...जागतिक युद्ध!"

"विलियम म्हणतो ती शक्यता कमी असली तरी नाकारता येणार नाही." दलजित म्हणाला, "युद्धाचा प्रकार आपण म्हणतो त्याप्रमाणे निव्वळ शस्त्रास्त्रांचीच बाब नव्हे. परस्परांचा पूर्ण संहार करणारी शस्त्रे सर्वांजवळ आहेत. मी ह्याचा अभ्यास केलाय! चारी खंडांनी युद्धाचा दुसरा एक प्रकारदेखील लक्षात घेतला आहे. तो म्हणजे शत्रूची सर्व शक्ति-केंद्रे नष्ट करण्याचा. त्याने प्राणहानी होणार नाही, पण शत्रू पुरता लुळा पडेल. आणि गंमत म्हणजे अशा युद्धातून खंड १ आणि २ पुरते नामशेष होतील. वास्तविक, खंड ३ आणि ४ तितक्या बिकट परिस्थितीला पोचू नयेत. कारण त्यांची शक्ति-केंद्रे छोटी आणि इतस्ततः पसरलेली आहेत. सर्वच सौरशक्तीवर अवलंबून नाहीत काही अजून अणुशक्ती आणि पेट्रोल, कोळसा इत्यादींवर चालतात. पण त्यांचे नियंत्रण एका कंप्यूटरतर्फे होते आणि तो बंद पडला तर..."

"पण असे जागतिक युद्ध होण्याची शक्यताच नाही. चारी खंडांचे परस्परसंबंध उत्तम आहेत. फक्त व्यापाराच्या दृष्टीने ते वेगळे आहेत. मी

गेल्या तीन महिन्यांत राजनैतिक परिस्थितीचा खूप अभ्यास केला आहे." इल्या उद्गारला.

इल्याची गृहीतके बरोबर होती, पण निष्कर्ष मात्र चुकीचा होता.

त्यानंतर तीन महिने गेले. पाची जणांनी एकविसाव्या शतकात सामान्य जीवन जगण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला आणि त्यात त्यांना थोडेबहुत यशही लाभले. पण आपण एका वेगळ्या काळातून, वेगळ्या संस्कृतीतून आलो आहोत याची त्यांना सारखी जाणीव होई. विलियमने खंड १ राहण्यासाठी निवडला. इल्याने खंड २, दलजित आणि तेंग यांनी खंड ३ तर कार्टर पॅटरसनने खंड ४ मध्ये बस्तान बसवले. पण दर आठवड्याला ते भेटून विचारविनिमय करीत.

एक दिवस विलियम दलजितकडे आला. त्याची चर्या चिंतातुर होती. दलजितने कारण विचारायच्या आधीच त्याने सांगायला सुरुवात केली.

"मी खंड १ च्या शक्तिकेंद्रांचा पुष्कळ अभ्यास केला आणि त्यावरून मला भवितव्याबद्दल फार शंका वाटते. ही सर्व शक्ति-केंद्रे पृथ्वीबरोबर फिरतात आणि सूर्यप्रकाशाच्या मार्गात आली की चालू होतात. अर्थात सर्व दिशांना ही केंद्रे असल्यामुळे सतत कुठले ना कुठले तरी केंद्र काम करतच असते."

"अशी किती केंद्रे आहेत?" दलजितने विचारले.

"खंड १ जवळ २४ केंद्रे आहेत. प्रत्येक केंद्रातून त्याच्या आसपासच्या लहान केंद्रांवर नियंत्रण केले जाते. लहान केंद्रे पुष्कळच आहेत, पण ती मोठ्या केंद्रांवर अवलंबून असतात. मोठे केंद्र बंद झाले की लहान केंद्रे पण बंद होतात. आणि ह्या २४ केंद्रांवर लक्ष ठेवणारा एक कंप्यूटर पृथ्वीवर खंड १ मध्ये आहे.

"सूर्यप्रकाशात असलेले केंद्र चालू असले पाहिजे. जर ते बंद पडले तर ते का बंद पडले हा प्रश्न कंप्यूटरपुढे येतो. बिघाड होण्याची अनेक संभाव्य कारणे आहेत. त्यांतले प्रत्येक कारण तपासून पाहून कंप्यूटर दोष कुठे आहे याचा पत्ता लावतो. मग ते दुरुस्त करायची योजना हाती घेण्यात येते. तोपर्यंत सूर्यप्रकाशातली इतर केंद्रे स्वतःची शक्ती वाढवून तात्पुरती वेळ मारून नेतात."

"दोन प्रश्न." दलजित म्हणाला.

"सांग."

"प्रश्न नं० एक : तात्पुरती म्हणजे किती वेळ?"

"कुठलाही दोष दुरुस्त व्हायला एका तासापेक्षा जास्त वेळ लागत नाही. म्हणून एक तासभर जास्त ऊर्जा पुरवायचे काम कुठलेही केंद्र करू शकते."

"त्याहून जास्त ताणले तर केंद्र बंद होणार. अर्थात तोपर्यंत एकतरी नवीन केंद्र उजेडात आलेले असणार." दलजित हिशोब करत होता. "पण समजा, एक चालते केंद्र अंधारात गेले तर आफत येणार!"

"पण ती शक्यताच नाही, कारण तासाभरात कुठलाही बिघाड दुरुस्त केला जातो." विलियम म्हणाला. "दुसरा प्रश्न?"

"कंप्यूटरला दोष सापडला नाही तर?" दलजित म्हणाला.

"मी पण हा प्रश्न तिथल्या शास्त्रज्ञांना विचारला. पण ते सर्व कुत्सितपणे हसले. त्यांच्या मते कंप्यूटरला प्रत्येक केंद्राचा खिळान् खिळा माहीत आहे. एकच पर्याय सोडल्यास बाकी सर्व बिघाड कंप्यूटरला माहीत आहेत."

"तो पर्याय कोणता?" दलजितने विचारले.

"शत्रूने मुद्दाम केंद्र बिघडवले तर, हा शेवटचा पर्याय आहे. ही परिस्थिती येणार नाही याची शास्त्रज्ञांना खात्री आहे. आणि आलीच तर त्यावर उपाय-योजनाही तितकीच प्रखर आहे."

दलजितच्या प्रश्नार्थक चेहऱ्याकडे पाहून विलियमने खुलासा केला. "प्रत्येक खंडाच्या केंद्रांवर नियंत्रण करणारा एक कंप्यूटर आहे. कुठल्या खंडाने आपले केंद्र बिघडवले याचा पत्ता लागेलच असे नाही, म्हणून बाकी तीन खंडांचे कंप्यूटर निकामी करायची उपाययोजना केली जाईल....म्हणजे त्या खंडांची केंद्रे आपोआप बंद होतील. पण ही योजना आत्मघात करणारी आहे. कारण प्रत्येक खंडाच्या कंप्यूटरमध्ये एक उलट हल्ल्याची योजना आहे! 'मरण्या'पूर्वी प्रत्येक कंप्यूटर ज्या कंप्यूटरने आपल्याला निकामी केले त्यालाच निकामी करू शकतो."

"म्हणजे सर्वच कंप्यूटर निकामी ठरणार!" दलजित म्हणाला.

"हो! आणि आपण पाहतो हे सुरळीत चाललेले जीवन संपुष्टात येणार. ही परिस्थिती स्वतःवर येऊ नये म्हणून दुसऱ्या खंडाचे केंद्र बंद करायला

कोणी धजणार नाही. प्रथम हल्ला करणाऱ्याला कंप्यूटर वापरावा लागतो आणि हल्ला करण्यापूर्वी कंप्यूटरला पटवावे लागते की हल्ला केला तर शेवटी आपला नाश होणार नाही." विलियम म्हणाला.

"आणि तू आत्ता सांगितल्याप्रमाणे कंप्यूटरला तसे पटवणे अशक्य आहे."

"म्हणून हल्ला होण्याची शक्यता जवळ जवळ शून्य आहे." विलियम म्हणाला, "जवळ जवळ म्हणण्याचे कारण एवढेच की जर कंप्यूटरमध्येच बिघाड झाला आणि त्याचे तर्कशास्त्र विस्कळीत झाले तर कदाचित हे शक्य आहे. पण कंप्यूटरमध्ये बिघाड होऊ नये म्हणून पुष्कळ दक्षता घेण्यात आली आहे."

"मला बाबा हे सर्व ऐकून अस्वस्थ वाटते. इतके यंत्रावलंबन चांगले नाही." दलजित म्हणाला.

"कारण तू गेल्या शतकातला आहेस. मला पण तुझ्याप्रमाणे चिंता वाटते. मी खंड १ च्या कंप्यूटर-शास्त्रज्ञांना सांगताच ते लागले हसायला. म्हणाले, 'तुमची विसाव्या शतकातली यंत्रे असतील बिघडत. इथे कसलाही बिघाड होणार नाही.' आणि शास्त्रज्ञ काय पण सामान्य माणसाची पण हीच धारणा आहे. आपल्या चिंतेला कोणी भीक घालणार नाही."

"मग आपल्यालाच काही तरी केले पाहिजे—आपणा पाच जणांना."

"माझ्या मनातले बोललास, दलजित!" त्याच्या पाठीवर थाप मारत विलियम म्हणाला. "पण काय करता येईल आपल्याला?"

"त्याबद्दल माझ्या काही कल्पना आहेत. तेंग, इल्या आणि कार्टर येऊ देत, मग मी सांगतो." दाढीवर हात फिरवत सरदारजी म्हणाले. "इल्याचे तंत्रज्ञान आपल्याला उपयोगी ठरेल."

२०७७ मधली मुंबई कुलाब्यापासून बोरिवली आणि कल्याणपर्यंत पसरली होती, पण तिची लोकसंख्या होती फक्त ३० लाख! शंभर वर्षांपूर्वीची गर्दी, जवळ जवळ बांधलेली जुनी घरे, तुडुंब भरलेल्या आगगाड्या आणि बसेस घाईने धावणारी माणसे...ह्यांपैकी कुठलीही खूण ह्या मुंबईत नव्हती. खरी वाहतूक जमिनीखाली मोनोरेलने होती. ही मोनोरेल विजेवर आवाजाशिवाय, धक्क्याशिवाय आणि चालकाशिवाय जात असे. प्रत्येक स्टेशनावर एक लहानशी

वसाहत होती राहणाऱ्यांची किंवा व्यापारी-दुकानदार वगैरेंची. पृष्ठभागावर रस्ते होते आणि त्यांवर बससारख्या विजेवर चालणाऱ्या गाड्या होत्या—थोडे अंतर जाण्याकरता. त्यांचे चालक होते, पण कंडक्टर नव्हते. कारण प्रवास फुकट होता. बहुतेक लोक फार तर दोनतीन मैल लांब कामावर जात. लहान मुले आपापल्या वसाहतीत शाळेत जात. वास्तविक खंड ३ हा खंड १ पेक्षा मागासलेला. खंड १ मधली मुले घरीच अभ्यास करीत। घरात टी० व्ही० सेटवर शिक्षक त्यांना धडे देत. त्यांनी विचारलेले प्रश्न शिक्षकास ऐकू जात—प्रश्न विचारणारा शिक्षकाला त्याच्या टी० व्ही० वर दिसे. हा प्रकार मुंबईच्या काही भागांत आला होता, पण अजून सर्वत्र प्रचलित झाला नव्हता.

दलजितसिंह आणि चांग तेंग हे आकाशयानातून बाहेर पडले आणि त्यांनी भुयारी रेल्वेचा रस्ता पकडला. स्थानकाचे नाव होते उरण. त्यांनी कुलाब्याकडे जाणारी रेलवे पकडली आणि अगदी टोकाला उतरले. त्यांच्या स्टेशनाचे नाव होते हॉलिडे कँप. पूर्वी इथे मिलिटरी वसाहत होती. अजूनही इथला काही भाग 'टॉप सेक्युरिटी'मधला होता.

स्टेशनमधून बाहेर पडल्यावर दोघांनी त्या दिशेलाच मोर्चा वळवला. तिकडे बस जात नव्हती. पण रस्ता होता. तो निर्मनुष्य होता, कारण सामान्य माणसाला तिकडे जाण्याचे प्रयोजनच नव्हते.

"शंभर वर्षांपूर्वीच्या काळात इथे चारपाच मजली इमारती होत्या. मी तिथल्या एका फ्लॅटमध्ये काही वर्षे राहिलो होतो." दलजितसिंह म्हणाला. आता इमारती नव्हत्या. आता फक्त मैदान होते.

"तुमची एक प्रख्यात वैज्ञानिक संस्था इथे होती नाही का? काय बरे तिचे नाव?" तेंग आठवायचा प्रयत्न करत होता.

"टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च." दलजितने सांगितले.

"बरोबर—टाटा इन्स्टिट्यूट! मी कधी तिकडे गेलो नव्हतो, पण तिची सर्व माहिती आमच्याकडे होती." तेंगने सांगितले.

सरदारजी हसून स्वतःशी पुटपुटले, "हिंदी चीनी भाई भाई."

"काय म्हणालास?" तेंगने विचारले.

"काही नाही!" शंभर वर्षांत परिस्थिती किती बदलली होती.

आता टाटा इन्स्टिटयूट नव्हती. पण त्या भागातच त्यांना जायचे होते. त्यांना हवा असलेला कंप्यूटर तेथेच होता. तो भाग जवळ आला तेव्हा तेंगने विचारले, "आपण शंघाईत जे केले तेच इथे करायचे ना?"

दलजितने 'हो'कारार्थी मान हलवली. रणक्षेत्रावर जाताना त्याला जो उत्साह, जी उत्तेजना वाटे त्यांचा त्याला अनुभव आला.

"होय. जे शंघाईत केले तेच बरोबर मुंबईत करायचे."

कंप्यूटर हा कितीही सुधारला तरी शेवटी सांगकाम्याच असतो. विसाव्या शतकातल्या मानवाला हे माहीत होते, कारण त्यानेच आधुनिक कंप्यूटरला जन्म दिला होता. पहिले मॉडेल अगदीच ढोबळ होते. योग्य ठिकाणी पंच करून भोके पाडलेली कागदी टेप वापरून त्याला सूचना द्यावी लागे. मग टेप जाऊन कार्डे आली. आकड्यांच्या 'कोड'मधून सूचना द्यायची जरूर राहिली नाही. सरळ भाषेत ही बेरीज कर, तो गुणाकार कर असे सांगता येऊ लागले. पुढे इलेक्ट्रॉनिक्समध्ये जशी जशी सुधारणा होत गेली तसतसे कंप्यूटरशी संधान बांधणे सोपे होत गेले आणि कंप्यूटरची ग्रहणक्षमता, कार्यक्षमता आणि गती वाढत गेली. मानवी डोक्याला न झेपणारी कामे तो करू लागला आणि मानव त्यावर जास्त विश्वास ठेवायला लागला.

आणि मानवाला विसर पडत चालला की कंप्यूटर हा मुळात सांगकाम्या असतो. त्याच्या 'डोक्या'त पर्याय भरण्याचे काम मुळात मानवाला करावे लागते. एकदा ते पर्याय भरले—मग ते दहा असोत किंवा दहा लाख—की कंप्यूटर सर्वांचा व्यवस्थित विचार करील. पण दहा पर्याय मुळात दिले असले तर त्याला अकरावा पर्याय सुचणार नाही.

ह्या सांगकामेपणाचा जबरदस्त हादरा मानवाला बसणार होता.

१५ जून २०७८ रोजी सूर्याच्या पृष्ठभागात थोडासा बदल झाला. सूर्याच्या अंतरंगात अणुगर्भीय प्रक्रिया चालतात. त्याचा बहिरंगापर्यंत फारसा प्रभाव पडत नाही. फक्त अंतरंगातल्या प्रक्रियेतून निर्माण झालेली ऊर्जा बहिरंगातून बाहेर जाते इतकेच. पण बहिरंगात पृष्ठभागाजवळ चुंबकीय क्षेत्रामुळे वेगवेगळे प्रकार घडत असतात. सूर्यावरचे डाग, कधी जास्त तेजस्वी दिसणारे भाग,

सूर्यांची विश्वकिरणे, कधी थोडा काळ टिकणाऱ्या ज्वाला, इत्यादी, इत्यादी प्रकार बहिरंगात घडणाऱ्या क्रियांचे अस्तित्व दर्शवतात. शिवाय सूर्यापासून सौर वात (सोलर विंड)—म्हणजे विद्युद्‌भार असलेल्या मूलकणांचा वारा—निघत असतो.

ह्या प्रकारापासून पृथ्वी दूर असली तरी अलिप्त नाही. पण वातावरण—पृथ्वीभोवती पसरलेले वायुमंडल—त्यापासून पृथ्वीचे रक्षण करते.

मानवाने बांधलेली सौर-केंद्रे वातावरणाबाहेर होती.

सूर्याच्या पृष्ठभागातला बदल काही मिनिटेच होता. पण त्यातून मोठी ज्वाला निघाली आणि सौर वातात एकदम खूप वाढ झाली. काही मिनिटेच...

पण खंड–१ आणि २ ची दोन दोन सौर-केंद्रे बंद पडली.

त्यांचे कंप्यूटर जागे झाले. बिघाडाचे सर्व पर्याय त्यांनी शोधले. पण हा पर्याय त्यांना माहीतच नव्हता. कारण त्यांच्या डोक्यात ते पर्याय भरणाऱ्या शास्त्रज्ञांनी सौर वातात इतकी वाढ होईल ही कल्पनाच केली नव्हती. 'सौर-वातापासून शक्तिकेंद्रांना धोका नाही' हे कंप्यूटरला सांगण्यात आले होते.

कंप्यूटर १ ने ठरवले, परिस्थिती आणीबाणीची आहे. शेवटचा पर्याय लागू पडतो. कंप्यूटर २ ने त्याच वेळी तोच निष्कर्ष काढला.

दोघांनी एकमेकांना आणि खंड ३ आणि खंड ४ च्या कंप्यूटरना निकामी करण्याचे संदेश पाठवले.

आणि क्षणार्धात पृथ्वीवरचे अतिप्रगत मानवी जीवन, गाडीला ब्रेक लागावा त्याप्रमाणे, थांबायला सुरुवात झाली.

चारी खंडांवरचा ऊर्जेचा प्रवाह थांबू लागला. आणीबाणीच्या परिस्थितीत काही काळ उपयोगी पडेल म्हणून साठवलेला ऊर्जेचा साठा कामी येऊ लागला, पण तो फार दिवस टिकणार नाही याची शास्त्रज्ञांना जाणीव होती.

पण ह्याला काही अपवाद होते. खंड ३ आणि ४ मधील जमिनीवरची काही लहान शक्ति-केंद्रे नियमित चालू होती.

खंड ३ वरचा मुख्य कंप्यूटर दिल्लीत होता. तो निकामी झाला तेव्हा त्याच्या हाताखालचे पीकिंग, शंघाई, बँकॉक, सिडने, मुंबई इथले कंप्यूटर्स आणि अंतराळातली शक्ति-केंद्रे बंद पडायला हवी होती. आणि तसे झालेही—फक्त शंघाई आणि मुंबई इथले कंप्यूटर्स वगळल्यास. काही

कारणाने इथल्या कंप्यूटर्सवरचा दिल्लीचा ताबा गेलेला होता. आणि त्यामुळे दक्षिण चायना आणि दक्षिण भारत इथली शक्ति-केंद्रे अजून व्यवस्थित चालू होती!

आणि तोच प्रकार खंड ४ वरच्या कंप्यूटर्सबाबत घडला होता. कायरो-मधला खंड ४ चा मुख्य कंप्यूटर बंद पडला, पण बगदाद आणि प्रेटोरिया इथले त्याच्या हाताखालचे कंप्यूटर्स अजून चालू होते. बाकी सर्व भागांतले कंप्यूटर्स बंद पडले होते. त्यामुळे दक्षिण आफ्रिका आणि मध्यपूर्वेतली शक्ति-केंद्रे काम करत होती.

अशा वेळी मुंबईच्या टेलिव्हिजन केंद्रातून एक महत्त्वाची बातमी प्रसारित करण्यात येईल अशी सूचना जगभर जाहीर करण्यात आली. त्या बातमीची वेळ होती १२·०० दुपार ग्रीनिच मीन टाइम १७ जून २०७८. ही बातमी सर्वांना ऐकायला मिळावी म्हणून विजेचा तात्पुरता प्रवाह चारी खंडांत सोडण्यात येईल अशीही सूचना देण्यात आली. ऊर्जेच्या तुटपुंज्या साठ्यातून ही तरतूद करण्याजोगे महत्त्वाचे त्या बातमीत काय असेल ह्याची सर्वांना उत्सुकता होती.

ठरल्या वेळी टी० व्ही० स्क्रीन्सवर ह्या प्रोग्रॅमला सुरुवात झाली. पाच लोकांचा एक गट लोकांच्या दृष्टीसमोर आला. त्यांनी स्वतःची ओळख करून दिली. दलजितसिंह सौंध, विलियम मॉन्क्रीफ, कार्टर पॅटरसन, इल्या मोरोव्हिच आणि चांग तेंग. सर्वांच्यातर्फे विलियम बोलायला उठला.

"आम्ही पाची जण गेल्या शतकात ह्या पृथ्वीवरच वाढलो. तपमान कमी केले की जीवनाचा वेग मंदावतो आणि म्हणून मानवी शरीरे गोठवून जीवन-काल वाढवता येईल का हा प्रयोग आमच्यावर करण्यात आला. आमच्या शारीरिक आयुष्यांत फारशी वाढ न होता आम्ही शंभर वर्षांचा कालखंड ओलांडला. विसाव्या शतकातले धागेधोरे सोडून एकविसाव्या शतकात तुमच्यामध्ये आलो.

"तुम्ही आमचे स्वागत केलेत, आम्हांला काही कमी पडू दिले नाहीत, त्याबद्दल आम्ही तुमचे आभारी आहोत. तुमचे उपकार फेडण्याची संधी इतक्या लवकर आम्हांला मिळेल असे वाटले नव्हते—उलट, तशी परिस्थिती

येऊ नये हीच आमची इच्छा होती. पण दुर्दैवाने ती परिस्थिती आज आली आहे...

"आता मी तुम्हांला आम्ही काही महिन्यांपूर्वी रेकॉर्ड केलेला प्रोग्रॅम ऐकवतो. तो प्रोग्रॅम संपल्यावर हे टी० व्ही० ट्रॅन्स्मिशन बंद होईल. म्हणून मी आम्हा सर्वांतर्फे तुमचा निरोप घेतो."

आता रेकॉर्ड केलेला प्रोग्रॅम सुरू झाला. दलजितसिंह पडद्यावर आला. तो म्हणाला : "लोक हो, हा रेकॉर्ड केलेला प्रोग्रॅम केव्हा दाखवण्यात येईल हे मला माहीत नाही. आम्ही कदाचित त्या वेळी हयात नसू. हे रेकॉर्डिंग १ जानेवारी २०७८ ला करण्यात येत आहे. कदाचित हे तुम्हांला ऐकवण्याची परिस्थितीच येणार नाही. तसे झाले तर आमचा अंदाज खोटा ठरेल, पण त्यात आम्हांला आनंदच वाटेल.

"आम्ही विसाव्या शतकात जन्मलो. आमच्या आणि आमच्या आई-वडिलांच्या काळात विज्ञानाने आणि तंत्रज्ञानाने विलक्षण प्रगती केली. ती पुढच्या शंभर वर्षांत किती पुढे जाईल याचे आम्हांला आणि आमच्या सम-कालीन मानवांना कुतूहल होते.

"आम्ही पाच जण एवढे नशीबवान की आम्हांला प्रत्यक्ष त्या प्रश्नाचे उत्तर मिळाले. गोठवलेल्या परिस्थितीत आम्ही १९७७ मधून २०७७ मध्ये आलो. आम्ही जे काही पाहिले ते माझा मित्र कार्टर पॅटरसन सांगेल."

"आत्ता बोलला तो दलजितसिंह." कार्टर बोलायला लागला, "मी सर्व तपशील सांगत नाही. आम्हांला मुख्य फरक दिसला तो यंत्रावलंबनात. विसाव्या शतकात यंत्रांचा पुष्कळ उपयोग केला जात असे, पण त्यांचे नियंत्रण मानवाच्या हाती होते. एकविसाव्या शतकात हे नियंत्रण बहुतकरून गेले होते. प्रथमप्रथम बारीकसारीक बाबतींत निर्णय घेण्याचे काम यंत्रांवर सोपवण्यात आले. मग महत्त्वाच्या बाबतीतसुद्धा यंत्रे मानवी मेंदूची कामे करू लागली. मानवी विचारसरणीत असणारी दिरंगाई, अकार्यक्षमता जाऊन वेगाने निर्णय घेण्यात येऊ लागले. त्यामुळे २०७७ मध्ये जगाचे राहणीमान पुष्कळ सुधारले. १९७७ मध्ये कठीण वाटणारे प्रश्न २०७७ मध्ये सुटले होते. आम्हांला आनंद वाटला, पण एक प्रकारची अस्वस्थता पण वाटू लागली. इतके यंत्रावलंबन चांगले का? विशेषकरून एका बाबतीत ह्या प्रश्नाचे उत्तर

आमच्या मते नकारात्मक होते. आम्ही तसे बोलूनही दाखवले, पण एकविसाव्या शतकातल्या मानवाने आमची थट्टा केली. ही कोणती बाब होती? माझा सहकारी चांग तेंग खुलासा करेल."

चांग तेंगने आपल्या संथ आवाजात सांगायला सुरुवात केली. "कुठलीही संस्कृती तंत्रज्ञानात किती पुढे गेली हे तिच्या ऊर्जेच्या वापरावरून ठरवण्यात येते. २०७७ मध्ये मानव १९७७ पेक्षा शंभर पटीने जास्त ऊर्जेचा वापर करत होता. जवळजवळ अपरिमित सौरशक्ती उपलब्ध असल्याने १९७७ मध्ये भेडसावणारा ऊर्जेचा प्रश्न सुटला होता. पण ह्या शक्तीचे नियंत्रण सर्वस्वी कंप्यूटर्सवर अवलंबून होते. आणि ते तसेच राहणार हे दिसत होते. संहारक अस्त्रे वापरण्यापेक्षा शत्रूची शक्तिकेंद्रे नष्ट करण्याची सोय करण्यात आली होती. पण एकमेकांच्या भांडणात जगातली सर्वच शक्तिकेंद्रे नष्ट होण्याची पण शक्यता होती. आणि गंमत म्हणजे शक्तिकेंद्रांचा नाश करण्याचा महत्त्वाचा निर्णय कंप्यूटर्सवर सोपवण्यात आला होता. त्यामुळे मानवी चूक होणार नाही ही खात्री होती—पण यांत्रिक चूक कशावरून होणार नाही? 'अमुक पर्याय तपासून अखेरचा पर्याय म्हणून हा निर्णय घे' असे कंप्यूटरला सांगून शास्त्रज्ञ मोकळा झाला. पण अकल्पित असा वेगळाच पर्याय उपस्थित झाला तर? मग कंप्यूटरला योग्य निर्णय घेता येत नाही. अशा परिस्थितीत युद्धजनित स्थिती नसूनही चुकून हे कंप्यूटर सर्व शक्ति-केंद्रे नष्ट करण्याची शक्यता होती. अर्थात हा वेगळा पर्याय कोणत्या स्वरूपात उपस्थित होईल याची आम्हांला कल्पना नव्हती. हा पर्याय उपस्थित होणे असंभाव्य नाही, पण तसे क्वचितच घडेल. आणि त्या दृष्टीने बचावाची उपाययोजना हवी. ती २०७७ मधल्या मानवाने केली नव्हती आणि ती करायची त्याला जरूर वाटली नव्हती. म्हणून आम्ही ती अमलात आणली. तिची माहिती माझा मित्र इल्या मोरोव्हिच देईल."

इल्या लगेच मुद्द्यावर आला. "सर्व शक्ति-केंद्रे नष्ट न होता काही केंद्रे वाचावी ह्या दृष्टीने आमचा प्रयत्न होता. २०७७ मधली जागतिक ऊर्जाकेंद्रे चार खंडांच्या ताब्यात होती. त्यांतील खंड १ आणि २ ची सर्व केंद्रे अंतराळात होती. खंड ३ आणि ४ ची काही केंद्रे सौरशक्तीवर चालत नसून तेल, कोळसा आणि अणुशक्ती यांवर चालत होती. ही केंद्रे आम्हांला वाचवता

येतील असे वाटले. त्यांच्यावरचा कंप्यूटरचा ताबा दूर करणे हाच एक उपाय होता. आम्ही कंप्यूटर-नियंत्रणाची सखोल माहिती मिळवली. सर्वच भाग यंत्रावर अवलंबून असल्याने त्या नियंत्रणावर मार्ग काढणे शक्य झाले. मानवी मेंदू अजूनही यांत्रिक मेंदूवर मात करू शकत होता. दलजितसिंह आणि चांग तेंगने हे नियंत्रण शिथिल केले, खंड ३ मध्ये. तिथल्या मुख्य कंप्यूटरची भ्रामक समजूत करून देण्यात आली की मुंबई आणि शंघाई यांच्या ताब्यातल्या शक्तिकेंद्रांवर त्याचा अजून ताबा आहे. कार्टर, विलियम आणि मी अशा तिघांनी हाच प्रकार खंड ४ मधल्या केंद्रांवर केला. आता विलियम मॉन्क्रीफ ह्या आख्यानाचा समारोप करील."

विलियम पडद्यावर दिसायला लागला. "आम्ही केलेल्या तरतुदीमुळे सर्व शक्तिकेंद्रे नष्ट होण्याची पाळी येणार नाही अशी आशा आहे. आमच्या कार्यामुळे वाचलेली केंद्रे जगाच्या शक्तीच्या एकंदर अपेक्षेच्या फार तर तीन-चार टक्के शक्ती पुरवू शकतील—२०७८ मध्ये. पण ह्या शक्तीचा योग्य प्रकारे वापर करून मानवाला बंद पडलेली अंतराळातली सर्व शक्तिकेंद्रे आणि पृथ्वीवरची इतर केंद्रे सुरू करता येतील. अर्थात हा उपाय काही वर्षेच लागू पडेल—कारण आमच्या अंदाजाप्रमाणे पुढल्या ५० वर्षांत पृथ्वीवर एकही शक्ति-केंद्र राहणार नाही. त्या परिस्थितीत आम्ही वाचवलेली जमिनीवरची केंद्रे अगोदरच बंद झालेली असतील आणि आमच्या उपाययोजनेचा उपयोग होणार नाही. पण त्यापूर्वी कंप्यूटरने अखेरचा पर्याय वापरल्यामुळे आम्ही कल्पिलेली बिकट परिस्थिती उद्‌भवली तर काही केंद्रे चालू राहतील. ही रेकॉर्ड केलेली टेप लावली की तुम्हांला ही केंद्रे का चालू राहिली याचे गूढ उकलेल. म्हणून ही टेप मुंबईच्या टी० व्ही० केंद्रावर जपून ठेवण्यात येत आहे. यातले रेकॉर्डिंग गुप्त राहील—जोपर्यंत त्यावर नोंदलेल्या परिस्थितीत तिचे प्रकाशन करण्यात येत नाही...ज्या अर्थी तुम्ही हा प्रोग्रॅम ऐकत आहात त्या अर्थी ती परिस्थिती आलेली आहे. तुम्ही ह्या परिस्थितीतून बोध घ्याल अशी आमची आशा आहे. तसे झाले तर आमचे शंभर वर्षांचे गोठून राहणे सफळ झाले असे आम्ही समजू...नमस्कार!"

√ परिशिष्ट

यक्षांची देणगी

पृथ्वीपलीकडे जीवनसृष्टी असेल काय? ह्या प्रश्नाचा वैज्ञानिक पातळीवर अभ्यास केला जात आहे आणि त्यात खगोलशास्त्र, जीवशास्त्र, संख्याशास्त्र, तंत्रशास्त्र इत्यादी अनेक विषयांचा संबंध येतो. अद्याप पृथ्वीव्यतिरिक्त इतरत्र जीवशक्ती असल्याचा प्रत्यक्ष पुरावा हाती आलेला नाही; परंतु तरीदेखील आपल्या आकाशगंगेतील शंभर अब्ज ताऱ्यांपैकी फक्त एका सूर्याच्याच भोवती एकाच ग्रहावर जीवशक्ती नांदत असेल हे विधान अशक्य कोटीतले वाटते. उलट काही लक्ष जीवसृष्टी पृथ्वीवरील मानवजातीपेक्षा अतिप्रगत अवस्थेत आपल्या आकाशगंगेत नांदत असाव्यात असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे.*

प्रगत जीवसृष्टीला गणकयंत्राचा वापर करणे जरुरीचे वाटणार; कारण दैनंदिन जीवनातील अनेक कामे ही यंत्रे चोखपणे बजावू शकतात. प्रगतीचे एक चिन्ह म्हणजे कमीत कमी जागा व्यापून जास्तीत जास्त वेगाने निर्णयावर पोचण्याची आणि जास्तीत जास्त माहितीचा साठा करण्याची क्षमता असलेली गणकयंत्रे निर्माण करू शकणे. खोलीभर व्याप असलेली बोजड गणकयंत्रे जाऊन डेस्क आणि पॉकेट कॅल्क्युलेटर्स आले हे गेल्या तीस वर्षांतल्या मानवी तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे द्योतक आहे. पुढील पिढीत याहून सूक्ष्म गणकयंत्रे तयार होतील.

* पाहा : Carl Sagan: *The Cosmic Connection,* Dell Publishing Co., U.S.A. (1973).

जीवसृष्टी किती जरी प्रगत असली तरी तिला ज्या ताऱ्यापासून ऊर्जा मिळते त्यात नैसर्गिक बदल झाल्याने तो तारा त्या जीवसृष्टीला पोषक राहीलच असे नाही. बिकट परिस्थितीत आपले निवासस्थान सोडून दुसरीकडे—अधिक उपयुक्त ठिकाणी—आपल्यासाठी जागा शोधणे त्या जीवसृष्टीला आवश्यक होणार! अशा जीवसृष्टीपुढे पृथ्वीसारख्या उत्तम ठिकाणावर ताबा मिळवण्यासाठी उडत्या तबकड्यांतून हल्ला करण्यापेक्षा अधिक सुटसुटीत उपाय पण असतील...

कृष्णविवर

एखादी मोठी वस्तू स्वतःच्या गुरुत्वाकर्षणाने संकुचित होत गेली तर एक परिस्थिती अशी उद्‌भवते की ती वस्तूच बाहेरून दिसेनाशी होते. कारण त्या वस्तूच्या पृष्ठभागावरचे गुरुत्वाकर्षण इतके प्रचंड असते की त्यामुळे प्रकाशसुद्धा त्या वस्तूकडे खेचला जातो. अशा वस्तूला कृष्णविवर (Black Hole) म्हणतात. पृथ्वी संकोच पावत तिचा व्यास सेंटीमीटरपेक्षाही कमी झाल्यास तिचे कृष्णविवर होईल.*

कृष्णविवराच्या पृष्ठभागाजवळ गुरुत्वाकर्षणामुळे कालाची गती शून्यवत होते, असा आइन्स्टाइनच्या सापेक्षता-सिद्धांताचा निष्कर्ष आहे. म्हणून तिथे जरी काही क्षणच गेले असले तरी त्या तुलनेने कृष्णविवरापासून लांब अंतरावर अनेक वर्षे जाण्याचा संभव आहे! त्याचप्रमाणे कृष्णविवराजवळ जाणाऱ्या यानाला तिथल्या गुरुत्वाकर्षणामुळे मोठ्या 'Tidal Forces' ना तोंड द्यावे लागेल. ज्याप्रमाणे चंद्रामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागाची ओढाताण होऊन समुद्राला भरती येते त्याप्रमाणेच ह्या Tidal Forces मुळे यानाची (ते भक्कम नसले तर) मोडतोड होईल.

उजव्या सोंडेचा गणपती

'One Two Three . . . Infinity' ह्या पुस्तकात‡ जॉर्ज गॅमॉ याने

* पाहा : Joht Taylor: *Black Holes: The End of the Universe,* Souvenir Press, U. K. (1973).

‡ पाहा : George Gamow: *One Two Three . . . Infinity,* Viking Press, U.S.A. (1954).

मोबियस पट्टीचा उपयोग एखाद्या चपट्या जीवाला तीन डायमेंशन्सच्या अवकाशात (space) फिरवण्यात कसा करता येतो याचे वर्णन केले आहे. ही पट्टी चपटी असून तिला एक पीळ असतो. असाच पीळ तीन डायमेंशन्सच्या अवकाशाला पडला तर त्यात आपल्यासारखे जीव चार डायमेंशन्समध्ये फिरवले जाऊन डाव्याचे उजव्यात आणि उजव्याचे डाव्यात रूपांतर झाल्यासारखे वाटेल!

मूल कणांमध्ये असलेल्या स्पिनमुळे अवकाशात पीळ निर्माण होऊ शकेल अशी गणितीय कल्पना ॲशर पेरेस* आणि इतर काही गणितज्ञांनी मांडली आहे तिचा वापर ह्या कथेत केला आहे.

गंगाधरपंतांचे पानिपत

कॅटॅस्ट्रॉफे थियरी हा गणिताचा एक नवा भाग गेल्या दहाबारा वर्षांत उदयाला आला. 'अकस्मात घडणारे बदल' ह्या सदराखाली मोडणाऱ्या घटनांची दखल हे गणित घेऊ शकते असा याच्या समर्थकांचा दावा आहे. रेने थोम हा फ्रेंच गणितज्ञ ह्या शाखेचा जनक असून झीमन नावाच्या इंग्लिश गणितज्ञाने याचा बराच प्रचार केला आहे.†

अणू, रेणू इत्यादींची चर्चा करणाऱ्या शास्त्राचा—क्वांटम थियरीचा—विकास ह्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत सुरू झाला, तरी अद्याप त्याच्या मूळ सिद्धांतांबद्दल बराच वाद आहे. न्यूटनपासून चालत आलेल्या भौतिक शास्त्रात अमुक कारणांमुळे निश्चितपणे अमुक घडेल अशी जी भावना स्थिर झाली तिला क्वांटम थियरीने तडा दिला. ठराविक कारणांमुळे ठराविकच परिणाम होतील असे सूक्ष्म वस्तूंच्या व्यवहारात दिसून येत नाही हे अणुशास्त्राने दाखवून दिले. त्याच कारणामुळे एकाऐवजी अनेक संभाव्य गोष्टी घडू शकतील. प्रत्येक गोष्टीला साजेसे एक विश्व असून आपल्याला दर्शक

* पाहा : A. Peres : *Spinor Fields in Generally Covarient Theories*, Nuovo Cimento Supplemento *24*, 1 (1962).

† पाहा : E. C. Zeeman : *Classification of Elementary Catastrophes of Codimension*, $\leq$ 5, Coventry, U.K. (1974)

(observer) ह्या नात्याने त्यातले एकच दिसते, अशी कल्पना क्वांटम थियरीत प्रचलित आहे.*

धूमकेतू

धूमकेतू सूर्यमालेत लांबून येतात, सूर्याभोवती चक्कर मारून परत लांब जातात. त्यांचे वस्तुमान ग्रहाच्या मानाने पुष्कळ कमी असले तरी त्यांचे शेपूट पुष्कळ लांब (म्हणजे पृथ्वी ते सूर्य इतक्या अंतराइतकेसुद्धा) असू शकते. हे धूमकेतू जर पृथ्वीवर आदळले तर प्रचंड नुकसान, प्राणहानी होण्याची शक्यता असते; पण सुदैवाने इतक्या जवळ धूमकेतू येण्याचा प्रसंग 'बाय चान्स' कोटी वर्षांतून एकदाच घडेल!†

धूमकेतू आणि सूर्यमालेतील इतर घटक आपापल्या ठराविक कक्षेत गुरुत्वाकर्षणामुळे फिरणाऱ्या निर्जीव वस्तू आहेत हे विज्ञानाने सिद्ध केले असले तरी अजून जनसामान्यांत त्यांच्या 'इष्ट' आणि 'अनिष्ट' 'शक्ती'बद्दल बरेच गैरसमज आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

पुनरागमन

मानवजात तंत्रशास्त्रात जशीजशी जास्त प्रगत होत जाईल तसतशी तिच्या जीवनात यांत्रिकपणा येण्याची शक्यता आहे. अशा तऱ्हेचे अतिप्रगत जीवन एखाद्या विचारवंताला कंटाळवाणे वाटणार नाही का? ही भीती काही शास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ यांनी व्यक्त केली आहे.

पृथ्वीवर पूर्वी अशी अतिप्रगत वसाहत असण्याची शक्यता अनेक विज्ञानकथालेखकांनी मांडली आहे. पृथ्वीवर मानवी जीवन टिकू शकेल अशी शक्यता काही कोटी वर्षांपूर्वीपासून निर्माण झाली असली तरी आपला आदिमानवापासूनचा ज्ञात इतिहास तितका जुना नाही! मानवजात पुष्कळ जुनी असून पूर्वी अतिप्रगत परिस्थितीस पोचली असेल आणि हिमयुगा-

* पाहा : H. Everett III : *Relative State Formulation of Quantum Mechanics*, Reviews of Modern Physics, *29*, 454 (1957).

† पाहा : Fred Hoyle : *Highlights of Astronomy*, W. H. Freeman, U.S.A. (1975).

सारख्या प्रचंड नैसर्गिक आपत्तीस तोंड देता देता जवळ जवळ नामशेष झाली असेल अशी शक्यता नाकारता येणार नाही.

दृष्टीआड सृष्टी

व्हायकिंग यानांनी मंगळावरच्या पृष्ठभागाची वरवरची छाननी करून तिथे जीवाणू इत्यादी नसल्यामुळे मंगळावर जीवसृष्टी नसेल असा निष्कर्ष काढला. परंतु पृष्ठभागाखाली एखादी अतिप्रगत जीवसृष्टी कशावरून वास करत नसेल?

धोंड्र

गेल्या काही वर्षांत, सूर्यमालेत भ्रमण करणाऱ्या आणि कधीकधी पृथ्वीवर येणाऱ्या मीटिओराइट्सपैकी काहींमध्ये मोठे रासायनिक अणू सापडले. काही अणू जीवसृष्टीचे मूलघटक समजले जातात. त्यामुळे पृथ्वीपलीकडे, सूर्यमाले-पलीकडील विशाल प्रदेशात जीवसृष्टीला पोषक परिस्थिती असेल का असा प्रश्न शास्त्रज्ञांपुढे आहे. रेडिओ आणि मायक्रोवेव्ह यांच्या द्वारे केलेल्या वेधांमुळे पण ह्या प्रश्नाला चालना मिळाली आहे. रासायनिक अणूपासून जीवसृष्टी आणि पुढे तिचा विकास होऊन उत्तम मेंदूची घडवणूक एखाद्या मीटिओराइटमध्ये होऊ शकेल का?

पुत्रवती भव

निसर्गामध्ये जीवनिर्मिती होताना लिंगांच्या बाबतीत एक तऱ्हेचा समतोल आढळतो. मानवजातीत स्त्री व पुरुष यांच्या संख्येत समानता आढळून येते. सामाजिक कारणामुळे अनेक वेळा एखाद्या जोडप्याला मुलगा व्हावा असे वाटते—पण मानवजातीच्या सुदैवाने नवीन होणाऱ्या बाळाचे लिंग कुठले असावे हे ठरवण्याची किल्ली निसर्गाने मानवाकडे अजून दिलेली नाही.

जीवसृष्टी कशी होते, स्त्री-पुरुष हा फरक नवीन होणाऱ्या जीवात केव्हा होतो आणि कुठल्या स्वरूपात होतो हे विज्ञानाला थोडे थोडे कळायला लागले आहे.* परंतु जोपर्यंत जनसामान्यात अंधश्रद्धा बोकाळली आहे

* पाहा : Stephen Black : *The Nature of Living Things*, Heinmann, Secker and Warburg U.S.A. (1972).

तोपर्यंत अशा मूलभूत प्रश्नांची गुरुकिल्ली शास्त्रज्ञांना मिळणे किती योग्य ठरेल? अशा शोधांचा वापर मानवजात समंजसपणे करेल का?

ट्रॉयचा घोडा

सुमारे पन्नास वर्षांपूर्वी प्रख्यात शास्त्रज्ञ पॉल डिरॅक यांना इलेक्ट्रॉनचे मूळ गणित मांडताना एका नवीन मूलकणाच्या अस्तित्वाचा साक्षात्कार झाला. इलेक्ट्रॉनइतकेच ह्या नवीन मूलकणाचे वस्तुमान असून त्याचा विद्युत्भार इलेक्ट्रॉनच्या बिलकूल उलटा असतो. इलेक्ट्रॉनचा विद्युत्भार ऋणात्मक तर ह्याचा धनात्मक. ह्या मूलकणाला पॉझिट्रॉन म्हणतात, आणि तो अनेक बाबतींत सृष्टीत इलेक्ट्रॉनच्या उलट समजला जातो. इलेक्ट्रॉन आणि पॉझिट्रॉन एकत्र आणले तर परस्परांचा नाश करून ऊर्जेची निर्मिती करतात.

पुढे हा शोध अधिक व्यापक स्वरूपाचा आहे असे दिसून आले. इलेक्ट्रॉन-प्रमाणे इतर अनेक मूलकणांचे 'उलटे' मूलकण सृष्टीत आहेत. जर इलेक्ट्रॉन, प्रोट्रॉन, न्यूट्रॉन इत्यादींपासून बनलेली वस्तू 'Matter' म्हणून ओळखली गेली तर बरोबर तशीच वस्तू उलट्या मूलकणांपासून—पॉझिट्रॉन, अँटीप्रोटॉन आणि अँटी-न्यूट्रॉन यांपासून—बनू शकेल आणि तिला 'Anti-Matter' म्हणतात. लांबून पाहिल्यास मॅटर आणि अँटीमॅटर यांच्यामधला फरक कळणे अशक्यप्राय आहे. कारण दोन्हींच्या प्रकाशाबरोबरच्या वागणुकीचे गुणधर्म समान आहेत. जवळ आले की मॅटर आणि अँटीमॅटर एकमेकांचा नाश करून ऊर्जानिर्मिती करतात.

आपल्या आसमंतात मॅटरचे प्राधान्य असल्याने अँटीमॅटरला इकडे फार काळ टिकून राहता येत नाही. परंतु दूरवरची एखादी आकाशगंगा अँटी-मॅटरची असल्याची शक्यता नाकारता येणार नाही!

नौलखा हाराचे प्रकरण

'टाईम मशीन'प्रमाणे भविष्यकाळात जाता येईल, पण परत भूतकाळात येता येईल का? आइन्स्टाइनच्या सिद्धांताप्रमाणे पहिले शक्य आहे, पण दुसरे नाही! परंतु आइन्स्टाइनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धांतातून काही

लोकांनी अशी शक्यता असणारी विश्वे गणिताने शोधून काढली. गोडेल नावाच्या शास्त्रज्ञाने असे विश्व शोधून काढले की ज्यात एखादा माणूस भविष्यातून भूतकालाकडे जाऊ शकेल!*

परंतु हे गणित प्रत्यक्षात भूतकालाकडे जाणारी याने निर्माण करण्यात मदत करील ही शक्यता दिसत नाही!

अखेरचा पर्याय

भविष्यकाळात मानवसंस्कृती यंत्रावलंबी झाली असेल व तिची यंत्रे चालवायला सौरशक्तिकेंद्रे वापरत असेल. एखाद्या मानवसमाजाला असहाय स्थितीत आणून सोडायला ही शक्तिकेंद्रे बंद करणे हा एक भविष्यकालीन युद्धाचा प्रकार ठरेल! आणि ही युद्धे मानवी तंट्यामुळे सुरू न होता यांत्रिक चुकीमुळे होण्याची शक्यता नाकारता येणार नाही!

* पाहा : K. Godel: *An Example of a New Type of Cosmological Solution of Einstein's Field Equations of Gravitation,* Reviews of Modern Physics, *21*, 447 (1949).

‘मौज प्रकाशन गृहा’ ने
प्रकाशित केलेल्या
जयंत नारळीकर यांच्या
विज्ञान-कादंबऱ्या

प्रेषित

पाचवी आवृत्ती

सत्तर रुपये

❁

वामन परत न आला

सहावी आवृत्ती

शंभर रुपये

❁

व्हायरस

चवथी आवृत्ती

नव्वद रुपये

❁

अभयारण्य

दुसरी आवृत्ती

सत्तर रुपये

मौज प्रकाशन गृह

यक्षांची देणगी जयंत नारळीकर मौज